ज्ञानदीप लावू जगी

पुणे नगर वाचन मंदिर

स्थापना : ७ फेब्रुवारी १८४८

email : pnvm1848@gmail.com
www.punenagarvachan.org

पुस्तकाचे नाव	:	भारतवर्षाचा संक्षिप्त इतिहास मुसलमानी व मराठी रियासत
लेखक	:	डॉ. बालकृष्ण
भाषांतरकार	:	बाळकृष्ण रामचंद्र कोलटकर
प्रकाशक	:	आर्य बुक डेपो, कोल्हापूर
प्रकाशन वर्ष	:	१९२९
मूळ ग्रंथ प्रत	:	महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था, पुणे

पुणे नगर वाचन मंदिर

अंकेक्षण (डिजीटायझेशन) प्रकल्प

अंकेक्षण रूपांतर - २०२०

भारतवर्षाचा संक्षिप्त इतिहास.

मुसलमानी व मराठी रियासत.

डॉ. बाळकृष्ण.

भारतवर्षाचा संक्षिप्त इतिहास

(सचित्र)

भाग २ रा--मुसलमान आणि मराठे

—लेखक—

डॉ० बालकृष्ण, एम्. ए., पीएच्. डी. (लंडन),

प्रिन्सिपॉल, राजाराम कॉलेज, कोल्हापूर.

—भाषांतरकार—

बाळकृष्ण रामचंद्र कोलटकर, एम्. ए.,

मुख्याध्यापक, विद्यापीठ, कोल्हापूर.

सन १९२९ इ.] [किंमत १-०-०

प्रकाशक—
आर्य बुक डेपो,
कोल्हापूर.

ब्लॉक मेकर्स —
(१) वाघळे आणि कंपनी,
मुंबई.
(२) लक्ष्मी आर्ट प्रिन्टिंग
वर्क्स, मुंबई.

ब्लॉक प्रिंटर्स--
लक्ष्मी आर्ट प्रिन्टिंग
वर्क्स, मुंबई.

पुस्तक मुद्रक —
आर्यभानु प्रेस,
कोल्हापूर.

या लेखकाचीं इतर पुस्तकें

(In English)

1.	Commercial Relations between India and England (Routledge, London.)	14/-s
2.	Hindu Philosophers on Evolution	10-0-0
3.	Shivaji the Great (In press)	5-0-0
4.	The Industrial Decline in India.	3-0-0
5.	Demands of Democracy.	2-0-0
6.	Commercial Survey of Kolhapur.	1-0-0
7.	From the Counter to the Crown. (In prep.)	
8.	Hindu Economics. (In preparation)	
9.	Vedic Psalms, (In the Press)	2-0-0
10.	Distribution of Real Property in Kolhapur,	1-0-0

(In Hindi)

11.	The Principles of Economics, Vol. I.	2-0-0
12.	History of India. 2 Vols.	2-8-0
13,	Ancient Polity.	0-8-0
14.	Modern Constitutions,	1-4-0
15.	Veda-the Word of God.	1-8-0
16.	Philosophy of Yajna.	0-4-0
17,	Sukraniti with notes and explanations. (In the press)	2-0-0
18.	History of India. (In Marathi) 3 parts.	2-8-0

Arya Book Depot. *D. B. Taraporevala Sons & Co.,*
Kolhapur. *BOMBAY.*

भारतवर्षाचा संक्षिप्त इतिहास, भाग १ ला.

अभिप्राय.

श्री. पंत प्रतिनिधि चीफ ऑफ औंध— असा इतिहास अदृष्टपूर्व असल्यानें आह्मांस तो फारच आवडला. विद्यार्थ्यांना व वाचकांना उपयुक्त माहिती, प्रश्नमाला, सारांश, सनावली, नकाशे व भारतीय कलादर्शक चित्रें यांनीं ओतप्रोत भरलेलें हें मराठी भाषेंतील पहिलेंच पुस्तक आहे, व यांतच त्याचें वैशिष्ट्य व अपूर्वत्व आहे. एकंदरींत हें पुस्तक अत्यंत उपयुक्त, बोधप्रद, मनोरंजक व इतिहास या नांवास शोभेल असें यथार्थ अतएव संग्राह्य आहे. प्राचीन भारताची इतकी व्यवस्थित माहिती देणारीं पुस्तकें मराठींत थोडीच आहेत. प्राथमिक शिक्षण;

ज्ञानप्रकाश— हा सर्व वृत्तांत त्रोटक स्वरूपाचा असला तरी त्यावरून आपल्या पूर्वजांनीं या देशाचें वैभव वाढविण्यास कसकसे परिश्रम केले याची चांगली कल्पना येते. प्राचीन भारताचा हा इतिहास पाहिला ह्मणजे आपली संस्कृति, आपल्या चालीरीति, आपल्या आवडीनिवडी, किंबहुना आपले अवगुण आज हजारों वर्षें कसे अबाधित परंपरेनें चालत आले आहेत हें चांगलें लक्षांत येतें............महाराष्ट्र वाचकांकडून या पुस्तकाचें योग्य स्वागत होईल अशी आह्मांस आशा आहे.

विविध ज्ञानविस्तार— हें पुस्तक विद्यार्थ्यांसाठीं लिहीलें असलें तरी आपल्या देशाच्या प्राचीन कालाची व तत्कालीन स्थितीची ओळख करून घेणाऱ्या इतर वाचकांनीं तें अवश्य वाचावें. आपल्या देशाचा प्राचीन काल किती उज्वल होता, विद्या, कला व ऐश्वर्य हीं येथें कशीं नांदत होतीं, त्या कालांत कसे पराक्रमी राजे होऊन गेले व त्यांनीं भारतवर्षाच्या कीर्तींत कशी भर टाकली

यांची ओळख या पुस्तकांत डॉ. बाळकृष्ण यांनीं थोडक्यांत पण उत्तम रीतीनें करून दिली आहे.

केसरी— अगदीं प्राचीन कालापासून मुसलमानांच्या स्वाऱ्या पर्यंतचा म्हणजे रजपूत कालापर्यंतचा इतिहास थोडक्यांत पण सुसंबद्ध रीतीनें या पुस्तकांत दिला आहे. इतिहासलेखनाचें धोरण या पुस्तकांत सर्वत्र राखलें आहे. माहिती देतांना लेखकानें पक्षपात न दाखवितां सारखीच गुणग्राहक बुद्धि दाखविली आहे. प्राचीन भारतीय वैभवाचें साधार वर्णन जागोजाग प्रसंगानें आलें आहे. जुन्या शिल्पकलेची व चित्रकलेची कल्पना येण्यासाठीं भरपूर चित्रें दिलीं आहेत. हिंदुस्थानाच्या प्राचीन इतिहासाची या पुस्तकांत आहे तेवढी तरी माहिती प्रत्येकास असली पाहिजे.

The Indian Daily Mail :-- ...... Many of the existing text-books on Indian History give unnecessary details regarding kings and ignore important phases of social, economic and other activities of the times ...... The book under review gives a correct account of the political and social history of the period and omits unnecessary details. This book will be very useful to students who study Indian history in Marathi.

The Bombay Chronicle:— It is a well-written book giving the actual picture of the life of the people, religious, social, political, and economic from the Vedic times to the coming of Muslim conquerors.........Whatever is given is useful and well stated

Prof. N. S. Takakhav;— With the natural awakening that has recently aroused the attention of the average citizen to a study of the nation's past, it was really astonishing that no book on the subject should have so far appeared on the subject in Maharashtra. Dr. Bal Krishna has rendered a distinct service to the Marathi reader.

दोन शब्द

प्रस्तुत इतिहास प्रसिद्ध करण्याचा उद्देश आह्मी प्रथम भागांत सांगितलाच आहे. ज्यांना फक्त मुसलमान व मराठे यांचाच इतिहास वाचावयाचा असेल, त्यांना सोईचें व्हावें ह्मणून हा भाग स्वतंत्र प्रसिद्ध केला आहे. प्रचलित ऐतिहासिक पुस्तकांतील मुसलमानी नांवें अशुद्ध लिहिलीं जातात, त्यांचे शुद्ध उच्चार आह्मी प्रस्तुत भागात दिले आहेत; परंतु विशेष प्रचारांत असलेलीं नांवें अशुद्ध असलीं तरी वाचकांचा घोटाळा होऊं नये ह्मणून तशींच ठेविलीं आहेत.

हें पुस्तक लिहिण्याच्या बाबतींत ज्या ज्या गृहस्थानीं मला उत्साहानें व कळकळीनें मदत केली त्यांचा मी अत्यंत ऋणी आहे; व त्यांचे, त्याचप्रमाणें बऱ्याच म्युझीअमचे व आर्ट ग्यालरीचे क्युरेटर्स, आर्केआलाजिकल डिपार्टमेंटचे व्यवस्थापक व इतर सद्गृहस्थ यांनीं आपल्याकडील चित्रें व नकाशे छापण्याची मला परवानगी देऊन पुस्तकाला शोभा आणिली, त्यांचेंही आभारप्रदर्शन मी पहिल्या भागांतच केलें आहे. पुस्तकांत जे कांहीं दोष नजरचुकीनें राहिले असतील, ते सर्व पुढील आवृत्तींत दूर होतील अशी आशा आहे.

इतिहासाध्यापकासाठीं दहा नियम.

(१) शिकवावयाचा पाठ स्वतः तयार केल्याशिवाय व नकाशे आणि चित्रें यांच्या साहाय्याशिवाय शिकवूं नये. (२) इतिहासांतील पाठ मराठी क्रमिक पुस्तकांतील पाठाप्रमाणें विद्यार्थ्यांना सर्वच वाचावयास सांगूं नये. (३) वर्गांत इतिहास कधींही शिक्षकानें वाचून दाखवूं नये; कारण त्यामुळें विद्यार्थी दुर्लक्ष करितात. (४) विद्यार्थ्यांना घरीं उत्तरें लिहिण्यासाठीं निदान दोन प्रश्न देण्यास विसरूं नये; लेखनानें विद्यार्थ्यांच्या ठिकाणीं आपल्या मनांतील विचार सुटसुटीत रीतीनें प्रगट करण्याची शक्ति वाढते. (५) शिकविलेल्या भागांतील प्रश्न वारंवार विचारल्याशिवाय केव्हांही राहूं नये. (६) विद्यार्थ्यांची घोकंपट्टीची संवय शक्य तितकी मोडून टाकावी. (७) विषयाचें पृथक्करण करून, सारांश व गोष्टी सांगून किंवा तुलना करून विषय सोपा व विशद करावा. (८) शंका विचारणें व चतुरपणें विषयाचें ग्रहण करणें या बाबतींत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावें. (९) चित्रें व नकाशे यांचें सूक्ष्मदर्शक यंत्राच्या साहाय्यानें निरीक्षण करून त्यांपैकीं प्रत्येकांतील विशेष विद्यार्थ्यांना समजून द्यावेत. (१०) नेमलेल्या क्रमिक पुस्तकाशिवाय इतिहासाचीं इतर पुस्तकें वाचून, ऐतिहासिक स्थळें प्रत्यक्ष पाहून व शक्य त्या इतर मार्गांनीं ऐतिहासिक माहिती मिळविण्याची व इतिहासाकडे चिकित्सक दृष्टीनें पाहण्याची विद्यार्थ्यांत आवड उत्पन्न करावी.

बालकृष्ण.

शुद्धिपत्र.

हें पुस्तक छापतांना कांहीं शब्दांवर अनुस्वार जरूर नसतां राहिले आहेत; व कांहीं अनुस्वार गेलेले आहेत; या साठीं आह्मी दिलगीर आहोंत. ज्या महत्वाच्या चुका आमच्या दृष्टींत आल्या त्या खालीं दिल्या आहेत.

पान	ओळ	अशुद्ध	शुद्ध
३	४	झाला	झाली
१७	२१	गुलामाचे	गुलामांचे
१८,२१	११,१	अथवा	आणि
२१,२२,	२८,३	बलबान	बलबन
२१	२२	गूण	गुण
३२	१	मुलगा बुगराखान	वंश
३३	२	दोआब	गंगा--यमुना मधील दोआब
३८	२२	पुर्वेकडील	पूर्वेकडील
३९	१२	परमेश्वराचा	परमेश्वराचीं
४६	१०	राठोडचा	राठोड
४७	२४	आजरामर	अजरामर
५१	६	१५९६	१५९३
,,	१८	१५३७	१५३६
५२	२५	मुदगजवळ भोगपर	मुदगलजवळ भोगपूर
६०	२	५ वें	१ लें
,,	१७	स्वारींबरोबर	स्वाऱ्यांबरोबर
६१	१	ह्मणूं	ह्मणवूं
७०	१०	राहीले	राहिले

पान	ओळ	अशुद्ध	शुद्ध
९४	२०	घडवून	हा शब्द नको
९९	१२	जळव	जवळ
१०४	३	व्यापाऱ्यांना.	व्यापाऱ्यांकरितां
,,	१९	८००० हजार	८ हजार
११४	२	राजा जसवंतसिंह व त्याचा	राजा जसवंतसिंहाचा
१८४	१	वाळाजी	बाळाजी
१८६	३	कराड	कऱ्हाड
१८८	४	त्यांच्या	त्यांचा
१९६	२५	नाहीं	नाहीं;
१९९	१२	इंग्रजांचा अंमल	इंग्रजांचा दिल्लींत अंमल
२०१	९	लष्करी;	लष्करी व

इतर पुस्तकांत लिहिल्याप्रमाणें आम्हीही खालील शब्द दोन्ही प्रकारें उपयोगांत आणिले आहेत.

हिंदु–हिंदू	महमुद--महमूद
हिंदुस्तान--हिंदुस्थान	बादशहा--बादशाह
शिकंदर--सिकंदर	महम्मद--मुहम्मद
अलाउद्दीन--अल्लाउद्दीन	फिरोज--फीरोझ
संधि--संधी	चांदबीबी--चांदबिबी
फारसी--पारसी	उंधेरी--अंधेरी.

भारतवर्षाचा संक्षिप्त इतिहास

भाग दुसरा-मुसलमान व मराठी रियासती

मध्ययुगीन भारतवर्ष

प्रकरण	१ लें	मुसलमानी राज्याची स्थापना	१
,,	२ रें	गुलाम वंश व खिलजी वंश	१७
,,	३ रें	तघलक, सय्यद व लोदी वंश	३१
,,	४ थें	हिंदुस्तानांतील लहान लहान राज्यें	४०
		राजवंशावली	५५

मोंगल साम्राज्य

प्रकरण	१ लें	बाबर	६०
,,	२ रें	हुमायून	६८
,,	३ रें	शेरशहा सूर	७५
,,	४ थें	अकबर	८२
,,	५ वें	जहांगीर	९८
,,	६ वें	शहाजहान	१०६
,,	७ वें	औरंगजेब	११२
,,	८ वें	मोंगल वंशाचा ऱ्हास	११९
,,	९ वें	सिखांचा उदय	१२९
,,	१० वें	मुसलमान रियासतींबद्दल स्फुट विचार	१३३

मराठी साम्राज्य

प्रकरण	१ लें	शिवाजीची पूर्वपीठिका	१४०
,,	२ रें	शककर्ता शिवाजी	१४५

,,	३ रें	छत्रपति संभाजी		१६६
,,	४ थें	शिवाजी (शाहू व राजाराम		१७१
,,	५ वें	शिवाजी २ रा व ताराबाई		१७६
,,	६ वें	बाळाजी विश्वनाथ पेशवा		१८१
,,	७ वें	बाजीराव	,,	१८४
,,	८ वें	बाळाजी बाजीराव	,,	१९०
		संस्मरणीय काळ व गोष्टी		१९८

चित्रांची यादी.

सोमनाथाचें देवालय, महमूद	८
पृथ्वीराजांचा दरबार	९
पृथ्वीराज संयुक्तेसह	१६
जयचंदचा दरबार	१७
कुतुब मिनार, पृथ्वीराजाचें देवालय	१८
पृथ्वीराज व पठाण राजे	१९
कैकुबादचा दरबार, अल्तमशाची कबर	२२
राणी पद्मिनी, देवगिरी किल्ला	२३
राणी पद्मिनीचा महाल	२४
चितोडगड कीर्तीस्तंभ	२५
महंमद तघलक	३२
गयासुद्दीनचा दरबार	३३
फिरोजशहा व त्याची लाट,	३४
तैमुरलंग, तघलकाबाद	३५
जाम-इ-मशीद, अटलादेवी मशीद	३८
गौर येथील मशीद व मुहाफिझखानाची मशीद	३९
जहाजमहाल	४०
रूपमती आणि बाजबहादुर	४१
पठाण व हिंदू साम्राज्यांतील नाणीं	४८
चांदबिबी, शहाजी, मलीक अंबर	४९
आदिलशाही बादशहा—विजापूर	५०
इब्राहीम रोझा, बोलघुंबद	५१
विजयनगरचा सामान्य देखावा	५४
विजयनगरांतील हत्तिखाना	५५
पठाण साम्राज्याचा नकाशा	५६
असीरगड व चंदेरी	५७

गझनी येथील बाबरची कबर	६०
बाबरचा दरबार, हुमायूनची कबर	६१
मोंगल साम्राज्याचा नकाशा	७२
शेरशहा	७३
शेरशहाची कबर	८०
मोंगल साम्राज्यांतील नाणीं	८१
मोंगल बादशहा	८२
अकबराचा दरबार	८३
ग्वाल्हेरचा किल्ला	८४
जयमल व पत्ता यांचे हत्ती	८५
प्रतापसिंह, टोडरमल, मुल्ला दोप्याजा	८६
बीरबल	८७
महाराणी जोधाबाईचा महाल	९०
चौसष्ट खांबा	९१
हिरन मिनार, पंचमहाल, बीरबलचा महाल, चिश्तीची कबर,	९४
अकबराच्या कबरेचे महाद्वार	९५
अकबरचा धार्मिक वादविवाद	९६
जहांगीर पोलो खेळत आहे	९७
राण्या पोलो खेळत आहेत	९८
अकबर, महाबत, अलीमर्दान	९९
नूरजहान—वाघाची शिकार	१०२
इतमादुद्दौलाची कबर, शहाजहान, अकबर व जहांगीर	१०३
मयूरसिंहासनावरील शहाजहान	१०६
दिवान-इ-आम	१०७
शहाजहानची कचेरी	११०
जुम्मा मशीद—दिल्ली	१११

ताजमहाल १११२
औरंगजेबाचा दरबार ११३
औरंगजेबाची मिरवणूक १२०
दिवाण--इ--आम १२१
औरंगजेब व गोवळकोंड्याचा वेढा १२४
औरंगजेबाची कबर, बऱ्हाणपूरचा किल्ला १२५
नादिर व शेवटचे मोंगल बादशहा १३२
सिख गुरु १३३
मराठेराजे व संतमंडळ, अफझुलखान १५२
राजा जयसिंह, राजा जसवंतसिंह, दिलेरखान, शाइस्ताखान १५३
रायगढ १६०
सिंहगढ, राजगढ, पुरंदर १६१
पेशवे १८४
आहमदशहाचा दरबार, आहमदशहा अब्दाली १८५
पानिपतचा संग्राम व्यूह १९८
सवाई माधवरावाचा दरबार १९३

भारतवर्षाचा संक्षिप्त इतिहास.

विभाग दुसरा.

मध्ययुगीन भारतवर्ष.

प्रकरण १ लें.

मुसलमानी राज्याची स्थापना.

१. **सहाव्या शतकांतील अरबांची स्थितिः—** अरबस्तान हा प्रदेश प्रायः शुष्क, निर्जन, नापीक आणि निर्जल असा आहे. परंतु अशा या प्रदेशांतही कांहीं ठिकाणें सुपीक असल्यानें त्या ठिकाणीं वसति आहे. पश्चिमेकडील भाग अधिक सुपीक असल्याकारणानें तेथें लोकवस्ती अधिक दाट आहे. सहाव्या शतकाच्या शेवटीं येथील लोकांची धार्मिक स्थिति निकृष्टावस्थेला पोंचली होती. लोक निरनिराळ्या हजारों देवांची, तसेंच भूत, प्रेत, तारका, वृक्ष इत्यादि निर्जीव पदार्थांची पूजा करीत असत. ते अंधश्रद्धाळू असून आपापसांत सदोदित भांडणें आणि युद्धें करीत असत. मक्केस काबा नांवाचा एक दगड आज पुष्कळ वर्षांपासून आहे. त्याच्या चारी बाजूला ३६५ मूर्ति असून त्या वेळीं त्यांची पूजा केली जात असे.

२. **महंमद पैगंबरः–** इ. स. ५७० सालीं या अरबस्तानांत एक महापुरुष जन्माला आला. या शक्तिशाली पुरुषाचें नांव महंमद होय. त्यानें सर्व जगाच्या इतिहासांत मोठी क्रांति घडवून आणिली.

देशाची अवनति पाहून महंमदाचें अंतःकरण अतिशय दुःखित झालें आणि ही दुःस्थिति नाहींशी करण्यासाठीं त्यानें जिवापाड प्रयत्न केला. त्याची शिकवण अशी होती कीं, या जगाचा उत्पत्ति-कर्ता, नियन्ता, आणि हर्ता असा एक परमेश्वर आहे; त्याचीच फक्त पूजा केली पाहिजे; मूर्तिपूजा करणें पाप आहे; प्रार्थना, उपासना, व्रताचरण, दान इत्यादिकांनीं आणि मद्याच्या त्यागानें ईश्वरप्राप्ति होते. या उपदेशामुळें मूर्तिपूजक लोक त्याचे शत्रू बनले आणि महंमदाचा नाश करण्याची संधि पाहूं लागले. यामुळें इ. स. ६२२ मध्यें महंमदाला मक्केहून मदिनेला पळून जाणें भाग पडलें. याच वर्षापासून मुसलमानांचा **हिजरी शक** सुरू झाला. मदिनेला गेल्यापासून महंमदानें तरवारीच्या जोरावर आपल्या धर्माचा प्रचार करावयास सुरवात केली. इ. स. ६३२ मध्यें महंमद मरण पावला. पण त्यावेळेपर्यंत सगळ्या अरबस्तानांत त्याच्या नवीन धर्माचा प्रचार झाला होता. या नवीन धर्माचें नांव '**इस्लाम**' ह्मणजे 'शान्ति प्राप्त करून परमेश्वराच्या इच्छेनुसार कार्य करणें' असें ठेवण्यांत आलें; आणि या धर्माच्या अनुयायांनां 'अहले इसलाम, मुसल्लम' अथवा 'मुसलमान' ह्मणजे 'श्रेष्ठ, महाशय' असें म्हणूं लागले.

३. **मुसलमानांचे विजयः**-या नवीन धर्मानें अरब लोकांतील दुफळीचा नाश होऊन त्यांच्यात संघटना झाली. ते पूर्वीप्रमाणेंच अडदांड, क्रूर, युद्धप्रिय होते; पण त्यांनीं पूर्वीची आपापसांतील भांडणें बंद केलीं. व आपलें सर्व शौर्य व क्रूरता दुसऱ्या जातींना जिंकणें आणि तरवारीच्या जोरावर स्वधर्म प्रचार करणें या कामीं लावलीं. त्याचा परिणाम असा झाला कीं १०० वर्षांच्या आंत इराण, टर्की, तार्तरी, चीन, मिसर, उत्तर आफ्रिका, स्पेन आणि सिंध हे देश जिंकले गेले. इतक्या झपाट्यानें धर्माचा प्रचार होणें ही गोष्ट आश्चर्यदायक आहे; हे सर्व विजय महंमद पैगंबराच्या कृपेनें प्राप्त झाले, असें वाटल्यानें मुसलमान लोक त्यास परमेश्वराचा प्रेषित म्हणूं लागले. हल्लीं मुसलमानांची संख्या १६ कोटि आहे. त्यांपैकीं हिंदुस्थानांत ७ कोटि मुसलमान आहेत. हिंदुस्थानची फार दिवसांपासून 'सुवर्णभूमि' अशी प्रसिद्धि होती.

त्याच प्रमाणें येथील लोकही मूर्तिपूजक असल्या कारणानें असल्या समृद्ध देशांत स्वधर्माचा प्रसार करावा, येथील लोक जिंकून राज्य स्थापावें, धन, दासी इत्यादिकांचा उपभोग घ्यावा, अशी इच्छा साहजिकच मुसलमानांच्या मनांत उत्पन्न झाली.

४ **सिन्धप्रांतावर स्वारीः**– इ. स. ६३५ त अबुलआसनें जलमार्गानें सैन्य आणून पश्चिम किनाऱ्यावर स्वारी करून ठाणें शहर लुटलें, परंतु रजपूत वीरांनीं त्याचा पराजय करून त्यास ठार मारिलें. इ. स. ६६४ त मुहल्लभ यानें अफगाणिस्तानच्या मार्गानें येऊन मुलतान लुटलें व पुष्कळ लोकांना बंदिवान करून तो घेऊन गेला. इ. स. ७१२ मध्यें **महंमद बिन कासीमनें** फार मोठें सैन्य घेऊन सिंध प्रांतावर स्वारी केली. महंमद बिन कासीम हा अतिशय शूर, बुद्धिमान्, रुबाबदार आणि मुत्सद्दी होता. सिंधचा राजा दाहर व त्याची राणी यानीं अतिशय शौर्यानें युद्ध केलें. परंतु यावेळीं जैन व बौद्ध हे धर्म सिंधप्रांतांत प्रचलित असल्यामुळें ठिकठिकाणीं बौद्ध भिक्षूंनीं व जैन श्रावकांनीं युद्ध करूं नका, युद्धांत हिंसा होते, ती धर्मविरुद्ध आहे अशी राजे लोकांना आज्ञा केली. पण राजानीं ही आज्ञा मानिली नाहीं तेव्हां श्रावकांनीं मुसलमानांच्या करितां नगरांचीं द्वारें खुलीं केलीं. पुष्कळ देशद्रोही जाठ व मीड लोक कासीमला जाऊन मिळाले. अशा रितीनें सर्व सिंधप्रांत, व मुलतान, हे देश कासीमनें जिंकिले. कल्पनातीत द्रव्य आणि दासी मुसलमान लोकांना मिळाल्या. आणि जर कासीम आपल्या खलीफाच्या क्रोधाला बळी पडला नसता, तर हिंदुस्थानचा त्यानें यापेक्षांही अधिक भाग जिंकला असता. असें सांगतात कीं, राजा दाहरला परिमलदेवि व सुरजदेवि नांवाच्या दोन अति सुंदर मुली होत्या. त्यांना खलीफाकडे पाठवून देण्यांत आले. तेव्हां कासीमचा सूड उगवण्या करितां त्यांनीं सांगितलें कीं, आम्हांस कासीमनें भ्रष्ट केलेलें आहे, आह्मी आपल्या सेवेस योग्य नाहीं. हें ऐकून खलीफा क्रुद्ध झाला आणि त्यानें निर्दोषी कासीमला गाईच्या कातड्यांत शिवून आणविलें. त्याची ही अवस्था पाहून त्या दोन वीरांगनांचा आत्मा शांत झाला. आपली लाज बचावली व आपल्या आप्तेष्टांच्या मृत्यूनंतर जगण्यापेक्षां मरण बरें, असें

वाटल्यावरून त्यांनीं खलीफाला सत्य सांगितलें. तें कटु सत्य ऐकून खलीफा अतिशय संतप्त झाला व त्यानें त्या असहाय वीरांगनांना हालहाल करून ठार मारिलें.

५ इ. स. ७०० ते १२०० पर्यंत सिन्ध प्रांताची परिस्थितिः– महंमद बिन कासीमच्या मृत्यूनंतर सिंध देश लौकरच हिंदूंच्या ताब्यांत आला. खलीफा हारून रशीदच्या वेळीं महावीर मामूनें सिंधप्रांत पुन्हा मुसलमानांच्या स्वाधीन करण्याची इच्छा धरून तो चितोडपर्यंत चालून आला. सर्व रजपूत राजांनीं एकत्र मिळून त्याला तोंड दिलें. त्यांचा सेनापति समरशूर महावीर खोमान हा होता. मोठ्या शार्यानें खोमानानें मामूंबरोबर चोवीस वेळां लढाई केली व शेवटीं मामूला पराजित करून परत हाकून लावलें. पुढें १५० वर्षेपर्यंत कोणत्याही मुसलमानानें भरतखंडावर स्वारी केली नाहीं. आणि ५०० वर्षेपर्यंत वायव्येकडील थोडा ही भाग त्यांच्या हातीं आला नाहीं. बाराव्या शतकाचे शेवटपर्यंत पंजाब व सिंधचे कांहीं भाग सोडून सर्व भरतखंड रजपूत राजांच्या अमलाखालीं होतें. परंतु या शांततेला विजयी महमुदानें जोराचा धक्का दिला. हा महमुद कोण हें जाणण्याकरितां थोडें अफगाणिस्थानच्या इतिहासाचें परिशीलन केलें पाहिजे.

६ दहाव्या शतकांतील अफगाणिस्थानचा वृत्तान्तः–इ. स. २०० पूर्वी अफगाणिस्थानांत यूचि आणि शक या जातींनीं येऊन वसाहत केली. तेथें त्यांनीं बौद्ध धर्म स्वीकारला, आणि ते भारतवर्षांतील चालीरीतीही शिकले. त्यांच्यापैकीं ६० राजांनीं इ. स. ८०० पर्यंत राज्य केलें. एका कल्हार नामक भट्टी रजपुतानें राज्य संपादन केलें. त्याच्या वंशांत समंद, कमालू, भीम, जयपाल, आनन्दपाल, त्रिलोचनपाल, भीमपाल ह्या राजांचीं नांवें प्रसिद्ध आहेत. इ.स. ८७० मध्यें मुसलमानांनीं रजपुतांना काबुलांतून हांकललें; परंतु रजपुतांच्या ताब्यांत पंजाब, काश्मिर आणि सिंधुनदी ते पेशावर पर्यंतचा मुलुख राहिला. शेवटीं महमुदानें इ. स. १०१८ त काश्मीर सोडून बाकी सर्व देश जिंकून मुसलमानी राज्याला जोडला.

७ **अलप्तगीनः**– बगदादच्या खलीफाची सत्ता संपुष्टांत आल्यावर प्रांतिक सुभेदार स्वतंत्र झाले. इ. स. ८६२ मध्यें समानी वंशाचा संस्थापक इस्माईल हा खुरासान, काबूल, अफगाणिस्थान, कंदाहार, जाबलिस्तान इत्यादि प्रांतांवर स्वतंत्रपणें राज्य करूं लागला. त्याच्या चौथ्या पिढींत मन्सूर नांवाचा एक अल्पवयी बादशहा गादीवर बसला. त्यावेळीं गझनीचा सुभेदार अलतगीन यानें बादशहाची सत्ता झुगारून दिली आणि आपण स्वतंत्र राजा झाला. अलतगीनाचा एक गुलाम सबक्तगीन या नावांचा होता. तो मोठा कर्तृत्ववान्, बुद्धिमान्, शूर व दयाळु होता. हा गुलाम आपल्या गुणांनीं सेनापति झाला आणि अलतगीनानें आपल्या मुलीशीं त्याचें लग्न करून दिलें. इ. स. ९७५ त अलतगीन मरण पावला आणि त्याचा मुलगा असहाक हा गादीवर बसला; पण सहा महिन्यांच्या आंतच त्याचा अंत होऊन शूर सबक्तगीनला अफगाणिस्थानची गादी मिळाली.

८ **सबक्तगीन आणि जयपालः**– सबक्तगीनानें पेशावर प्रांतावर स्वारी केली. लाहोरचा राजा जयपाळ यानें स्वदेशाच्या रक्षणार्थ पेशावरच्या जवळच त्याला तोंड देऊन थोपवून धरिलें, पण थंडी अत्यन्त पडल्यामुळें रजपूत सेनेला लढतां आलें नाहीं. खंडणी देण्याचें कबूल करून जयपाळ परत आला. परंतु त्यानें परत आल्यावर खंडणी तर दिली नाहींच पण खंडणी मागण्यास आलेल्या लोकांना कैद केलें. हें पाहून सबक्तगीनानें हिंदुस्थानवर स्वारी केली. दिल्ली, अजमिर, कलिंजर, आणि कनोज येथील राजांची मदत घेऊन जयपाळनें मुसलमानांच्या बरोबर लम्गान नदीवर युद्ध केलें, पण या युद्धांतही त्याचा पराजय झाला. हजारों हिंदु या युद्धांत कामास आले, हजारों जीव बचावण्याकरतां पळून गेले, अशी सर्व वाताहत होऊन गेली. मोठ्या कष्टानें आपला जीव वांचवून राजा जयपाळ लाहोरला पोंचला. मुसलमानांचा विजय झाला होता, तरी सबक्तगीनाच्या ताब्यांत पेशवार आलें नाहीं. हें महमुदाच्या वृत्तांतावरून ओघानें कळेलच !

९ **महमुदाचा वृत्तान्तः**–सबक्तगीनाच्या मृत्यूनंतर अस्माईल

गादीवर बसला. पण दोन चार महिन्यांतच त्याचा वध करून त्याचा धाकटा भाऊ महमुद हा गादीवर बसला. ह्याच महमुदानें हिंदुस्थानावर अठरा वेळ स्वारी केली! येथील राजांना थर थर कांपावयास लाविलें, भयंकर अत्याचार केले, शेंकडों शहरें जाळिलीं आणि उध्वस्त केलीं. लाखों हिंदूंना गुलाम करून नेलें आणि या सुवर्णभूमीची द्रारिद्यभूमि केली. हा महमुद साहस, शौर्य, दृढनिश्चय, लोभ आणि क्रूरता यांचा मूर्तिमंत पुतळा असून तरवारीच्या जोरावर हिंदुस्थानांत मुसलमानी धर्माचा प्रसार करण्याची त्याची उत्कट इच्छा होती. त्याचा विजयी उत्साह वृद्धिंगत व्हावा म्हणून खलीफानें त्याला बक्षिसें आणि पदव्याही दिल्या होत्या. कविश्रेष्ठ फरदोसीनें आपल्या शहानामा ग्रंथांत महमुदाचें नांव अमर करून ठेविलें आहे. महमुदानें त्याला या ग्रंथाबद्दल प्रथम ६०००० साठ हजार सुवर्ण मोहरा द्यावयाचें कबूल केलें होतें पण शेवटीं त्यानें सुवर्ण मोहोरांच्या ऐवजीं चांदीच्या मोहरा दिल्या, त्यामुळें फरदोसीला फार राग आला. महमुदनें आपली विजय पताका पर्शियन खाडीपासून आरल समुद्रापर्यंत आणि काफपर्वतापासून सतलज पर्यंत फडकाविली! पण शेवटीं व्हावयाचा तोच परिणाम झाला? तो १०३० सालीं मृत्युशय्येवर पडला, तोपर्यंत फुटकी कवडी ही त्यानें कोणाला दान दिली नाहीं. लुटीचें सर्व सामान आपल्या समोर ठेऊन त्यांतील एक एक सुंदर वस्तु पाहून तिचा आपल्याला वियोग होणार ह्मणून त्याच्या नेत्रांतून सारख्या अश्रूधारा वहात असत. तेव्हां त्याला संसार असार आहे, आणि मानवजीवित क्षणभंगुर आहे हें समजून आलें तरी देखील त्याचा लोभी स्वभाव गेला नव्हता.

१० **महमुदाची स्वारीः**— प्रतिज्ञा केल्याप्रमाणें महमुदाला जरीं प्रत्येक वर्षी स्वारी करतां आली नाहीं, तरी इ. स. १००० पासून इ. स. १०२६ पर्यंत काबूल ते गंगा आणि काश्मिर ते गुजराथ पर्यंतचा प्रदेश त्यानें पादाक्रांत केला. याप्रमाणें त्यानें आपली वाढती लक्ष्मी आणि यश संपादन केलें.

पेशावर, वैहन्दः—इ. स. १००० मध्यें महमुदनें काबुल आणि हिंदूंच्या ताब्यांत असलेला पेशावर हे प्रांत जिंकून घेतले होते. ते परत

मिळविण्याकरितां जयपाळनें पेशावर जवळ महमुदाबरोबर युद्ध केलें. हजारों हिंदू मारले गेले. पुष्कळ सरदारांसहित राजा जयपाळ पकडला गेला. पन्नास हत्ती देण्याचें कबूल करून त्यानें आपली सुटका करून घेतली. परंतु युद्धांमध्यें पकडले गेले असतां जगण्यापेक्षां अग्निकाष्ठ भक्षण करून मरुन जावें, या रजपुतांच्या प्रशंसनीय वीर्योत्पादक चालीला अनुसरून राजा जयपालनें आपला पुत्र अनंगपाल याच्या स्वाधीन राज्य करुन आपला अंत करून घेतला.

राजा अनंगपालाचा पराजयः– महमुदानें तीन स्वाऱ्या करून भेरा, पेशावर आणि मुलतान हे प्रांत जिंकिले. तदनंतर त्यानें पंजाब प्रांत अनंगपाळाकडून जिंकून घेण्याकरतां स्वारी केली. त्यावेळीं अनंगपाळाच्या सहाय्यार्थ उज्यैन, ग्वाल्हेर, कालेंजर, कनोज, दिल्ली, आणि अजमीर म्हणजे उत्तर हिंदुस्थानांतील बहुतेक राजे आणि तीस हजार गक्खर युद्धामध्यें एकत्र झाले होते. हिंदुस्थानच्या इतिहासांत अशा प्रकारचा घनघोर संग्राम दुसरा सांपडत नाहीं. या संग्रामांत उत्तरे कडील सर्व राजे एकत्र होऊन त्यांनीं परक्या देशांतील लोकांना शत्रू समजून त्याच्या बरोबर लढाई केली आणि देशांतील लोकांनींही या परशत्रूपासून देशाचें रक्षण करण्याकरितां आपल्या कडून शक्य तितकी मदत केली. या वेळीं देशाभिमानाचें वारें स्त्रियांच्याही अंगांत संचारलें होतें. स्त्रियांनीं आपल्या भारतमातेला बंदिवान करणाऱ्या महमुदाबरोबर लढण्याकरितां आपापले अलंकार काढून दिले. गरिबांनीं कोणी सूत काढून किंवा दुसऱ्या अनेक प्रकारें श्रम करून युद्धाला मदत केली.


परंतु हिंदुस्थानचें दुर्दैव यशाच्या मार्गांत आडवें आलें, आणि राजा अनंगपालचा सर्वस्वी पराजय झाला. विजयी मुसलमानांनीं पळून जाणाऱ्या रजपुतांचा पाठलाग केला. त्यांच्या घोड्यांच्या टापांनीं सारा पंजाब प्रांत कंपित होऊन गेला. दावानलाप्रमाणें सारा देश भस्म करीत विजयी मुसलमान **नगरकोट** लुटण्या करितां येऊन पोंहोचले. **नगरकोट** किल्ल्यावर लढाईची कांहींच तयारी नव्हती, तो सहजासहजीं मुसल-

मानांच्या हातीं आला. ७०००० दिर्हम नाणें, ७००४०० मण सोनें, चांदी आणि २० मण अमूल्य जडजवाहीर घेऊन महमूद परत गेला. गझनीमध्यें त्यानें या लुटीचें प्रदर्शन भरविलें. तें प्रदर्शन पाहणाऱ्या प्रत्येक मनुष्याच्या मनांत हिंदुस्थान लुटण्याचा उत्साह सारखा भरून गेला. हिंदुस्थान म्हणजे सुवर्णभूमि आहे, हिंदुस्थान ही सोन्याची खाण आहे, हें आज त्यांनीं प्रत्यक्ष नेत्रानीं पाहिलें. महमुदानें लुटींतील कांहीं भाग सैन्यामध्यें वांटला. त्यामुळें सैन्यामध्यें सामील होण्याकरीतां लोक फार उत्साहानें पुढें येऊ लागले.

ठाणेश्वर.–ठाणेश्वर हे एक अति पवित्र स्थान होतें. या ठिकाणीं जगसोमेदवाची पूजा केली जात असे. या नगरांत पुष्कळ वर्षांची संपत्ति सांठून राहिली होती. हिंदू सैन्य पोहोंचण्याच्या आंत विजेच्या वेगाने महमुदानें ठाणेश्वरावर स्वारी केली. अगणित संपत्ति आणि २ लाख दास दासी घेऊन तो परत गेला.

लोहकोट.–महमुदानें काश्मीरावर स्वारी केली, पण तो देश त्याला जिंकता आला नाहीं.

कनोज व मथुरा.–वरील पराजयाचा मोबदला भरून काढण्याकरीतां महमुदानें अति प्रसिद्ध असें कनोज शहर आणि मथुरा यांवर हल्ले केले. पर्वतांच्या एका गुप्त मार्गानें एकाएकी येऊन त्यानें कनोजवर चढाई केली. लढाईला तोंड देण्याची आपली शक्ति नाहीं, असे पाहून तेथील राजा महमुदाच्या स्वाधीन झाला. राजा आणि महमुद हे पुढें मित्र बनले असे सांगतात. तेथून नंतर भगवान् श्री कृष्णाची जन्मभूमी जी मथुरा त्या पवित्र नगरावर त्यानें स्वारी केली. या नगरांतील सुंदर प्रसिद्ध भव्य आणि चिरेबंदी इमारती व मंदीरे पाहून महमुदानें असे उद्गार काढले कीं, "मी जितका आपल्या धर्मामध्यें स्थिर आहे तितकेच हे मथुराप्रासाद स्थिर आहेत." सतत वीस दिवस लुटालूट, घातपात, बलात्कार, मूर्ती भंजन आणि जाळपोळ हे प्रकार मथुरेस सुरू होते. कमीत कमी ३५० हत्ती, ५०००००० रुपये व १५०००० गुलाम घेऊन महमुद परत गेला, आणि त्यांना इराणांत



सोमनाथाचें देवालय.



महमूद (लेखकाकडील चित्रावरून)



व अफगाणिस्थानांत हे दोन दोन रुपयाला विकले; शिवाय आणखी कित्येक हिंदु गुलाम गझनींतील प्रत्येक घरांत ठेविले; त्यामुळें गझनी ही एक हिंदुनगरीच दिसूं लागली.

लाहोर—इ. स. १०१८ त अनंगपालाचा मुलगा त्रिलोचनपाल याचा निकाल करून महमुदानें आपला एक मुसलमान प्रतिनिधि तेथें नेमला. अशा तऱ्हेनें मुसलमानी राज्याच्या पायाचा दगड या ठिकाणीं प्रथम बसविला गेला.

सोमनाथ—गुजराथच्या समुद्र किनाऱ्यावर एक अतिशय प्रसिद्ध असें सोमदेवाचें अथवा शिवाचें देवालय होतें. हिंदू लोक या देवालयाला खालील कारणांमुळें अति पूज्य मानीत असत.

१. भगवान् श्रीकृष्णाचें निधन या ठिकाणीं झालें. २. सोमा (चंद्रा) मुळें समुद्राला भरती—ओहोटी येते; आणि मृत्यूनंतर जीव चंद्रलोकांत जातो असें हिंदू लोक समजतात, ह्मणून चंद्राच्या प्रतिमेची त्या ठिकाणीं पूजा केली जात असे. या पाषाणाच्या मूर्तीच्या प्रभावानें समुद्राला भरती—ओहोटी येते असें अज्ञानी लोक मानीत असत. ३. सूर्य किंवा चंद्र ग्रहणाच्या दिवशीं या सोमनाथाची पूजा करण्याकरितां हिंदुस्थानच्या सर्व दिशाहून जवळ जवळ दोन लाख स्त्रीपुरुष येथें येत असत. ४. ३०० न्हावी प्रत्येक दिवशीं यात्रेकरूंचें मुंडन करीत असत. गंगेच्या पाण्यानें प्रत्येक दिवशीं मूर्तीला स्नान घालण्यांत येई. ५०० देवदासी मूर्तीसमोर नृत्य करीत असत. ३०० गवई गात असत, आणि २००० ब्राह्मण आरती करीत असत. ५. देवालय एका दुर्गम अशा किल्ल्यांत होतें. मंदिराला रत्नजडीत खांब होते. त्या मंदिरांत ५ फूट उंच आणि २ फूट जाड अशी जडजवाहिराच्या अलंकारांनीं सुशोभित केलेली व चुंबकमण्यांच्या योगानें अधांतरीं लटकत ठेवलेली मूर्ती होती. सोन्याचांदीला तर या मंदिरांत सीमाच नव्हती. वस्तुतः हें देवालय भरतखंडांत अनुपमेयच होतें. अशा देवस्थानाची जर महमुदानें लूट केली नसती, तर त्याच्या सर्व स्वाऱ्या आणि विजय व्यर्थ ठरले असते, आणि त्याचें जीवितकार्य निष्फळ

झालें असतें. इ. स. १०२५ मध्यें एका मोठ्या सैन्यानिशीं त्यानें गझनीहून चाल केली आणि वाटेंत अजमीर आणि नहरवाला जिंकून तो सोमनाथाला इ. स. १०२६ मध्यें येऊन पोहोंचला.

सोमनाथाच्या रक्षणाकरतां आसपासचे राजे एकत्रित होऊं शकले नाहींत, आणि नगरांत व देवालयांत असणाऱ्या सैन्यालाही देवळाच्या रक्षणासाठीं सहायाची अवश्यकता वाटली नाहीं; कारण त्यांना असें वाटत होतें कीं, महमुद आला तो देवाच्या प्रेरणेनेंच आला. तसें नसतें तर त्याच्या सर्व सैन्याचें वाटेंतच भस्म झालें असतें. त्यामुळें ईश्वर आपल्या बाजूला नसून मुसलमानांना अनुकूल आहे हें त्यांना समजून चुकलें. तरी पण मूठभर रजपुतांनीं मोठ्या शौर्यानें युद्ध केलें. महमुदाच्या सैन्याचें धैर्य सुटून तें पळण्याच्याही बेतांत होतें, इतक्यांत अनुभवी रणपंडित विजिगीषु महमुदानें मोठे आवेशयुक्त भाषण करून त्याला थोपवून धरलें. अशा तऱ्हेनें दुप्पट उत्साह आल्यामुळें यवनांनीं अति शौर्यानें लढून रजपूत सैन्याला पळावयास लावलें. मुसलमानांनीं किल्ल्यांत प्रवेश केला आणि हजारों हिंदूंना कापीत कापीत ते देवळाजवळ येऊन पोहोंचले. भयंकर चिडलेल्या महमुदानें मूर्तिच्या डोक्यावर प्रहार करण्याकरतां गदा उचलली; आणि आतां प्रहार करणार, इतक्यांत तेथील पुजारी पुढें झाले आणि "मूर्तिभंग करूं नका, त्याबद्दल आह्मी तुह्माला कोट्यावधी रुपये देतों;" असें ह्मणून त्यांनीं त्याची विनवणी केली. पण महमुदानें उत्तर दिलें कीं, "मला मूर्तिभंजक ह्मणून प्रसिद्ध होण्याची इच्छा आहे, मूर्ति विकणारा ह्मणून नव्हे;" असें ह्मणून त्यानें आपल्या गदेनें त्या मूर्तिचे चार तुकडे केले; आणि विजय चिन्ह ह्मणून ते चार तुकडे मक्का, मदीना, बगदाद आणि गझनी या ठिकाणीं पाठवून दिले. असा मोठा विजय संपादन करून महमूद गझनीस परत गेला.

महमुदाच्या विजयाचीं कारणें—(१) महमुदाचें युद्धकला-नैपुण्य आणि त्याची व त्याच्या सैन्याची जिवावर उदार होऊन लढण्याची तयारी. (२) त्याचे घोडेस्वार मध्य आशियांतील डोंगराळ प्रदेशांत राहणारे होते; त्यामुळें धाडस, बळकटी व काटकपणा हे गुण त्यांच्या

अंगी होते. (३) डोंगराळ प्रदेशांतील लोक शूर परंतु गरीब असल्यामुळें ते लुटालुटीचे प्रसंग वांया जाऊं देत नसत. हिंदुदेवळांतून मूर्तींच्या सभोंवती सांठविलेलें द्रव्य पाहून त्यांच्या तोंडाला पाणी सुटलें व तें लुटण्याचा त्यांनीं निश्चय केला. (४) हिंदूंचा बहुतेक सर्व विश्वास त्यांच्या हत्तीच्या सैन्यावर होता. परंतु चपळतेच्या बाबतींत हत्ती अगदीं निरुपयोगी असून ते फार क्षुल्लक कारणांनीं बुजतात; यामुळें ते फारच अनावर होऊन शत्रूंचा व मित्रांचाही धुव्वा उडवितात. अनंगपालाचा पराजय याच कारणामुळें झाला. (५) लढाईच्या बाबतींत महमुदाच्या पूर्वीं शिकंदर बादशहानें व पुढें बाबरनें लढविलेले लष्करी डावपेंच महमूद लढवीत असे. परंतु त्याच्या प्रतिकाराच्या साधनांची हिंदूंना माहिती नव्हती. (६) यावेळीं हिंदुस्थानांत लहान लहान अशीं बरींच हिंदू राज्यें होतीं. पण महमुदाची स्वारी अकल्पित व अचानक आल्यामुळें या सर्व राजांना एकत्रित होऊन तिला तोंड देतां आलें नाहीं. (७) हिंदूंकडे शत्रुला थोपवून धरण्यासाठीं सरहद्दीवर सैन्य ठेविलें नसावें व शत्रुची हालचाल कळविणारे हेरही नसावेत असें दिसतें. शिवाय महमुदाच्या अचानक स्वारीनें गर्भगळित झाल्यामुळें त्याला परत फिरतांना अडविण्याचें सुद्धां भान हिंदूंना राहिलें नाहीं.

महमुदाचें हिंदुस्थानाशीं धोरणः—(१) महमुदाचें राज्य फार विस्तीर्ण असून तें नवीनच मिळविलेलें होतें व त्यांत स्वातंत्र्यप्रिय लोक रहात असल्यामुळें आपली गझनी राजधानी सोडून हिंदुस्थानांत फार काळ घालविणें त्याला शक्य नव्हतें. (२) महमुदाची सर्व भिस्त मध्य आशियांतील उत्साही व साहसी योद्ध्यांवर होती. त्यांना हिंदुस्थानचें रखरखीत मैदान केव्हांही पसंत नसल्यामुळें, ते नेहमी आपल्या फळाफुलांच्या देशांत राहण्याची इच्छा करीत असत. (३) महमुदाला फक्त हिंदुस्थानची संपत्तीच लुटण्याची इच्छा होती. कारण हिंदुस्थानांत राज्यस्थापना केल्यावर त्याचा उपभोग आपल्याला शांततेनें घेतां येईल असें त्याला कधींही वाटलें नाहीं. यामुळें त्यानें हिंदुस्थानांत राज्यस्थापना केली नाहीं. ह्मणून हिंदुस्थानांत राज्य स्थापण्याचा विचार त्यानें मनांत आणिला, परंतु

त्यानें फक्त पंजाब प्रांतांत राज्य स्थापना करून हिंदुस्थानांत वारंवार येण्यासाठीं या देशाचा दरवाजा खुला ठेविला. यामुळें महमुदाला हिंदुस्थानाचा सम्राट किंवा मुसलमानी राज्य–संस्थापक असें ह्मणणें योग्य नाहीं.

महमुदाच्या स्वारीचे परिणामः— (१) वर निर्देश केल्याप्रमाणें महमुदानें पंजाब प्रांतांत आपलें राज्य स्थापन केलें. (२) हिंदुस्थानांतील रजपूत शूर व कोणत्याही संकटाला न डगमगणारे असे आहेत अशी तुर्कांची व उत्तरे कडील सर्व मुसलमानांची समजूत होती. परंतु महमुदाच्या स्वारीनें हिंदूंची दुर्बलता शाबित केली, आणि हिंदुस्थानावर स्वारी करण्यास कांहीं हरकत नाहीं, अशी त्यांची खात्री पटवून दिली. (३) सोमनाथ, नगरकोट व मथुरा यांची लूट करून महमुदानें अपार संपत्ति हरण केली. त्याच्या या व अशाच इतर लुटींनीं व लढायांनीं हिंदुस्थानाचें बरेंच द्रव्य हरण होऊन देश दरिद्री बनत चालला. (४) पुष्कळ हिंदू लोक पकडले गेले व मारले गेले. कित्येकांना जबरदस्तीनें मुसलमान करण्यांत आलें. त्यामुळें हिंदूंची संख्या कमी होत जाऊन मुसलमानांची वाढूं लागली. (५) महमुदाच्या स्वारीला ' मोठा लुटारू दरवडा ' असें ह्मणणें योग्य होईल; त्याच्या स्वारीमुळें त्याच्या इतर धर्मबंधूंना हिंदुस्थानावर स्वारी करून संपत्ति लुटण्याचा मार्ग सांपडला. (६) हिंदुस्थानांतील बरेच पंडीत, कारागीर व कलाकुशल लोकांना महमूद गिझनीला घेऊन गेला. या कारागिरांनीं आपलें उत्कृष्ट नैपुण्य प्रदर्शित करण्याच्या उद्देशानें तेथें बरेच राजवाडे व इमारती हिंदु पद्धतीवर बांधिल्या. त्यामुळें गझनी हें हिंदुस्थानांतीलच एक शहर भासूं लागलें. या शहराविषयीं हॅावेल साहेब असें ह्मणतो कीं, " हिंदूंचीं देवळें जितक्या उत्साहानें व व्यवस्थित रीतीनें महमुदानें लुटलीं तितक्याच उत्साहानें व व्यवस्थितपणें त्यानें हिंदुस्थानांतील व पर्शियांतील कलाकौशल्यादि गोष्टीही लुटल्या. "

महमुदाच्या स्वारीच्या वेळीं बरींच लहान लहान हिंदु राज्यें होतीं; परंतु आपापसांतील द्वेषबुद्धीनें त्यांच्यांत दुही माजली, व यामुळें संघटित

होऊन त्यांना महमुदाशीं तोंड देतां येईना, असा एक प्रवाद आहे. परंतु तो निराधार दिसतो. पंजाब, स्थानेश्वर व सोमनाथ यांचें रक्षण करण्यासाठीं बरेच हिंदुराजे महमुदाशीं लढण्यास संघटित झाले असें इतिहास सांगत आहे. परंतु इतर ठिकाणीं एकाएकीं झडप घातल्यामुळें सर्वांना एकत्रित होऊन त्याचें पारिपत्य करतां येईना. तरी महमूद ज्या वेळीं गुजराथहून गिझनीला परतला, त्यावेळीं त्याचें बहुतेक सैन्य नष्ट पावलें. त्याच्या बरोबर लढण्यासाठीं रजपूत एवढ्या जोरानें आले कीं, त्याला निर्जल व रुक्ष प्रदेशांतून पळ काढावा लागला. सोमनाथाच्या लुटीचा सूड घेण्याच्या इराद्यानें त्याच्या वाटाड्यांनीं वाट चुकवून त्याला वालुकामय प्रदेशांतून नेलें. त्याचे बरेच शिपाई तहानेनें तडफडून मेले व बाकीचे सूर्याच्या तापानें वेडे झाले. अशा रीतीनें त्याचे बरोबर त्याच्या प्रचंड सैन्यापैकीं फारच थोडे लोक गझनीला परत गेले. महमुदानें काश्मीर घेण्याचा दोनदां प्रयत्न केला, परंतु तो दोन्ही वेळां फसला. यावरून तो नेहमींच विजयी होई, असें ह्मणतां येत नाहीं. शिवाय महमुदाविषयीं आपणांस मुसलमानांनीं लिहिलेल्या पुस्तकांतूनच माहिती मिळत असल्यामुळें त्याचें शौर्य व हिंदूंची दुर्बलता दाखविण्यांत बरीच अतिशयोक्ति झाली असली पाहिजे, त्यामुळें ती सर्वच खरी मानितां येत नाहीं.

११. **विशालदेवः**— महमुदाच्या वंशांत एकंदर १५ बादशहांनीं राज्य केलें; परंतु परस्परांतील कलह, चैन, अनाचार, प्रांतिक सुभेदारांनीं वारंवार सत्ता झुगारून देणें, राज्य-शासन-पद्धतीचा अभाव इत्यादि कारणांमुळें महमुदाच्या वंशजांची सत्ता कमजोर झाली, व त्यामुळें हा राजवंश १५६ वर्षांतच समाप्त झाला. या वेळीं पंजाब प्रांत मुसलमानांच्या ताब्यांत होता. परंतु इ. स. ११२० च्या सुमारास अजमीरचा बलाढ्य राजा विशालदेव यानें दिल्ली जिंकून मुसलमानांना पंजाबांतून हांकून दिलें. सुमारें तीस वर्षांनंतर पुन्हां गझनीच्या बादशहांनीं पंजाबवर सत्ता गाजवली आणि नंतरचे दोन बादशहा, खुस्रो व खुस्रोमलिक यांनीं लाहोरमध्यें राज्यही केलें. विशालदेवानें उत्तरे कडील

बहुतेक भाग जिंकला होता. दिल्लीमध्यें त्याच्या वेळचे अवशेष अजून सांपडतात.

१२ घोरी राज्याचा आरंभ— मराठी भाषेंत याला घोरी म्हणतात. परंतु खरा उच्चार गौरी असा आहे. अफगाणिस्थानच्या पश्चिमेकडेही गझनीच्या बादशहांचें राज्य राहिलें नाहीं. तुर्क, सल्जुक आणि घोरी हे स्वतंत्र झाले. इ. स. ११५२ मध्यें अल्लाउद्दीन घोरीनें गझनीहून बहरामला हांकून दिलें. सात दिवस गझनी लुटली. घरें उध्वस्त केलीं आणि जें कांहीं थोडें बहुत उरलें होतें तें अग्निसात् केलें. या त्याच्या घातक व दाहक वृत्तीमुळें तो जगद्दाहक या नांवानें प्रसिद्धीस आला. तेव्हांपासून घोरींनीं गझनीचें राज्य प्राप्त करून घेतलें आणि लाहोरांतही महमुदच्या वंशाचा नाश करण्याची खटपट चालविली. इ. स. ११५६ मध्यें शहाबुद्दीन महमद घोरीनें कपटानें खुस्रोमलीकला पकडून त्याच्या परिवारासकट त्यास ठार मारिलें. अशा प्रकारें बाराव्या शतकाच्या शेवटीं पंजाबचें राज्य एका मुसलमानी वंशांतून दुसऱ्या मुसलमानी वंशाच्या ताब्यांत गेलें.

घोरीच्या स्वारीच्या वेळीं हिंदुस्थानची स्थिति—घोरीच्या या स्वारीच्या वेळीं उत्तर हिंदुस्थानच्या राज्यांत दोन तट होते. एका बाजूला कनोज, माळवा, आणि गुजराथ एथील राजे व दुसऱ्या बाजूला अजमीर असे दिल्लीचा राजा पृथ्वीराज व त्याच्या छत्राखालील बहुतेक राजपुतान्याचे राजे होते. हिंदुस्थानला दुफळीचा शापच मिळाला आहे. येथील लोकांच्या एकमेकांवरील अविश्वासामुळें राष्ट्रकार्य संघटनेनें होत नाहीं. या दुफळीमुळेंच हिंदुस्थानला शत्रूच्या हातीं अनेक वेळां जावें लागलें. संघटन हेंच स्वातंत्र्याचें साधन आहे आणि जोंपर्यंत मत्सर, स्वार्थ व धर्मविरोध अस्तित्वांत असल्यानें संघटन होत नाहीं, तोंपर्यंत हिंदुस्थान देश परतंत्रच राहणार हें स्पष्ट आहे.

१३ महम्मद घोरीची स्वारी— शहाबुद्दीन महम्मद घोरीनें आठ वेळां हिंदुस्थानावर स्वारी केली. गुजराथचा राजा भोळा भीम यानें एके वेळीं त्याचा पराभव केला. दुसरे वेळीं दिल्लीचा राजा पृथ्वीराज यानेंही तिरोडी अथवा तरायांच्या युद्धांत इ. स. ११९१ त त्याचा

पूर्ण पाडाव केला. बाकीच्या स्वारींत घोरीला यश मिळालें, त्यामुळें राजकीय वातावरणांत असें तुफान उठलें कीं, सर्व रजपूत राजे आपापल्या सिंहासनापासून भ्रष्ट झाले. पुरातन इंद्रप्रस्थांत यवनांचें राज्य इतकें स्थिर झालें कीं इ. स. १७७० पर्यंत बहुतेक सर्व देश त्यांच्या ताब्यांत होता. या दीर्घ कालांत पुष्कळ वेळां हिंदूंनीं उचल खाण्याचा प्रयत्न केला, पण हे यत्न जोमाचे नसल्याकारणानें इ. स. १६५० पर्यंत निष्फळ झाले.

पानिपत व तरायांचे युद्ध (इ. स. ११९३)–तरायांच्या विजयाचा मोबदला घेण्याकरितां एक लक्ष वीस हजार शूर सैन्य घेऊन महम्मद घोरीनें दिल्लीवर चाल केली. पृथ्वीराजही एकशें पन्नास सरदार आणि मांडलीक व इतर स्वतंत्र राजे यांच्या सैन्यासह त्याला तोंड देण्याकरितां पुढें चालून गेला. रजपूत सैन्यांत तीन लक्ष घोडेस्वार, तीन हजार हत्ती व असंख्य पायदळ होतें. या हिंदू मुसलमानांची गांठ तरायांच्या रणक्षेत्रावर पडली. घनघोर युद्ध होऊन त्यांत पृथ्वीराजाचा पराभव झाला व तो मारला गेला.


पराजयाची कारणें– १. कनोजचा जयचंद घोरीला मिळाला. २. पृथ्वीराजाची तयारी पुरी नव्हती. ३. युद्धांत ताज्या दमाचे सैन्य शिल्लक न राहिल्यानें, आणि ४. घोरीची हालचाल न कळल्यानें रजपुतांना हार खावी लागली. घोरीनें दिल्ली व अजमीर अशा दोन रजपूत राजधान्या आपल्या ताब्यांत घेतल्या आणि अजमीर येथील देवालयें पाडून मशीदी बांधिल्या व मुसलमानी धर्माचा प्रसार केला; नंतर आपला चतुर गुलाम सेनापति कुतुबुद्दीन यास हिंदुस्थानांत आपला प्रतिनिधि ह्मणून ठेवून तो गिझनीला परत गेला.

परिणाम– १. या पराजयामुळें हिंदूराज्यावर घोर परिणाम झाला. नुसती चव्हाण राज्याची समाप्ति झाली असें नसून, रजपुतांच्या सत्तेवर मोठा जोराचा घाव बसला. २. सर्व रजपुतांच्या मनांत मुसलमानांविषयीं भीति उत्पन्न झाली. पुढें कोणत्याही रजपुत राजाला सर्व रजपुतांची एकी करून हिंदुस्थानचें रक्षण करितां आलें नाहीं. यामुळें

रजपुतांच्या सत्तेला उतरती कळा लागली. ३. या विजयानें मुसलमानांना सर्व हिंदुस्थान पादाक्रांत करण्याचें द्वार खुलें झालें.

जयचंद्राच्या जयाचा अस्त—महंमद घोरीला रजपुतांचा पुरा बींमोड करावयाचा होता; ह्मणून त्यानें रजपुत राजांचा संघ चिरडून टाकण्याचा प्रयत्न केला. निराशा आणि नैतिक अधःपात पावलेले रजपूत राजे देशद्रोही जयचंदाला मदत करणार नाहींत, हें त्यानें ओळखलें आणि तसेंच झालें. जयचंदाला एकट्यालाच तुर्काशीं तोंड देणें भाग पडलें. इ. स. ११९४ मध्यें घोरीनें पुनः स्वारी केली. या वेळीं जयचंदाला त्याच्या देशद्रोहाचें फळ चांगलें मिळालें. जयचंद रणांगणावर मेला. कनोज, काशी, इ. ठिकाणीं मुसलमानांनीं भयंकर अत्याचार केले, आणि तेथील राज्यें ताब्यांत घेतलीं. जयचंदाचा मुलगा शिवजी यानें हजारों रजपुतांसह आपल्या जन्मभूमीचा त्याग करून हल्लींचें जोधपूर येथें नवीन राज्य स्थापन केलें. पुढें त्याची हळूहळू भरभराट झाली. कुतुबुद्दीन व त्याचा सेनापति बखत्यार यांनीं ग्वाल्हेर, गुजराथ, बिहार आणि बंगाल हे प्रांत सन १२०३ पर्यंत जिंकून घेतले. त्या वेळीं त्यांनीं तेथें निष्कारण हजारों लोकांचा वध केला. बंगाल बिहारांत **बखत्यार खिलजीनें** अगदीं सहज विजय प्राप्त केला. नदिया, नालंदा, आणि विक्रमशिला येथील पुस्तकालयें जाळलीं; देवळें पाडून मशिदी बांधिल्या. अशा प्रकारें रक्तपात, धार्मिक अत्याचार व हिंदूवर बहिष्कार या तत्वावर मुसलमानी राज्याचा आरंभ झाला.

इ. स. १२०६ तील राज्याची अवस्था— इ. स. १२०६ मध्यें महंमद घोरी हिंदुस्थानांतून परत गेला. व त्याचा खोखर जातीनें घात केला. यावेळीं माळव्याचा उत्तरेकडील भाग मुसलमानांच्या हातांत आला होता. परंतु घोरीला मुलगा नसल्यामुळें या विस्तृत राज्यांत चार वेगवेगळ्या गुलाम सुभेदारांनीं आपलीं स्वतंत्र राज्यें स्थापिलीं—गझनींत येलदोज, सिंधांत कवाजा, दिल्लींत कुतुबुद्दीन, आणि बंगालमध्यें बखत्यार—हे गुलाम अधिकारारूढ झाले. इ. स. १२०६ च्या सुमारास पंजाब, सिंध, संयुक्त प्रांत, उत्तर राजपुताना व गुजराथ हे प्रांत मुसलमानी सत्ते



पृथ्वीराज संयुक्तेसह विलास मंदिरांत आहे.



जयचंदचा दरबार.

खालीं होते. परंतु राजपुताना, माळवा, दख्खन येथें रजपुत राजे राज्य करीत होते. कांहीं शतकें यांच्यांत परस्परांत युद्धें सुरू होतीं. त्याचें वर्णन ओघानें येईलच.

१४ गझनीचा महमूद आणि घोरी. १. महंमद घोरी हा गझनीच्या महंमुदाइतका सुदैवी नव्हता; पण अधिक राजकारणकुशल व धोरणी मुत्सद्दी होता. २. महमुदानें फक्त हिंदुस्थानांतून मिळणाऱ्या संपत्तीवरच ह्मणजे लुटीनें होणाऱ्या तात्कालिक फायद्यावरच दृष्टि ठेविली होती. येथें येऊन हिंदुस्थान कायमचें जिंकण्याचा विचार त्यानें केला नाहीं. घोरीनें हिंदुस्थानच्या संपत्तीवर डोळा ठेवून शिवाय राज्यावरही दृष्टी ठेविली आणि तदनुसार त्यानें राज्यवृद्धीसाठीं कुशल सेनापति निवडले. ३. महमुदाचें राज्य त्याच्या मृत्यूनंतर लयाला गेलें. परंतु घोरीनें प्रस्थापिलेली मुसलमानांची सत्ता दिवसें दिवस वाढत गेली. अशा रितीनें त्यानें हिंदुस्थानांतील एका बलाढ्य अशा साम्राज्याचा पाया घातला. याचा हिंदु आणि मुसलमान समाजावर चिरस्थायी परिणाम झाला. ४. महमूद हा कलेचा आणि विद्येचा आश्रयदाता होता; पण घोरी हा फक्त शिपाईगडी होता.

प्रकरण दुसरें.

गुलाम वंशः– इ. स. १२०६ ते १२९०.


१ गुलाम वंश व त्याचें कार्यः— गुलाम वंशांत एकंदर दहा राजांनीं चौऱ्याऐंशी वर्षें राज्य केलें. याला गुलाम वंश ह्मणण्याचें कारण असें कीं, कुतुबुद्दीन, तसेच दुसरे बादशाह पहिल्या प्रथम गुलामाचे पुत्र होते; परंतु वाढतां वाढतां ते बादशाह झाले. या वंशानें माळवा आणि गुजराथ खेरीज उत्तर हिंदुस्थान जिंकून घेतलें, प्रान्तिक मुसलमानांना दाबांत ठेविलें, रज-

पुतांना डोकें वर करूं दिलें नाहीं, आणि मोगलांच्या स्वारीला रोखून धरिलें. या चार कारणांनीं मुसलमानी राज्य उत्तर हिंदुस्थानांत स्थिर झालें. शेवटीं शेवटीं तर शिल्पकलेंत त्यांनीं फार मोठी सुधारणा घडवून आणिली, आणि अत्यंत सुंदर व नवीन तऱ्हेच्या इमारती बांधिल्या.

२ **लक्षप्रद कुतुबुद्दीनः**— हा मोठा चतुर आणि बुद्धिमान बादशाह होता. याच्या कामावरून हा फार शूर, दूरदर्शी, आणि राजकार्यधुरंधर होता असें स्पष्ट दिसतें. राज्यप्राप्तीनंतर त्यानें आपल्या मुसलमानी प्रजेचें फार उत्तम प्रकारें रक्षण केलें. याची दानशीलता पुढें कित्येक वर्षें प्रसिद्ध होती; परंतु हा फक्त मुसलमानांनाच दान देत असे; हिंदुंचा वारंवार अपमान व घात करीत असे. याचें नांव **हातमसानी** अथवा लक्षप्रद असें प्रसिद्ध होतें. तबकात–ई–नासरीच्या लेखकानें असें लिहून ठेविलें आहे कीं, मुसलमानांवर निःसंशय हा देणग्यांचा वर्षाव करित असे. परंतु हिंदुंना याच्या भक्षस्थानीं पडावें लागत असे. स्मिथ वर्णन करितो कीं, " कुतुबुद्दीन हा एक मध्य आशियांतील इतर योध्यांप्रमाणें क्रूर, खुनशी, व धर्म वेडा असून, अप्रतिम सेनानी होता. उत्तर हिंदुस्थानांतील विजयाचें श्रेय सर्वस्वी यालाच आहे. गुलामगिरींतून तोच पहिल्यानें दिल्लीच्या सुलतान पदाला पोहोंचला. परंतु आपल्या सत्तेचा उपभोग घ्यावयास हा फार दिवस जगला नाहीं. लाहोरमध्यें तो पोलो खेळत असतां घोड्यावरून पडून मेला. वीस हिंदु देवळांच्या सामानानें त्यानें कुतुबमिनार बांधिली. तिची उंची आजमितीस २४० फूट आहे.

३. **वीर अल्तमश**—आराम बादशाह मूर्ख आणि चैनी असल्यानें त्याला आपल्या बापाच्या वेळच्या शूर व साहसी सरदारांना ताब्यांत ठेवितां आलें नाहीं. कुतुबुद्दीनचा अल्तमश नांवाचा गुलाम आपल्या बुद्धीमत्तेनें बिहारचा सुभेदार झाला होता. त्यानें आरामला मारून स्वतः राज्य बळकाविलें. हा मोठा शूर बादशाह होता. यानें आपलें राज्य सिंधु-पासून ब्रह्मपुत्रापर्यंत व हिमालयापासून विंध्याद्रिपर्यंत स्थिर केलें.

१ बंगाल, सिंध, लाहोर व गझनी येथील स्वतंत्र सुभेदारांना नाहींसे करून त्यांचे देश आपल्या राज्यास जोडले.



कुतुब मिनार (दिल्ली).



पृथ्वीराजाचें देवालय (दिल्ली).



महमदघोरी



कुतुबुद्दीन



पृथ्वीराज



सुलतानरझीया



नासिरुद्दीन



अल्लाउद्दीन खिलजी



महमद् तघलक



तैमुर्लंग

२ यानें राजपुतान्यांतील स्वतंत्र राजांना जिंकण्याचा मोठा प्रयत्न केला; व झालावार, रणथंबोर, ग्वाल्हेर, माळवा हे प्रदेश जिंकून घेतले. उज्जैनी येथील प्राचीन आणि जगद्विख्यात महाकालीच्या देवालयांतील मूर्ती दिल्ली येथील जामे मशीदींत फरशी करून बसविली. आपापसांत फूट होती तरी रजपूत एकदम हार गेले नाहींत; तेव्हां त्यांना जिंकण्याकरितां अल्तमशला एकसारखा सहावर्षे प्रयत्न करावा लागला.

३ नाश करणारा **झेंगिसखान** यानें प्रचंड सैन्यासह मध्य-आशियांतून निघून मुसलमानी देशांचा नाश केला. अल्तमश बादशहानें खुळेपणानें झेंगिसखानापासून पळून आलेल्या खीवाच्या बादशहाला आश्रय दिला होता; यामुळें झेंगिसखान चिडून जाऊन आपली असंख्य सेना घेऊन सिंधुपर्यंत येऊन पोहोंचला. तेव्हां अल्तमशानें ज्या बादशहाला आश्रय दिला होता, त्याला आपल्या राज्यांतून हांकलून दिलें व अशा रीतीनें भांडणाचें मूळच काढून टाकिलें. हें पाहून झेंगिसखानही शान्त झाला व आपल्या देशास परत गेला.

४ इ. स. १२२९ त मुसलमानी शिक्याचें नाणें हिंदुस्थानांत-पहिल्यानेंच चालू झालें.

५ बगदादच्या खलीफानें अल्तमशला स्वतंत्र बादशहा कबूल केलें. अशा प्रकारें त्याच्या राज्याला बळकटी आली. जरी तो गुलामाचा गुलाम होता, तरी त्यानें राज्य फारच कुशलतेनें केलें. कुतुबुद्दिनानें जिंकलेले प्रान्त संघटित करून मुसलमानी सत्तेला अल्तमशानें बळकटी आणिली.

४ सुलतान रझीया-- अल्तमशाचा मुलगा रुक्नुद्दीन बादशहा झाला. परंतु तो फार चैनी, रंगेल व सदा नाचरंगांत निमग्न असल्या कारणानें राज्याला नालायक ठरला. एका सरदारानें त्याला ठार मारिलें, व तें राज्य रझीयाला दिलें. ही राणी राज्य करण्यांत मोठी निपुण, फार धार्मिक, शूर व राजनीतिकुशल होती यांत संशय नाहीं. ही पुरुष वेष घेऊन दरबारामध्यें जात असे. या कारणानें तिला "सुलतान रझीया" असें ह्मणत असत. हीच्या हातून एक चूक झाली व त्यामुळें हीच्यावर संकटाचे पर्वत कोसळले; ती अशी कीं, हीनें याकूत नांवाच्या

एका हब्शाला पहिल्या प्रतीचा सरदार केलें. हें पाहून अगोदरच चिडलेले इतर सरदार संतप्त झाले व त्यांनीं बंड उभारिलें; कारण

१ यांच्यावर एक स्त्री राज्य करीत होती; आणि ती पुरुषाचा वेष घेऊन दरबार भरवित असे.

२ त्यांच्या पैकीं कोणाहीबरोबर तिनें विवाह केला नाहीं.

३ यांच्या अत्याचाराचें ती दमन करीत असे.

४ शेवटीं वर सांगितल्याप्रमाणें विदेशी हब्शाला पहिल्या प्रतीचा सरदार केल्यानें सर्व सरदार तिच्यावर उलटले. रझीयेनें कांहीं वेळ मोठ्या शौर्यानें लढाई केली, परंतु सरते शेवटीं ती एका हिंदूच्या हातून मारली गेली. आतांपर्यंत दिल्लीच्या सिंहासनावर बसलेली पहिली हीच मुसलमानी स्त्री होय. वीस राजपुत्रांहूनही ती अधिक राजकार्यकुशल आहे असें अल्तमश ह्मणे; परंतु तिचें राज्य पुरुषांना आवडलें नाहीं. या जगांत स्वार्थ ही एक विचित्र चीज आहे!

५ साधु स्वभावी नासिरुद्दीन–रझीयाच्या पश्चात अल्तमशाचा मुलगा व नातु यांनीं सहा वर्षें राज्य केलें; परंतु ते शक्तिहीन, विलासी व क्रूर होते. त्यामुळें अल्तमशानें जिंकलेला देश यांच्या हातून गेला, व प्रजेवर फार अत्याचार होऊं लागले. हिंदुस्थानांतील बादशहा निर्बल पाहून मोंगलांनीं पुनः इ. स. १२४१ व १२४५ त दोन स्वाऱ्या केल्या, आणि लुटालूट करून परत गेले. शेवटीं मसऊद मारला गेला व दयाळू आणि धार्मिक नासिर बादशहा झाला. हा कुराण लिहून व तें विकून उदर--निर्वाह करीत असे. याची राणी स्वतः स्वयंपाक करीत असे. सुदैवानें नासिरुद्दीनाला गयासुदीन बलबन हा राजकार्यदक्ष व शूर असा मंत्री मिळाला होता. तो अल्तमशाचा गुलाम असून नासिरुद्दीनचा व्याही होता. नासिरुद्दीन बादशहाचा वृत्तांत त्याच्याच काळीं लिहिलेल्या तबकात--इ--नासरी नामक पुस्तकांत सांपडतो; त्यावरून त्याच्या वेळीं खालील महत्वाच्या गोष्टी घडल्या असें दिसतें.

१ मागील कारकीर्दीत स्वतंत्र झालेल्या रजपुतांना त्यानें पुनः मांडलीक केलें.

२. पंजाबांत लुटालूट करणाऱ्या गख्खर अथवा मोवाती लोकांचा रानटी क्रूरतेनें बंदोबस्त केला.

३. उच्च (मुलतान जवळ) आणि सिंध येथील मुसलमान सरदारांचा बीमोड केला. झेंगिसखानचा नातू हलाकु यानें आपला एक वकील हिंदुस्थानांत पाठविला. त्याच्या सन्मानार्थ एक मोठा थाटाचा दरबार भरविण्यांत आला होता. त्यावरून दिल्ली येथील राजांचें ऐश्वर्य मोंगलांच्या निदर्शनास आलें, व इ. स. १२५७ त होणाऱ्या मोंगलांच्या स्वारीला आळा बसला.

६. **अत्याचारी बलबन**— हा गुलाम वंशांत एक सर्वोत्कृष्ट बादशाहा होऊन गेला. याच्या कारकीर्दीत गुलाम वंश वैभवाच्या शिखराला जाऊन पोहोंचला होता. बलबन उत्तम शास्ता असला तरी तो कोत्या मनाचा, स्वार्थी व अत्याचारी होता.

१. त्याच्या बरोबरीचे कांहीं गुलाम मित्र, उच्च पदाला पोहोंचले होते. ते आपल्या सारखे बलिष्ठ होऊं नयेत ह्मणून त्यांतील चाळीस गुलामांची त्यानें कत्तल केली.

२. हिंदूंना दरबारांत मोठ्या जागा देण्याचें त्यानें बंद केलें.

३. बलबनच्या अत्याचाराला कंटाळून गंगा आणि यमुना यांमधील प्रदेश व मिवात येथील हिंदूंनीं केलेलीं बंडे, त्यानें जबरदस्तीनें मोडिलीं. केवळ मिवात मध्येंच एक लाख हिंदूंची कत्तल झाली.


४. मोंगलांच्या हल्ल्यांतून पळालेल्या पंधरा देशांच्या राजांना व कित्येक कवींना बलबनानें आपल्या दरबारांत आश्रय दिला, यामुळें या कवींनीं बलबनाच्या दोषांवर पांघरूण घालून त्याचे गूण तेवढे प्रसिद्ध केले.

५. इ. स. १२७९ मध्यें बंगालचा सुभेदार तुगरलखान यानें बंड केलें; दोन वेळां त्यानें बादशाही सैन्याचा पाडाव केला. हें बंड मोडण्याच्या बाबतींत बलबनानें मुसलमान व हिंदू या दोघांनाही क्रूरता दाखविली. शेवटीं बलबनच्या एका सरदारानें तुगरलला पकडून ठार मारिलें. नंतर बलबानचा पुत्र बुगराखान तेथील सुभेदार झाला.


६ मोंगलांनीं पंजाबवर इ. स. १२८५ मध्यें हल्ला केला. बलबानचा मुलगा महंमद यानें त्यांचा पराभव केला. परंतु तो स्वतः मात्र कपटानें मारिला गेला. व ऐंशी वर्षांच्या वृद्ध बलबानला आपल्या शूर व बुद्धिमान मुलाचा वियोग असह्य होऊन, तोही इ. स. १२८७ त मेला. यावरून स्वतःला दुःख झाल्या नंतरच दुसऱ्याच्या दुःखाची कल्पना येते या ह्मणीची सत्यता पटते.

७ थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे त्यानें आपल्या दराऱ्यानें राज्यांत शांतता राखिली, आणि एका बाजूनें अत्याचार व क्रूरता आणि दुसऱ्या बाजूनें महनीय दरबार यामुळें त्याची राज्यव्यवस्था सुस्थितींत होती. राज्याच्या सिमेवर बलाढ्य सैन्य ठेवून मोंगलासारख्या परशत्रू पासून त्यानें राज्याचें रक्षण केलें. त्यानें फारसी वाङ्मयाला उदार आश्रय दिला. महाकवि अमीर खुस्रूला त्याचा व त्याच्या मुलाचा फार आश्रय होता. तरी राज्य विस्तारापेक्षां राज्य घटनेकडेच त्याचें अधिक लक्ष होतें. तो न्यायाच्या कामीं फार कडक आणि निःपक्षपाती होता, अशी त्याची कीर्ती आहे. आपल्या राजनीतिकुशलतेनें व संगरप्रियतेनें त्यानें मुसलमानी राज्य जिवंत ठेविलें. त्यामुळें मध्ययुगीन भारताच्या इतिहासांत त्याचें नांव अखंड राहिलें.

७ **कुपुत्र कैकुबाद**—बुगराखान अत्यंत शान्तस्वभावी असल्यामुळें दंग्या धोप्यानें गांजलेल्या दिल्लीचें राज्य करण्याची त्याची इच्छा नव्हती. तेव्हां त्याचा मुलगा कैकुबाद हा बादशाहा झाला. हा अतिशय दुष्टबुद्धीचा, विलासी व निर्लज्ज होता. त्यामुळें '**यथा राजा तथा प्रजा**' या न्यायानें दिल्ली नगरांतील अमीर, वजीर व सर्व साधारण प्रजा सुद्धां चैनबाज झाली. सरदारांना व अधिकाऱ्यांना लोकांस लुटण्याची सुवर्णसंधी मिळाली. बुगराखाननें कैकुबाद बादशाहाला पुष्कळ गोष्टीं सांगून पाहिल्या, परंतु पालथ्या घागरीवर पाणी. कैकुबादनें पित्याचा उपदेश मानिला नाहीं. त्याचा परिणाम असा झाला कीं, खिलजी घराण्यांतील एक मोठा सरदार जलालुद्दीन यानें संधी साधून बादशाहाला सोस्यानें मारून त्याचा अंत केला, व त्याचें शव यमुना नदींत फेंकून दिलें. वाईटाचा शेवट वाईटच! अशा




कैकुबाद दरबारांत बसला आहे. (इंडियन प्रेस)



शमसुद्दीन अल्तमशाची कबर (दिल्ली).



राणी पद्मिनी (बडोदा म्यु.)



देवगिरी (दौलताबाद) येथील किल्ला.

प्रकारें गुलामराजे विलासाचें गुलाम झाल्या कारणानें त्यांचा शेवट झाला, आणि जलालुद्दीनानें खिलजी बादशाहीचें राज्यारोहण रक्ताच्या सिंचनानें व आभिषेकानें साजरें केलें. याचाही शेवट काय होतो हें ओघानें कळेलच.

खिलजी वंश. १२९० ते १३२१.

८ खिलजी विषयीं माहिती:— खिलजी हे तुर्क होते. परंतु बरींच वर्षे अफगाणिस्थानांत राहिल्यामुळें आणि अफगाणांना हिंदुस्थानच्या स्वारींत मदत केल्यानें यांनाही अफगाण असें लोक म्हणूं लागले. या वंशांत तीन खिलजीनीं आणि दोन मुसलमान झालेल्या हिंदूनीं राज्य केलें. ३१ वर्षांच्या अल्पावधींत जरी या वंशांत पांच बादशाहा सिंहासनावर आले, तथापि यांची प्रसिद्धी पुष्कळच आहे.

९ प्रसिद्धीचीं कारणें:— १. त्यांच्या कारकीर्दींत राजपुताना, गुजराथ आणि दक्षिण या तीनही देशांतील रजपूत राज्यें कन्याकुमारी पर्यंत जिंकिलीं गेलीं, आणि गुजराथेंत मुसलमानी अंमलाला सुरवात झाली. २. यानीं आपल्या राज्यांत मोंगलांची वसाहत करविली व त्यांनीं बंड पुकारल्यास त्यांची कत्तल केली; अशारीतीनें त्यांच्या स्वाऱ्या बंद करून आपल्या देशाला शान्ति व सुबत्ता प्राप्त करून दिली. ३. हिंदू आणि मुसलमान यांच्यात एकी होऊं लागली. ४. हिन्दी आणि फारसी मिळून एक नवी उर्दू भाषा प्रचारांत आली. याकाळीं, याच भाषेंत कविता करण्यास कवि खुस्रोनें आरंभ केला. हल्लीं सुद्धां त्या भाषेचा पुष्कळ लोक उपयोग करतात.

१० दयाळु जलालुद्दीन:— सत्तराव्या वर्षी कैकबाद आणि त्याचा मुलगा यांना ठार मारून जलालुद्दीनानें राज्य बळकाविलें, पण त्याचा स्वभाव रुधिरप्रिय नव्हता. तो राजद्रोह्यांना व चालून आलेल्या मोंगलांना अति दयाळुपणामुळें क्षमा करीत असे. त्यामुळें त्याच्या राज्यांत अधिकाधिक बंडें होऊं लागलीं. राजद्रोही आणि खुनी लोकांना इतर प्रजेला त्रास देण्याला सुवर्णसंधि मिळाली. त्याचा पुतण्या व


जांवई अल्लाऊद्दीन यानें सुद्धां त्याच्या प्रेमळपणाचा आणि दयाळु स्वभावाचा फायदा घेऊन त्याचा कपटानें घात केला.

महत्वाच्या गोष्टीः– १ लाहोरावर मोंगलानीं केलेला हल्ला यानें परतविला; हजारों मोंगलांना पकडलें आणि त्यांना मुसलमान करून दिल्ली जवळ मोंगलपूर नामक गांव वसविलें.

२ रजपुतांच्याकडून मालवा जिंकून घेतला व उज्जैन येथील देवालय पाडलें; पण त्याला रणथंबोर किल्ला जिंकता आला नाहीं.

३ अल्लाउद्दीनानें प्रथम बुंदेलखंड व भिलसा हीं शहरें लुटलीं; नंतर आठ हजार स्वार घेऊन यादव रजपुतांची प्रसिद्ध राजधानी देवगिरी लुटण्याकरितां दक्षिणेंत ८०० मैल तो चालून गेला. परंतु जातांना अल्लाउद्दीनानें ही खरी गोष्ट रजपुतांना कळूं दिली नाहीं. त्यानें असें उठविलें होतें कीं, जलालुद्दीनाच्या हातांतून जीव वांचवून आपण सैन्यासकट देवगिरीच्या राजाजवळ नोकरी मागण्यास जात आहों. परंतु कपटी अल्लाऊद्दीनानें अकस्मिक विजेप्रमाणें देवगिरीवर स्वारी केली, व शेवटीं सहाशें मण मोती, दोन मण रत्नें, दोनहजार मण चांदी, चार हजार रेशमीं वस्त्रे आणि हजारों अमूल्य वस्तूंची लूट मिळविली. जलालुद्दीन आनंदानें आपल्या पुतण्याला भेटण्याकरितां प्रयाग नजीक आला, परंतु निर्दय आणि कपटी अल्लाउद्दीनानें पितृवत् असलेल्या आपल्या वृद्ध चुलत्याचा घात केला. दक्षिणेंतून आणलेली अगणित संपत्ति अल्लाउद्दीनानें आपली प्रजा, सरदार, व सैन्य यांना वाटून दिली व त्यांचें तोंड बंद केलें. यामुळें सर्वलोक त्याचीं दुष्कृत्यें विसरले व त्याला राज्य कारभारांत मनःपूर्वक सहाय्य करूं लागले. द्रव्याचा प्रभाव असा आहे.

११ अत्याचारी अल्लाउद्दीनः–हा अति निर्दय, कपटी, जुलमी आणि क्रूर बादशाहा होता. त्यानें रक्ताचा पाट वाहवून जग जिंकण्याची इच्छा धरली. त्याला धर्माची अगर विद्येची मुळींच चाड नसल्यामुळें तो निरक्षर होता. इतिहासकार झियाउद्दीन बारणी असें ह्मणतो कीं मिसर देशाचा क्रूरतेमुळें प्रसिद्ध असलेला राजा फॅरो याच्यापेक्षांही अल्लाउद्दीन अधिक अत्याचारी व रुधिर प्रिय होता. त्यानें



चितोडगडांतील राणी पद्मिनीचा महाल (ओझा)



चितोडगड कीर्तीस्तंभ (ओझा).

केलेले कांहीं अत्याचार येणें प्रमाणें:– हिंदूंना हत्ती, घोडे, पालखी वगैरे वापरण्याची मनाई केली. देवस्थान, इनाम व खासगी मालकीच्या सर्व जमिनी त्यानें सरकारजमा केल्या. दुआबांतील प्रत्येक शेतकऱ्याला जमिनीचा लहानसाच तुकडा लागवडीसाठीं दिला जात असे, व त्यांतील उत्पन्नाचा अर्धा हिस्सा सारा म्हणून घेण्यांत येई. गाई, बैल, मेंढरें वगैरे पाळण्यासही कर द्यावा लागत असे. आपलीं उत्तम वस्त्रें व अलंकार बादशहास दिसल्यास ते जप्त होतील या भीतीस्तव ते कोणीही धारण करूं शकत नसत. सर्व उत्सव, मेळे, मेजवान्या आणि सरदारांतील विवाह त्यानें बंद केले होते. जागोजागीं हेर नेमून त्यानें प्रजेला इतकें सतावून सोडलें होतें कीं, प्रजेच्या स्वप्नांतल्या गोष्टीच फक्त सोडून बाकी सर्व गोष्टी बादशहाला समजत असत असें म्हणतात. सर्वांना निर्धन करण्याकरितां व आपल्या प्रचंड सैन्याचा खर्च चालण्यासाठीं सर्व पदार्थांच्या किंमती सरकारतर्फे निश्चित करण्यांत आल्या होत्या. दारू पिणें किंवा तयार करणें यांना फार मोठी शिक्षा ठेविली होती. तुरुंग कैद्यांनीं भरून दुसऱ्या कैद्यांना ठेवण्यास जागा उरली नाहीं तर, कैद्यांना ठार मारलें जात असे. त्याचें सैन्य फार मोठें असून चार लक्ष पंचाहत्तर हजार लोक फक्त पायदळांतच होते. त्यांच्या खर्चानें प्रजेला पीडा व त्रास होत असे.

१२ मोंगलांचा पराभवः-- इ. स. १२९७ ते १३०५ पर्यंत मोंगलांनीं पांच वेळां हिंदुस्थानावर मोठमोठ्या स्वाऱ्या केल्या व प्रत्येक स्वारीच्या वेळीं शहरें लुटून स्त्रिया व मुलें घेऊन ते जात असत. एक वेळ तर ते दिल्लीला दोन महिने वेढा देऊन बसले होते. त्यांना हांकून देण्याकरितां अल्लाउद्दीनानें दिल्लीच्या भोंवतीं किल्ले बांधले, आपलें लष्कर फार वाढवून सरहद्दीवर मोठें सैन्य ठेवलें, युद्धांत पकडलेल्या मोंगलांना मुसलमान केलें, व मुसलमान होण्याचें ज्यांनीं नाकारलें त्यांना हत्तीच्या पायीं ठार मारून त्यांच्या शिरांचे स्तंभ उभारले. मोंगलपूरच्या मोंगलांवर जरा अविश्वास झाल्याबरोबर त्यानें सुमारें तीस हजार मोंगलांची कत्तल केली, व त्यांच्या बायकामुलांना गुलाम म्हणून विकून टाकलें. अल्लाउद्दीनाच्या क्रूरपणामुळें मोंगलांनीं इतकी धास्ती घेतली कीं, पुढें एक शतकापर्यंत त्यांनीं हिंदुस्थानावर स्वारी केली नाहीं.

१३ राज्यविस्तारः– १. इ. स. १२९६ ते १२९८ या वर्षांत गुजराथच्या स्वतंत्र रजपूत राजाचा अल्लाउद्दीनानें पराभव केला, आणि त्याची पत्नी कमलादेवी हिला आपली राणी करून तिची एक सुंदर मुलगी देवलदेवी हिचें आपला पुत्र खुस्रू याच्याशीं लग्न लाऊन दिलें. ह्याच हल्ल्यांत एक हिंदू अधिकारीही अल्लाउद्दीनाच्या हातीं सांपडला. तो पुढें मुसलमान होऊन हजारदोनारी **मलिक काफूर** या नांवानें प्रसिद्धीस आला, व नंतर अल्लाउद्दीनाचा सेनापती झाला. काफूरला दक्षिणेची पूर्ण माहिती असल्याकारणानें तो देश जिंकण्याकरतां एक मोठ्या सेनेसह त्याची योजना झाली, व ती कामगिरी त्यानें योग्य प्रकारें बजाविली.

२ रणथंबोरचा अजिंक्य किल्ला अल्लाउद्दीनानें जिंकला. त्यावेळीं तेथील हजारों रजपूत स्त्रीपुरुषांनीं स्वधर्म व स्वदेश यांकरतां आत्मसमर्पण केलें.

३ मेवाडची राजधानी चितोड यावर दोन वेळां हल्ले करून शेवटीं इ. स. १३०३ त अल्लाउद्दीनानें तो जिंकला. चितोडची रूपवती पद्मिनी हिनें अग्निप्रवेश करून आपलें व आपल्या देशाचें नांव अमर केलें.

४ तसेंच त्यानें मोठ्या प्रयत्नानें माळवा, मांडू, उज्जैन, चंदेरी हीं जिंकून घेतलीं, व अशा तऱ्हेनें बहुतेक राजपुताना आपल्या अमलाखालीं आणिला.

५ उत्तर हिंदुस्थानांतील बहुतेक मोठे राजे जिंकल्यावर दक्षिणेकडील राज्यें पादाक्रांत करण्याचा अल्लाउद्दीनानें निश्चय केला व वर सांगितल्याप्रमाणें शूर व चतुर काफूरबरोबर प्रचंड सेना देऊन त्याला दक्षिणेकडे पाठविलें. त्यानें चार हल्ल्यांतच देवगिरी, तेलंगण, द्वारसमुद्र व रामेश्वर पर्यंतचा मुलुख पादाक्रांत केला (भाग १ ला पान १०९ते११२). इ. स. १३०६ त त्यानें देवगिरी जिंकून यादववंशी रामदेवाला कैद करून दिल्लीला आणलें; परंतु खंडणी देण्याचें कबूल करून तो आपले राज्यांत परत आला. इ० स० १३०९ त काफूरानें तेलंगणावर स्वारी केली, व वरंगळ राजधानी जिंकून तेथील राजा प्रतापरुद्र याच्याकडून खंडणी देण्याचें कबूल करून घेतलें. इ०स० १३१० त यानें द्वारसमुद्राच्या बल्लाल राजांना जिंकलें, व पुढच्या वर्षीच रामेश्वरा-

पर्यंतचा सारा देश जिंकून घेतला. ठिकठिकाणीं मुसलमानी विजयाचें विजयचिन्ह ह्मणून मशिदी बांधून आणि अगणित द्रव्य घेऊन काफूर परत आला. इ. स. १३१२ मध्यें काफूरानें देवगिरीवर हल्ला करून तेथील राजा रामदेवाचा पुत्र शंकरदेव याला ठार मारिलें व तें राज्य हस्तगत केलें. पुन्हां थोड्याच वर्षांत दक्षिणेकडील रजपुतांनीं आपली स्वतंत्र सत्ता स्थापन केली; तरी रजपुतांची कीर्ति जी एकदां नष्ट झाली ती कायमचीच. कारण पुढें लौकरच मुसलमानी सत्ता दक्षिणेंत स्थिर झाली. वरील विजयामुळें अल्लाउद्दीन स्वतःला शिकंदरसानी (प्रतिशिकंदर) असें म्हणवीत असे व त्यानें आपल्या नाण्यांवर सुद्धां शिकंदरसानी हेंच नांव कोरलें आहे.

१४ **चितोडचा विजयः**—वरील सर्व स्वाऱ्यांत चितोडचा हल्ला अद्वितीय आहे. त्याचा वृत्तांत थोडक्यांत असा आहे. चितोडच्या अल्पवयी राजाचा संरक्षक भीमसी होता. पद्मिनी नामक सिंहलद्वीपची राजकुमारी त्याची पत्नी होती. ती अत्यंत लावण्यवती असल्यामुळें तिला आपल्या जनानखान्यांत ठेवावी अशी अल्लाउद्दीनाला इच्छा झाली. या कारणाकरितां त्यानें चितोडवर हल्ला केला. परंतु धर्म व देश यांकरतां प्राणही देण्यास तयार असलेल्या रजपुतांनीं त्याला चांगलें तोंड दिलें. त्यामुळें चितोड किल्ला सहजरीत्या आपल्या स्वाधीन होत नाहीं, असें बादशहाला कळून चुकलें; आणि शेवटीं बादशहानें पद्मिनीचें प्रतिबिंब फक्त आरशांत पाहून स्वदेशी परत जावें व पुन्हा चितोडवर कधींही हल्ला करूं नये, या करारास तो कबूल झाला. कराराप्रमाणें अगदीं थोड्या लोकांनिशीं बादशाहा किल्ल्यांत आला आणि त्यानें पद्मिनीच्या सुंदर मूर्तीचें प्रतिबिंब कांहीं आरशांत पाहिलें. या वेळीं धर्मशील रजपुतांनीं अल्लाउद्दीनाच्या एका केंसाला देखील धक्का लावला नाहीं. परंतु भीमसी किल्ल्याबाहेर त्याला पोहोचवावयास आला असतां अल्लाउद्दीनानें कपटानें त्याला कैद केलें; आणि पद्मिनीच्या प्राप्तीखेरीज भीमसीला सोडणार नाहीं, असें सांगितलें. अशा परिस्थितींत 'शठं प्रति शाठ्यं' या न्यायानेंच अल्लाउद्दीनाचा प्रतिकार करावयाचें ठरवून पद्मिनीनें "मी आपल्या दासीसह आपल्याकडे येण्यास तयार आहें," असा त्याला निरोप पाठविला. ७०० डोल्यांत शस्त्रसज्ज असे ७०० शूर व जिवावर उदार झालेले रजपूत बसवि-

ण्यांत आले. प्रत्येक डोलीला उचलणारे भोई म्हणून ६।६ रजपूत शिपाईच होते. अशा तऱ्हेनें सुमारें ५००० रजपूत अल्लाउद्दीनाच्या सैन्यांत वेषांतरानें येऊन पोहोचले. पद्मिनीनें आपल्या पतीबरोबर शेवटले दोन शब्द बोलण्याची परवानगी घेतली; व या मिषानें भीमसी व पद्मिनी दोघेही कांहीं अंतरावर तयार ठेवलेल्या दोन अति चपल घोड्यांवर स्वार होऊन चितोड गडाकडे निघून गेले. अल्लाउद्दीनाच्या सैन्याला आपल्या धन्याचा पाठलाग करतां येऊं नये म्हणून त्यांना अडवून धरण्याकरतां ५००० रजपुतांनीं आपले प्राण वेंचले. अल्लाउद्दीनानें पुन्हां चितोडगडाला वेढा दिला. पण यावेळीं सुद्धां त्याचें कांहीं न चालल्यामुळें लज्जित होऊन तो दिल्लीला परत गेला. परंतु चितोड घेण्याची त्याची इच्छा मात्र अनावर वाढली. त्यामुळें अतिशय मोठें सैन्य घेऊन त्यानें पुन्हा चितोडगडावर हल्ला केला. पहिल्या हल्ल्यांत पुष्कळ रजपूत कामास आले होते; तरी या हल्ल्याच्या वेळींसुद्धां शिल्लक राहिलेले रजपूत जिवावर उदार होऊन लढले. परंतु शत्रूपुढें टिकाव धरणें अशक्य झाल्यामुळें, यावेळीं किल्ल्याचें रक्षण करणें शक्य नाहीं, असें दिसून आल्यावरून त्यांनीं जोहर करण्याचा निश्चय केला. हजारों रजपूत स्त्रियांनींही मुसलमानांच्या हातून आपलें व आपल्या धर्माचें रक्षण करण्यासाठीं चितेच्या द्वारें स्वर्गद्वार गांठलें. राणी पद्मिनी ही त्यांत अग्रणी होती. सर्व रजपूत पुरुष केशरी पोषाख धारण करून व हातांत नग्न तलवारी घेऊन आपल्या धर्माच्या व देशाच्या शत्रूबरोबर लढण्याकरतां किल्ल्याच्या बाहेर पडले. प्रत्येक जणानें लढतां लढतां आनंदानें आपला देहत्याग केला. सर्व रजपूत वीर रणक्षेत्रांत दिवंगत झाल्यावर अल्लाउद्दीनानें स्मशानभूत चितोडांत प्रवेश केला. सर्व शहर आणि गड पेटलेल्या चितांच्या धुरानें भरलेला त्याच्या दृष्टीस पडला. ज्या कमलनयनेच्या प्राप्तीसाठीं या बादशहानें हा घनघोर संग्राम केला, ती पद्मिनी आतां प्रतिबिंबाच्या रूपानें देखील त्याच्या दृष्टीस पडणें शक्य नव्हतें. तेव्हां तो फार खजील होऊन दिल्लीला परतला, व त्यानें चितोड रजपुतांच्याच हातीं राहूं दिला.

१५ अल्लाउद्दीनाचा अंतः—वाइटाचा शेवट वाईटच व्हावयाचा.

आपल्या कारकीर्दीच्या शेवटीं अल्लाउद्दीनाचा अत्याचार आणि अविश्वासीपणा अधिकच वाढला. त्याचे सर्व मुलगे विषयी आणि दारूबाज निघाले. दोन पुत्रांना त्यानें कैदही केलें. आणि सारा राज्यकारभार काफूरच्या हातीं सोंपविला. ज्या ज्या रजपूत राजांना अल्लाउद्दीनानें जिंकलें होतें ते बहुतेक स्वतंत्र झाले, आणि गुजराथ व दक्षिण येथें बादशहाविरुद्ध बंडें उद्भवलीं. राज्यलोभानें काफूरानें इ. स. १३१५ मध्यें बादशहाचा घात करविला व तो स्वतः गादीवर बसला. त्यानें बादशहाच्या दोन मुलांचे डोळे काढले; परंतु मुबारक त्याच्या हातीं सांपडला नाहीं. मुबारकच्या पक्षांतील लोकांनीं सहा महिन्यांत काफूरला ठार मारलें आणि मुबारक गादीवर बसला.

१६ अल्लाउद्दीनाच्या कारकीर्दीचें सिंहावलोकनः–(१) अल्लाउद्दीन हा शिकंदर, तैमूर, झेंगिसखान, नादिरशहा यांच्याच योग्यतेचा मोठा विजेता होता, यांत शंका नाहीं. (२) दक्षिण व चितोड ताब्यांत आणणारा हाच पहिला मुसलमान बादशहा होय. (३) राजकारणाच्या बाबतींत कुराणाच्या आज्ञाही कित्येक वेळां बाजूला ठेवण्यास तो कचरत नसे. (४) तो ‘ना विष्णुः पृथिवीपतिः’ या तत्वाचा पुरस्कार करणारा पहिलाच बादशहा होता. या तत्वाला अनुसरूनच त्यानें आपली सोटेशाही व दडपशाही गाजविली. (५) मालाच्या किंमती, मजूरांचे पगार, सामाजिक चालीरीति इत्यादि सर्व आपल्या इच्छेप्रमाणें नियमित करण्याचा त्यानें पहिल्यानेंच प्रयत्न केला. (६) राजद्रोहाचा नायनाट करण्यासाठीं, सरदारांचा बीमोड करण्याकरितां व प्रत्येक इसम आपल्या आधीन व्हावा म्हणून त्यानें शक्य ते अति कडक उपाय योजिले. त्यानें सरदारांचीं उत्पन्नें खालसा केलीं, हेर मोठ्या प्रमाणांत नेमले, आणि प्रजेकडून द्रव्य उकळण्याचे असंख्य उपाय योजिले. (७) त्यानें खासगी बैठकी देखील बंद केल्या. त्याचें सैन्य प्रचंड व युद्धनिपुण होतें. (८) त्यानें आपल्या राज्यांत दारूबंदीहि केली. अशा रीतीनें वागून त्यानें हिंदुस्थानाच्या इतिहासांत आपलें नांव केलें.

१७ नामुबारक (अशुभ) मुबारकः—मुबारकचें राज्यारोहण अशुभच ठरलें! त्यानें आपल्या धाकट्या भावाची व ज्यांच्या सहायानें

त्यास सिंहासन प्राप्त झालें होतें त्या सरदारांचीहि कत्तल करविली. त्यानें खुस्रू नांवाच्या एका नीच मनुष्याला उच्च पदवी दिली, आणि त्याच्या हातीं राज्यकारभार देऊन आपण भोगविलासांत गुंग होऊन गेला. स्त्रीवेश घेऊन तो सरदारांच्या घरीं नाच करीत असे. अशा रीतीनें राज्यलक्ष्मीची विडंबना चालली होती. गुजराथेंतील खुस्रू नांवांचा एक अस्पृश्य, बादशहा होण्याच्या इच्छेनें मुसलमान झाला होता; वाढत वाढत खुस्रू मुबारकचा मुख्य वजीर झाला; व शेवटीं त्यानें इ. स. १३२० मध्यें मुबारक आणि राजकुमार यांना ठार मारून स्वतः राज्य बळकाविलें.

१८ **अदूरदर्शी खुस्रूखान**——वर सांगितल्या प्रमाणें बादशहा झाल्यावर खुस्रूनें खजिन्यांतील संपत्ति मोठ्या औदार्यानें वाटली. त्याचें कारण असें कीं, खिलजी वंशांतील राजांचा व राजपुत्रांचा घात करून आपण तक्त मिळविलें, ही गोष्ट प्रजेनें विसरून जावी. परंतु खुस्रू पुरे सहा महिनेही राज्य करूं शकला नाहीं. राज्यलोभानें जरी तो मुसलमान बनला होता, तरी हिंदू राज्याच्या पुनरुद्धाराविषयीं त्याला जबर इच्छा होती. त्यामुळें त्यानें अनेक प्रकारांनीं मुसलमानांचा छळ केला व म्हणून मुसलमानी प्रजा त्याचे विरुद्ध झाली. या छळाचा पुरा सूड घेण्यासाठीं, त्यांनीं त्या काळचा शूर जेता म्हणून नांवाजलेला दिपालपुरचा सुभेदार गयासुद्दीन तघलक याला खुस्रूवर स्वारी करण्यासाठीं आमंत्रण दिलें, व त्याप्रमाणें तो आला. या वेळीं दिल्लींतील हिंदू प्रजा व इतर हिंदू राजे यांपैकीं कोणीच खुस्रूला मदत केली नाहीं. याप्रमाणें असहाय झाल्यामुळें खुस्रूचा पराभव झाला व तो मारला गेला. अशा तऱ्हेनें जात्यन्ध हिंदूंनीं हिंदुराज्याच्या पुनरुद्धाराची चालत आलेली सोन्यासारखी संधि दवडली आणि पुन्हा मुसलमानी राज्याची बेडी आपल्या पायांत अडकवून घेतली.

प्रकरण ३ रें

तघलक वंश- इ. स. १३२१ ते १४१४

१ **गयासुद्दीन** (१३२१-१३२५)—हा बादशहा तघलक वंशाचा संस्थापक होता. याचा बाप तुर्की गुलाम व आई हिंदू होती. खिलजी वंशांतील एकही पुरुष जिवंत नसल्यानें सरदारांनीं गयासुद्दीनाला राज्य दिलें; व तें त्यानें दयाळुपणानें व हुषारीनें चालविलें. याच्या कारकीर्दीत व्यापाराची भरभराट असे, व दरबारांत विद्वानांचा सन्मान होत असे. जुलमानें गांजलेल्या प्रजेचा राग शांत करण्याचा यानें अतिशय प्रयत्न केला. हा मोठा शूर, लढवय्या व राज्यकार्यधुरंधर होता. त्यानें चांगले कायदे केले आणि लोकांच्या मनांत विश्वास उत्पन्न करून गादीची योग्यता व वैभव हीं वाढविलीं. त्यानें जमीन महसुलाची फेरतपासणी करून वसुलाच्या पद्धतीची पुनर्घटना केली, व आपल्या सैन्याला नेहमीं संतुष्ट आणि शिस्तींत ठेविलें. पण त्याची हिंदूंशीं वागणूक उदारपणाची नव्हती. दिल्ली येथील हिंदूंचें त्याला भय वाटत असे आणि त्यांच्या भयानें त्यानें दिल्लीपासून चार मैलांवर तुगलकाबाद नांवाचें एक नवीन नगर वसविलें. अजूनही त्याचे अवशेष सांपडतात.

२ **त्याची कारकीर्दः**— १. वर सांगितल्याप्रमाणें दक्षिणेकडील तेलंगण देशांत वरंगळ येथें हिंदू राजे राज्य करीत होते. ते दिल्लीला योग्य रीतीनें खंडणी पाठवीत नसल्यामुळें त्यांचें पारिपत्य करण्यासाठीं गयासुद्दीनानें आपला मुलगा जूनाखान याला पाठविलें, परंतु त्याचा पराभव होऊन त्याला परत यावें लागलें. या पराभवाचें उट्टें काढण्यासाठीं दुसऱ्या खेपेस त्यानें बहुतेक तेलंगण देशाचा नाश केला, व तेथील राजाला कैद करून दिल्लीला पाठविलें; आणि जूनाखान स्वतः मोठी लूट घेऊन परत आला.


२ गयासुद्दीनानें विदर्भ (बेदर) राज्यही जिंकून घेतलें.

३ बंगालमध्यें बलबनचा मुलगा बुगराखान अजून पर्यंत स्वतंत्र रीतीनें राज्य करीत होता त्याला त्यानें मांडलीक केलें.

४ सुनारगंग (ढाका) व मिथिला (तिर्हुत) येथील राजांचाही गयासुद्दीनानें पराभव केला. हा विजय संपादून बादशहा परत आला तेव्हां विजयाच्या आनंदाप्रीत्यर्थ आपल्या बापाला सामोरे जाऊन भेट-ण्यासाठीं त्याचा पुत्र जूनाखान यानें एक लांकडी इमारत तयार केली होती. भेटी होऊन बादशहा बाहेर पडणार, इतक्यांत दुर्दैवानें ती इमारत एकदम कोसळली आणि त्या खालीं सांपडून गयासुद्दीन इ. स. १३२५ त मरण पावला. कांहींचें असें मत आहे कीं आपल्या बापाला मारण्यासाठींच जूनाखानानें हा बेत मुद्दाम रचिला होता.

३ **महंमदशहा तघलक** (१३२५–१३५१):— जूनाखान बादशहा झाल्यावर त्यानें महमदशहा असें नांव धारण केलें. हा परस्पर-विरोधी गुणांचा पुतळाच होता. तो आपल्या काळीं मोठा विद्वान् समजला जात असे. युनानीदर्शनशास्त्र, वैद्यक तसेंच ज्योतिष यांत तो निष्णात असून भक्तिमान् व दानशील होता. परंतु त्या बरोबरच तो मूर्ख, अन्धविश्वासी, अत्याचारी, क्रूर, हट्टी, चंचल आणि गर्विष्ठही होता. इतिहासकार बाराणी म्हणतो कीं, यानें लोकांची तृणवत् कत्तल केली. इब्न बतूता लिहितो कीं, "महमदला दान देण्यांत आणि रक्तासिंचन करण्यांत सारखाच आनंद होत असे. राजवाड्याच्या दरवाजापाशीं, रंकाचा राव होऊं पाहणारा एखादा भिकारी किंवा बादशहानें ठार मारलेल्या एखाद्या माणसाचें प्रेत या दोहोंपैकीं एक तरी दृश्य नेहमींच दृष्टीस पडावयाचें." यावरून असें दिसतें कीं, तत्कालीन मुसलमान इतिहासकारांनाही बादशहाची ही पाशवी वागणूक पसंत नव्हती. बादशहाच्या या दुर्गुणांमुळें हिंदुस्थानावर ओढवलेल्या सर्व आपत्तींचें वर्णन करणें अशक्य आहे. तथापि त्यांतील कांहीं गोष्टी खालीं दिल्या आहेत:–

(१) मोंगलांनीं एकदां हल्ला केला असतां, युद्ध करण्याचें सामर्थ्य असूनही यानें त्यांना खजिन्यांतील द्रव्य देऊन परत पाठविलें; या



तघलक.



ग्यासुद्दीनचा दरबार.

मुळें मोंगल अधिक वळावले व वारंवार हल्ला करूं लागले. (२) यानें दोआवच्या शेतकऱ्यांवरील कर फार वाढविला व जेव्हां शेतकऱ्यांनीं हा वाढविलेला कर देण्याचें नाकारलें, तेव्हां बादशहानें त्यांना भयंकर दंड केला. त्यामुळें आपल्या भरलेल्या शेतांचा त्याग करून ते शेतकरी वनांत निघून गेले. रानांत सुद्धां त्यांना हुडकून काढण्याकरितां बादशहानें पाठविलेल्या सैन्यानें या शेतकऱ्यांची पशुवत् शिकार करून त्यांना ठार केलें. (३) त्यानें कनोजवर एकदम हल्ला केला व एक लाख हिंदूंची कत्तल केली. या कारणांमुळें देशांत दुष्काळ पडला व खजिना रिकामा झाला. (४) देशाचें संरक्षण तर दूरच राहिलें; पण बादशहानें धनप्राप्तिस्तव चीन देश जिंकण्यासाठीं एक लाख सैन्य तिकडे पाठविलें. चिनी लोकांनीं हिमालयांतच त्यांतील पुष्कळसें सैन्य कापून काढलें, व त्यांतून बचावलेले लोक परत आल्यावर बादशहानें त्यांची कत्तल केली. (५) चीन देशांतून धन मिळत नाहीं असें पाहून, तें इराणांतून आणण्याकरतां एक लाख सैन्य तिकडे पाठविलें. परंतु पगार थकल्यामुळें सैन्यांतील लोकांनीं पंजाबच्या पुढें जाण्याचें नाकारलें व प्रजेला मनमुराद लुटलें. (६) देशांतील सोनें, चांदी संपल्यामुळें, त्यानें तांब्याचें नाणें पाडलें व तें चांदीच्या रुपयाप्रमाणें चालू करावें असें फर्मावलें. व्यापाऱ्यांनीं तें घेण्याचें नाकारलें, व्यापार बंद पडला व देशांत दारिद्र्यानें ठाणें दिलें. (७) देवगिरीला आपली राजधानी करावी अशी त्याची इच्छा होती; म्हणून दिल्लींतील लोकांना देवगिरी येथें जाऊन राहण्यास यानें दोन वेळां आज्ञा केली, व देवगिरीचें नांव बदलून दौलताबाद असें ठेवलें. दौलत ह्मणजे धन. जणूं काय नांव बदलून देवगिरी संपत्तीचें माहेरघरच बनून जाणार होती! तेथें जावयास चांगला रस्ता नव्हता, खाण्यास अन्नसामुग्री नव्हती, सामान नेण्यास वाहन मिळत नव्हतें, कीं रहावयाला घर मिळत नव्हतें. सर्व प्रदेश खडकाळ; आणि मार्ग उंच पर्वतांनीं अडवलेला. हजारों लोक रस्त्यांतच मेले; उरलेल्यांना मग दिल्लीला परत जाण्याची आज्ञा मिळाली. अंगांत सैतान संचारला कीं अशी अवस्था होते! (८) याच्या मूर्खपणालाही सीमा नव्हती! दक्षिणेवर

यानें स्वारी केली, त्या वेळीं याचा एक दांत पडला. त्याचें यानें भीर नांवाच्या गांवीं मोठ्या समारंभानें दफन केलें व त्यावर एक कबर बांधली. त्यानें आपल्या मूर्खपणाचें चिरकाल टिकणारें स्मारकच उभारलें म्हणायचें ! अशा प्रकारें या बादशहानें अल्लाउद्दीन आणि इराणचा बादशहा जुहाक यांना क्रूरपणांत मागें टाकलें व मूर्खपणांत रोमचा बादशहा नीरोवरही ताण केली, यांत संशय नाहीं असेंच म्हणावें लागतें.

४ बंडें:—वरील सर्व कारणांमुळें देशांत अशांतता माजली व त्याचें पर्यवसान जिकडे तिकडे बंडें उभारण्यांत झालें. निरनिराळ्या प्रान्तांतील सुभेदार व रजपूत राजेही महंमदशहाची सत्ता झुगारून स्वतंत्र झाले.

१ इ. स. १३३६ त वरंगळच्या राजघराण्यांतील दोन पुरुष हरिहर व बुक्का यांनीं विजयनगर येथें आपली गादी कायम केली.


२ इ. स. १३४० त बंगालचा सुभेदार स्वतंत्र झाला; परंतु अयोध्या येथील स्वतंत्र होऊं इच्छिणाऱ्या सुभेदाराचा बादशाही सैन्यानें पराभव केला. त्याचप्रमाणें सिंधचा सुभेदारही कांहीं वर्षे युद्ध केल्यावर बादशहाच्या हस्तगत झाला.

३ इ. स. १३४७ त हसनगंगूनें दक्षिणेंत ब्राम्हणी राज्याची स्थापना केली.

४ इ. स. १३५० त गुजराथचा पठाण सुभेदार स्वतंत्र झाला.

५ राजपूतान्यांतील सर्व राजे तर आधींच स्वतंत्र झाले होते.

५ **शान्तिप्रिय फिरोजशहा** (१३५१ ते १३८८):— महम्मदाच्या नंतर त्याचा चुलतभाऊ फिरोजशहा गादीवर आला व बऱ्याच खालावलेल्या दिल्लीच्या राज्याचा राजा झाला. या बादशहाचा स्वभाव महम्मदशहाच्या अगदीं उलट होता. हा बुद्धिमान्, शान्तताप्रिय, दयाळु, सर्वांशीं मैत्री करणारा व कट्टा मुसलमान होता. त्यानें महम्मदाच्या राजवटींत पिडलेल्या प्रजेला आपल्या ३७ वर्षांच्या कारकीर्दीत फार सुख दिलें; महम्मदाचे सर्व हानिकारक कायदे बंद केले; जमिनीवरचे व व्यापारावरचे कर कमी केले; शेतीच्या समृद्धीकरितां कालवे बांधिले. व प्रजेच्या सोईकरतां पुष्कळ धर्मशाळा, तलाव, स्नानगृहें, पूल, विहिरी,




फिरोजशहाची लाट.



फिरोजशहा तघलक (इंडीयन प्रेस).



तैमुरलंग (बडोदा म्यु)



तघलक्राबाद.

मशिदी, विश्वविद्यालयें, व स्तंभ उभारले. त्यानें नवी दिल्ली वसविली व तिचें नांव फिरोजाबाद असें ठेवलें; व हिसार, फत्तेवाद व जोनपूर हींही शहेंर वसविलीं. त्यानें गुलामांचीं पुष्कळ दुःखें निवारिलीं व गुन्ह्याबद्दल दिल्या जाणाऱ्या अमानुष शिक्षा बंद करून त्या सौम्य केल्या. महम्मदच्या वेळीं स्वतंत्र झालेल्या लोकांना जिंकण्याचा यानें फार प्रयत्न केला, पण त्यांत त्याला यश आलें नाहीं. त्यांना जिंकण्याचे प्रयत्न व्यर्थ होतात हें जाणून, यानें तो नादच सोडला व आपल्या ताब्यांत असलेल्या संयुक्तप्रांत व पंजाब या राज्यांवरच तो संतुष्ट राहिला.

६ राजकीय उलाढाली:—(१) फिरोजशहानें बंगाल प्रांत दिल्लीच्या अंमलाखालीं आणण्याचा प्रयत्न केला, पण त्यांत त्याला यश आलें नाहीं. त्यामुळें बंगालचें स्वातंत्र्य मान्य करणें त्याला भाग पडलें. (२) त्यानें बहामनी राज्याचें स्वातंत्र्य कबूल केलें. (३) त्यानें सिंधप्रांत जिंकला होता; पण तेथील राजाच्या नातलगाला तो परत देणें त्यास भाग पडलें. वरील गोष्टींव्यतिरिक्त विशेष असें याच्या कारकीर्दींत कांहींच घडलें नाहीं.

७ हिंदूंवर अत्याचार:—हा बादशहा गुणी असला, तरी कट्टा मुसलमान होता. ह्यानें हिंदूंवर भयंकर अत्याचार केले. १. यानें त्यांचीं देवळें पाडलीं व त्या सामानानें मशीदी बांधल्या. २. आतांपर्यंत ब्राम्हणांपासून जिझीया कर घेतला जात नसे, तो यानें त्यांच्यावर लादला. ३. जो हिंदू मुसलमान होण्याचें नाकबूल करी, त्याला भयंकर दंड होत असे. ४. दिल्लींतील एक ब्राम्हण मुसलमानांची शुद्धी करून त्यांना हिंदू करून घेत आहे, असें बादशहाला समजल्या-वरून, त्या ब्राम्हणाला जिवंत जाळण्यांत आलें. ५. अशोकाच्या वेळचे दोन स्तंभ मीरत नगरांत व यमुनेच्या मुखाजवळ होते. त्यांचा पाया खोल पृथ्वीच्या गर्भांत आहे अशी लोकांची कल्पना होती. ती कल्पना नाहींशी करण्यासाठीं फिरोजशहानें ते उखडून दिल्लींत नेऊन पुरले. ६. सर्वांत लाजिरवाणी व दुःखाची गोष्ट ही कीं, हिंदूंना मोठ्यानें मंत्र उच्चारून किंवा शंख अगर घंटा वाजवून देवाची पूजा करण्याची त्यानें मनाई केली.

वरील कारणांस्तव स्मिथनें म्हटलें आहे कीं, "फिरोजशहानें आपल्यापूर्वी स्वारी करणाऱ्या मुसलमानांचाच कित्ता गिरवून त्यांचें क्रूर व्रत पुढें चालविलें." त्यानें शिआ लोकांना देखील सोडलें नाहीं. त्यानें त्यांचे ग्रंथ जाळले व त्यांना स्वमतप्रचार करूं दिला नाहीं. चित्रकला सुद्धां त्यानें बंद केली.

८ **दहा वर्षांच्या अवधींतील अराजकता**:—फिरोजशहाच्या पश्चात् दहा वर्षे राजलक्ष्मी सारखी हेलकावे खात होती. या वेळीं दिल्लीच्या सिंहासनावर सहा नालायक व मूर्ख बादशहा आले. एका बादशहाच्या पक्षांतील लोकांचें दुसऱ्या बादशहाच्या पक्षांतील लोकांशीं भर रस्त्यावर व गल्लोगल्लीं युद्ध होत असे. तीन वर्षे दोन बादशहानीं दिल्लींत राज्य केलें. शेवटचा बादशहा महमूद याच्या कारकीर्दींत तर ही बादशाहीची दुर्बलता फारच वाढली; त्यामुळें जौनपूर, महोबा, काल्पी, बियाना, समानह, गुजराथ, माळवा, खानदेश, मुलतान व सिन्ध हे स्वतंत्र झाले; व शेवटल्या महम्मुदाच्या कारकीर्दींत तैमूरलंगरूपी महत् संकट भारतवर्षावर कोसळलें.

९ **तैमूरलंगाच्या स्वारीचीं कारणें**:- १ लंगडा तैमूर हा असाधारण शक्तीचा तुर्की विजेता होता. विजयतृष्णेनेंच त्याला हिंदुस्थानवर स्वारी करावयास लावलें. २ हिंदुस्थानची 'सुवर्णभूमि' अशी प्रसिद्धी आहे; तेव्हां या देशांतून अपार द्रव्य नेण्याची तैमूरला इच्छा झाली. ३ हिंदूंना मुसलमान करून, त्यांच्या मूर्ती फोडून, देवालयें जमीनदोस्त करून व धर्म बुडवून गाझी बनण्याचा त्याचा हेतू होता. ४ तैमूरच्या लोकांना हिंदुस्थान जिंकणें कठीण वाटत होतें. पण तैमूरची खात्री होती कीं, हिंदुस्थानांत आपआपसांत लढणारे शेंकडो राजे आहेत; त्यांच्यांत एकी नसल्यामुळें या दुफळीचा फायदा घेऊन हिंदुस्थान सहज जिंकतां येईल; नंतर त्यानें योग्य काल पाहून स्वारी केली व विजय संपादन केला.

१० **तैमूर लंगाची स्वारी**:—इ० स० १३९८ च्या सप्टेंबर महिन्यांत प्रचंड सैन्य बरोबर घेऊन तैमुरानें विद्युद्वेगानें बोलान घाटांतून हिंदुस्थानावर चाल केली. प्रलयकालच्या झंझावाताप्रमाणें हा नरभक्षक तैमूर ज्या ज्या ठिकाणीं गेला, त्या त्या

ठिकाणीं स्मशानांतील भीषण शांतता नांदूं लागली; आबालवृद्ध तरुणांच्या रक्ताचे पाट वाहूं लागले. पुराणकालीं भगीरथाच्या मागून ज्याप्रमाणें शांतिदायिनी गंगा धांवत आली, त्याच्या उलट या रक्तप्रेमी तैमूराच्या मागून अत्याचार, दुराचार, घात, दारिद्र्य इत्यादिकांची नदी धांवत आली. काळरूपी तैमूरानें आर्यनरनारींचे प्राण, वित्त, लाज, देश, धर्म यांचा किंबहुना त्यांच्या सर्वस्वाचा नाश केला. हा रक्ताचा पूर मुलतान, तुलम्बा, भटनोर, दिल्ली, मीरत, हारिद्वार, कांगडा नगरकोट, जम्मू व काश्मीर यांवरून वाहत गेला! यामुळें हिंदुस्थानभर हाः हाः कार उडाला. दिल्लीला पोंचून युद्ध करण्यापूर्वी पकडलेल्या एक लक्ष हिंदूंचा त्यानें वध केला. महमुदानें मोठ्या सेनेसह दिल्लीजवळ तैमुरशीं शौर्यानें सामना केला. परंतु त्यांत विजयी होऊन, तैमूर दिल्लींत शिरला. तेथील लोकांना त्यानें अभय दिलें होतें; तरी त्यानें पांच दिवस दिल्ली लुटली व हजारों लोकांची कत्तल केली; आणि अगणित द्रव्य घेऊन व प्रत्येक सैनिकाला १५० हिंदुगुलाम व सैनिकाच्या प्रत्येक मुलाला ४० गुलाम देऊन तैमूर परत गेला.

११ या स्वारीचे परिणाम. १ पन्नास वर्षांपर्यंत सोन्याचांदीच्या नाण्याऐवजीं तांब्याच्या नाण्याचें चलन सुरू होतें. त्यामुळें दुष्काळ व अराजकता वाढली; सांथीचे रोग फैलावले व हजारों लोक मेले. २ हिंदूंची लोकसंख्या व वैभव यांना मोठा धक्का बसला. ३ तघलक वंशाचा मिणमिणणारा दिवा कायमचा मालवला. कारण महमुदानें जरी हें राज्य मोठ्या कष्टानें संपादन केलें होतें, तथापि त्या राज्याची मर्यादा दिल्लीपुरतीच राहिली; बाकी सर्व प्रांत स्वतंत्र झाले. शेवटीं इ. स. १४१२ त दौलतखान लोदीनें या महमुदाचाही घात केला, व तो स्वतः राज्यावर बसला. पण तोही दोन वर्षांतच मुलतानचा सुभेदार खिजराखान सैय्यद याच्याकडून पराभूत होऊन मारला गेला. ४. केव्हां केव्हां वाईटांतून चांगलेंही निघतें. हिंदूंची व मुसलमानांची एकी व्हावी ह्मणून कांहीं वर्षे पुष्कळ प्रयत्न करण्यांत आले होते. तैमूर-लंगानें हिंदुस्थानांतील मुसलमानांनाही हिंदूंच्या बरोबर चिरडलें होतें. या समान आपत्तीमुळें हिंदू व मुसलमान या उभयतांनाही एकमे-

कांच्या सहाय्याची अपेक्षा वाटूं लागली व दोघांत कांहीं काळ एकी होऊन त्या वेळच्या सत्पुरुषांच्या उपदेशानें ती दिवसेंदिवस अधिक वाढत गेली. पंधराव्या शतकांत रामानंद, चैतन्य, कबीर, दादू, नानक, फरीद, ज्ञानदेव, नामदेव, इत्यादि सत्पुरुषांनीं हिंदूमुसलमानांतील वितुष्ट काढून टाकण्यासाठीं महाप्रयत्न केले.


सैय्यद वंश (१४१४-१४५०)

१२ महंमद पैगंबराची मुलगी बिबि फातिमा हिच्या वंशजांना सैय्यद असें ह्मणतात; ते मुसलमानांचे पुरोहित आहेत. या वंशाचें राज्य दिल्लीच्या आसपास होतें. त्यांनीं आपल्या राज्यविस्ताराचा प्रयत्न केला. पण त्यांत त्यांना यश आलें नाहीं. हे बादशहा दयाळू व कमजोर असल्यामुळें ते केवळ नामधारीच होते; यामुळें त्यांच्या कारकीर्दींत विशेष असें कांहीं घडलें नाहीं. शेवटला बादशहा अल्लाउद्दीन याला पंजाबचा सुभेदार बहिलोलखान लोदी यानें राज्यावरून हांकून दिलें व स्वतः राज्य बळकावलें.


लोदी वंश (१४५०-१५२६)

१३ **धर्मप्रिय बहलोलखानः**— (१४५० ते १४८८) हा बादशहा अति चतुर, साहसी, शूर, शान्तताप्रिय, दयाळु, न्यायी, मनमिळाऊ, सरलस्वभावाचा व कट्टा मुसलमान होता. हा प्रतिदिवशीं पांच वेळ नमाज पढत असे; मौलवी लोकांबरोबर धार्मिक वाद करीत असे, व मांस खांत नसे. हा सिंहासनावर बसत नसे. एकंदरींत हा साधुस्वभावी फिरोज-शहासारखा होता असें म्हणण्यास हरकत नाहीं. यानें दिल्लीच्या आपल्या छोट्या राज्याला सर्व पंजाब प्रांत जोडला, तसेंच सतत २६ वर्षें लढून पुर्वेकडील शरकी बादशहाच्या हातून जौनपूर जिंकून घेतलें. याप्रमाणें याच्या ताब्यांत सिंधपासून बिहार पर्यंतचा सर्व मुलूख होता.


१४ **शिकंदर** (१४८८-१५१७):— १ बहलोल खानाचा पुत्र शिकंदरशहा हा आपल्या बापाप्रमाणेंच शूर, चतुर व मुत्सद्दी होता. पण धर्मवेडेपणा, कपट व क्रूरता यांमुळें तो हिंदूंच्या बरोबर वाईट रीतीनें वागला. २ त्यानें आपल्या आठवीस वर्षांचे कारकीर्दींत पुष्कळ युद्धें करून बियाना, धौलपूर, चंदेरी, ग्वालेर, व बिहार प्रांत जिंकले; अशा प्रकारें त्यानें




जामि मशीद (जौनपूर.)



अटलादेवी मशीद (जौनपूर.)



मुहाफिझखानाची मशीद (अहमदाबाद.)



गौर येथील मशीद (इंडियन प्रेस)

दिल्ली साम्राज्याचें प्राचीन वैभव परत मिळविलें. सर्व विद्यांची वाढ होण्याकरितां यानें खटपट केली; विशेषतः वैद्यकाला त्यानें अधिक प्रोत्साहन दिलें. ३ बलबन, अल्लाउद्दिन व महंमद तघलख यांची उदाहरणें डोळ्यांसमोर असतां देखील यानें हिंदूंना त्रास दिला, त्यांचा वधही केला, व अशा रीतीनें त्यानें आपल्या राज्यावर कुऱ्हाड पाडून घेतली. ४ स्थानेश्वराला सूर्यग्रहणाचे वेळीं जमलेल्या एक लाख हिंदुंची कत्तल करण्याची याची इच्छा होती; परंतु मौलवी लोकांनीं त्याला अनुमति दिली नाहीं. यानें देवांच्या हजारों मूर्ती फोडल्या, व देवळें पाडलीं. श्रीकृष्णाची जन्मभूमि मथुरा येथें त्यानें यमुनेच्या कांठावर एक मशीद बांधली, आणि यमुनेंत स्नान करणेची व स्नानानंतर क्षौर करणेची बंदी केली. या वेळीं बुधन नांवाचा एक ब्राह्मण सर्व मतांच्या लोकांना 'आपण सर्व एकाच परमेश्वराचा लेकरें आहोंत' असा उपदेश करीत असे. त्याला पकडून बादशहानें मुसलमान होण्याची आज्ञा केली. ती त्यानें नाकारल्यामुळें त्याला जिवंत जाळण्याची शिक्षा फर्माविण्यांत आली. बुधनानें अग्नि प्रवेश केला, परंतु स्वधर्म सोडला नाहीं. या सर्व अत्याचारांमुळें हिंदू भयंकर चिडले, व रजपूतशिरोमणि राणा संग यानें हिंदुराज्याचा विस्तार करण्याचा प्रयत्न केला.

१५ **इब्राहीमशहाः**— हा आपल्या बापाप्रमाणें अतिक्रूर, व अविश्वासि राजा होता. आपल्या सर्व जुन्या वजीरांना यानें एका मागून एक ठार मारलें व काहीं नीच मनुष्यांना आपलें वजीर केलें; त्यामुळें प्रांतिक सुभेदारानीं बंड केलें. कुरा, बिहार व पंजाब हे स्वतंत्र झाले. त्याच्या क्रूरपणाची इतकी परमावधी झाली कीं, पंजाबचा सुभेदार दौलतखान लोदी, इब्राहीमचा चुलता आलमखान व राणा संग या तिघांनीं काबूलचा मोंगल बादशहा बाबर याला हिंदुस्तानवर स्वारी करण्याकरितां निमंत्रण केलें. बाबरानें पांच वेळा पंजाबवर स्वारी केली व प्रत्येक वेळीं त्याचा कांहीं भाग आपल्या अंमलाखालीं घेतला. अशा रीतीनें घरचाच भेदी सामील झाल्यामुळें, बाबरानें शेवटीं इ. स. १५२६ मध्यें पानिपतच्या युद्धांत इब्राहीमचा पराभव केला व तो दिल्लीचा बादशहा झाला.

———

प्रकरण ४ थें.

उत्तर हिंदुस्थानांतील लहान लहान राज्यें.

[१२०६ — १५९१]


बंगाल, जौनपूर, काश्मीर, सिन्ध, गुजराथ, मालवा व राजपुताना येथें वेळोवेळीं स्वतंत्र राज्यें होऊन गेलीं; त्यांचा वृत्तांत पुढें संक्षेपानें दिला आहे.

१ बंगाल (११९८ – १५७६)

१ इ. स. ११९८ त बखत्यार खिलजीचा मुलगा महंमद यानें नदिया जिंकून तेथें आपलें राज्य स्थापिलें, व गौर ही आपली राजधानी केली. तेव्हां पासून कांहीं काळ सोडून जवळ जवळ शेवटपर्यंत बंगाल मुसलमानांच्या अमलाखालीं राहिला. इ. स. १२२५ पर्यंत तो खिलजींच्या स्वाधीन होता. २ इ. स. १२५८ पर्यंत दिल्लीचे बादशहा बंगालवर सुभेदार नेमीत असत व तेथील कारभार पहात असत. ३ इ. स. १२७९ पर्यंत तीन सुभेदारांनीं स्वतंत्रपणें राज्य केलें. तिसरा सुभेदार तुगरल याला बलबनानें ठार मारलें व आपला मुलगा बुगराखान यास बंगालचा सुभेदार केलें. ४ त्यावेळेपासून इ. स. १३३१ पर्यंत बुगराखानाच्या वंशांतच राज्य चालत राहिलें होतें; पण दिल्लीचा बादशहा महम्मद तघलक यानें पुनः तें स्वतःच्या अमलाखालीं घेतलें. परंतु पुढें थोड्याच वर्षांनीं बंगालमध्यें पूर्व व पश्चिम बंगाल अशीं दोन स्वतंत्र राज्यें स्थापन झालीं. ५ इ. स. १३५२ त पश्चिम बंगालचा सुभेदार इल्यासशहा पठाण यानें सर्व बंगालचें राज्य बळकाविलें. तें त्याच्या वंशांत इ. स. १४०९ पर्यंत चालू होतें. ६ या वर्षापासून एका हिंदू वंशातील राजांनीं कांहीं वर्षे तेथें राज्य केलें. परंतु इल्यासशहाच्या वंशजानीं पुन्हा तें राज्य मिळविलें. ७ शेवटीं इ. स. १४९३ पासून सैय्यद राज्य करूं लागले. या वंशातील हुसेनशहा व त्याचा मुलगा नसरतशहा यांनीं बंगालच्या इतिहासांत आपलें नांव केलें आहे. हे दोघेही आपल्या



जहाजमाल (मांडू).



रूपमती आणि बाजबहादूर (इ. सं. मं.-पूणें).

हिंदू प्रजेला वात्सल्यानें वागवीत असत. त्यांनीं बंगाली वाङ्मयाला उत्तेजन दिलें. महाभारत व भागवत या सारख्या मोठ्या ग्रंथाचें बंगाली भाषांतर करविलें; आपल्या गौर राजधानींत मोटमोठ्या इमारती व मशिदी, बांधून ती सुशोभित केली; त्यांतील हुसेनशहाची कबर व लहान आणि मोठी सोनेरी मशीद अशा तीन इमारती फार प्रसिद्ध आहेत. ८ इ. स. १५३९ ते १५६३ पर्यंत बंगाल सूरींच्या अमलाखालीं होता. त्यांच्या हातून बिहारचा सुभेदार **सुलेमानखान** यानें तें राज्य घेतलें; व इ० स० १५७२ पर्यंत अकबराचें स्वामित्व पतकरून त्यानें राज्य केलें. पुढें त्याचा पुत्र **दाऊदखान** यानें अकबराची सत्ता नाकारली; त्यामुळें त्याला जिंकून इ. स. १५७६ मध्यें राजा टोडरमलनें तो प्रांत अकबराच्या राज्यास जोडला.

२ जौनपूर (१३९४–१४९३)

गंगेच्या गोमति नांवाच्या फाट्यावर जौनपूर शहर हल्लींही प्रसिद्ध आहे. हें **फिरोजशहा तघलकानें** वसविलें. इ. स. १३९४ त दिल्ली येथील बादशहानें **ख्वाजाजहान** नांवाचा एक सुभेदार तेथें नेमला होता; त्याचा दत्तक **मुबारकशहा** तैमुर परत फिरतांच इ. स. १३९९ मध्यें स्वतंत्र झाला; तेथें सहा सुलतानांनीं शंभर वर्षें राज्य केलें. यांना **शर्की** (पूर्वेचे) **सुलतान** असें ह्मणतात. ते युद्धकलानिपुण, विद्याप्रिय व कलाकौशल्याची आवड असलेले असे होते. यांमध्यें **इब्राहीमशहा**, **महमूदशहा** व **हुसेनशहा** हे तीन प्रसिद्ध बादशहा होऊन गेले. १ यांनीं दक्षिणेंत ओरीसापर्यंत व उत्तरेंत दिल्लीपर्यंत युद्ध केलें; व कनोज, अयोध्या आणि बिहार हे प्रांत जिंकले. २ यांच्या दरबारांत विद्वान् लोकांना फार मान मिळे. ३ ह्यांनीं पुष्कळ भव्य इमारती बांधल्या, त्या आजही प्रशंसनीय समजल्या जातात. त्यांपैकीं अटला मशीद, जामा मशीद व लाल दरवाजा हे प्रसिद्ध आहेत. या मशिदींच्या बांधणींत हिंदु शिल्पकला बऱ्याचअंशीं दिसते. या कारणांनीं शरकी सुलतानांचें राज्य विशेष प्रसिद्धीस आलें आहे. परंतु त्यांना दिल्ली बरोबर वारंवार युद्ध करावें लागे. त्यामुळें त्यांचा ऱ्हास होऊं लागला. २६ वर्षें युद्ध केल्यानंतर इ. स. १४७६ त, **बहलोल लोदीनें** हुसेनशहाकडून जौनपूर जिंकून घेतलें. तरी १४९३ पर्यंत हुसेनशहाच्या हातीं थोडा प्रदेश राहिलाच होता (पृ. ३८ पहा).

३ गुजराथ (१३९४ ते १५७२)

१ गुजराथला "हिंदुस्थानचें उद्यान" असें ह्मणतात. कारण हा प्रान्त बराच सुपीक आहे. हा देश इ० स० १२९८ पर्यंत अव्याहतपणें रजपुतांच्या अमलाखालीं होता. परंतु या अवधींत मूर्तिभंजक महमुदानें एकदां सोमनाथ लुटलें; व कुतुबुद्दीनानें स्वारी करून थोडासा काळ या प्रांतावर सत्ता चालविली.

२ इ.स. १२९८ त अल्लाउद्दिनानें हा प्रांत जिंकला व रूपवती **कमलादेवीला** आपली राणी केली (पृ. २६ पहा). तेव्हांपासून हा देश दिल्लीच्या अमलाखालीं राहिला. परंतु **जफरखान** नांवाच्या बाटून मुसलमान झालेल्या एका रजपुताला गुजराथचा सुभेदार नेमिलें होतें; त्यानें इ. स. १४०१ मध्यें तेथें आपलें स्वतंत्र राज्य स्थापिलें. याचा पुतण्या अहमदशहा, व सातव्या पिढींत झालेला महमूदशहा विगरा हे प्रसिद्ध बादशहा होऊन गेले. **अहमदशहानें** अतिसुंदर राजवाडे बांधून अहमदाबाद नगर वसविलें. त्यानें तीन वेळां माळव्यावर स्वारी केली. माळव्याच्या सुलतानानेंही उलट दोन वेळां अहमदाबाद पर्यंत चढाई केली. खानदेश व ब्राह्मणी राजांबरोबरही अहमदशहानें युद्ध केलें. अशा रीतीनें युद्धें चाललीं असतां देखील राज्यकारभार फार प्रशंसनीय रीतीनें चालला होता. **महमूदशहानें** १४५९ ते १५११ पर्यंत ५२ वर्षें राज्य केलें. हा मोठा शूर होता. याचा विजयध्वज सिंध, कच्छ, गिरनार, चंपानीर, खानदेश व अहमदनगरपर्यंत फडकत राहिला होता. महमुदाच्या नंतर त्याचा मुलगा व दोन नातू गादीवर आले. माळव्याच्या रक्षणासाठीं राणा संगाबरोबर त्यांनीं केलेल्या युद्धाबद्दल त्यांची कारकीर्द प्रसिद्ध आहे. परंतु या युद्धांत राणा संग विजयी होऊन त्यानें माळव्यांतील कांहीं भाग जिंकला.

३ बहादुरशहा (१५२६ ते १५३७) व चितोडवर दुसरी स्वारी

महमुदचा तिसरा नातु **बहादुरशहा** हा खराच बहाद्दर होता. यानें खानदेश व वऱ्हाड हे प्रांत जिंकले; व संगपुत्र राणा रत्नसिंह याच्या सहाय्यानें माळवाही जिंकून गुजराथला जोडला. गुजराथच्या

गादीवर येण्यापूर्वी बहादुर कित्येक वर्षे चितोडमध्यें राणा संगाकडे पाहुणा ह्मणून राहिला होता; व त्याला राणा संगाची आई पुत्रवत् मानीत असे. परंतु कृतघ्न बहादुरनें या उपकारांची फेड पूर्णपणें अपकारानीं केली. राणा रत्नसिंहाच्या मृत्यूनंतर त्याचा भाऊ विक्रमादित्य गादीवर आला. परंतु तो अगदींच अयोग्य राजा असल्यामुळें त्याचे कांहीं सरदार त्याचे विरुद्ध बहादुरशहाला सामिल झाले. या परिस्थितीचा व चितोड मध्यें रहात असतां मिळविलेल्या माहितीचा दुरुपयोग करून व राणा संगाशीं आपला पूर्वीचा संबंध लक्षांत न घेतां बहादुरानें प्रचंड सैन्यानिशीं चितोडला दोनदां वेढा दिला. दुसऱ्या वेढ्याच्या वेळीं संगाची राणी **कर्मवती** हिनें रक्षाबंधन पाठवून मोंगल बादशहा हुमायुन याला आपला धर्मबंधु केलें व त्याच्याजवळ सहाय्य मागितलें. परंतु हुमायूनाला वेळेवर साहाय्य देतां येईना. त्या अवधींत बहादुरशहानें तोफा व बंदुकांच्या सहाय्यानें चितोडचा निकाल करून टाकला. राणी कर्मवती व तेरा हजार रजपूत वीरांगना यांनीं आपला धर्म, देश व लाज यांचें रक्षण करण्याकरितां चितारोहण केलें; व बत्तीस हजार शूर रजपूतांनीं देशाकरितां धारातीर्थी देह ठेविले. याप्रमाणें रजपूत मुझफरशहाचा वंशज बहादुरशहा यानें रजपूतांच्या विरुद्ध लढून आपली बहादुरी दाखविली.

पुढें या बहादुरशहाचा हुमायूनानें ठिकठिकाणीं पराभव करून त्याला हांकून दिलें व गुजराथ देश आपल्या स्वाधीन करून घेतला. परंतु हुमायून परतल्यानंतर बहादुरशहानें आपलें राज्य पुन्हां कमावलें. बहादुरच्या मृत्यूनंतर पसतीस वर्षेपर्यंत गुजराथचें राज्य त्याच्या वंशांतच राहिलें. परंतु त्याचे पुत्र आपापसांत राज्याकरतां भांडत असल्यामुळें राज्य दुर्बल होत गेलें. सरतेशेवटीं अकबरानें इ० स० १५७२ त तें जिंकून आपल्या राज्यास जोडलें.

४ माळवा (१४०१–१५३१)

१ मुसलमानांनीं माळवा प्रांत रजपुतांकडून इ० स० १३०५ त जिंकून घेतला; तेव्हांपासून तो दिल्लीच्या बादशहाच्या अमलाखालींच होता. २. परंतु इ० स० १४०१ मध्यें माळव्याचा सुभेदार **दिलावरखान** घोरी

यानें भोजराजाची राजधानी धार येथें स्वतंत्र राज्य स्थापिलें. त्याचा मुलगा **हुशंगशहा** मोठा प्रसिद्ध बादशहा होऊन गेला. यानें विक्रमादित्याची राजधानी मांडू आपली राजधानी केली, व हुशंगाबाद शहर वसविलें. हा एकदां गुजराथच्या बादशहाच्या हातीं सांपडला असतां, तेथून निसटला व परत आल्यावर तो गुजराथबरोबर लढत राहिला. वऱ्हाड व ओरीसापर्यंत सुद्धां त्यानें विजय संपादन केले, व काल्पीचा किल्ला जिंकला. या प्रमाणें याची तीस वर्षांची कारकीर्द युद्धाच्या धामधुमींतच गेली. ३ **महमूद खिलजीनें** आपल्या धन्याच्या हातून राज्य हिसकावून घेतलें; व काल्पी, मंडळगड, कोटा व बुंदी हे आपल्या अमलाखालीं आणले; आणि जौनपूर, चितोड, गुजराथ व दक्षिण येथील राजांबरोबर युद्ध केलें. या वेळीं चितोड येथें कुंभराणा राज्य करीत होता. यानें महमुदाचा पराभव केला व या विजयाचें स्मारक ह्मणून चितोडच्या पहाडावर पांच मजली एक कीर्तिस्तंभ बांधला. तरीसुद्धां सुलतान आपलाच विजय झाला असें ह्मणत असे; त्यामुळें त्यानेंही आपल्या विजयाचें स्मारक ह्मणून मांडू येथें एक सात मजली मनोरा उभारला. नंतर दुसऱ्या **महमुदानें** आपल्या मुसलमानी सरदारांना दाबांत ठेवण्याकरितां रजपुतांची मदत मागितली. परंतु शेवटीं त्याचें व संगाचें वैमनस्य आलें; त्याचे परिणाम पुढें दिले आहेत. या खिलजी वंशानें शंभर वर्षे राज्य केलें, व त्या मुदतींत प्रजेला सुख देण्याचा प्रयत्न केला. यांनीं बांधलेल्या मोठमोठ्या इमारती अजूनही माळव्यांत दृष्टीस पडतात. ४ इ० स० १५३१ त बहादुरशहानें, व इ० स० १५३५ त हुमायूनानें माळवा जिंकून आपल्या स्वाधीन करून घेतला. नंतर पठाण **मल्लूखानानें** दहा वर्षे स्वतंत्र राज्य केलें. परंतु शेरशहानें त्याला पदच्युत करून **शुजाअतखान** सूराला सुभेदार केलें. याचा पुत्र **बाजबहादुर** फार प्रसिद्ध आहे. रूपमतीवरील याचें अगाध प्रेम वर्णिलेल्या कविता आजतागायत प्रसिद्ध आहेत. यानें अकबरापासून आपला देश बचावण्याकरितां फार प्रयत्न केले; परंतु शेवटीं माळवा जिंकला गेला, व बाजबहादुर मोंगलांचा सरदार बनला.

राजपुताना.

५ **मेवाड**:—१ राजपुतान्यांत मेवाड, मारवाड, अंबर, विकानेर, बुंदी व कोटा हीं राज्यें प्रसिद्ध असून, त्यांतही पुन्हा मेवाड अधिक प्रसिद्ध आहे. **मेवाडचे** राणा गुह, बापा रावळ, खुमाण, समरसिंह, हमीर, लाखा, कुंभु, संग, उदयसिंह व प्रताप हे राजे प्रसिद्ध आहेत. पहिल्या तीन राण्यांचें वृत्त पहिल्या भागांत आलेलें आहे. २ महापराक्रमी **समरसिंह** (समरसी) पृथ्वीराजाबरोबर पानिपतच्या लढाईंत मारला गेला. रूपवती **पद्मिणी** व तिचा पति **भीमसिंह** यांची माहिति मागें दिलीच आहे. ३ **हमीर** धीरोदात्त, तेजस्वी, साहसी व चतुर होता. यानें अल्लाउद्दिनाकडून चितोड परत मिळविलें. यानें अतिशय चातुर्यानें राज्य केलें; व आपल्या राज्यास इतकी बळकटी आणिली कीं, पुढें दोनशें वर्षें पर्यंत दिल्ली, माळवा व गुजराथ येथील बादशहा चितोड जिंकू शकले नाहींत. ४ राणा **लाखा** हा शिल्पकलाप्रेमी, देशहितैषी व धर्मानुरागी होता. जेव्हां गया तीर्थाला अपवित्र करण्याची इच्छा धरून मुसलमानांनीं तसा प्रयत्न केला, तेव्हां त्याचें रक्षण करण्याकरितां राणा लाखानें आपलें सैन्य नेऊन व प्रचंड युद्ध करून आपले प्राणही दिले. चितोड येथील पडक्या राजवाड्यांचा व देवालयांचा यानें जीर्णोद्धार केला. ५ राणा **कुंभुनें*** ५० वर्षें (१४१९–१४६९) राज्य केलें. हा हमीरा प्रमाणें शूर व लाखाप्रमाणें शिल्पकलाप्रिय होता. मेवाडच्या रक्षणा-करितां अवघे चौऱ्याऐशीं किल्ले आहेत; त्यांपैकीं ३२ राणा कुंभूनें बांधिले. त्यांतील कुंभमेरू [कोमलमीर] हा किल्ला अधिक प्रसिद्ध आहे. यानें पुष्कळ वाडे व देवालयें बांधिलीं. त्याच्या विजयांपैकीं माळव्यांतील विजयासंबंधानें कर्नल टॉड ह्मणतो कीं, यानें माळव्याचा राजा पहिला महमूद× याला पकडून कांहीं दिवस बंदिवासांत ठेविलें होतें. परंतु

---

* ओझानीं ही वर्षें १४३३–६८ अशीं दिलीं आहेत.

× राणा संगानें दुसऱ्या महमुदाच्या बाबतींत हीच गोष्ट केली असे बऱ्याच इतिहासकारांचें मत आहे.

पुढें यानें त्याची सन्मानपूर्वक मुक्तता केली. रजपुतांच्या दिलदार व भोळ्या स्वभावाचें तसेंच अदूरदर्शीपणाचें हें एक धडधडीत उदाहरण आहे. ६ राणा **संगानें** (१५०९–२९) पुष्कळ विजय संपादन करून रजपूतांची सत्ता वाढविली. त्यामुळें हा फारच पूज्य मानिला जात असे. भरतखंडांत आपल्या निस्सीम भक्तिमुळें प्रसिद्ध असलेली **मीरांबाई** (१४९८–१५४६) राणा कुंभुची धर्मपत्नी होती असें कर्नल टॉडनें लिहीलें आहे; परंतु तसें नसून ती राणा संगाची सून होती. ती कृष्णाची उपासक असून प्रतिभासंपन्न कवयित्री होती. हल्लीं देखील तिचीं भजनें राजपुतान्यांत सर्वत्र आनंदानें ऐकिलीं जातात.

६ **मारवाड** (जोधपूर):— जोधपूर हें राठोडचा जयचंद याचा नातु **शिवजी** यानें वसविलें. हा प्रदेश सुपीक नसल्यानें दिल्लीच्या मुसलमान बादशहानीं येथील रजपुतांकडे विशेष लक्ष दिलें नव्हतें. या कारणानें राठोड वंश सुस्थितींत राहूं शकला. राणा **चोंदानें** (इ. स. १३८२–१४०९) मंदोर शहर आपली राजधानी केली व राज्याची शक्ति अधिक वाढविली. या वंशांत **जोधा** नांवाचा एक मोठा प्रतापशाली राजा होऊन गेला. हल्लींचें जोधपूर यानेंच वसविलें. या राजाला पुष्कळ मुलें होतीं. राज्याच्या वारसानें स्वराज्यांत राहून राज्यकारभार पहावयाचा, व बाकीच्या भावांनीं निरनिराळे देश जिंकून आपल्या कुळाचा गौरव वाढवावयाचा असा येथील क्रम होता. त्याप्रमाणें राणा चोंदाच्या चौदा पुत्रांनीं व रणमल्लाच्या चोवीस पुत्रांनीं निरनिराळ्या ठिकाणीं जाऊन राठोड वंशाची कीर्ति वाढविली. जोधाचा वंशज **मालदेव** हा अति प्रसिद्ध राणा होऊन गेला. यानें आपल्या अडतीस वर्षांच्या (इ. स. १५३२–१५६९) कारकीर्दींत नागोर, अजमीर, झालोर, महोबा, अंबर व मेवाडचा कांहीं भाग हे जिंकून आपल्या राज्याला जोडले. परंतु शेरशहानें याचा कपटानें पराभव केला. वृद्ध मालदेवाला प्रतापसिंहाचें सहाय्य मिळालें नाहीं, ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. हे दोन राजे एकत्र होऊन त्यांनीं अकबराला तोंड दिलें असतें, तर रजपुतांचा अपकर्ष लौकर झाला नसता. मालदेवाचा पुत्र **उदयसिंह**

(लष्ठ राजा) अकबरच्या दरबारांत सरदार झाला. त्यानें आपली बहीण अकबराला दिली. याला एकंदर चौतीस पुत्र होते; यांनीं नवीन राज्य स्थापनेंत मोठा भाग घेतला; बादशहाशीं संबंध जडल्या कारणानें यांची शक्तीही वाढली; परंतु त्यामुळें मारवाडची स्वतंत्रता नष्ट झाली. येथील राजांना दक्षिण व गुजराथ येथील सुभेदारी दिली जात असे. औरंगजेबाचे वेळीं यांच जोधपूरचा प्रसिद्ध राजा यशवंतसिंग काबूलादी प्रातांचा सुभेदार होता.

७ **अंबर (जयपूर)— दुलहारायानें** धुंदरचें नवेंराज्य इ. स. ९६७ मध्यें स्थापन केलें, व रानटी मीन लोकांना हळू हळू जिंकून तें वाढविलें. कांहीं वर्षांनंतर **अंबरचें** राज्य त्याचे नातवानें जिंकलें व त्या वेळेपासून त्यांना अंबराधीश म्हणतात. पृथ्वीराजानें आपल्या बहिणीचा विवाह येथील महावीर **राणा पूजन** याच्या बरोबर केला होता. याच पूजनानें शहाबुद्दीन घोरीचा खैबर घाटांत पराभव करून त्याचा गझनी-पर्यंत पाठलाग केला. हळू हळू जोधपूरप्रमाणें याही राज्याचा विस्तार झाला. **बिहारीमल्ल** अकबराचा अंकित झाला. त्याचा मुलगा **भगवानदास** व नातु **मानसिंह** यांनीं अकबराच्या दरबारांत मोठें यश संपादन केलें. भगवानदासाची मुलगी युवराज सलीमला दिली होती. पुढें तिला सलीमापासून खुस्रु नांवाचा मुलगा झाला. औरंगजेबाचे वेळीं अंबरचा **मिरझाराजा जयसिंह** प्रसिद्धीस आला. यानेंच दाराच्या विरुद्ध औरंगजेबाला सहाय्य केलें व शिवाजी राजाला जिंकून आग्र्याला पाठविलें.

दिल्लीचे बादशहा औरंगजेब ते महमदशहा यांच्या कारकीर्दींत **सवाई जयसिंह** (१६९९-१७४३) हा अति प्रसिद्ध होऊन गेला. यानें जयपूर नगर वसविलें. शिल्पकला व ज्योतिष यांना उत्तेजन दिल्या-मुळें त्याचें नांव आजरामर झालें.

दक्षिणेंतील राज्यें

८ **ब्राह्मणी राज्यः**— चौदाव्या शतकाच्या उत्तरार्धांत दक्षिणेंत दोन राज्यें अस्तित्वांत आलीं—एक मुसलमानांचें बहामनी (ब्राह्मणी) राज्य व दुसरें विजयनगरचें हिंदवी राज्य. महमद तघलकाच्या

अत्याचारानें चिडून जाऊन दक्षिणेकडल्या मुसलमान सरदारांनीं बंड केलें; व हसन गंगूला इ० स० १३४७ त आपला सुलतान करून नवीन राज्याचा पाया घातला. **अफगाण हसन** हा दिल्ली येथील गंगू नांवाच्या एका ब्राह्मणाचा सेवक होता. "तूं कांहीं दिवसांनीं बादशहा होशील," असे गंगूनें त्याला ज्योतिषाच्या आधारानें सांगितलें होतें; या करितां संधि मिळावी ह्मणून गंगूनें महंमदशहाच्या दरबारांत त्याला एक नोकरीही लावून दिली. तेथें हसन आपल्या सुदैवानें व बुद्धिमत्तेनें उच्च पदाला चढला; व वर सांगितल्याप्रमाणें शेवटीं तो दक्षिणचा बादशहा झाला. आपला पूर्वीचा मालक गंगू याला दिल्लीहून बोलावून त्यानें त्याला कोशाध्यक्ष केलें; व गंगू विषयींची कृतज्ञता दर्शविण्याकरितां आपल्या राज्याला **ब्राह्मणी राज्य** असें नांव देऊन स्वतःला **सुलतान अलाउद्दीन हसन गंगू ब्राह्मणी** असें ह्मणवूं लागला. हल्लींचे दक्षिण हैद्राबाद संस्थान या राज्यांतच सामील होतें. गुलबर्गा त्याची राजधानी होती. इ० स० १५२६ पर्यंत या वंशांतील अठरा बादशहांनीं राज्य केलें. पुढें या राज्याचे पांच स्वतंत्र भाग झाले. याच वेळीं उत्तर हिंदुस्तानांतही पठाणांचें राज्य नष्ट होऊन मोंगलांचे राज्य स्थापन झालें, हा खरोखर विचित्र योगायोग आहे!

ब्राह्मणी वंशांत **फिरोजशहा** (इ० स० १३९७–१४२२) व त्याचा भाऊ **अहमदशहा** (१४२२–१४३५) हे दोन पराक्रमी सुलतान होऊन गेले. यांच्या कारकीर्दीत राज्याचा फार विस्तार झाला. विजयनगरच्या राजाचा पराभव झाला; आणि तैलंगण, अहमदनगर व बेदर हे इलाखे राज्याला जोडले गेले. फिरोज जवळ जवळ दरवर्षी विजयनगरावर स्वारी करीत असे. त्यानें राजमहेंद्रीपर्यंतचा मुलूख पादाक्रांत केला होता; परंतु शेवटीं हिंदूंनीं त्याचा पूर्ण पराभव केला. त्याचे मागें अहमदशहानें विजयनगराबरोबर दारुण युद्ध चालू ठेविलें. असें सांगतात कीं, जेव्हां जेव्हां वीस हजार हिंदूंची कत्तल होत असे, त्या त्या वेळीं तो मोठा समारंभ करून आपल्या लोकांना मेजवानी देत असे.




अल्तमश.




गयासुद्दीन बलबन.



अलाउद्दीन खिलजी.



महंमद तघलक.




महम्मद शहा बहामनी.



विजयनगर.

पठाण व हिंदू साम्राज्यांतील नाणीं.

(इंडियन प्रेस, अलहाबाद).



चांदबीबी (ब्रिटिश म्युझियम).



शाहजीराजे.



मलीकअंबर.

इ. स. १४३५ ते १४६३ पर्यंतचे कालावधींत अतिक्रूर, निर्बल व विलासी असे सुलतान झाल्यामुळें राज्याला उतरती कळा लागली.

महम्मद शहा (१४६३-१४८२)- हा सुद्धा महत्त्वाचा बादशहा झाला. याचे कारकीर्दीत महमूद गावन हा जर राज्याचा वजीर नसता, तर हें राज्य केव्हांच नष्ट झालें असतें. हा मोठा हुशार, शक्तिशाली व राजकारणपटु मंत्री होता. यानें ओरीसा प्रांतांतील राजमहेंद्री वगैरे नगरें व मच्छलीपट्टण जिंकलें; कांची लुटली; बेळगांव, गोवा आणि कोंकण प्रांत आपल्या राज्यास जोडले. यानें प्रबळ झालेल्या सरदारांची शक्ति कमी केली व बादशहाचें सामर्थ्य वाढविलें; प्रजेला न्याय, सुख, आणि शांति दिली; परंतु स्वार्थी सरदारांनीं इ. स. १४८१ त याला ठार मारिलें. या चतुर मंत्र्याच्या मृत्यूनंतर शेवटचे पांच राजे आपल्या मंत्र्यांच्या हातांतील बाहुलीं बनले, त्यामुळें ब्राह्मणी राज्याचे तुकडे होऊन वर सांगितल्याप्रमाणें पांच सरदारांनीं पांच स्वतंत्र राज्यें स्थापिलीं.

बहामनी राजांच्या कारकीर्दीचें सिंहावलोकन:—बहामनी वंशांत एकंदर अठरा राजे झाले. परंतु त्यांतील बहुतेक धर्मवेडामुळें जुलमी होते. या घराण्याच्या इतिहासाला शेजारच्या वरंगळ व विजयनगर येथील हिंदू राज्यांशीं झालेल्या लढाईची हकीगत असें म्हणतां येईल. त्यांच्या कारकीर्दीचे विशेष म्हणजे त्यांनीं बांधलेले अभेद्य किल्ले, पूर्वेकडील प्रांतांत बांधलेले कालवे, व मुसलमानी वाङ्मयास दिलेलें प्रोत्साहन, हे होत. हिंदू प्रजेचें निर्दलन करण्याचा यांनीं प्रयत्न केला, तरी त्याच्यांत त्यांना यश आलें नाहीं. फक्त कांहीं प्रमाणानें मुसलमानी धर्माची वाढ झाली.

बहामनी राज्याच्या अपकर्षाचीं कारणें:-हा अपकर्ष सर्वस्वी बाहेरच्या स्वाऱ्यामुळेंच झाला नसून तो अंतस्थ दौर्बल्यामुळेंही झाला. (१) दक्षिणी मुसलमान व परदेशी मुसलमान यांच्या झगड्यामुळें राज्य कमजोर झालें. (२) यानंतर सुलतानांचे भोगविलास व त्यांची नीतिबाह्य वागणूक आणि जवळ जवळ स्वातंत्र्य उपभोगणाऱ्या सुभेदारांच्या हातांत राज्यकारभार यांमुळें साम्राज्याचा विलय लवकर झाला. (३) शेवटचे

सुलतान तर आपल्या प्रधानांच्या हातांतील बाहुलीं झाले होते. या सर्व कारणांमुळें इ. स. १५२५ पर्यंत या राज्याची फुटून पांच स्वतंत्र राज्यें झालीं. त्यांचा त्रोटक वृत्तांत खालीं दिला आहे.


९ दक्षिणेंतील पांच मुसलमानी राज्यें.

१ विजापूरची आदिलशाही (१४८९ ते १६८६)– हिची राजधानी विजापूर असून ही गादी **यूसफ् आदिलशाहानें** स्थापन केली. हा महमूद गावनचा गुलाम होता; परंतु तो स्वतःच्या कर्तबगारीनें बऱ्याच उच्च दर्जाला चढून शेवटीं विजापूरचा सुभेदार झाला. इ.स. १४८९ त त्यानें आपली स्वतंत्र सत्ता पुकारून आपला वंश चालू केला. त्या वंशाला त्याच्या नांवावरून **आदिलशाही** असें म्हणतात. याच वंशांत यूसफखेरीज, इस्माईल, पहिला इब्राहिम, पहिला अल्ली, दुसरा इब्राहीम व दुसर अल्ली हे प्रसिद्ध बादशहा झाले.

या सुलतानांनीं भव्य, उठावदार व हिंदुस्थानांत अप्रतिम अशा इमारती बांधिल्या. यांपैकीं महम्मदची कबर, बोल गुंबद, इब्राहीम रोझा, गगनमहाल, आनंद महाल, जुम्मा मशीद व जलमंदीर वगैरे इमारती आतां सुद्धा विजापूरचें गतवैभव दाखवितात. घिजापूरच्या राजांना मोंगल बादशहांशीं सतत पन्नास वर्षेपर्यंत युद्ध करावें लागलें व शेवटीं औरंगजेबानें त्यांचें राज्य जिंकलें. शिवाजीनें सुद्धां आपलें स्वातंत्र्य पुकारून विजापूराशीं ३५ वर्षेपर्यंत युद्ध चालविलें. याबद्दल माहिती पुढें येईलच.


२ गोवळकोंड्याची कुतुबशाही (१५१२–१६८७)– ही **कुली कुतुबशहा** यानें स्थापन केली. हा पहिल्यानें एक सुभेदार असून नंतर १५१२ त स्वतंत्र झाला. त्यानें स्थापिलेल्या वंशाला **कुतुबशाही** असें म्हणतात. या वंशाविषयीं माहिती पुढें सांगण्यांत येईल.

३ अहमदनगरची निजामशाही (१४९० ते १६३७)— ही निजाम उल्मुल्कचा मुलगा **मलिक अहमद** यानें इ. स. १४९० मध्यें स्थापन केली. यानें अहमदनगर आपली राजधानी करून व दौलताबादचा किल्ला जिंकून आपल्या राज्याला बळकटी आणिली. येथील राज आपल्या शेजारच्या विजापूर, वऱ्हाड, खानदेश व गुजराथ या देशांच्या




DYNASTIE de BEYDJAPOUR (VISAPOUR.)

आदिलशाही–बादशाहा–विजापूर.



इब्राहीम रोझा (विजापूर).



बोलघुंबद (विजापूर).

राजांबरोबर लढाया करीत असत. याच्या वंशांतील **हुसैन शहा** नांवाचा एक बादशहा विजयनगरचा पाडाव करण्याच्या इराद्यानें झालेल्या १५६५ च्या कटांत सामील झाला होता. या राज्याच्या इतिहासांतील दुसरी महत्वाची गोष्ट ह्मटली ह्मणजे वऱ्हाडवर इ. स. १५७४ त मिळालेला विजय. निजामशाही राजांचा या पुढील सर्व काळ मोंगलांपासून आपल्या राज्याचा बचाव करण्यांत गेला. इ. स. १५९६ त गादीच्या हक्काबद्दल चाललेल्या आपापसांतील यादवीचा फायदा घेऊन अकबरानें आपला मुलगा मुराद याला अहमदनगर जिंकण्यासाठीं पाठविलें. त्यावेळीं **चांदबिबीनें** फार शौर्यानें अहमदनगरचें रक्षण केलें, व वऱ्हाड प्रांत सोडून देऊन त्याच्याशीं तह केला. नंतर तिच्याच अधिकाऱ्यांपैकीं एकानें तिचा खून केला. या वेळेपासून या राज्याचीं सूत्रें **मलिक अंबर** नांवाच्या हबशी प्रधानाच्या हातांत गेलीं. त्यानें मोंगलांना दाद न देतां अहमदनगर इ. स. १६१० त परत जिंकलें. पुढें कांहीं वर्षांनंतर जरी तें मोंगलांच्या हातांत गेलें, तरी मोगलांना मलिकअंबर व शहाजीराजे यांच्या कारकीर्दीत पुढें पाऊल सरसावितां येईना. मलिकअंबर फक्त लढाईच्या कामांत वाकबगार होता असें नसून फडणिसीच्या बाबतींत ही तितकाच कुशल होता. त्यानें सरकार साऱ्याची नवी पद्धत अमलांत आणिली. शेवटीं इ. स. १६३७ त शहाजहाननें अहमदनगरच्या स्वतंत्र राज्याचा नाश करून तें आपल्या राज्याला जोडलें.

४ वऱ्हाडची इमादशाही (१४८४ ते १५७४)— हिचें मुख्य शहर एलिचपूर होतें. याचा संस्थापक इमादुल्मुल्क हा पूर्वीं हिंदू असून नंतर मुसलमान झाला होता. यानें स्थापन केलेल्या वंशाला **इमादशाही वंश** असें ह्मणतात. या वंशानें इ. स. १५७४ त वऱ्हाड अहमदनगरला सामील होईपर्यंत तेथें राज्य केलें.

५ बेदरची बरीदशाही (१४९२ ते १६०९)— हिचें मुख्य शहर **बेदर** असून ती **कासिम बरीद** या तुर्कानें १४९२ त आपलें स्वातंत्र्य जाहीर करून स्थापन केली. या वंशांतील एकंदर सात राजांनीं येथें राज्य केलें; व हा मुलुख शेवटीं १६०९ त विजापूर राज्यांत सामील झाला.

१० विजयनगर (१३३६ ते १५६५)

वरंगळ येथील हिंदू राजांचें मलिक काफूर व महम्मद तघलघ यांच्याशीं युद्ध होऊन शेवटीं त्यांचें राज्य मुसलमानांच्या ताब्यांत गेलें. तेव्हां त्या वंशांतील **हरिहर** व **बुक्काराय** हे तेथून निघून एनागुंदीच्या राजाच्या आश्रयाला गेले व कांहीं दिवसांनीं तें राज्य त्यांना मिळालें. पण एनागुंदी भरभराटीस येणार नाहीं असें वाटल्यावरून, त्यांनीं तुंगभद्रेच्या कांठीं इ. स. १३३६ मध्यें एक नवें शहर वसविलें व तेथें आपली राजधानी केली. आपला मंत्री **विद्यारण्य** याच्या नांवावरून त्या शहराला विद्यानगर किंवा विजयनगर हें नांव दिलें. या राजाचा **सायणाचार्य** या नांवाचा दुसरा एक मोठा बुद्धिमान्, व्यवहारचतुर व विद्वान् मंत्री होता. त्यानें वेद व ब्राह्मण ग्रंथांवर भाष्य लिहिलें आहे. हरिहर रायाच्या वेळेपासून कृष्णदेवरायापर्यंत या राज्याचा विस्तार तुंगभद्रेपासून कन्याकुमारीपर्यंत झाला असून लंका व जावा वगैरे बेटांवर सुद्धां त्यांचा अम्मल चालत असे. विजयनगरच्या बादशहांचें बहामनी राज्यांशीं नेहमीं युद्ध होत असे; हजारों हिंदू आणि मुसलमान मारले जात असत; आणि एकदां तर देवरायाला स्वतःच्या मुलीचें अलाउद्दीन बहामनीशीं लग्न करणें भाग पडलें. इ. स. १५३० च्या सुमारास राजा अल्पवयस्क असल्यामुळें हें राज्य क्षीण होऊं लागलें. कृष्णरायाच्या नंतरचे **अच्युतराय** व **सदाशिवराय** हे सर्वस्वीं आपल्या मंत्र्याच्या हातांत होते. शेवटीं तर सदाशिवरायाचा मंत्री **रामराजा** प्रत्यक्षच राज्य करूं लागला. विजापुराधीश व रामराजा यांनीं अहमदनगरच्या राज्यावर हल्ला केला. त्यांत हिंदूंनीं भयंकर अत्याचार केले. त्यामुळें पांचही मुसलमानी राज्यें आपापसांतील विरोध सोडून धर्मरक्षणासाठीं एक झालीं व लढण्याच्या तयारीनें त्यांनीं तालिकोट येथें आपल्या सैन्याची छावणी ठेविली.

तालिकोटचें युद्ध (१५६५)—हें युद्ध मुदगज़वळ भोगपर येथें झालें. आसमंतात् पुष्कळ मैल संग्राम सुरु होता. या युद्धांत सरासरी दोन्ही बाजूंचें मिळून पंधरा लाख सैन्य लढलें. इतकें सैन्य हिंदुस्तानांतील त्यानंतर कोणत्याच युद्धांत सामील झालें नाहीं. पहिल्यानें हिंदूंची

सरशी झाली. परंतु लौकरच दुर्दैवानें रामराजा आपल्या हत्तीवरून खालीं घसरला व त्यामुळें शत्रूच्या हातांत सांपडला. त्याला गिरफदार करून त्याचा शिरच्छेद करण्यांत आला; यामुळें हिंदु सैन्याचा धीर सुटला व तें पळत सुटलें. एक लाख हिंदूंचा वध झाला व त्यांच्या रक्तामुळें कृष्णा नदीचें पाणी रक्तरंगीत झालें.

या युद्धाचे परिणामः— विजयी मुसलमानी सैन्यानें विजयनगरच्या वेशीपर्यंत हिंदु सैन्याचा पाठलाग केला. त्यांनें नगर लुटलें, व तेथील इमारतींची व देवळांची जाळपोळ, लुटालूट केली व सर्व तऱ्हेचे जुलूम सुरू झाले. या गोष्टीमुळें वैभवाच्या शिखरावर असलेलें विजयनगर मोडकळीस आलें; व तें दारुण दृश्य आजही हंपीजवळून दिसतें.

दक्षिणेंत इ. स. १५६५ पर्यंत टिकलेलें हिंदुराज्य अस्तंगत झालें, व तेथें इस्लामचें वर्चस्व बसलें; तरी कांहीं भाग वगळून तो देश हिंदूंकडेच राहिला. विजयनगरचे मांडलीक आपापल्या प्रान्तांत स्वतंत्र झाले. त्यापैकीं म्हैसूरचा सरदार फार मोठा होता. या रामराजाचे वंशांतील प्रसिद्ध वेंकटराजा यानें चंद्रगिरीला आपली राजधानी केली. पुढें त्याच्या वंशजाकडून इंग्रजांनीं इ. स. १६३९ त मद्रास खरेदी केलें. या पुरातन वंशांतील राजे अजूनही एनागुंदी व म्हैसूर येथें राज्य करतात.

विजयनगरच्या राज्याची व्यवस्थाः— विजयनगरचें राज्य सर्वस्वीं एकतंत्री पद्धतीनें चाललें होतें. त्या राज्याचे दोनशें विभाग केले असून प्रत्येक विभागावर एक एक सुभेदार होता. प्रत्येक सुभेदारानें साऱ्याची कांहीं ठराविक रक्कम व ठराविक सशस्त्र शिपाई पुरवावयाचे असत. राजाच्या पदरीं सुमारें दहा लाख सैनिक असून कारणपरत्वें तो आणखीही तितकेंच सैन्य उभारीत असे. सर्व गोष्टींचा विचार करतां राज्य भरभराटींत असून तें योग्य रीतीनें चाललें होतें. लोकवस्ती दाट असून सर्वत्र सुबत्ता नांदत होती.

सामाजिक स्थितिः— ब्राह्मणांना विशेष मान मिळत असे. बहुतेक लोक मांसाहारी होते. बकऱ्या व रेडे यांचा यज्ञ होत असे.

सतीची चाल अस्तित्वांत होती. प्रधानाच्या संमतीनें द्वंद्वयुद्ध खेळण्याची परवानगी मिळे, व जे द्वंद्वयुद्ध खेळत त्यांना मान मिळत असे.

विदेशीयांचें मतः– सर्व विदेशीय प्रवासी विजयनगरचें वैभव व समृद्धी या विषयीं आश्चर्य करीत असत. इटॅलिअन प्रवाशी निकोलो काँती हा इ. स. १४२० च्या सुमारास विजयनगरास आला होता. तो म्हणतो कीं या शहराचा परीघ ६० मैल असून त्याभोंवतीं फारच मजबूत असा कोट उभारलेला होता.

इ. स. १४४२ त इराणच्या बादशहानें कालीकोटच्या झामोरिन पाशीं अबदुर्रझाक याला वकील ह्मणून पाठविलें होतें. त्यानें विजयनगरचें फारच मजेदार वर्णन दिलें आहे. तो ह्मणतो, "हें शहर अभूतपूर्व असून अखिल पृथ्वीतलावर याच्यासारखें दुसरें शहर पाहण्यांत किंवा ऐकिवांत नाहीं. सशस्त्र सैनिक असलेल्या अशा सात कोटांनीं या किल्ल्याचें रक्षण केलें असून नगररक्षकांची पद्धत उत्तम आहे." पेईस नांवाच्या एका पोर्तुगीज प्रवाश्यानें विजयनगर हें रोमइतकें मोठें शहर असून त्यांत एक लाखापेक्षां जास्ती घरें आहेत असें वर्णन केलें आहे. उत्तम सरोवरें, बागबगीचे इत्यादिकांनीं हें सुशोभित असून सर्वसंपन्न असें जगांत हेंच एक शहर आहे. राजवाड्यांतील हस्तिदंती काम पाहून त्याला फारच आश्चर्य वाटलें.

वाङ्मय व कलाकौशल्य— या राजांनीं संस्कृत आणि तेलगु वाङ्मयाला मोठा आश्रय दिला. विजयनगरचे राजे आपल्या कारकीर्दीच्या आरंभापासूनच शिल्पकला व चित्रकला यांचे आश्रयदाते म्हणून प्रसिद्ध होते. त्यांनीं आपल्या राजवटींत मजबूत किल्ले, रुंद कालवे, पाण्याच्या पुरवठ्यासाठीं तलाव, भव्य प्रासाद, व शिल्प आणि चित्रकलांच्या योगानें सुशोभित केलेलीं अशीं मंदिरें बांधलीं. त्यांनीं बांधलेल्या या इमारतींचीं यथार्थ वर्णनें देण्यासाठीं मोठमोठे ग्रंथ पाहिजेत. प्रस्तुत पुस्तकांत आह्मीं कांहीं चित्रें दिलीं आहेत, त्यावरून बरीच कल्पना येईल.



विजयनगरचा सामान्य देखावा.



हत्तिखाना (विजयनगर).

गुलाम वंश

(१२०६–१२९०)

१ कुतबुद्दीन (१२०६–१०)

२ आराम १२१०   पुत्री=३ शमसुद्दीन अल्तमश १२१०–३६

४ रुकनुद्दीन १२३६   ५ रजिया १२३६-४०   ६ बहराम १२४०-४२   ८ नासिरुद्दीन महमूद १२४६-६६   पुत्री = ९ गयासुद्दीन बलबन १२६६-८६

७ मसऊद (१२४२–४६)   पुत्री=बुगराखान बंगालचा सुभेदार

१० कैकुबाद (१२८६-१२९०)

खिलजी वंश १२९०–१३२१

कायमखान

१ जलालुद्दीन (१२९०-९६)   मसऊद

२ रुक्न-उद्–दीन (१२९६) (पदच्युत)   ३ अलाउद्दीन १२९६–१३१६

४ शहाबुद्दीन (१३१६)   ५ मुबारक १३१६–२०

६ खुस्रू १३२१

तघलक वंश

(१३२१–१४१२)

१ ग्यासुद्दीन तघलक (१३२१–२५) रजब सिपहसालार

२ मुहम्मद शहा (१३२५–५१) ३ फीरोज [१३५१–८८]

फतहखान जफरखान ६ मुहम्मद १३८९–९२

५ अबुबकर १३८८-८९

४ ग्यासुद्दीन तघलक दुसरा १३८८

८ नसरतशहा १३९४-९९

७ शिकंदर १३९२

९ महमूद १३९२-९४ व १३९९ते१४१२

१० दौलतखान लोदी १४१२–१४

सय्यद वंश १४१४–१४५१

१ खिजरखान १४१४–२१

मुबारक १४२१-३३

फरीद

३ मुहम्मदशहा १४३३–४३

४ अला उद्दीन १४४३–५१


लोदी वंश

१४५१–१५२६


१ बहलोल १४५१–८८

२ शिकंदर १४८८-१५१७


३ इब्राहीम १५१७–२६



पठाण साम्राज्य
इ० स० १००० ते १५२६
हिरात
अफगाणिस्थान
कंदाहार
बलुचिस्थान
काश्मीर
तिबेट
जौनपूर
बिहार
कालिंजर
गोंडवाना
खानदेश
वऱ्हाड
दमण
अहमदनगर
चौल
विजापूर
गोवा
राजमहेंद्री
बंगालचा उपसागर
मदुरा
सिलोन
केप कामोरीन
हिंदी महासागर



चंदेरीचा किल्ला.



असिरगढचा किल्ला.

राजवंशावली.

गुजराथ (१३९४।१५७२)
(राज्यारोहणाचीं वर्षें)

मुझफर १ला	१३९४
अहमद १ला	१४११
मुहम्मद	१४४३
कुतुब	१४५१
दाऊद	१४५९
महमूद बिगरा	१४५९
मुझफर २रा	१५११
सिकंदर	१५२६
महमूद २रा	१५२६
बहादुर	१५२६
मीरां मुहम्मद	१५३७
महमूद ३रा	१५५४
अहमद २रा	१५६१
मुझफर ३रा	१५६१–७२

माळवा (१४०१--१५६४)
(राज्यारोहणाची वर्षें)

दिलावरखान घोरी	१४०१
हुशंग घोरी	१४०५
मुहंमद घोरी	१४३५
महमूद खिलजी	१४३६
गयासुद्दीन ,,	१४६९
नासिरुद्दीन खिलजी	१५०१
महमूद २रा ,,	१५११–३१
गुजराथेंत सामील झालें	१५३१।३५
हुमायुनाच्या अमलाखालीं	१५३५
मल्लूखान	१५३६–१५४५
त्याला शेरशहानें हांकलून दिलें	१५४५
शुजाअत खान	१५४५–५४
बाझबहादुर	१५५४–६४

अकबरानें आपल्या राज्यास जोडलें

जौनपूर [१३९४–१४९३]

ख्वाजा जहान	१३९४
मुबारक शहा	१३९९
इब्राहीम ,,	१४०१
महमूद ,,	१४४०
मुहम्मद ,,	१४५८
हुसैन ,,	१४५९–७६

विजयनगर (१३३६--१६४२)

हरिहर पाहिला	१३३६
बुक्का पाहिला	१३४३
हरिहर २रा	१३७९
बुक्का २रा	१४०४
देवराय पाहिला	१४०६
वीर विजय	१४१०
देवराय दुसरा	१४२४
मल्लिकार्जुन	१४४७
विरूपाक्ष	१४६५
प्रौढ देवराय	?
नरसिंह सालुव	१४८६
इमादि नरसिंह	१४९२

नारस नायक	१५०५
वीर नरसिंह	१५०६
कृष्ण देवराय	१५०९
अच्युत	१५२९
सदाशिव	१५४२
तिरुमल	१५७०
रंगा	१५७३
वेंकट पहिला	१५८५
रंगा	१६४२

बहामनी (१३४७–१५२६)

हसन गंगू अलाउद्दीन १ला	१३४७
मुहम्मद शहा १ला	१३५८
मुजाहिद शहा	१३७५
दाऊद शहा	१३७७
महमूद १ला	१३७८
गियासुद्‌दीन	१३९७
शमसुद्‌दीन	१३९७
फिरोझ	१३९७
अहमद शहा	१४२२
अलाउद्‌दीन २रा	१४३५
हुमायूनशहा जालिम	१४५७
निझामशहा	१४६१
मुहमद २रा	१४६३
महमूद शहा २रा	१४८२
अहमद शहा	१५१८
अलाउद्‌दीन ३रा	१५२०
वली	१५२२
कलीम	१५२६

अहमदनगर [१४९०–१६३७]

निजाम उल् मुल्क अहमद	१४९०
बुर्हान शहा	१५०८
हुसैन ,,	१५५३
मुर्तझा ,,	१५६५
मीरां हुसैन	१५८८
इस्माईल	१५८९
बुर्हान २रा	१५९०
इब्राहीम	१५९५
अहमद २रा	१५९५
बहादुर	१५९६
मुर्तझा २रा	१६००
हुसैन २रा	१६३१–३५

विजापूर [१४९०–१६८६]

यूसफ आदिलशहा	१४९०
इस्माईल ,,	१५१०
मल्लू ,,	१५३४
इब्राहीम ,, १ला	१५३५
अली ,,	१५५७
इब्राहीम ,, २रा	१५८०
मुहम्मद ,,	१६२६
अली ,, २रा	१६५६
सिकंदर ,,	१६७३–१६८६

गोवळकोंडा [१५१२–१६८७]

सुलतान कुली कुत्बशहा	१५१२
जमशीद	१५४३
सुभान कुली	१५५०
इब्राहीम	१५५०
मुहम्मद कुली	१५८०
मुहम्मद	१६१२
अब्दुल्ला	१६३५
अबदुल हुसैन	१६७२–८७

मोंगल बादशहा.

१ बाबर (१५२६–१५३०)

२ हुमायून (१५३०-४०, १५५५--५६) कामरान हिंदाल आस्करी

३ अकबर (१५५६–१६०५)

४ जहांगीर (१६०५–१६२७) दानियाल मुराद

खुस्रू ५ शाहजहान (१६२८–५८) पर्वेज शहयार

दारा शिकोह शाहशुजा ६ औरंगजेब (१६५८–१७०७) मुरादबक्ष

७ मुअज्जम उर्फ बहादुरशाह (१७०७-१२) आजम कामबक्ष अकबर

८ जहांदारशाह (१७१२-१३) अजीमुश्शान जहानशाह रफी-उश्शान

१० रफीउद्दर्जात १७१९ ११ रफीउद्दौलत १७१९

१४ आलमगीर दुसरा (१७५४-१७५९) ९ फर्रुखसीयर (१७१३-१९) १२ मुहंमद शहा (१७१९-४८)

१५ शाह आलम (१७५९-१८०६) १३ अहमदशहा (१७४८-५४)

१६ अकबरशाह (१८०६-३७)

१७ बहादुरशाह (१८३७-१८५८)


मोंगल साम्राज्य.

प्रकरण ९ वें


बाबर (इ. स. १५२६–३०)

१ **मोंगलांचें पूर्ववृत्तः—** कनिष्कांच्या वेळेपासून बौद्धधर्माचा चीन देशांत प्रसार झाला. त्यामुळें तद्देशीय बरेच लोक पुष्कळ शतकें पर्यंत बौद्धधर्मांत राहिले व अद्यापिही तसेच आहेत. याच काळांत व्यापार, साहित्य व धर्मप्रचार या द्वारां त्यांचा आर्यावर्ताशीं निकट संबंध येऊन हिंदू चालीरीति त्याच्यांत मिसळल्या. याप्रमाणें मंगोलियांत राहणाऱ्या मोंगलांच्या आचारविचारांत बौद्ध व हिंदू यांच्या आचार-विचारांची मिसळ झाली होती. मोंगल परधर्मसहिष्णु होते; पंचमहाभूतें व पिशाच्चादिकांची ते पूजा करीत असत; प्रत्येक घरांत मूर्तिपूजन चाले; त्यांचे ब्राह्मणांप्रमाणें पुरोहित व मांत्रिक असत; इतकें असूनसुद्धां हिंदूंप्रमाणें ते एकच ईश्वर मानीत असत; बौद्ध असूनही ते मांसाहारी होते. क्षत्रियांप्रमाणेंच त्यांच्यांत गांधर्व विवाह प्रचलित होता. त्यांच्या बायका पडद्यांत न राहतां उत्सवाला व सह-भोजनाला पुरुषांबरोबर जात असत. तेराव्या शतकाच्या पूर्वार्धांत मध्य आशियांतून झंगीस व हलाकू यांच्या स्वारींबरोबर आलेले मोंगल अशा तऱ्हेचे होते. त्यामुळें तेराव्या शतकांतील मोंगलांच्या धर्माचें हिंदू-धर्माशीं बरेंच साम्य आढळतें. परंतु त्यांचे आचारविचार लौकरच पालटले. मध्य आशियांतील त्यांच्या विजयामुळें त्यांनां मुसलमानांच्या मध्यभागीं रहावें लागलें. अशा तऱ्हेच्या दोन शतकांच्या वास्तव्यामुळें त्यांचे शारीरिक व धार्मिक गुणही बदलले.


त्यांनीं तुर्की स्त्रियांशीं शरीरसंबंध केला व त्यामुळें पीतवर्ण, चपटीं नाकें, बारीक डोळे व रुंद तोंडावळा इत्यादि त्यांचें पूर्व स्वरूप बदलून त्या ऐवजीं तांबुस वर्ण, लांब नाकें व लांबट चेहरे इत्यादि तुर्की स्वरूप आलें. चारी बाजूंस मुसलमानांचें वास्तव्य व स्त्रियाही



गझनी येथील बाबरची कबर.



बाबरचा दरबार.



मुसलमान असल्यामुळें ते स्वतःला तुर्की मुसलमान ह्मणूं लागले. शेवटीं ते इतके कट्टर मुसलमान झाले कीं भारतवर्षांतील हिंदूंना मुसलमान करून स्वतःला ' गाझी ' होण्याच्या इच्छेनें त्यांतील बादशहा तैमूर यानें हिंदुस्थानावर इ. स. १३९८ मध्यें स्वारी केली. त्या स्वारींत त्याची इच्छा पूर्ण झाली, परंतु त्यावेळीं मोंगली राज्याची स्थापना होऊं शकली नाहीं. फक्त येथें येऊन लुटालूट, कापाकापी व बाटाबाटी करून तो निघून गेला. पुढें इ. स. १५२६. मध्यें हिंदुस्थानांत मोंगली साम्राज्याचा पाया घालणारा **बाबरही** ह्याच वंशातला होता.

२ बाबराचीं प्रारंभींचीं सुखदुःखें— हिंदुस्थानांत मोंगल साम्राज्याचा पाया घालणाऱ्या बाबराच्या नसांनसांतून आशिया खंडाचा बराचसा भाग पादाक्रान्त करणाऱ्या झेंगिस व तैमूर या दोन प्रसिद्ध विजेत्यांचें रक्त खेळत होतें. त्याचा पिता उमरशेख तैमूर वंशांतील तुर्क असून आई झेंगिस वंशांतील मंगोल होती. बाबरच्या अंगीं मंगोल लोकांची शक्ति आणि तुर्कांची बुद्धिमत्ता व साहस हीं बेमालुम एकत्रित झालीं होतीं.

इ. स. १४९४ मध्यें बाबर बारा वर्षें वयाचा असतांना त्याचा बाप मृत्यु पावला, व त्यामुळें त्याला फरगाणा प्रांताचें राज्य मिळालें. एवढ्या अल्पवयांतच तैमूरच्या वेळेपासून प्रसिद्ध असलेली समरकन्द राजधानी जिंकून घेण्याची त्याची दृढ इच्छा होती. त्याप्रमाणें त्यानें समरकन्द शहर कांहीं वेळां जिंकलें व कांहीं वेळां गमावलें. इतकेंच नव्हे तर त्याला अखेर इ. स. १५०२ मध्यें समरकन्द व फरगाणाही सोडून दुसऱ्या देशीं जावें लागलें. इ. स. १५०४ मध्यें त्यानें काबूल प्रांत मोठ्या शौर्यानें जिंकला आणि आपल्या ह्या नवीन राज्याची वाढ करीत असतां तो हिंदुस्थान जिंकण्याच्या खटपटीसही लागला. प्रथमतः कंदहार व हिरात जिंकून त्यानें अखिल अफगाणिस्थान आपल्या छत्राखालीं आणिला, व हिंदुस्थान जिंकण्यापूर्वीं २२ वर्षें या ठिकाणीं राज्य केलें. समरकंदाचें जुनें राज्यही जिंकण्याचा त्यानें यत्न केला; त्याप्रमाणें तें त्याला मिळालें. पण पुन्हा इ. स. १५१४ त तें

त्याच्या ताब्यांतून गेलें. या वेळेपासून, समृद्ध अशी हिंदभूमि जिंकण्याचा त्यास ध्यास लागला.

३ **हिंदुस्थानावर स्वाऱ्याः**— १५१९ पासून राज्यस्थापनेकरितां बाबर चार वेळां पंजाबांत उतरला. परंतु तो प्रत्येक वेळीं स्वदेशीं परत गेल्यावर मागें पंजाबांत असलेल्या त्याच्या मोंगल अनुयायांना हुसकून लावण्यांत येत असे. पुढें लौकरच बाबराच्या सुदैवानें, इब्राहीम लोदीच्या कारकीर्दीनें गांजलेल्या मुसलमानांनीं व हिंदूंनीं त्याला पुन्हा पाचारण केलें. एकीकडून पंजाबचा सुभेदार दौलतखान लोदी व दुसरीकडून इब्राहीमचा चुलता अलमखान (अलाउद्दीन) व चितोडचा राणा संग्रामसिंह या सर्वांनीं बाबरला साहाय्य करण्याचें अभिवचन दिलें. इब्राहीमचा पाडाव करून हिंदुस्थानचें राज्य बाबर आपणाला देईल असा त्यांचा समज होता. परंतु याचा परिणाम उलट झाला—त्यांचा नाश होऊन हिंदुस्थानांत मोंगल साम्राज्याची स्थापना झाली. इ. स. १५२६ त बाबरनें हिंदुस्थानावर पांचवी स्वारी करून पानिपतच्या मैदानांत लढाई दिली.

४ **हिंदुस्थानची राजकीय परिस्थिति** (इ. स. १५२६):— बाबराच्या स्वारीचे वेळीं हिंदुस्थानची फारच शोचनीय स्थिति होती. (१) दिल्लीचे बादशहा फक्त नामधारी होते. कारण माळवा, गुजराथ, सिंध व बंगालमध्यें पठाणांनीं स्वतंत्र राज्यें स्थापन केलीं होतीं; तसेंच अयोध्या, जौनपूर व बिहार या प्रान्तांत पठाणांनीं बंडें उभारलीं होतीं; तिकडून पंजाबचा सुभेदारही बंड करून बाबरास साहाय्य करण्यास तयार होता. (२) राजपुतान्यांत राणा संगाच्या नेतृत्वाखालीं रजपूतसंघ स्थापन झाला होता, त्यामुळें हिंदूंची शक्ति फार वाढली होती असें भासत होतें; परंतु त्यांचींही आपसांत भांडणें चाललींच होतीं. (३) दक्षिणेंतील बहामनी राज्य नष्ट होऊन त्या ठिकाणीं पांच स्वतंत्र राज्यें झालीं होतीं; तीं आपसांत लढून, शिवाय शेजारच्या विजयनगरच्या राज्याशींही नेहमीं भांडत असत. (४) दक्षिणेकडील राजे उत्तरेच्या राजकीय बाबतींत कोणत्याही प्रकारचा भाग घेत नसत. मुसलमान—मुसलमानांत व हिंदू—हिंदूंत झगडे होत असून शिवाय हिंदू—मुसलमानांतही युद्धें

होत असत; त्यामुळें हिंदुस्थान देश अनेक हिंदू व मुसलमान राज्यांत वांटला गेला होता. या यादवीचा बाबरनें चांगलाच फायदा घेतला.

५ **पानिपतचा संग्राम** (इ. स. १५२६):— भारतवर्षाच्या इतिहासांत पानिपत फारच प्रसिद्ध आहे. याच ठिकाणीं चार वेळां नव्या नव्या वंशांनीं हिंदुस्थानचें राज्य मिळविलें आहे. प्रस्तुत युद्धांत (१) इब्राहीमजवळ एक लाख शिपाई व एक हजार हत्ती होते. बाबराजवळ केवळ १२००० शिपाई होते, परंतु पुष्कळशा तोफा व बंदुका होत्या. (२) इब्राहीम युद्धकलेंत अननुभवी होता, आणि त्याचे शिपाई विलासी व कामी असल्यानें दुर्बल होते; परंतु बाबर त्यावेळचा अपूर्व योद्धा आणि सेनापति होता. त्याचे सैनिकही शूर व युद्धनिपुण होते. (३) बाबरच्या सैन्याकडे तोफा व बंदुका असून पठाणांकडे त्या नव्हत्या. (४) युद्धाचे वेळीं इब्राहीमचे शिपाई घाबरून गेले; व जेव्हां बाबराच्या सैन्यानें इब्राहीमच्या सैन्यावर अघाडी, पिछाडी व दोन्ही बाजू अशा चारी दिशांनीं हल्ला केला, त्या वेळीं इब्राहीम व त्याचे सुमारें चाळीस हजार शिपाई कामास आले, व बाकी जीव वांचवून पळत सुटले. या प्रमाणें पानिपतची लढाई जिंकून बाबरानें दिल्ली व आग्रा यांवर आपला अधिकार चालविण्यास सुरवात केली, व मोंगल राज्यास प्रारंभ केला. यानंतर थोड्याच काळांत त्याला ग्वाल्हेर व जौनपूर हे प्रान्त मिळाले; त्यामुळें त्याचें राज्य विस्तृत झालें.

६ **राणा संग्रामसिंह उर्फ संग**:—मेवाडचा हा राजा राष्ट्रवीर व उदार होता. तो नांवाप्रमाणें संग्रामसिंहच नसून सर्व हिंदूराष्ट्राचा सिंह होता. माळवा, दिल्ली आणि गुजराथ येथील मुसलमानी राजांना त्यानें पराभूत केलें. त्याचें सर्व आयुष्य लढायांमध्यें खर्च झालें. त्याच्या शरीरावर ऐंशीं घाव लागले होते व ज्यावर जखमांच्या खुणा नाहींत असा एकही शरीराचा भाग उरला नव्हता. त्याचा एक पाय, एक हात व एक डोळा युद्धामध्यें नष्ट झाला होता. बाबरच्या मताप्रमाणें त्यानें २९० शहरांतील मशिदी पाडल्या व पुष्कळशा मुसलमानांना कैद केलें. त्याचे पदरीं दोन लाख स्वार, सात राजे, नऊ मांडलिक व एकशें चार सरदार रहात असत.

आपत्तींत वाढलेला, शरसंधाननिपुण व साहसी असा हा वीर योद्धा भारतीय साम्राज्याकरितां बाबराशीं लढण्यास आला. बाबरही त्याच्याशीं लढण्यासाठीं आग्र्याहून निघाला.

७ **सीक्री व खानवाचें युद्ध** (इ. स. १५२७):— राणा संगाचा दरारा वर लिहिल्याप्रमाणें यमुनेपासून गुजराथपर्यंत बसला होता. बाबर केवळ लूटमार करण्यासाठीं आला नसून राज्यस्थापनेच्या इराद्यानें आला आहे असें जेव्हां संगानें पाहिलें, तेव्हां आपल्या सर्व रजपूत मांडलिकांना बरोबर घेऊन बाबरशीं युद्ध करण्याची त्यानें तयारी केली. बाबराकडून संगानें बियाना किल्ला जिंकून घेतला; पुढें आग्र्यापासून २० मैलांवर सीक्रीच्या मैदानांत दोघांचें युद्ध झालें. त्यांत संगानें बाबरच्या आघाडीच्या सैन्याचा सपशेल पराभव करून त्याच्या सैनिकांची सर्व आशा खुंटविली. पुन्हा खानव्यासही एक महत्वाचें युद्ध झालें.

८ **रजपुतांच्या पराभवाचीं कारणें**:-(क) सीक्रीच्या लढाईत भोळ्या रजपुतांनीं अशी एक मोठी चुकी केली कीं, बाबराचें सैन्य पळत असतां त्याचा पाठलाग करण्याचें सोडून ते स्वस्थ उभे राहिले. रजपुतांनीं बाबराच्या सैन्याचा जोरानें पाठलाग केला असता तर मोंगलांचा खात्रीनें पराजय झाला असता, कारण बाबरच्या सैनिकांचें मन अगोदरच निराशेनें खचलें होतें. (ख) दीड महिनापर्यंत रजपूत स्वस्थ असल्याकारणानें खानवाच्या लढाईची तयारी करण्यास बाबरास अवसर मिळाला. (ग) बाबराचा पराभव होणार असें एका ज्योतिष्यानें त्याला सांगितल्यामुळें मोंगली सैन्यांत निराशा व भय पसरलें होतें; तरी पण बाबरानें अपूर्व धैर्य दाखवून आपल्या सैनिकांस या धर्मयुद्धांत ' मारूं किंवा मरूं ' या निश्चयानें लढण्यास उद्युक्त केलें. (घ) रजपुतांनीं ही सोन्यासारखी संधि सोडली, इतकेंच नव्हे तर, त्यांच्यांतील एक देशद्रोही रजपूत सेनापति सिल्हदी हा बाबरास मिळाला, व या लढाईच्या ऐन प्रसंगीं तो आपल्या सैन्यासह रजपुतांस सोडून गेला. (ङ) इतके दिवस आळसांत राहिल्यानें रजपुतांचे आपसांत झगडे होत असत; तर इकडे मोंगल सेनेचा उत्साह उत्तरोत्तर वाढत होता. (च) बाबरचे वीर सैनिक तोफांच्या साहाय्यानें लढत

होते; शिवाय घोर संग्रामांत थकलेल्या सेनेवर दोन्ही बाजूनीं आणि पुढून व मागून असा चोहोंकडून अचानक हल्ला चढविण्याची बाबराची विशिष्ट युद्धकला रजपुतांना माहीत नव्हती. शिकंदर व बाबर यांच्या विजयमालिकांचें मुख्य कारण ह्मणजे हेच डावपेंच. अशा रीतीनें रजपूतसेना दोन लक्ष व मोगल सैन्य फार फार तर चाळीस हजार असून सुद्धां, वरील सर्व कारणांमुळें रजपूत, खानवाच्या युद्धांत पराजित होऊन, पळत सुटले. वीर राणा संग लढाईत घायाळ होऊन मूर्छित पडला. त्याला त्याच्या सरदारांनीं रणक्षेत्रांतून पळवून नेलें. बाबराचा विजय झाल्यानंतर सीक्रीला "फतहपुर सीक्री" असें नांव देऊन बाबरानें स्वत: 'गाझी' हें उपपद धारण केलें आणि रजपुतांच्या शिरांचा एक स्तंभ रचून तो परत फिरला!

परिणामः— या युद्धाचे परिणाम भयंकर झाले. (१) रजपुतांचा पराक्रम लुप्त झाला व त्यांचें राष्ट्रीय महत्त्वही नष्ट झालें. (२) पुष्कळ सरदार व योद्धे मारले गेल्यामुळें बहुतेक रजपूत घराणीं निर्बल झालीं. (३) रजपुतांची एकी विस्कळित झाली व मुसलमानांशीं सामना करण्याची शक्ति त्यांच्यांत उरली नाहीं. यानंतर केव्हांही रजपुतांनीं हिंदुस्थानचें राज्य परत मिळविण्याचे प्रयत्न केले नाहींत. केवळ राजपुतान्यावर होणाऱ्या हल्लयांस ते तोंड देत राहिले. (४) पठाणांच्या आशेचा लुकलुकणारा दिवा विझून भारतवर्षामध्यें मोंगली राज्य प्रस्थापित झालें.

९ चंदेरीचा विजय (इ. स. १५२८):— बाबराशीं दुसरें युद्ध करून त्याला पराजित करावें असा एका बाजूनें राणा संगाचा विचार होता; तर दुसऱ्या बाजूनें बाबर रजपुतांवर हल्ला करून त्यांची सर्व शक्ति नाहींशी करण्याच्या बेतांत होता. त्याप्रमाणें त्यानें चंदेरीवर स्वारी केली, तेव्हां तेथील मेदिनीरावास सहाय्य करण्यासाठीं राणा संग निघाला. परंतु युद्धविरोधी रजपूत सैन्यानें राण्यास विष देऊन मारून टाकलें. या युद्धांत रजपुतांनीं बाबराच्या सैन्यावर दगडांचा व ज्वालाग्राही पदार्थांचा मारा केला, तरी अखेरीस मेदिनीरावाचा पराजय झाला. या वेळीं सर्व रजपुतांनीं जोहर करून आपल्या शूरत्वाला साजेल अशा

तऱ्हेनें आपलें प्राणदान केलें, व त्यांच्या स्त्रियांनीं अग्नि काष्ठभक्षण करून आपलें पातिव्रत्य राखिलें.

१० रणथंभोरची प्राप्तिः—राणा संगाच्या मृत्यूनंतर त्याचे मुलगे आपसांत भांडूं लागले, व शेवटीं त्याच्या दुसऱ्या मुलानें आपल्या वडील भावाविरुद्ध आपल्याला मदत मिळावी ह्मणून रणथंभोरचा किल्ला बाबराच्या स्वाधीन केला. अशा तऱ्हेनें रजपुतांचा नायनाट करावयास उठलेल्या व राणा संगाचें सर्व राज्य नाहींसें करण्याचा बेत रचणाऱ्या बाबराला फक्त भाऊबंदकीमुळें संगाचा मुलगा सामील झाला.

११ सुलतान महमूद लोदीः—हा सुलतान इब्राहीम लोदीचा भाऊ असून बाबराच्या विरुद्ध लढण्यासाठीं त्यानें बिहार प्रांतांत एक लाख सैन्य जमविलें. परंतु बाबरानें जोराचा हल्ला करून त्या सैन्याचा अलाहाबादजवळ पराभव केला. या पराजयानंतर लोदी घराण्यानें केव्हांच डोकें वर काढलें नाहीं.

१२ घोग्रेचें युद्ध :—बंगालचा सुलतान **नसरत शहा** यानें बाबरचा स्नेह संपादन करण्याचा पहिल्यानें प्रयत्न केला. परंतु नंतर त्यानें महमूद लोदीला मदत केली; आणि इ. स. १५२९ त गंगा व घोग्रा यांच्या संगमावर बाबराशीं लढाई दिली; त्यांत नसरत शहाचा सपशेल पराभव झाला. अशा तऱ्हेनें पानिपत व घोग्रेच्या लढायांत अफगाणांचा आणि सीक्री व चंदेरीच्या लढायांत रजपुतांचा पराभव करून बदक्षानपासून बंगालपर्यंत व हिमालयापासून ग्वाल्हेरपर्यंत सर्व मुलुखावर बाबरानें आपला अंमल बसविला. या रीतीनें त्याचें आयुष्य लढण्यांत गेलें. या श्रमांचा त्याच्या प्रकृतीवर बराच परिणाम होऊन तो खंगत चालला; व त्यामुळें स्वकष्टार्जित राज्याचा उपभोग घेण्यास तो फार वर्षे जगला नाहीं.

१३ बाबराची राज्यव्यवस्थाः—मोंगलराज्यसंस्थापक बाबर ऐश्वर्याच्या मार्गे लागणारा शिपाईगडी व कर्तृत्ववान् आणि दयाळू राज्यकर्ता होता. हिंदुस्थानांतील पांच वर्षांच्या अवधींत तो पठाण व रजपूत राजांचें वर्चस्व कमी करण्यांत गढून गेला होता; त्यामुळें राज्य-सुधारणेकडे त्याला मुळींच लक्ष देतां आलें नाहीं. शिवाय त्याच्यापूर्वीच्या

अफगाणांच्या दुबळ्या कारकीर्दीत इतकी अव्यवस्था माजली होती कीं, ती पांच वर्षांच्या थोडक्या काळांत सुधारणें शक्य नव्हतें. तरी त्यानें कांहीं सुधारणा अमलांत आणिल्या, त्या अशाः--

(१) सरदारांची जहागीर त्यांच्याकडे फक्त त्यांच्या आयुष्या-पुरतीच रहावयाची, व मृत्यूनंतर पुनः ती राजाचे ताब्यांत जावयाची असें त्यानें ठरविलें. त्यामुळें उमरावांना बादशहाची मर्जी संपादन करणें भाग पडलें. (२) त्यानें आपल्या सरदारांचे दर्जे ठरविले व त्यांचीं मनें आपल्याकडे आकर्षून घेतलीं. (३) न्यायदानाचे बाबतींत मुख्य अधिकार बाबरानें आपल्याकडे ठेविले; परंतु त्याचे सुभेदार पूर्वीपासून चालत आलेला न्यायदानाचा अधिकार चालवीत होते. (४) आपल्या सरदारांस मुजरा करावयास लावून बाबर त्यांचें महत्व कमी करीत असे; परंतु ही गोष्ट त्यांना पसंत नव्हती. (५) त्यानें हिंदूंचा छळ केला नाहीं, व हुमायुनानेंही तेंच धोरण ठेवावें, एतदर्थ, गाईला पूज्य मानून हिंदूंचीं मनें न दुखवितां त्यानें राज्य करावें असें बाबरानें आपल्या मृत्युपत्रांत लिहिलें होतें.

१४ बाबराचा अंतः— बाबराच्या मृत्यूचा वृत्तान्त विचित्र आहे. त्याचा आवडता मुलगा हुमायून फारच आजारी होता. वैद्यांनींही त्याची आशा सोडली असतां, त्याच्यासाठीं मरण पतकरण्यास बाबर तयार झाला. त्यानें हुमायुनाच्या सभोंवती तीनदां प्रदक्षिणा करून खऱ्या अंतःकरणपूर्वक ईश्वराची प्रार्थना केली कीं, "हुमायुनाचा आजार मला येवो." आश्चर्याची गोष्ट अशी कीं, त्या वेळेपासून हुमायु-नास गुण येऊं लागला, व बाबराची प्रकृति बिघडत चालली. शेवटीं इ. स. १५३० सालीं डिसेंबरमध्यें तो मरण पावला. त्याचें प्रेत अकरा वर्षेपर्यंत आग्रा शहरांत पुरून ठेविलें होतें. नंतर तें काबूल शहरीं नेऊन त्यावर एक उत्तम कबर बांधिली गेली. तेथें लोक यात्रेसाठीं अजून जातात.

१५ बाबराचा स्वभाव व वर्तन फारच नमुनेदार होतें. तो शूर योद्धा, पटाईत घोडेस्वार, दूरदर्शी व युद्धकलानिपुण सेनापती, धष्टपुष्ट,

व शत्रूंशीं कठोर असा होता. तसाच तो निसर्गप्रेमीही होता. हिरवीं गार शेतें पाहून त्यास आनंद होत असे. त्याचा मनमिळाऊ स्वभाव, प्रेमपूर्ण व दयार्द्र हृदय, आनंदी वृत्ति, आपत्कालीं संतोष व धैर्यशीलता, औदासीन्यपराङ्मुखता, आशावादीपणा, स्मरणवहींत स्वभाषेंत आपलें जीवनवृत्त जसेंच्या तसें लिहिण्याचा निर्भीडपणा, फार्शी भाषेंतील अत्युत्तम कवित्व, इत्यादि गुणांनीं त्याचें चरित्र अपूर्व झालें आहे. हिंदुस्थानांत प्राप्त झालेली लूट आपल्या साथीदारांना व अफगाण प्रजेला वाटणें आणि उदासीनता न दर्शवितां सुखानें आयुष्य क्रमणें, या कारणांमुळें बाबराला **कलन्दर** (उदार साधु) हें उपपद प्राप्त झालें.

प्रकरण २ रें

हुमायून (इ. स. १५३०–१५५६)

१ **हुमायुनाचा स्वभाव व धोरणः** — बाबराच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा हुमायून गादीवर बसला खरा, तथापि बाप व मुलगा यांत पुष्कळ भेद होता. विजय व सुदैव हीं बाबराच्या कारकीर्दीचीं लक्षणें होतीं; तर अपयश व दुर्दैव हीं हुमायुनाच्या कपाळीं लिहिलीं होतीं. जरी त्याला दुर्दैवाच्या दिव्यांतून अनेकदां जावें लागलें तथापि तशांतही त्याचे चांगले गुण दिसून आले. परंतु भारतीय साम्राज्याला त्या गुणांपासून काडीचा फायदा झाला नाहीं.

२ **हुमायुनाच्या कारकीर्दींतील नैसर्गिक दौर्बल्यः**— हुमायून, कामरान, हिंदाल व आस्करी असे बाबराचे चार पुत्र होते. कामरानला काबूल व कंदहारचें राज्य मिळालें व दुसरे दोघे पुत्र हुमायुनाबरोबर हिंदुस्थानांत राहिले. (१) त्यांना हुमायुनानें लहान लहान सुभेदाऱ्या दिल्या व मूर्खपणानें पंजाबचा प्रान्त कामरानच्या हवालीं केला. अशा रीतीनें फक्त नवीन जिंकलेला मुलूख हुमायुनाच्या ताब्यांत राहिला आणि ज्या ठिकाणीं मोंगली राज्य प्रस्थापित झालें होतें, असा सर्व मुलूख त्याच्या भावांच्या ताब्यांत जाऊन काबूलकडून मिळणारी सैनिकांची मदत

बंद झाली. यामुळें त्याला बऱ्याच अडचणी सोसाव्या लागल्या. (२) शिवाय हुमायुनाकडे मुत्सद्देगिरीचा अभाव असल्यामुळें, आपल्या दिलदार स्वभावानुसार तो प्रत्येकावर विश्वास ठेवीत असे. (३) बाबराची उमेद, आशावादित्व व तडफ हीं हुमायुनामध्यें नव्हतीं. (४) हुमायुनाचा स्वभाव जात्या दृढनिश्चयी नव्हता, व हा दोष अफुसेवन व भोगविलास यांमुळें फारच वाढला. त्यामुळें शत्रूचा पुरा बींमोड करण्याचा प्रयत्न त्यानें कधींच केला नाहीं. एका शत्रूवर विजय मिळवीत असतां तें काम मध्येंच अपुरें सोडून तो दुसऱ्या ठिकाणीं लढाईला जात असे. गुजराथ, बंगाल व चितोड इत्यादि लढायांतील त्याची धांदल प्रसिद्ध आहे. पुढें जय आणि मागें पराजय अशी त्याची नेहमीं स्थिति असे. (५) बापाला दिलेल्या वचनाप्रमाणें तो आपल्या भावांशीं दहा वर्षें चांगल्या रीतीनें वागला. परंतु त्याचे भाऊ मात्र त्याच्याशीं अप्रामाणिकपणें वागत होते, म्हणून त्याला आपलें धोरण बदलावें लागलें. (६) बाबराच्या वेळचे बरेच अनुभवी सरदार मेले होते, व जे जिवंत राहिले ते राज्योपभोगांत गढून गेले होते. यामुळें हुमायुनाचा राज्यकारभार योग्य रीतीनें चालला असेल अशी आशा करण्याला जागाच नाहीं. शूर बाबराला पांच वर्षांच्या अल्पकालांत अफगाणांचा पूर्णपणें पाडाव करतां आला नाहीं. त्यामुळें त्याच्या मृत्यूची बातमी ऐकून अफगाणांनीं पुन्हां युद्धाची तयारी केली. सर्व आयुष्यभर हुमायुनाला स्वतःच्या राज्यरक्षणासाठीं लढाया कराव्या लागल्या. त्यांतील मुख्य मुख्य खालीं दिल्या आहेत.

३ बिहारवर स्वारीः— बिहारप्रान्त महमूदखान लोदी व शेरखान सूर या दोन पठाणांकडे असून, ते फार त्रास देऊं लागले. त्यांचा बंदोबस्त करण्यासाठीं हुमायुनानें प्रथम बिहारवर स्वारी केली. तेथून इ. स. १५३१ मध्यें महमूदास हांकलून दिलें; व चुनारच्या किल्ल्याला वेढा दिला; पण शेरखानानें हुमायुनाला लटकी शरणचिठ्ठी देऊन तो उठविला. अशा रीतीनें अफगाणांचें पूर्णपणें निर्मूलन न करतां त्यानें शेरखानरूपी सर्पास मोकळें सोडिलें. यानेंच नंतर हुमायुनाचा चावा कसा घेतला हें पुढें कळेलच.

४ हुमायुनाची गुजराथवर स्वारी:—गुजराथचा बादशहा बहादुरशहा याच्याशीं हुमायुनाला इ० स. १५३६ मध्यें युद्ध करावें लागलें. १ बहादुरशहानें माळवा, खानदेश, अहमदनगर, वऱ्हाड, चितोड वगैरे जिंकून आपलें गुजराथचें राज्य बरेंच वाढविलें. या विजयानें त्याचें सामर्थ्य दिवसेंदिवस वाढत चालल्यानें त्यापासून दिल्लीच्या राज्याला बराच धोका होता. २ हुमायुनाचा मेहुणा त्याचा शत्रु होता; त्याला बहादुरशहानें आश्रय दिला; व हुमायुनानें त्याला स्वाधीन करण्यास कळविलें असतांसुद्धां त्यानें तसें केलें नाहीं. ३ लोदी राज्यांतील बरेच सरदार दिल्लींतून बाबरानें घालवून दिल्यामुळें बहादुरशहाच्या पदरीं नोकरीस राहिले होते; व अलाउद्दीन लोदी, बदक्षानहून निघून दिल्लीचें राज्य परत मिळविण्याच्या हेतूनें लढाईची तयारी करण्यासाठीं गुजराथेंत आला, त्याला आपल्या सैन्याची मदत देऊन बहादुरशहानें आग्र्यापर्यंत पाठविलें; परंतु तेथें हुमायुनानें त्याचा पराजय केला. ४ बहादुरशहानें चितोडवर हल्ला केला. त्यावेळीं चितोडच्या राणीनें हुमायुनाकडे रक्षाबंधन पाठवून त्याची मदत मागितली; परंतु हुमायुनाला वेळेवर मदत देतां आली नाहीं. त्यामुळें बहादुरनें किल्ला घेतला, व हुमायुनाच्या लौकिकाला कलंक लाविला. या सर्व गोष्टींचा सूड घेण्यासाठीं हुमायुनानें गुजराथवर स्वारी केली. प्रथम मंडेश्वर (मंदसूर) येथें युद्ध झालें. त्यांत बहादुरचा पराभव झाल्यामुळें तो पळत सुटला. हुमायुनानें त्याचा पाठलाग करून व मांडू, चंपानेर, कँबे येथें पराभव करून त्याला दीव बेटांत हांकलून दिलें, तेथें तो पोर्तुगिजांच्या आश्रयास राहिला.

यानंतर हुमायून गुजराथ व माळव्यांत आपली सत्ता प्रस्थापित झाली किंवा नाहीं हें न पाहतां वरील प्रांत आस्करीच्या ताब्यांत देऊन शेरखानाचा बंदोबस्त करण्याकरितां परतला. कांहीं दिवसांनीं तेथील मोंगल सरदार आपसांत भांडूं लागले. त्यांनीं हुमायुनाविरुद्ध बंड पुकारलें आणि आस्करीला राज्यपदावर बसविलें. या अंदाधुंदीचा फायदा घेऊन बहादुरशहा दीव बेटांतून परत आला, व त्यानें इ. स. १५३७ मध्यें आपलें वडिलार्जित राज्य परत मिळविलें. अशा रीतीनें हुमायुनाचे सर्व प्रयत्न निष्फळ ठरले.


५ हुमायून व शेरखानः— हुमायून गुजराथ व माळवा जिंकण्यांत मग्न झाला असतां इकडे शेरखानानें बिहारप्रान्त जिंकिला, कपटानें रोहितास नांवाचा अजिंक्य डोंगरी किल्ला ताब्यांत घेतला व बंगाल्यांत अचानकपणें घुसून गौर राजधानी हस्तगत केली. ही बातमी ऐकून त्याच्या वाढत्या शक्तीला आळा घालण्यासाठीं माळव्यांतून परत येऊन हुमायुनानें लढाईची तयारी केली. आपला भाऊ हिंदाल व आस्करी यांना आग्र्याहून बरोबर घेऊन एका प्रचंड सैन्यासह तो बंगालवर चालून गेला. प्रथम चुनारास वेढा देऊन त्यानें कांहीं महिने विनाकारण खर्च केले. शेवटीं इ. स. १५३८ मध्यें चुनार जिंकिलें. शेरखान आपल्या शक्तिच्या धुंदींत होता. आपला शत्रू निर्बल आहे, अशी त्याची पक्की खात्री असल्यामुळें त्यानें हुमायुनाला थोपविण्याचा प्रयत्न केला नाहीं. त्यामुळें हुमायून बंगाल्यांतील गौर राजधानीपर्यंत चाल करून गेला, व ती त्यानें ताब्यांत घेतली. या विजयानें हर्षभरित होऊन त्याच ठिकाणीं एक वर्षपर्यंत तो ऐष आरामांत निमग्न राहिला. एवढ्या अवधींत इकडे शेरखानानें त्याच्या नाशाची तयारी केली. बंगालच्या बाहेर येऊन त्यानें काशी व चुनार आपल्या ताब्यांत घेतलीं आणि कनोज व जौनपूर या दोन शहरांस वेढा दिला. त्यामुळें बंगाल्यांत असलेल्या बादशाहाच्या सैन्याला बाहेरून मिळणारी मदत बंद झाली. तेव्हां हुमायुनानें आपला भाऊ हिंदाल यास नवें सैन्य आणण्याकरितां आग्र्यास पाठविलें. पण तेथें जाऊन हिंदाल स्वतःसच बादशाहा ह्मणवूं लागला व त्यानें राज्यसूत्रें आपल्या हातीं घेतलीं. ही बातमी ऐकून हुमायून घाबरला, कारण जरी बंगाल त्याच्या हातीं आला, तरी साम्राज्याचे इतर भाग हिंदाल व शेरखान यांच्याचकडे होते. त्यांना आळा घालण्यासाठीं हुमायून बंगालहून सैन्यासह परत फिरला.

६ चौन्साचें युद्ध इ. स. १५३९ – हुमायून बंगालहून निघाला तेव्हां ऐन पावसाळ्याचे दिवस होते. पावसाळा जोरांत सुरू असल्यामुळें व हिंवज्वराच्या फैलावामुळें त्याचे शिपाई मरूं लागले. मार्गावर ठिकठिकाणीं ये जा व देवघेवही बहुतेक बंद झाली होती.

वरील कारणांमुळें नवीन कुमक मिळण्याची आशा नव्हती; आणि पुरामुळें त्याला बंगाल्यांतून बाहेर जातां येईना. अशा बिकट परिस्थितींत तें सैन्य असतां मधून मधून शेरखानाचे शिपाई त्याच्यावर हल्ला करीत असत. शेवटीं चौन्साच्या रणमैदानांत दोन्ही फौजांचा दोन महिने तळ पडला. एके दिवशीं पहांटेस संधि साधून शेरखानानें आपल्या सैन्यासह हुमायुनाच्या सैन्यावर अचानक छापा घातला, व त्याची दाणादाण उडविली. त्याचा परिणाम असा झाला कीं, सर्व युद्धसामग्री, जनाना, व खजिना शेरखानाचे हातीं पडला. परंतु दैववशात् इब्राहीम नांवाच्या एका भिस्त्याच्या मदतीनें हुमायून गंगापार होऊन आग्र्यास परत आला. शेरखानाच्या सैन्यानें बंगाल, बिहार व जौनपूर मधून मोंगलांना उधळून लाविलें आणि बुंदेलखंडापर्यंतचा सर्व मुलूख उध्वस्त केला. अशा प्रकारें इ. स. १५३९ त शेरखान बंगालचा सुलतान झाला व त्यानें "शेरशहा" अशी पदवी धारण केली.

७ कनोजचें युद्ध---वर सांगितल्या प्रमाणें इ. स. १५३९ त चौन्साच्या युद्धांत पराजित होऊन हुमायून मोठ्या कष्टानें आग्र्यास पोहोंचला. तेथें कामरान पंजाबांतून आग्रा घेण्यास आला आहे असें त्यानें पाहिलें. परंतु आपल्या आईच्या सांगण्यावरून कामरान व हिंदाल यांनीं आपलें वैर थांबविल. परंतु या आपत्तींत हुमायुनाला कोणच्याच प्रकारची मदत न करतां, कामरान आपल्या सैन्यासह परत गेला. नंतर थोड्याच कालांत कसेंबसें ४०००० सैन्य जमवून व शेरशहाशीं लढण्याची जय्यत तयारी करून हुमायून आग्र्याहून निघाला. इ. स. १५४० मध्यें दोन्हीं सैन्यांची कनोज जवळ गांठ पडली. परंतु अफगाणी सैन्यापुढें मोंगली सैन्याचा टिकाव न लागून, तें वाट फुटेल तिकडे पळत सुटलें व हूमायुनाचा सपशेल पराभव झाला.

आपल्या थोड्या अनुयायांनिशीं हुमायून आग्र्यास परत आला; आणि तेथून द्रव्य व सर्व परिवार घेऊन तो पंजाबांत कामरानकडे आश्रयास गेला असतां, शेरशहानें तेथेंही त्याचा पाठलाग केला. हुमायुनाला पंजाब मिळूं नये ह्मणून कामराननें तो प्रान्त शेरशाहाच्या स्वाधीन केला,


मोगल साम्राज्य
तिबेट
हिरात
बलुचिस्थान
अजमीर
दिल्ली
आग्रा
अल्लाहाबाद
माळवा
अहमदाबाद
गोंडवाना
बिहार
अरबी समुद्र
बंगालचा उपसागर
हिंदी महासागर
सिलोन



शेर शहा. (बडोदा म्यु.)

व हुमायूनखेरीज इतर सर्व बंधु दोन लाख मोंगलांस बरोबर घेऊन काबूलास निघून गेले. अशा रीतीनें पंजाब, दिल्ली व आग्रा हे प्रान्त शेरशहानें काबीज केल्यामुळें हुमायुनाच्या हातून हिंदुस्थानचें साम्राज्य गेलें.

८ राजापासून रंकः— लाहोरांत असतांना, हुमायुनाजवळ भरपूर मोंगल असूनसुद्धां शेरशहाशीं लढण्याचें धैर्य त्याच्यांत नसल्यानें व भावांच्या विश्वासघातकी वर्तनानें निराश होऊन तो उत्तर सिंधला गेला व तेथें बक्खरच्या सुलतानापाशीं त्यानें गुजराथ जिंकण्यासाठीं मदत मागितली. ती न मिळाल्यामुळें तेथें कांहीं दिवस राहून बक्खरच घेण्याची त्यानें खटपट केली. त्यांत यश न आल्यामुळें तो मारवाडचा राजा **मालदेव** याच्या आश्रयाला गेला. हुमायुनाला हाकलून देण्याविषयीं मालदेवाशी शेरशहाचा तगादा सुरु झाला म्हणून हुमायुनाला आपल्या कांहीं अनुयायांना बरोबर घेऊन तेथून निघून जावें लागलें. वाटेंत सिंधच्या निर्जल, कांटेरी वनांत व वालुकामय प्रदेशांत भोजनरहित स्थितींत हुमायुनासारख्या सम्राटाला दिवस कंठावे लागले! परंतु दुःखांत सुख एवढेंच कीं, अमरकोटाजवळ त्याच्या तळमळणाऱ्या जीवास प्रफुल्लित करणारें असें एक पुत्ररत्न त्याला इ. स. १५४२ मध्यें लाभलें, व त्याचें नांव **अकबर** असें ठेवण्यांत आलें. यानेंच नंतर मोंगल साम्राज्याचा पाया बळकट केला. शेवटीं हुमायून अमरकोटास गेला व तेथील राजा राणा प्रसाद यानें त्यास आश्रय दिला.

९ हुमायुनाचें इराणमध्यें वास्तव्य (इ. स. १५४१ ते १५४५):— सिंध जिंकणें किंवा तेथें राहाणें अशक्य वाटल्यामुळें हुमायून आपल्या परिवारासह सिंधहून कंदहारकडे जाण्यास निघाला. परंतु त्याला त्याचा भाऊ आस्करी यानें तेथें कोणत्याही प्रकारचें साहाय्य न करितां उलट अटक करण्याचा बेत केला. ह्मणून तो लवकरच तेथून इराणकडे पळाला व तेथील सुलतान **शहा तहमास्प** याजपाशीं त्यानें आश्रय व मदत मागितली. तेव्हां हुमायुनानें शिया पंथाचा स्वीकार केल्यास त्यास मदत देण्याचें शहानें कबूल केलें. हुमायुनाला दुसरा मार्ग नसल्यामुळें शहाच्या अटीस त्यास मान वांकवावी लागली. त्याप्रमाणें शहानें चार वर्षेंपर्यंत त्यास आदरानें वागविलें.

१० अफगाणिस्थान जिंकिलें:—तदनंतर कंदहार जिंकून तो प्रान्त इराणच्या राज्यास जोडण्याच्या करारावर शहानें हुमायुनास बारा हजार सैन्य दिलें. याच सैन्याच्या साहाय्यानें हुमायुनानें कंदहार इ. स. १५४५ मध्यें जिंकला. परंतु कांहीं दिवसांनीं शहाशीं विश्वासघात करून त्यानें तो प्रांत बळकाविला. तेथें सैन्य उभारून, त्याच्या साहाय्यानें आपल्या कृतघ्न भावाकडून काबूल जिंकून घेतलें. पण या नव्या राज्याच्या स्थैर्याकरितां पुढेंसुद्धां त्यास आपल्या भावाशीं कांहीं वर्षेंपर्यंत वरचेवर लढाया कराव्या लागल्या. त्यांत कधीं हुमायुनाचा तर कधीं त्याच्या भावांचा विजय होई. शेवटीं हुमायुनाच्या सुदैवानें हिंदाल लढाईंत मारला गेला; आस्करीस कैद करून मक्केस पाठविलें; आणि कामरानास पकडून त्याचे डोळे काढण्यांत आले. अशाप्रकारें आपल्या भावांचा निःपात करून हुमायुनानें आपला मोर्चा इ. स. १५५५ मध्यें हिंदुस्थानाकडे वळविला.

११ हिंदुस्थानांतील विजय:—बाबरानें कष्टानें मिळविलेलें हिंदुस्थानचें राज्य हुमायुनानें घालविल्यामुळें बाबरचे सर्व श्रम आधींच फुकट गेले होते. शेवटीं इ. स. १५५५ मध्यें हुमायुनाचें दुर्दैव संपून पुनः हिंदुस्थान जिंकण्याची सुसंधी त्याला कशी प्राप्त झाली याची माहिती पुढें येईल. पंधरा हजार घोडेस्वार बरोबर घेऊन हुमायून हिंदुस्थानांत परत आला. मच्छीवारा व सरहन्द या ठिकाणीं शिकंदर सूराचा पराभव करून लाहोर व दिल्लीचें राज्य त्यानें आपल्या ताब्यांत घेतलें. तथापि नवीन राज्याचा फार दिवस उपभोग घेण्याचें त्याच्या नशिबीं नव्हतें.

१२ हुमायुनाचा मृत्यू (इ. स. १५५६):—एके दिवशीं तो आपल्या पुस्तकालयांतून खालीं येत असतां बादशाही मशिदीमध्यें मुल्लानें नमाज पढण्याची दिलेली सूचना ऐकून तेथेंच पायरीवर नमाज पढण्यास बसला. नमाज झाल्यावर तो काठी टेकून उठूं लागला असतां संगमरवरी पायरीवरून काठी निसटली व तो गडगडत खालीं आला. नंतर चार दिवसांतच या नवीन राज्यास डळमळीत अवस्थेंत ठेवून तो आपल्या वयाच्या पन्नासाव्या वर्षी परलोकवासी झाला. दिल्लीमध्यें असलेली हुमायुनाची कबर पाहण्यासारखी आहे.

हुमायुनाच्या मृत्यूचें त्याच्या सर्व आयुष्याशीं बरेंच साम्य आहे. हिंदुस्थानचा सम्राट असूनसुद्धां ज्याला बरींच वर्षे खडतर वनवास काढावा लागला, जो कित्येक लढायांत प्राणावर बेतलें असतांसुद्धां वांचला, पाठलाग करणाऱ्या शत्रूंच्या व गुप्त मारेकऱ्यांच्या तरवारीपासून ज्याचें अनेक वेळां रक्षण झालें, व वनवासाच्या वेळीं वाळवंटांतील तहान व भूक यांनींसुद्धां ज्याला अपाय झाला नाहीं, तोच बादशहा आपल्या राज्यांत राज्यसुखाचा प्याला समोर आला असतां नमाजासारख्या शांतिदायक वेळीं निर्घृण काळाच्या आक्राळविक्राळ जबड्यांत अकस्मात् जावा हें आश्चर्य नव्हे काय? बाकी त्याचें हें घसरणें त्याच्या स्वभावानुसार होतें हें स्पष्ट आहे. तो आपल्या सर्व आयुष्यांत इकडून तिकडे घसरत व हेलकावे खात होता व शेवटीं सुद्धां तो घसरूनच मृत्युमुखीं पडला.

प्रकरण ३ रें.

शेरशहा सूर (इ. स. १५४०-४५)

१ शेरशहाचें पूर्ववृत्तः—हा बिहार प्रांतातील सहसरामचा जहागीरदार हसन याचा मुलगा असून त्याचें नांव **फरीद** असें होतें. याचें राजकारणाचें व इतर शिक्षण जौनपूर येथें झालें. परंतु बापाबरोबर भांडण झाल्यामुळें त्याला आपलें नशीब काढण्यासाठीं सैनिक व्हावें लागलें. नंतर आपल्या हेतूंना जुळेल त्याप्रमाणें तो बाबराकडे नोकरी करी व लोदींच्या पदरींही राही. शेवटीं त्यानें आपली जहागिरी इ. स. १५२८ त बाबराकडून बहाल करून घेतली; व पुढें विजय द्वारा तो ती वाढवूं लागला. त्यामुळें बिहारच्या राजाला राग येऊन त्यानें त्याला वाघाकरवीं मारविण्याचा निश्चय केला. परंतु फरीदनें त्या वाघाला मारून स्वतः **शेरखान** नांव मिळविलें; व आपली चतुरता आणि बल या गुणांमुळें त्यानें लौकरच बिहार प्रान्त व चुनारचा किल्ला हे क्रमाक्रमानें जिंकिले. पुढें इ. स. १५३९ मध्यें बंगालचा सुलतान झाल्यानंतर त्यानें **शेरशहा** नांव धारण केलें आणि मोंगलांचा आनुवंशिक चढेलपणा,

निरर्गल वागणूक व ऐदीपणा यांचा फायदा घेऊन त्यांना हिंदुस्थानांतून हाकलून द्यावें अशी त्यानें महत्त्वाकांक्षा धरिली व ती पूर्ण केली.

२ **बंगालचा विजयः**—त्यावेळीं बंगालचें राज्य महमूद नांवाच्या सरदारानें बळकाविलें असल्यामुळें तेथें गादीच्या हक्कासंबंधानें आपसांत युद्धें चाललीं होतीं. या सोन्यासारख्या संधीचा फायदा घेऊन इ. स. १५३६ मध्यें शेरखानानें त्या प्रान्तावर प्रचंड सैन्यानिशीं हल्ला केला; परंतु महमुदानें भरपूर पैसा भरल्यामुळें तो परत फिरला. त्यामुळें त्याचें नांव मात्र प्रसिद्धीस आलें; व हा पठाणांचें राज्य पुन्हा प्रस्थापित करील या भावनेनें पुष्कळ अफगाण सरदार व सैनिक त्याच्या भोवतीं जमा झाले. पुढें इ. स. १५३८ त त्यानें आपल्या युद्धकलापटुत्वामुळें हुमायुनाची नजर चुकवून पुन्हा बंगालवर चाल केली व तेथील गौर राजधानी जिंकिली. पण हुमायुनानें ती लौकरच ताब्यांत घेतली. यानंतर पुन्हा बंगाल प्रांन्त शेरखानानें कसा मिळविला, इतकेंच नव्हे तर, हुमायुनाला हिंदुस्थानाबाहेर हाकलून देऊन मोंगल राज्याऐवजीं आपलें राज्य कसें प्रस्थापित केलें वगैरे भाग हुमायून प्रकरणांत आलाच आहे.

३ **शेरशहाची मुलूखगिरीः**—शेरशहानें फक्त पांचच वर्षें राज्य केलें, परंतु तें फारच अनुकरणीय झालें. मोंगलांपासून पंजाब, ग्वाल्हेर. उत्तरसिंध व माळवा आणि रजपुतांपासून रायसेन व चितोडचे किल्ले, आणि मारवाड प्रान्त असे त्यानें जिंकून घेतले.

(अ) रायसेनवर हल्लाः—माळव्यांतील रजपुतांची शक्ति कमी करण्याच्या इराद्यानें इ. स. १५४३ त शेरशहानें रायसेन किल्ल्याला सहा महिनेपर्यंत वेढा दिला. परंतु विजयाच्या बाबतींत दोन्ही बाजू हताश झाल्यामुळें, तह होऊन किल्ला शेरशहाच्या स्वाधीन झाला. तहांतील शर्तीप्रमाणें किल्ला सोडून रजपूत लोक बाहेर जात असतां, या युद्धांत त्यानां कपटानें ठार मारण्यांत आलें. रजपुतांनीं या युद्धांत इतकें अपूर्व शौर्य दाखविलें कीं, त्यांच्या पुढें असंदयार व रुस्तम यांचें शौर्य अगदींच क्षुद्र दिसतें, असें प्रसिद्ध इतिहासकार फरिश्ताचे उद्गार आहेत.

(ब) मारवाडवर स्वारीः— मारवाड (जोधपूर) चा शक्तिमान

राजा **मालदेव** याच्या शेजारींच राज्य करीत होता. त्याला जिंकण्यासाठीं इ. स. १५४४ त शेरशाहानें ८०००० सैन्यासह त्याच्यावर स्वारी केली. पण रजपुतांच्या अपूर्व शौर्यापुढें त्याचें कांहीं एक चाललें नाहीं. अशा रीतीनें लढत राहिल्यास आपल्या हातांतील दिल्लीचें अवाढव्य साम्राज्य जाऊन त्याबदला मारवाडचें मूठभर राज्य हातीं यावयाचें असें पाहून, त्यानें कपटानें रजपुतांस बनावट पत्रें पाठवून मालदेवास फसविलें व त्याचा पराजय केला; नंतर, अबु, अजमीर, चितोड, जोधपूर, हीं जिंकून राजपुतान्याचा बराच भाग त्यानें आपल्या ताब्यांत आणला.

(क) कलिंजरचें युद्ध व शेरशहाचा मृत्यु (१५४५):–बुंदेलखंडाच्या राज्याचा दरवाजा जो कलिंजरचा अभेद्य किल्ला त्यावर शेरशहानें हल्ला केला. त्या किल्ल्यावरील रजपूत योद्ध्यांना मागें हटविण्यासाठीं किल्ल्याच्या तटावर चार हजारांहून जास्ती तोफांचे मोठमोठे गोळे फेंकण्यांत येत होते; त्यातील एक गोळा दैववशात् भिंतीवर स्फोट होऊन मागें आला आणि इतर गोळयांत व दारूसामानांत पडला, त्यामुळें सर्वच आगीचा भडका होऊन त्यांत शेरशहा अर्धा भाजला गेला. मृत्युशय्येवर असतांसुद्धां तो आपल्या शिपायांना उत्तेजन देतच होता. शेवटीं विजयाची आनंददायक बातमी ऐकून त्यानें इ० स० १५४५ त शांतमनानें इहलोकींचा त्याग केला. त्याचें शव सहसराम येथें त्यानेंच बांधलेल्या कबरेंत पुरण्यांत आलें.

४ राज्यव्यवस्था—(१) प्रांतिक व्यवस्था:–अफगाण बादशहांच्या कारकीर्दींत राज्याच्या निरनिराळया भागांतील सुभेदार बादशहामार्फत नेमिले जात. परंतु त्यांतील सुभेदारांच्या हाताखालचे अधिकारी सुभेदारांकडून नेमिले जात असल्यामुळें त्यांचा व बादशहांचा अर्थाअर्थीं संबंध नसे; या रीतीनें बादशहा जवळ जवळ निःसत्व झाले होते. परंतु शेरशहानें ही पद्धत बदलली. राज्यव्यवस्थेसाठीं त्यानें आपल्या राज्याचे **सरकार, परगणा** व **ग्राम** असे विभाग करून, त्यांतील सर्व दर्जांचे अधिकारी तो स्वतः नेमीत असे; व त्यांचा पगारही मुख्य तिजोरींतून देण्यांत येई. त्यामुळें नेमणूक, बडतर्फ होणें, पगार मिळणें वगैरे बाबतींत या कामगारांचा

बादशहाशीं प्रत्यक्ष संबंध येत असल्यामुळें शेरशहाचें राज्य एकतंत्री झालें. अशा रीतीनें हें राज्य ह्मणजे अकबरच्या व नंतर इंग्रजांच्या राज्यव्यवस्थेचा मूळ पाया बनलें.

(२) लष्करी व्यवस्थाः—शेरशहाचें लष्कर फारच बलवान होतें. नुसत्या दिल्लींतच एक लक्ष पन्नास हजार घोडे, पंचवीस हजार पायदळ, पांच हजार हत्ती, व प्रचंड तोफखाना होता. त्याची लष्करी शिस्त फारच कडक होती; व तीवर लक्ष ठेवण्यासाठीं लष्करांत गुप्त हेर होते. शिपायांची रोज हजेरी ठेवण्यांत येत असे; प्रत्येक शिपायाला रोख वेतन देण्यांत येई. सर्व लष्कराचे विभाग केले असून प्रत्येकावर एक फौजदार नेमण्यांत आला होता. त्याच्या लष्करांत हिंदू बव्हंशानें असून त्यांतील कित्येक अधिकारीही होते. त्याचे लष्करी नियम इतके उत्तम होते कीं, अकबरानेंसुद्धां त्यांतील बऱ्याच नियमांचें अनुकरण केलें.

(३) सरकार साऱ्याची पद्धतः--त्यानें सर्व जमीनींची मोजणी करून तिच्यावर सारा बसविला. प्रत्येक शेतकऱ्याला आपल्या नक्त उत्पन्ना पैकीं चौथा हिस्सा रोख किंवा धान्यरूपांत सारा ह्मणून द्यावा लागत असे; व तो मुकादम नांवाच्या अधिकाऱ्यामार्फतवसूल केला जाई. अशा रीतीनें त्यानें कुळें व सावकर ह्यांमधील जमीनदार व तालुकदार हा मध्यवर्ती वर्ग काढून टाकला. या रयतवारी पद्धतीवरच हल्लींची ब्रिटिश रयतवारी पद्धत उभारली आहे.

(४) आपल्या पूर्वीच्या नाणेंपद्धतीतील अव्यवस्था मोडून शेरशहानें उत्तम कसाचीं सोनें, चांदी व तांब्याची नाणीं पाडलीं, व त्यांवर अरबी अक्षरांबरोबर देवनागरी अक्षरेंहीं कोरलीं.

(५) त्याचप्रमाणें आपल्या राज्यांतील सर्व **जकाती** बंद करून, सरहद्दीवर फक्त कर घेऊन, वरील प्रमाणें नाणें सुधारून, शेरशहानें व्यापार व उद्योगधंदे याना उत्तेजन दिलें.

५ शेरशहाच्या कारकीर्दीचें सिंहावलोकनः--वरील सर्व गोष्टीं-वरून असें सिद्ध होतें कीं, शेरशहानें केलेल्या कांहीं वाईट गोष्टींकडे दुर्लक्ष केल्यास त्याची कारकीर्द एकंदरींत प्रशंसनीयच झाली.

१ आपल्या राज्यछत्राखालीं असलेल्या हिंदूंस व्यर्थ त्रास न देतां त्यांचें परोपरीनें पालन करणें हें तो आपलें कर्तव्य समजून त्या प्रमाणें वागतही असे.

२ ठिकठिकाणीं किल्ले बांधून त्यानें आपल्या राज्याला मजबुती आणिली.

३ मोठमोठे रस्ते व ठिकठिकाणीं धर्मशाळा, विहिरी व डाकचौक्या बांधून व्यापारी व प्रवासी ह्यांच्या सुखसोई केल्या; त्याचप्रमाणें उत्कृष्ट पोलीस व न्यायपद्धति अमलांत आणून त्यानें प्रजेला निर्भय केलें. टपाल सुरू करून एकमेकांची बातमी कळविण्याची व्यवस्था केली. या सर्व गोष्टींमुळें राज्याची भरभराट होऊन नवीन व्यापारी शहरें अस्तित्वांत आलीं. अशा प्रकारें शेरशहाची राजवटी सर्वांना प्रिय झाली.

४ सर्व विभागांवर स्वतःचे अधिकारी नेमून, सरदारांचें खासगी सैन्य काढून, स्वतःचें बादशाही सैन्य सर्व साम्राज्यभर ठेऊन, त्याला सरकारी खजिन्यांतून पगार देऊन, जमीनदार वर्ग नाहींसा करून, सरकार सारा स्वतःच्या नोकरांकडून वसूल करून, पोलीस पद्धत सुधारून, रस्ते व डांक चौक्या इत्यादि बांधून, सर्व जनतेला प्रिय असें एकतंत्री साम्राज्य स्थापन करण्याचा प्रयत्न करणारा तोच पहिला राष्ट्रकर्ता होता.

त्याच्या सर्व कारकीर्दीच्या सिंहावलोकनावरून तो शूर शिपाई, दूरदर्शी सेनानी व धोरणी मुत्सद्दी होता हें स्पष्टच आहे. त्याला " हिंदुस्तानचा सिंह " ह्मणणें अयोग्य होणार नाहीं. शेरशहा बाह्यतः रुधिरप्रिय, कपटी, आणि क्रूर दिसला तरी तो दयार्द्र योद्धा व न्यायी राजा होता हे विसरतां कामा नये. स्मिथ ह्मणतो कीं " वरील सर्व लोकोपयोगी गोष्टींच्या रूपानें शेरशहानें आपल्या पांच वर्षांच्या कारकीर्दीचें स्मारक केलें. जर तो आणखी कांहीं वर्षे जिवंत राहिला असता तर मोंगली साम्राज्याचें नांव हिंदुस्तानच्या इतिहासांत उरलेंच नसतें. "

६ **सलीमशहा** [इ. स. १५४५–५३]:— हा शेरशहाचा दुसरा मुलगा असून त्यानें आपला जेष्ठ बंधु **आदिल** याला बाजूला सारून राज्य मिळविलें. आदिलतर्फे असलेल्या सर्व उमरावांचा यानें छळ केला;

व वजनदार अमीरांची सत्ता कमी करण्यासाठीं त्यांनां त्रास दिला; यामुळें सलीमच्या विरुद्ध अनेक तट झाले. अशा प्रकारें पठाणांतील एकी मोडल्यानें हिंदुस्थानचें राज्य परत जिंकण्यास मोंगलांस छान अवसर मिळाला. परंतु सलीम स्वतः राजकारणांत आपल्या बापा प्रमाणेंच निष्णात आणि बुद्धीवान असल्यानें, त्याचीच राज्यव्यवस्था चालू ठेऊन त्यानें राज्याचें महत्व राखिलें. त्यामुळें त्याच्या आठ वर्षांच्या कारकीर्दीत राज्यास क्षीणता आली असली तरी ती बाह्यतः दिसली नाहीं.

७ फीरोजशहा [इ. स. १५५३]:– सलीम शहाच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा **फीरोज शहा** बारा वर्षें वयाचा असतां गादीवर आला. परंतु थोड्याच दिवसांत त्याचा मामा मोबारीझखान यानें त्याचा खून केला, व स्वतः **सुलतान महमदशहा आदिल** अशी पदवी धारण करून सिंहासनारूढ झाला.

८ सुलतान महमदशहा आदिल (१५५३–५५):-वरील प्रमाणें राज्यारूढ झाल्यावर तो हीन सुखांत दंग होऊन हलक्या तोंडपूजांचा गराडा स्वतः भोंवतीं ठेवूं लागला. यामुळें लोक त्याला आदिल [न्यायी] ह्मणण्या ऐवजीं अंदळी [अंध] ह्मणूं लागले. राज्यांत अंदाधुंदी माजली व जिकडे तिकडे बंडें उपस्थित झालीं.

९ हिमूं विक्रमादित्य (इ. स. १५५६):— अदिलनें आपल्या कारकीर्दीत इतका अत्याचार व मूर्खपणा केला कीं यामुळें शेरशहाचे सर्व श्रम व्यर्थ झाले. सुदैवानें त्यास हिमूं नांवाचा एक शक्तिशाली, राजकारण-कुशल व युद्धनिपुण हिंदू महामंत्री मिळाला होता. महमंद आदिल विलासांत दंग असतां हिमूं अति कुशलतेनें राज्यकारभार पहात असे; यावेळीं गर्विष्ठ पठाण अधिकाऱ्यांनीं बंडें उभारलीं; यां पैकीं पंजाबचा सुभेदार **सिकंदर सूर,** बंगालचा सुभेदार **महमंद सूर** व संबळचा सुभेदार **इब्राहीम सूर** हे मुख्य होते. हीं सर्व बंडें मोडण्याची हिमूनें खटपट केली. इ. स. १५५५ मध्यें हिमूं बंगाल प्रांत जिंकण्यास गेला असतां हुमायुनानें पंजाबचा सुभेदार सिकंदर सूर याचा पराजय केला; सिकंदर सूर हिमालयांत पळून गेला आणि लाहोर, दिल्ली व आग्रा हे प्रांत हुमायुनाच्या ताब्यांत आले.



शेरशहाची कबर (सहासराम)




हुमायूं.



अकबर.



जहांगीर.



नूर जहान.



शहा जहान.



औरंगजेब.

मोंगल साम्राज्यांतील नाणीं.

१० पानिपतचें दुसरें युद्ध [इ. स. १५५६]:-- हुमायुनानें आपल्या विजयी मोंगल सैन्यासह हिंदुस्थानांत परत येऊन वरील प्रमाणें आग्रा व दिल्ली हीं दोन्ही शहरें स्वारी करून काबीज केल्याची सूचना हिमूस मिळतांच तो बंगाल जिंकून लगेच परत फिरला आणि तीं दोन्ही शहरें त्यानें परत घेतलीं. या विजयानें शेफारून जाऊन त्यानें आपल्या नामधारी आदिलशहा बादशहास एकीकडे सारलें, दिल्लींत स्वतःला राज्याभिषेक करविला व **विक्रमादित्य** हें नांव धारण केलें. त्याच्या या कृत्यामुळें त्याचे पठाण सैनिक चिडून पुढील युद्धांत त्यांनीं त्यास योग्य साह्य केलें नाहीं व हिंदूंनींही त्याला मदत दिली नाहीं. अशा स्थितींत सुद्धां वीर हिमू अकबराशीं लढण्याकरितां पुढें आला. प्रसिद्ध ऐतिहासिक युद्धक्षेत्र पानिपत येथें त्याचा मोंगलाशीं घोर संग्राम झाला; त्यांत तो शौर्यानें लढत असतां पकडला गेला व मोंगलांचा विजय झाला. अकबराचा सेनापति बहरामखान यानें हिमूचें शीर कापून काबूलच्या लोकांना दाखविण्यासाठीं तिकडे पाठविलें व त्याचें शरीर दिल्लींत ठेविलें. लढाईत मेलेल्या सैनिकांचीं डोकीं उडवून त्यांची एक मिनार बांधण्यांत आली.

११ शिकंदर सूराचा पराभवः-- शिकंदर सूर आणि आदिलशहा यांच्या अस्तित्वामुळें अकबरास पंजाब व संयुक्त प्रांतावर राज्य करणें सोपें नव्हतें. हुमायुनाच्या मृत्यूनंतर मोंगल सैन्याचा पराभव करून शिकंदरानें पंजाबचें राज्य परत घेतलें; तेव्हां बाल अकबर निर्भयपणें बहरामासह पंजाबमध्यें गेला व मानकोटाच्या दुर्गावर हल्ला करून त्यानें शिकंदराचा पूर्णपणें पराभव केला. नंतर त्याला क्षमा करून बिहारामध्यें एक जहागीर देण्यांत आली. अशा प्रकारें मोंगल साम्राज्याच्या स्थापनेच्या मार्गांतील कांटा अकबरानें दूर केला.

प्रकरण ४ थें.

अकबर (इ० स० १५५६–१६०५)

१ **अकबर** चौदा वर्षें वयाचा असतां गादीवर आला व "जलालुद्दीन अकबर बादशहा गाझी" अशी पदवी धारण करून त्यानें राज्यसूत्रें हातांत घेतलीं. त्या वेळीं हिंदुस्तानचें राज्य अगदीं मोडकळीच्या स्थितींत होतें; अशा परिस्थितींत या बालराजानें आपल्या राज्याला कशी बळकटी आणली, निरनिराळे प्रांत जिंकून त्याचा कसा विस्तार केला व मग त्या अवाढव्य राज्याला मुत्सद्दीपणानें सुसंघटित कसें केलें हें पुढें सांगितलें आहे.

२ **हिंदुस्तानांतील राजकीय परिस्थिति** इ० स० १५६० च्या सुमारास, खालीं दिल्याप्रमाणें होती:—(१) मुलतानपर्यंत पंजाबचा प्रांत, ग्वाल्हेर, अजमीर व प्रयागपर्यंत गंगेतील दोआब अकबराचे ताब्यांत असून बाकी राहिलेल्या देशांत बरेच राजे राज्य करीत होते. (२) काश्मीर आदिकरून हिमालयाच्या पायथ्याशीं असलेलीं सर्व संस्थानें स्वतंत्र होतीं. (३) सुलेमान कराराणी नांवाचा अफगाण राजा बंगाल, बिहार व ओरिसा येथें स्वतंत्रपणें राज्य करीत होता. (४) राजपुताना, सिंध व मध्यप्रांत (छोटा नागपूर व हल्लींच्या ओरिसा प्रांतांतील कांहीं संस्थानें) यांत बरींच लहान लहान स्वतंत्र राज्यें होतीं. (५) गुजराथ, माळवा व खानदेश येथें स्वतंत्र मुसलमान राजे होते. (६) दक्षिणेंत पांच स्वतंत्र मुसलमानी राज्यें असून त्यांचा तुंगभद्रेपर्यंत अम्मल चालत असे; व तुंगभद्रेपासून केप कामोरीनपर्यंत विजयनगरचें शक्तिशाली राज्य पसरलें होतें. (७) हिंदुस्तानचा पश्चिम किनारा व त्यावरील व्यापार पोर्तुगिझांच्या ताब्यांत असून दीव, दमण, वसई, मुंबई, चौल व गोवा येथें त्यांनीं तटबंदी केली होती.

३ **अकबराची महत्त्वाकांक्षाः**— हिंदुस्तानचा बराचसा भाग आपल्या सत्तेखालीं आणण्याची त्याची इच्छा होती. " राजानें नवीन नवीन विजय संपादन करण्याची हांव सदा धरली पाहिजे; नाहींतर शेजा-


BĀBAR.
AURANG ZEB.
AKBAR.
HUMĀYUN.
SHĀH JAHĀN.
JAHĀNGIR.
NUR JAHĀN



अकबराचा दरबार. (बडोदा म्यु.)


रचे राजे त्याचे विरुद्ध उठतात; त्याचप्रमाणें युद्धाचे अभावीं सैन्यही आळशी व स्वच्छंदी बनतें," असें अकबराचें मत होतें. आपल्या सर्व कारकीर्दींत त्यानें हेंच धोरण ठेविलें; व शेवटीं इ० स० १६०१ मध्यें असीरगड आपल्या ताब्यांत येईपर्यंत त्यानें तें दृढनिश्चयानें पाळलें.

४ अकबराच्या मार्गांतील आरंभींच्या अडचणी:- (१) हिंदुस्तानामध्यें मोंगल राज्याची पुनः स्थापना करण्यांत ज्या अडचणी उत्पन्न झाल्या त्या सर्वांत हुमायुनाचा अकालीं मृत्यु व अकबराची अज्ञानावस्था या मुख्य होत. (२) हिंदु व मुसलमान लोक मोंगलांना आततायी मानून त्यांच्याशीं त्या काळीं विरोधभावानें वागत. (३) इ० स० १५६७ पर्यंत अकबराचे नातेवाईक, सेनापती आणि उझबेग उमराव यांच्या बंडामुळें त्याला त्रास झाला. (४) काबूल प्रांत सोडल्यामुळें त्याला ताज्या दमाचे नवीन शिपाई सांपडेनात. (५) अकबराच्या राज्याभोंवतीं बरेच स्वतंत्र राजे असून ते सर्व त्याच्या विरुद्ध होते. या सर्व कारणांमुळें एकाद्या बळकट धीराच्या माणसाशिवाय सर्व सत्ता हातांत घेऊन राज्य चालविणें अशक्य होतें. पण अकबरानें स्वतःची मोहकता, असाधारण मुत्सद्दीपणा, दृढनिश्चय आणि समयसूचकता वगैरे गुणांच्या साहाय्यानें या अडचणींचा नाश केला.


५ खानबाबा बहरामखान (१५५६-६०):—हा शिया पंथी तुर्क सरदार असून हुमायुनाच्या दरिद्रावस्थेंत मुद्दां त्याच्या हरएक संकट प्रसंगीं त्याच्या बरोबर मोठ्या इमानानें राहिल्यामुळें, आपल्या वागणुकीनें तो हुमायुनाला प्रिय झाला होता. काबूल व हिंदुस्तान जिंकण्याच्या बाबतींत बहरामनें बरीच महत्त्वाची कामगिरी केली. पुढें हिमू आणि शिकंदर यांच्या विरुद्धही हाच लढला, आणि स्वप्रांतीं जाण्याला उत्सुक झालेल्या मोंगलांना यानेंच थोपवून धरलें. ही त्याची सर्व कामगिरी लक्षांत घेऊन अकबरानें आपल्या राज्यप्राप्तीनंतर त्याला "खानबाबा" ही बहुमानाची पदवी दिली व राज्याचा संरक्षक नेमिलें. आपल्या करड्या वकडक स्वभावानें बहरामानें सर्व पठाण व मोंगल यांना पूर्णपणें आपल्यां

ताब्यांत ठेविलें होतें व राज्यांतील सर्व नोकरांचाकरांवर त्याचा वचक होता. बहरामासारख्या शूर, बुद्धिवान् व कसलेल्या मंत्र्यावर अकबरानें त्यावेळीं राज्यकारभार सोपाविला नसता तर अकबराची काय दशा झाली असती हें सांगणें कठीण आहे. परंतु बहरामानें गर्व व क्रूरता यांमुळें बहुतेक अमिरांचें नाक खालीं केलें. आपला प्रतिस्पर्धी तार्दीबेग याला त्यानें हिमूनें केलेल्या हल्ल्याच्या वेळीं दिल्लीचें राज्य हिमूच्या ताब्यांत देऊन राजद्रोह केला, या आरोपावरून ठार मारिलें; दरबारांत बरेच सुन्नीपंथी लोक असून सुद्धां त्यानें शियापंथी लोकांना बढत्या दिल्या. कित्येक वेळां बादशहा व जनानखान्यांतील स्त्रिया यांचा तो अपमान करीत असे व यामुळें बादशहाला त्याचा राग येत असे. आधींच विरुद्ध झालेले इतर अमीर या गोष्टीचा फायदा घेऊन बहरामविरुद्ध अकबरचे कान फुंकून त्याला चिथवीत असत. अशा तऱ्हेनें बहरामाविरुद्ध मंडळीनें मन फिरविल्यामुळें इ० स० १५६० मध्यें आपण स्वतःच राज्यकारभार हाकण्याचें अकबरानें जाहीर केलें, आणि बहरामखानास मक्केची यात्रा करण्यास आज्ञा केली. आज्ञेप्रमाणें तो मक्केस जाण्यास निघाला असतां वाटेंत विरुद्ध तटाच्या अमिरांनीं त्याचा बराच अपमान केला. यामुळें रागावून त्यानें बंड पुकारलें. परंतु इतर सरदारांच्या मदतीनें अकबरानें तें मोडल्यामुळें बहरामखानास हार खावी लागली. बहरामानें क्षमा मागितली व त्याची पूर्वींची कामगिरी लक्षांत घेऊन अकबरानें ती त्याला उदारपणानें दिली. नंतर बहराम मक्केस जात असतां रस्त्यांत गुजराथमधील पाटण येथें त्याच्या एका शत्रूनें त्याला ठार केलें. अशा रीतीनें या उपयोगी, शूर व स्वामिनिष्ठ पुरुषाचा शेवट झाला.

६ प्रारंभींचे विजयः—आपल्या कारकीर्दीच्या आरंभीं अकबरानें अजमीर, ग्वाल्हेर आणि जौनपूर हे प्रांत जिंकले व नंतर चार वर्षांत बाजबहादूरसारख्या प्रबल राजाकडून माळवा जिंकिला. इ.स. १५६२ मध्यें त्यानें रजपुतांचा मिरथा नामक जोधपुरांतील मजबूत किल्ला घेतला, व मध्य प्रांतांतील



ग्वाल्हेरचा किल्ला.



दिल्ली येथील किल्ल्यांतील दिल्ली-दरवाज्याच्या आंतील भाग.
वरील दोन हत्तीवर जयमल व पत्ता यांचे पुतळे होते.

Lakshmi Art, Bombay, 8.

गोंडवाना राज्यास जोडला. गोंडवान्याच्या रजपूत राजांनीं या वेळपर्यंत आपलें स्वातंत्र्य फारच शौर्यानें राखिलें होतें. अकबराच्या वेळीं दुर्गावती नामक शूर वीर राणी तेथें राज्य करीत होती. अशा परिस्थितींत तिच्यावर अकबरानें स्वारी करणें ह्मणजे आपल्या अंगीं स्त्रीदाक्षिण्याचा अभाव दाखविणें होय. स्वतःचें स्वामित्व कबूल करण्याची अकबरानें केलेली मागणी तिनें तिरस्कारपूर्वक नाकारली; व एकाद्या सेनापतीप्रमाणें आपल्या सैन्याचें आधिपत्य स्वीकारून तिनें आसफखानाच्या सैन्याची दोनदां दाणादाण उडविली. पुढें तिच्या सैन्यांत करटानें फूट पडली, तरी शेवटपर्यंत ती आपला जात्यभिमान व देशाचें स्वातंत्र्य राखण्यासाठीं लढली व त्यांतच तिचा अंत झाला. परकीयांपासून स्वतःच्या राज्यरक्षणासाठीं ज्या ज्या राण्यांनीं स्वतःच्या सैन्याचें सैनिकत्व पत्करिलें त्यांत दुर्गावती प्रमुख आहे.


७ **प्रारंभींचीं बंडें**:—बहरामच्या मृत्यूनंतर राज्यकारभार चालविण्यास स्वतः समर्थ नसल्यामुळें इ. स. १५६०-६२ च्या दरम्यान अकबराला राजवाड्यांतील स्त्रियांच्या आधीन व्हावें लागलें, व त्यांच्या वर्चस्वामुळें तो बाईलबुद्ध्या झाला. परंतु ज्या ज्या स्त्रियांवर त्यानें विश्वास ठेविला होता, त्यांपैकीं बहुतेक विश्वासघातकी ठरल्यामुळें त्यांच्या वर्चस्वातून मोकळें होऊन स्वतःच राज्यकारभार पहावा अशी बलवत्तर इच्छा त्याला झाली. तेव्हां त्यानें राष्ट्रहिताच्या कांहीं गोष्टी केल्या—[१] लढाईंत गुलाम करण्याची बंदी, [२] रजपुतांशीं शरीर संबंध व त्यांचा दरबारांत प्रवेश, [३] जमाखर्चाच्या व्यवस्थेंत सुधारणा, [४] जिझिया कराचें निर्मूलन, व [५] यात्रेकरूंवरील कराची बंदी इत्यादि. या गोष्टींवरून त्याची भावी कारकीर्द समजण्यासारखी आहे.

राजकारभार स्वतःच चालविण्याचा अकबराचा निश्चय समजतांच त्याच्या पदरच्या मोठमोठ्या सरदारांनीं बंडें उभारिलीं. यांपैकीं (१) **ख्वाजा मुअज्जम (२) अबदुल्लाखान, (३) उझबेग उमराव, (४) आसफखान, [५] महंमद हकीम, [६] मिर्झा लोक** यांचीं बंडें प्रसिद्ध आहेत. यांतील प्रत्येक जबरदस्तीनें मोडलें गेलें. तरी तसें करतांना अकबराचें उदार व दयार्द्र अंतःकरण व्यक्त झालें. हीं बंडें

यशस्वी रीतीनें मोडल्यानंतर अकबरानें मुलुखगिरी करण्यास सुरवात केला, त्याची माहिती पुढें दिली आहे.

८ **राजपुतान्यावर हल्ला करण्याचीं कारणें:**–[१] कांहीं बंडखोर अफगाण डोंगरांत राहून शेजारच्या पठारावर हल्ला करीत व त्यांना रजपूत मदत करीत. [२] हिंदुस्तानांतील मुसलमानांच्या ताब्यांतील मुलुखांतून पळालेल्या हिंदूंना रजपूत मदत करीत असल्यामुळें मोंगल राज्याच्या आंत व बाहेर नेहमीं तट होत असत. [३] अकबराला दक्षिणेंत जाण्यासाठीं रस्ता खुला हवा होता; हा रस्ता स्वतंत्र रजपूत राज्यांतून जात असल्यामुळें तीं राज्यें जिकणें त्याला भाग पडलें. [४] चितोडच्या शूर रजपुतांनीं अकबराची आधीनता पत्करून त्यांच्याशीं विवाहसंबंध ठेवण्याचें नाकबूल केलें. [५] अकबरानें पराभूत केलेल्या माळव्याच्या बाजबहादुराला आश्रय दिल्यामुळें चितोडच्या राजाला शासन करणें आवश्यक होतें. यामुळें अकबरानें राजपुतान्यावर हल्ला करून तेथील राज्यें एकामागून एक आपल्या राज्यांत सामील केलीं.

९ **चितोडचा विजय(१५६८):**- अकबरानें प्रथमतः चितोडावर स्वारी केली. या वेळीं अकबराच्या सैन्यांत **भगवानदास** व **राजा टोडरमल** सारखे सेनापति चितोडविरुद्ध लढत होते. राणा संगाचा पुत्र राजा उदयसिंह चितोडचें राज्य सोडून गिरिकंदरीं जाऊन राहिला. त्याच्या गैरहजेरींत सुद्धां चितोडच्या वीर रजपुतांनीं अकबराशीं घोर सामना केला. या सामन्यांत विशेषतः **जयमल** आणि **पत्ता** या वीरांनीं इतकें शौर्य दाखविलें कीं, त्याबद्दल अकबराला आदर वाटून या युद्धांत ते मेल्यावर त्यांची स्मृति कायम ठेवण्यास्तव त्यांच्या मूर्ति प्रथम आग्रा व नंतर दिल्ली येथील किल्ल्याच्या दरवाजाबाहेर दगडी हत्तींवर बसविण्यांत आल्या. अकबराचें सैन्य अधिक असल्यानें चितोड सर झाला; पण रजपूत वीरांगनांनीं जोहर करून आपलें पातिव्रत्य राखलें; आणि ८००० रजपूतांपैकीं प्रत्येकानें अति शौर्यानें आपले प्राण देऊन चितोड राखण्याचा प्रयत्न केला. अशा रीतीनें १५६८ मध्यें चितोड अकबराच्या हातीं आला, आणि तेव्हांपासून त्याचें स्वातंत्र्य नाहींसें झालें. या हल्ल्यांत रजपूतांनीं केलेल्या विरोधामुळें अकबर एवढा बेभान



रायगड.



प्रतापसिंह.



टोडरमल.



मुल्ला दोप्याजा (बडोदा म्यु.)



बीरबल (भा. इ. सं. मंडळ, पुणें).

झाला कीं त्यानें सर्वांची कत्तल करण्याचा हुकूम सोडला; व यामुळें तीस हजार शेतकरी नाहक बळी पडले!

(२) चितोड सर केल्यावर अकबरानें **रणथंभोरच्या** डोंगरी किल्याला वेढा देऊन तो काबीज केला. (३) शेरशहानंतर रजपूतांनीं **कलींजरचा** किल्ला परत जिंकला होता तो घेण्यासाठीं अकबर गेला असतां तेथील **रामचंद्र** राजानें तो त्याचे हवालीं केला. [४] अकबराचे हे विजय पाहून **जोधपूर** व **बिकानेर**चे राजे सुद्धां त्याला शरण आले. अशा रीतीनें बहुतेक सर्व राजपुताना त्याच्या हस्तगत झाला.

१० राणा प्रताप [इ. स. १५७२–९७]:— अकबरानें चितोड जिंकिला तरी सिसोदिया रजपुतांना त्याला नामोहरम करतां आलें नाहीं. तेथील उदयसिंह आपल्या देहान्तापर्यंत [इ. स. १५७२] त्याच्याबरोबर लढत राहिला, व त्याच्या पश्चात् हें युद्ध त्याचा मुलगा प्रताप यानें नेटानें चालविलें; त्यामुळें प्रताप हें नांव सार्थ आहे. हा राणा **संगाचा** नातु व राणा **उदयसिंहाचा** जेष्ठ मुलगा असून याला आणखी चोवीस भाऊ होते. हा फार शूर, धीराचा, आत्मत्यागी व हिंदू धर्माची चाड असणारा असा राजा झाला. वरील लढायांत त्याची राजधानी, तिजोरी, व अनेक निवडक सैनिक नाहींसे झाले होते; दुसरे रजपूत राजे अकबराच्या बाजूनें लढत असत; त्याचे भाऊ अकबराला सामील झाले होते; त्याचा एक भाऊ त्याचा प्राणघात करण्याची संधि पाहात होता. या सर्व कारणांनीं, महादरिद्रावस्था प्राप्त झाल्यामुळें सर्व परिस्थिति प्रतिकूल असून सुद्धां, मेवाडचें स्वातंत्र्य राखण्यासाठीं यानें फारच प्रयत्न केला. अकबराबरोबर तो सतत सव्वीस वर्षें लढला, पण आपल्या घराण्यांतील मुली बादशाही वंशांत देण्याला तो कधींही तयार झाला नाहीं, किंवा अकबराची आधीनताही त्यानें स्वीकारली नाहीं. इ. स. १५७६ मध्यें **हळदीघाट**च्या खिंडींत मोंगलांबरोबर झालेल्या घोर संग्रामांत प्रतापाला हार खावी लागली व त्याचे कित्येक किल्लेही गेले. परंतु त्याचें हृदय जरा सुद्धां डगमगलें नाहीं. नंतर आपल्या सर्व परिवारासह वनवासांत अत्यंत हृदयविदारक कष्ट भोगी

असतां सुद्धां फार शौर्यानें व इमानी साथीदारांच्या साहाय्यानें तो लढत राहिला; पण अकबराचें प्रभुत्व त्यानें केव्हांही कबूल केलें नाहीं. ती आधीनता स्वीकारून मानसिंह किंवा त्याचा मुलगा भगवानदास जसे सुखी झाले तसें यालाही होतां आलें असतें; परंतु देशभक्ति, धर्मसेवा, जात्यभिमान, आत्मसन्मान, अद्भुत वीरवृत्ति, व असामान्य सहनशीलता यांचा तो खराखुरा आदर्श होता; ह्मणूनच अकबरानें जिंकलेला आपल्या राज्यांतील सर्व भाग पुन्हा जिंकून रजपूत हें नांव त्यानें उज्ज्वल राखिलें.

११ राजपुतान्यांतील विजयाचे परिणामः— या विजयांनीं रजपुतांना जिंकल्यावर सुद्धां त्यांच्याशीं नम्र व उदार वागणूक ठेऊन त्यांचीं मनें अकबरानें मोठ्या कौशल्यानें वेधून घेतलीं, त्यामुळें बहुतेक रजपूत त्याची नोकरी करण्यास तयार झाले. पश्चिमेकडील हिंदुकुशाच्या हिमाच्छादित शिखरापासून तों पूर्वेकडील आराकानच्या घोर अरण्यापर्यंत व उत्तरेकडील काश्मीरापासून दक्षिणेकडील पठारापर्यंत सर्व प्रांतांत ते अकबरासाठीं लढले.

१२ गुजराथवरील स्वारीचीं [इ. स. १५७२] कांहीं कारणें अशीं होतीं कीं, (१) राजपुतान्यांतील विजयामुळें गुजराथला मार्ग मोकळा झाला होता. (२) हुमायुनानें तो प्रांत एकदां जिंकल्यामुळें अकबर त्या प्रांताला वडिलार्जित मानित असे. (३) व्यापारामुळें तो प्रांत फारच धनाढ्य होता व "तेथील राजधानी अहमदाबाद या सारखें त्याकाळीं जगांत दुसरें शहर नव्हतें;" सृष्टिसौंदर्यामुळें त्याला "हिंदुस्तानचें उपवन" मानण्यांत येत असे. (४) गुजराथमध्यें या वेळीं सरदार मंडळींत यादवी माजल्याकारणानें पठाणांपासून तो प्रांत घेणें सोपें होतें. असें असतां अकबरासारख्या बादशहानें त्या प्रांताकडे दुर्लक्ष करणें शक्य नव्हतें. तेव्हां अकबरानें इ. स. १५७२ मध्यें तेथील सुलतान **मुजफ्फरशहा** याजपासून तो प्रांत आपल्या ताब्यांत घेतला. यानंतर गुजराथेंत अनेक बंडें उत्पन्न झालीं. परंतु तीं सर्व अकबरानें जबरदस्तीनें मोडल्यामुळें तेथें इ. स. १५९३ पासून शांतता नांदू लागली.

वरील विजयाचे परिणाम असे झाले कीं, (१) हा प्रान्त मिळाल्यामुळें मोंगली साम्राज्याचें उत्पन्न वाढलें; (२) पारसी, जैन, व पोर्तुगीझ लोकांशीं अकबराचा संबंध येऊन त्याच्या धार्मिक विचारांवर बराच परिणाम झाला. (३) या प्रान्तावर राजा टोडरमलाची नेमणूक होऊन त्यानें आपली जमीनमहसुलाची प्रसिद्ध पद्धत पहिल्यानें येथेंच सुरू केली. (४) समुद्रकांठचीं बंदरें ताब्यांत आल्यामुळें त्याचा पौर्वात्यांशीं व पाश्चिमात्यांशीं व्यापाराचा संबंध येऊन त्यानें आरमार बनविण्यास सुरवात केली.

१३ **बंगालचा विजय** (१५७६)-- बंगालचा सुभेदार सुलेमान करारणी मेल्यावर त्याचा मुलगा **दाऊदखान** हा गादीवर आला, व पान ४१ मध्यें सांगितल्याप्रमाणें त्यानें अकबराविरुद्ध जाहीर रीतीनें बंड पुकारलें. त्यामुळें त्रस्त झालेल्या लोकांनीं पूर्व प्रांताचा मोंगल सुभेदार **मुनीमखान** याच्याकडे दाद मागितली. त्याच वेळीं गुजराथ वरील दुसऱ्या स्वारीहून अकबर परतल्यावर त्यानेंही बंगालकडे नजर फेंकली; पूर्वेकडे जाऊन त्यानें पटना व हाजीपूर काबीज केलीं; दाऊद पळून गेला, व बंगालची मोहीम सरदारांवर सोपवून अकबर आग्ऱ्यास परतला. इ.स. १५७५ त **तुकारोईच्या** युद्धांत दाऊदचा पराभव होऊन, अकबराचें वर्चस्व कबूल केल्यावर त्याला ओरिसा प्रांतांत एक जहागिरी मिळाली. परंतु गौरमध्यें ग्रंथिज्वराच्या सांथीनें मुनीमखान मेला. तेव्हां मोंगली सैन्याच्या शोचनीय स्थितीचा फायदा घेण्याचा दाऊदनें विचार केला. ह्मणून अकबरानें खानजहान व राजा टोडरमल यांना त्याचेवर पाठविलें. त्यांनीं **राजमहाल** येथें १५७६ मध्यें दाऊदचा पराभव करून त्याला लढाईत ठार मारलें. यावेळीं त्या प्रांतांत स्थिरस्थावरता करण्याचा प्रयत्न झाला. परंतु इ. स. १५८० मध्यें तेथें बंड झालें, व तें पुढें कांहीं वर्षेपर्यंत टिकलें. टोडरमलाच्या साहाय्यानें तें बंड मोडलें गेलें, व यावेळेपासून बंगाल प्रांत मोंगली साम्राज्याचा एक विभाग झाला.


१४ **काश्मीरचा विजय** (१५८६-८७):-भूलोकावर स्वर्गतुल्य

असलेला काश्मीरसारखा रमणीय प्रांत घेण्याची अकबराला फार इच्छा होती. इ. स. १५६९ पासून तेथील सुलतान अकबराचें वर्चस्व कबूल करीत आला; परंतु इ. स. १५८४ मध्यें तो स्वतंत्र झाला, तेव्हां अकबरानें तो प्रांत इ. स. १५८६।८७ मध्यें भगवानदासामार्फत जिंकला.


१५ ओरिसा, सिंध, बलुचिस्थान आणि **कंदहार** हे १५९१ पर्यंत स्वतंत्र होते. त्या सर्व प्रांतांवर आपला राज्यविस्तार करण्याची अकबराची महत्वाकांक्षा होती. त्याप्रमाणें त्यानें सिंध इ. स. १५९१ मध्यें, ओरिसा इ. स. १५९२ मध्यें, व बलुचिस्थान आणि कंदाहार इ.स. १५९५ मध्यें जिंकिला, व या प्रकारें सर्व उत्तर हिंदुस्थान आपल्या ताब्यांत आणिला.

१६ दक्षिणेंतील स्वाऱ्याः–उत्तरेंतील विजय पुरे झाल्यावर महत्वाकांक्षी अकबरानें दक्षिणेकडे नजर फेंकली. तेथील पांच मुसलमानी राज्यांनीं आपलें स्वामित्व कबूल करावें म्हणून प्रत्येकाकडे त्यानें वकील पाठविले; परंतु खानदेश शिवाय इतरांनीं तसें करण्याचें नाकारल्यामुळें दक्षिणेवर स्वारी करण्याचें त्यानें ठरविलें.

याच सुमारास **अहमदनगरच्या** सरदारांमध्यें आपसांत तट होते; त्यांतील एकानें अकबरास बोलविलें. त्याप्रमाणें त्यानें आपला प्रिय पुत्र **मुराद** यास मोठ्या सैन्यासह इ. स. १५९३ मध्यें तिकडे पाठविलें. मुरादानें अहमदनगरच्या किल्ल्यास वेढा दिला. त्या वेळीं तेथील सुलतानाची आत व विजापूरची पालक राणी **चांदबीबी** अहमदनगरास राहात असल्यामुळें, तिनें दोन्ही सैन्यें एकत्र करून व स्वतः अंगांत चिलखत घालून अहमदनगरचें रक्षण करण्याकरितां मोंगलांशीं लढाई दिली. शेवटीं सर्व उपाय थकल्यामुळें तिनें मोंगलांशीं तह करून वऱ्हाड प्रांत त्यांना सोडला. थोड्याच दिवसांत अहमदनगरांतील निरनिराळे पक्ष पुन्हा भांडूं लागले, व इ. स. १६०० मध्यें त्यांतील एका पक्षाच्या लोकांनीं चांदबीबीचा खून केला; या पूर्वींच अकबर स्वतः दक्षिणेंत आला होता. या खुनानंतर त्यानें अहमदनगर जिंकलें आणि तेथील बादशहास कैद करून त्याला ग्वाल्हेरास पाठविलें.



महाराणी जोधाबाईचा महाल (सीकरी).



चौसट्ट खांबा (सीकरी).

खानदेशचा सुलतान याच सुमाराला आपणास स्वतंत्र ह्मणवूं लागला. ह्मणून इ. स. १६०० मध्यें अकबरानें तेथील राजधानी **बऱ्हाणपूर** जिंकिली, व त्या काळचा जगांतील अति बळकट किल्ला **असीरगड** याला वेढा दिला. परंतु किल्ला सर होत नाहीं असें पाहून, अकबरानें लांच व कपट यांच्या साहाय्यानें तो जिंकला व खानदेश आपल्या राज्यांत सामील केला.

१७ **अकबराचा राज्य-विस्तारः**—कंदहार आणि काबूलपासून बंगाल-ओरिसापर्यंत आणि हिमालयापासून अहमदनगर सुभ्यापर्यंत अकबराचें राज्य पसरलें होतें. यांत पुढील पंधरा सुभे होते—काबूल, काश्मीर-लाहोर, मुलतान-सिंध, दिल्ली, आग्रा, अयोध्या, अलहाबाद, बिहार, बंगाल-ओरिसा, गुजराथ, माळवा, अजमीर, खानदेश, वऱ्हाड, अहमदनगर. या प्रकारचें विस्तृत साम्राज्य हिंदुस्तानांत हेंच पहिल्यानें स्थापन झालें, व आपल्या मुत्सद्देगिरीनें अकबरानें त्याला संघटित केल्यामुळें तें दोन शतकेंपर्यंत टिकलें.

१८ **हिंदूंशीं व्यवहारः**—अकबरानें हिंदूंशीं जितका उत्तम व्यवहार केला तितका आतांपर्यंत थोड्याच विदेशी बादशहांनीं एतद्देशीयांशीं केला असेल. (१) जिझिया व यात्रेवरील कर त्यानें उठविला. (२) सति आणि बालविवाहाच्या निंद्य रीति बंद केल्या, व विधवाविवाह प्रचलित केला. (३) आपल्या सर्व राज्यांत गोवध बंद केला. (४) हिंदुस्थानांत एक राष्ट्रीयत्व स्थापन करण्यासाठीं, त्यानें दोन उपाय योजिले [अ] आपला, आपल्या पुत्रांचा व नातेवाईकांचा हिंदु स्त्रियांशीं विवाह घडवून एक प्रकारचें सामाजिक संघटण केलें. तसेंच [ब] दीनइलाई पंथामार्फत धार्मिक ऐक्य व संघटण करण्याचा त्यानें प्रयत्न केला. (५) त्यानें आपल्या राज्यांत हिंदूंना मोठमोठे अधिकार दिले. **मानसिंह** हा बंगाल, बिहार, काबूल व काश्मीर या प्रान्ताचा वेळोवेळीं सुभेदार होता. त्याचप्रमाणें **भगवानदास, टोडरमल, बीरबल व पृथिवीसिंह** हे सुद्धां सुभेदार व सेनापति होते. (६) त्यानें हिंदूंच्या कित्येक धार्मिक पुस्तकांचा अनुवाद फैजीकडून फारसी भाषेंत

करविला. त्यांत अथर्ववेद, रामायण व महाभारत हे विशेष प्रसिद्ध आहेत. फैजीचे रामायण व महाभारत हे दोन्ही सचित्र हस्तलिखित ग्रंथ जयपूरच्या पोथीखान्यांत अजूनपर्यंत पहावयास सांपडतात. [७] आपल्या हिंदू राण्यांकरितां वाड्यांत मंदिरें बांधविलीं, आणि पूजाचनांत त्यांना पूर्ण स्वातंत्र्य दिलें. केव्हां केव्हां तो स्वतःही जानवें घालून व तिलक लावून पूजेंत सामील होत असे.

१९ अकबर व जैन गुरुः—अकबराचे कित्येक जैन गुरु झाले. इ. स. १५७८ पासून कारकीर्दीच्या शेवटपर्यंत त्याच्या दरबारांत एक दोन जैन गुरु नेहमींच असत. अकबराच्या धार्मिक परावर्तनाच्या बाबतींत जैन गुरूनाच अधिक श्रेय द्यावें लागतें.

अकबर व सिख गुरुः—सिख धर्माबद्दल अकबराचें फारच उत्तम मत होतें व त्यानें एकदां सिख गुरु **अमरदास** याजपाशीं जाऊन जेवण सुद्धां घेतलें असें सांगतात. त्याच प्रमाणें सिखांचा गुरु **रामदास** याला त्यानें एक जहागीर दिली होती. त्यांतच पुढें **अमृतसर** नांवाचा सुप्रसिद्ध तलाव बांधिला गेला. त्याभोंवतीं सध्या वसत असलेलें अमृतसर शहर सिखधर्माचें मुख्य धर्मस्थान मानिलें जातें. गुरु **अर्जुन** यानें लिहिलेल्या **ग्रंथसाहेब** नामक सिखांच्या धर्मपुस्तकावर अकबराचें इतकें प्रेम असे कीं, त्यानें एकदां या गुरूपासून कांहीं धर्मोपदेश घेतला. अकबराच्या या भेटी-मुळें सिख गुरूंचा मान वाढला व त्यांच्याशीं असलेला जनविरोध कमी झाला.

अकबर व पारसी गुरुः-- सुरतेच्या हल्ल्याच्या वेळीं इ. स. १५७३ त अकबरचा पारसी लोकांशीं संबंध आला. त्यांजपासून त्यांच्या धर्मांतील रहस्य व अग्नीची पूजा या गोष्टी तो शिकला.

२० अकबर व अशोकः–या दोहोंत बरेंच साम्य आहे. हे दोघेही परधर्मसहिष्णु असून आपापल्या धर्म गुरूंच्या विरुद्ध वागले. प्रचलित इस्लामी धर्माबद्दल तिरस्कार वाटून अकबरानें दीन–इलाही नामक नवीन पंथ स्थापन केला; तर त्या वेळच्या हिंदू धर्माबद्दल असमा

धान वाटून अशोकानें बौद्ध धर्माचा अंगिकार केला. दोघांनींही प्राणिवधाची बंदी केली. परंतु अकबर व अशोक यांच्यांत कांहीं परस्परविरोधी गुणही आहेत. अकबराला राज्याचा लोभ व मानाची इच्छा असून या गोष्टी तो कपटानें व क्रौर्यानें साधीत असे. परंतु अशोक आत्मदमन व दैवी महत्वाकांक्षा या गुणांवर राज्यकारभार करून बौद्धधर्माच्या प्रसाराला विजय मानीत असे.

२१ अकबर व एलिझाबिथ्ः—अकबर व इंग्लंडची राणी एलिझाबिथ् (१५५८ ते १६०३) यांच्यांत बरेंच साम्य आहे. या दोघांनींही जवळ जवळ सारखीच मुदत राज्य केलें. दोघेंही आपापल्या राज्याचीं व धर्माचीं प्रमुख होतीं. दोन्हीं आपापल्या देशाच्या इतिहासांतील सम्राटांत श्रेष्ठ होतीं; कारण दोघांनींही नौका, आरमार, व्यापार, उदीम, रंग–चित्र–शिल्प इत्यादि कला व वाङ्मय यांना उत्तेजन देऊन आपापल्या राज्याचें महत्व वाढविलें. दोघांनींही आपापल्या राज्यांत एकराष्ट्रीयत्व स्थापित केलें. धर्मसहिष्णुता व सुधारणा हे दोघांचेहि विशेष होते. त्याचप्रमाणें दोघांनींही बऱ्याच आर्थिक सुधारणा केल्या. परंतु एलिझाबिथ् ही अकबरसारखी जेती नव्हती, किंवा पैगंबरही नव्हती. सुरवातीला फारच लहान असलेलें मोंगल राज्य अकबरानें उत्तरोत्तर वाढवून साम्राज्य बनविल्यामुळें, अकबर एलिझाबिथ् पेक्षांही श्रेष्ठ सम्राट होता हें निःसंशय आहे.

२२ धार्मिक निःपक्षपातः–प्रथमप्रथम तर अकबर केवळ मुसलमानी धर्माचाच पुरस्कर्ता होता; परंतु फैजी आणि अबुलफजल व रजपुत यांच्याशीं संबंध आल्याकारणानें त्याचें उदार आणि सत्याभिलाषी हृदय मुसलमानी धर्मानें संतुष्ट होईना. सीक्रीमध्यें दर आठवड्यास बृहस्पतवारीं एक धार्मिक सभा होऊन त्यांत मुख्य मतमतान्तराचे पंडित, संन्यासी, मौलवी, पाद्री हे धर्मतत्वांवर परस्पर वादविवाद करीत असत. (अशाच एका प्रसंगाचें चित्र सोबत आहे). या सभांमुळें मुसलमानी धर्मातील त्याची रुचि नाहींशी झाली, व सर्व मतांचे लोक पूजापाठविधीमध्यें स्वतंत्र झाले.

महाराज अशोकाप्रमाणेंच अकबरानेंही धार्मिक निःपक्षपात दाखविला; व अला-उद्-दीन प्रमाणें एक नवीन **दीन इलाही** नामक पंथ धर्मैक्य करण्यासाठीं इ. स. १५८२ मध्यें स्थापिला; यांत फारसी आणि हिंदू धर्मतत्वांचा भाग अधिक होता. अकबर स्वत: त्यांतील पैगंबर असून तोच दीक्षा देत असे. परंतु अकबराच्या मृत्युबरोबरच या धर्माचाही अंत झाला. या पंथाचा मुसलमानी धर्माशीं बराच विरोध होता-या पंथानें [१] सूर्य व अग्नीची पूजा, [२] मांसाशनाचा त्याग, [३] गोवधाची बंदी, [४] अरबी भाषा व मुसलमानी कायदा शिकण्याची मनाई, [५] मृत शरीर दहन करणें इत्यादि तत्वांचा प्रसार केला. शिवाय अकबरानें असा कायदा केला कीं, नवीन मशिदी बांधूं नये, जुन्या मशिदींची डागडूजी करूं नये व शेख, मुल्ला आणि फकीर यांना राज्यांतून हांकून द्यावें.

२३ अकबराची राज्यव्यवस्था:-त्याच्या राज्यव्यवस्थेचे मुख्य विशेष असे होते कीं, [१] आतां सारखीं त्या वेळीं लष्करी व मुलकी खातीं निरनिराळीं नसून प्रत्येक लष्करी अधिकाऱ्याला मुलकी कामें जादा दिलीं होतीं; व त्यांचा पगार लष्कराकडून देण्यांत येई. [२] धार्मिक व राजकीय बाबतींत अकबराला मुख्य मानिल्यामुळें त्याचें राज्य एकतंत्री झालें होतें. [३] त्याचें कार्यकारी मंडळ नव्हतें व त्यामुळें त्याचे मंत्री हे फक्त सल्लागार असून प्रत्येक एक एक खात्याचा चिटणीस होता.


घडवून त्याची राज्यव्यवस्था पठाणांच्याहून निराळी असून, त्यांतील सुधारणा त्यानेंच घडवून आणिल्या. त्यां पैकीं कित्येक इतक्या उत्तम होत्या कीं, त्यांतील कांहीं आजही अमलांत आहेत.

२४ न्यायपद्धत:—त्याचें न्यायखातें सुव्यवस्थित नव्हतें; कायदा प्रचारांत नव्हता; निकाल लेखी दिले जात नसत; वकीलही नव्हते; व राजधानी शिवाय इतर शहरांत न्यायकचेऱ्या नव्हत्या; परंतु प्रत्येक मनसबदाराला न्यायदानाचे अधिकार दिले होते; व प्रत्येक सुभ्यांत तेथील सुभेदार न्यायाच्या बाबतींत पूर्ण अधिकारी होता.

२५ करग्रहण:—(१) वर सांगितल्याप्रमाणें आपल्या राज्याचे




हिरन मिनार (सीकरी).




पंचमहाल (सीक्री).



बीरबलचा महाल (सीकरी).



चिश्तीची कब्र (सीकरी).



अकबरच्या कब्रेचें द्वार (सिकंदरा).

पंधरा सुभे करून, प्रत्येकामध्यें त्यानें **दिवाण** व **फौजदार** असे दोन दोन अधिकारी नेमिले होते. दिवाणाचें काम सारावसुलीचें असून फौजदाराकडे एकंदर राज्यव्यवस्था असे. दोघेही वेगवेगळे व आपापल्या खात्यापुरतेंच बादशहाला जबाबदार असत. अशा रीतीनें सैन्य व पैसा यांची ताटातुट झाल्यामुळें सुभेदारांना स्वतंत्र होतां येत नसे, शिवाय हे दोन अधिकारी एकमेकांवर नजर ठेवीत. (२) जिझिया व यात्रेकरूंवरील कर उठविले; शिवाय गुरांवरील, झाडांवरील, त्याचप्रमाणें शेतकऱ्यांवरील इतर लहान सहान करसुद्धां माफ केले गेले. (३) सारावसुलीचें खातें व्यवस्थितपणें उभारलें गेलें. (४) पडित जमिनींत लागवड करण्यासाठीं शेतकऱ्यांस उत्तेजन देण्यांत येत असे. (५) व्यापाराच्या मार्गांतील अडचणी दूर करण्यासाठीं रहदारी कर उठविण्यांत आला व आयात मालावरील कर कमी झाल्यानें व्यापार भरभराटीस आला.

२६ **जमीनमहसुलः**–राजा टोडरमलाच्या साहाय्यानें करवसूलीची पद्धत अकबरानें बरीचशी सुधारली. त्यानें [१] सर्व जमिनी त्यांच्या उपजाऊ शक्तिप्रमाणें चार वर्गांत विभागिल्या, [२] आरंभीं वार्षिक जमाबंदीची रीति अमलांत आणिली, आणि तीमुळें जुलुम होतो असें पाहिल्यावर, मग **दशवार्षिक** लागणीची पद्धत कायम केली. [३] राज्यांतील कांहीं नोकर लोकांना जमिनीच्या ऐवजीं रोकड द्रव्य वेतन म्हणून दिलें जाई. यामुळें जुलुमांस व बंडास आळा बसला. ही पद्धत शेरशहानेंही चालविली होती; परंतु अकबराच्या काळीं ती कायम झाली. (४) अकबरानें शेरशहाप्रमाणें उत्पन्नाचा $\frac{1}{4}$ भाग न घेतां, सुमारें $\frac{1}{3}$ भाग घेण्याचें ठरविलें. (५) सारा फक्त धान्यरूपांत वसुल करण्याऐवजीं, केव्हां केव्हां रोख किंवा धान्य रूपांत घेतला जाई. (६) साऱ्याचा हिशेब हिंदी भाषेच्या ऐवजीं फारसी भाषेंत ठेवण्याचा आरंभ पहिल्यानें टोडरमलानेंच केला.

२७ **लष्करी व्यवस्थाः**—(१) **मनसबदार** नामक अधिकाऱ्यांकडे सर्व लष्करी व्यवस्था देण्यांत आली होती. या मनसबदारांचे तेहतीस वर्ग केले असून त्यांतील एकएक मनसबदारानें ठरावीक सैन्य

पुरवावयाचें होतें; व त्याच्या संख्येप्रमाणें त्यांना पंच-हजारी, दस-हजारी असे हुद्दे दिले होते. त्यामुळें कायम बादशाही सैन्य फारच थोडे ठेवावें लागे. (२) या मनसबदारांना जहागिऱ्या न देतां त्यांना रोख वेतन देण्यांत येई. (३) मनसबदारांच्या माहितीसाठीं त्यानें कांहीं नियम केले होते. त्यामुळें हजेरीच्या किंवा इतर बाबतींत लबाडीचा संभव नव्हता. (४) त्याचप्रमाणें स्वतः कडून सैन्याला मिळालेले हुकूम पाळले जावेत या विषयीं त्यानें भरपूर खबरदारी घेतली होती. तरी सुद्धां युरोपीयन लष्करी शिस्तीची बरोबरी झाली नाहीं. (५) लढाईसाठीं तयार होणारा दारुगोळा किंवा तो ठेवण्याचें कोठार या बाबतींत तो स्वतः नज़र ठेवीत असे. (६) बंदुका व तोफा ओतविण्यांत, त्याचप्रमाणें तोफखान्याच्या व्यवस्थेंत, त्यानें बऱ्याच सुधारणा केल्या; परंतु तो तोफखाना युरोपीयन तोफखान्यासारखा होईना.

२८ वाङ्मय व कलाकौशल्यः—अकबराची कारकीर्द चिरकाल वैभवशाली व विजयी झाल्यामुळें, वाङ्मय व कलाकौशल्य यांना उत्तेजन व राजाश्रय मिळाला. **अबुल-फझल, निजाम-उद्-दीन, बदौनी** इत्यादी लेखकांनीं फारसी भाषेंत महत्वाचे इतिहासग्रंथ लिहून काढले. फारसी कवींमध्यें **फैजीला** श्रेष्ठ मानिलें जातें. **सूरदास** व हिंदी रामायणाचा कर्ता **तुलसीदास** हे दोन प्रसिद्ध कवि त्याच्या काळीं झाले. त्याचप्रमाणें तानसेनासारखा प्रसिद्ध गायकही त्याच्या दरबारीं होता. अबुल फझल ह्मणतो कीं, 'तानसेनासारखा गायक मागील हजार वर्षांत झालेला नाहीं.' अकबराला विनोदी भाषणें ऐकण्याचा नाद असल्यामुळें त्याच्या दरबारीं बीरबल व मुल्ला दोप्याजा यां सारखे खुषमस्करे होते; त्यांच्या पुष्कळ गोष्टी प्रसिद्ध आहेत. तसेंच, हिंदू चितारांना पारसी चित्रकला शिकण्यास लावून जुन्या हिंदी चित्रकलेला त्यानें नवीन वळण लाविलें.

अकबरानें बांधलेल्या इमारतीः— आग्ऱ्याचा लाल किल्ला, अलहाबादचा किल्ला, दिल्ली येथील हुमायुनाची कबर (१५६९) इ. स. १५७५-८७ च्या दरम्यान बांधलेलें फतहपूर सीक्री हें शहर व सिकंदरा येथील स्वतःची कबर इत्यादि सर्व अकबरानें बांधविलेल्या



अकबर धार्मिक वादविवाद करीत आहे. चित्रांत अकबर व सलीम यांचे समोर अबुल फजल व फैजी, बाजूस हिंदु, मुसलमान, व ख्रिस्ती लोक आहेत. (इ. सं. मं. पुणें.)



जहांगीर पोलो खेळत आहे (ब्रिटिश म्युझियम).

Lakshmi Art, Bombay 8.

इमारती हल्लींही प्रसिद्ध आहेत. यांत हिंदू व मुसलमानी बांधकामाच्या पद्धतीचें सुंदर मिश्रण दिसून येतें. **फतहपूर सीक्री** सध्यां जरी मोडकळीच्या स्थितींत असलें तरी त्यांमध्यें पुष्कळ मनोहर व आश्चर्यजनक प्रासाद, वाडे इत्यादि इमारती आजही दिसतात. यांपैकीं सलीम चिश्तीची कबर, बीरबलाचा महाल, जोधाबाईचा महाल, चौसष्ट खांबा, पंच महाल, हिरन मिनार आणि अकबराचा राजवाडा हे प्रसिद्ध आहेत.

२९ **अकबराचा मृत्यु:**—अकबराच्या आयुष्याचे शेवटले दिवस फार कष्टांत गेले. त्याचे परम स्नेही एका मागून एक निधन पावले. त्याचा मुलगा **सलीम** (जहांगीर) अत्यंत मद्यपी व बंडखोर निघाला. **मुराद** व **दानियाल** हे अति मद्यसेवनामुळें मृत्युमुखीं पडले. इ. स. १६०३ मध्यें सलिमानें अबुल फजलला ठार मारिल्यामुळें अकबराला अत्यंत दुःख झालें. शेवटीं एकूणपन्नास वर्षे राज्य केल्यावर इ. स. १६०५ मध्यें हृदयाची क्रिया बंद पडून तो मेला.

३० **अकबराचें कार्य:**—त्यानें आपल्या कारकीर्दींत खालील फार महत्वाचीं कामें केलीं. (१) राज्याचा विस्तार करून त्याला बळकटी आणिली. (२) त्यानें राष्ट्राच्या हिताकरितां पुष्कळ नवीन कायदे केले. (३) हिंदूंना चांगल्या तऱ्हेनें वागविलें. (४) पुष्कळ उपायांनीं हिंदू व मुसलमान यांची एकी करून त्यांच्या साहाय्यानें एकराष्ट्रीयत्व उत्पन्न केलें. (५) वाङ्मय व ललितकला यांची उन्नति केली. (६) व्यापार धंद्याला उत्तेजन दिलें. (७) पुष्कळ राष्ट्रीय, सामाजिक व आर्थिक सुधारणा केल्या. (८) या राजवटींत एका बाजूनें इराण, तुर्कस्थान व चीन, आणि दुसऱ्या बाजूनें युरोप व आफ्रिका इत्यादि भागांशीं हिंदुस्थानचा निकट संबंध आला. या सर्व गोष्टींमुळें अकबराला "नवयुगोत्पादक सम्राट्" ही संज्ञा देणें योग्य आहे.

३१ **अकबराचा आचार:**— अकबराच्या अंगीं असलेल्या अद्वितीय बुद्धि, सुंदर आकृति, रुंद भालप्रदेश, तेजस्वी चेहरा, बलिष्ठ शरीर, आकर्षक आचरण, शौर्य, धैर्य, औदार्य, न्यायशीलता, निःपक्षपात व समता इत्यादि मोठ्या गुणांमुळें त्याला सर्व मोंगल बादशहांत

श्रेष्ठ मानिलें जातें; व याच गुणांमुळें त्यानें वीर व धाडसी रजपुतांना जवळ ओढलें, हिंदुप्रजेला शत्रु ऐवजीं मित्र बनविलें आणि अशा रीतीनें राज्य विस्तृत, संघटित व बळकट केलें.

३२ अकबराचा व्यवहार पुढीलप्रमाणें होता:—(१) पायीं मोठ मोठ्या मजला मारणें, घोड्यावर बसणें व शिकार करणें, पोलो खेळणें इत्यादि मर्दानी खेळ त्याला आवडत असत. तरी राज्यकारभारामध्यें त्यानें दुर्लक्ष केलें नाहीं. त्याच्या काळीं पोलो इतका लोकप्रिय झाला होता कीं, स्त्रिया सुद्धां तो खेळ खेळत असत. (२) फार्सी व संस्कृत साहित्य, धर्म, तत्त्वज्ञान, काव्य, गायन, इतिहासादि विषयांवर ग्रंथ ऐकण्यांत व त्याबद्दलच्या चर्चेत दर रात्रीं तो पुष्कळ वेळ घालवीत असे. परंतु बालपणीं चुलत्याच्या कैदेंत राहिल्यामुळें त्याला स्वतःला मात्र कांहीं लिहितां वाचतां येत नव्हतें. तरी त्याच्या पुस्तकालयांत चोवीस हजार हस्तलिखित ग्रंथ होते. (३) प्रजेच्या सर्व प्रकारच्या अडचणी ऐकून त्या दूर करण्याचा तो प्रयत्न करीत असे. (४) तो सायंकाळीं आपल्या मंत्र्यांबरोबर राज्यकारभारासंबंधीं विचार विनिमय करीत असे. (५) हिंवाळ्यांत साम्राज्याच्या निरनिराळ्या भागांत न्याय देण्यासाठीं आपलें सैन्य व दरबार यांसह दौरा काढीत असे; त्यामुळें सर्व सुभेदार त्याच्या आधीन राहून शिवाय त्याचा प्रजेशी निकट संबंध येई.

प्रकरण ५ वें.

नूर-उद्दीन महंमद जहांगीर (इ. स. १६०५ ते १६२७)

१ मद्यप्रिय जहांगिराचे गुणदोष:—अकबराच्या पश्चात युवराज **सलीम** आपल्या वयाच्या सदतिसाव्या वर्षी **जहांगीर** [जगज्जेता] हें नांव धारण करून बादशहा झाला. परंतु त्यानें एकही नवीन प्रांत आपल्या राज्याला जोडला नाहीं; त्यामुळें जहांगीर हें नांव त्याला शोभत नाहीं. हा बादशहा मद्यपी, भोगी, स्वार्थी, दयाळु परंतु क्रूर व अस्थिर स्वभावाचा असला तरी तो न्यायी व राज्यकारभारांत दक्ष



राण्या पोलो खेळत आहेत (इ. स. मं, पुणें).



हिंदु पोषाखांत अकबर.



महाबत खान (बडादो म्यु)



अली मर्दान

होता. मुसलमानी धर्मानें निषिद्ध मानलेल्या मद्य, अफु व तंबाकू इत्यादींच्या सेवनाविरुद्ध त्यानें कायदे केले असले तरी तो नेहमीं त्यांच्याच सेवनांत गर्क असे. हा नाद पुढें इतक्या थराला गेला कीं, हातांत शराबाचा प्याला असलेलें आपलें चित्र नाण्यांवर सुद्धां त्यानें कोरलें; व "एक शेर दारू व अर्धाशेर मांस यां पलीकडे मला कांहीं नको" असें तो नेहमीं म्हणत असे; त्यामुळें "बुद्धिमान् दारुड्या" हें उपपद त्याला मिळालें आहे. अशा रीतीनें जहांगीर परस्पर विरोधी गुणांचा पुतळा होता.

२ खुस्रूचें बंडः— खुस्रू हा जहांगिराची राणी मानबाई (राजा भगवान दासाची मुलगी) हिचा पुत्र असून या बापलेकांमध्यें बराच बेबनाव होता. जहांगीर बादशहा झाल्यावर त्याच्या विरुद्ध यानें राज्यप्राप्तीसाठीं बंडसुद्धां उभारलें. परंतु बादशाही सैन्यानें इ. स. १६०६ मध्यें लाहोराजवळ त्याचा पराभव करून, चनाब नदीपाशीं त्याला साथीदारांसह पकडलें; त्यापैकीं शेकडों अति क्रूरतेनें मारले गेले, व पुष्कळांचीं डोकीं वृक्षावर लटकवून त्या वाटेनें खुस्रूला लाहोरला आणिलें. नंतर त्याचे डोळे शिवून त्याला सोळा वर्षें पर्यंत कैदेंत ठेवण्यांत आलें; व इ. स. १६२२ मध्यें शहाजहाननें त्याला दक्षिणेंत मारिलें. त्याच्या मोहक वागणुकीनें तो सर्वांना प्रिय झाला होता. त्यामुळें त्याला "हुतात्मा संत" मानण्यांत आलें.

३ जहांगिराचे आरंभींचे कायदेः— आपल्या कारकीर्दीच्या सुरवातीसच त्यानें व्यापारावरील पुष्कळ कर उठविले, रस्त्यावरची लुटालूट व दरोडे यांचा बंदोबस्त केला, विहिरी व मुशाफरखाने बांधिले; त्यानें दारू तयार करण्याची व विकण्याची तसेंच गुन्हेगारांचे नाक—कान कापण्याची बंदी केली; रुग्णालयें स्थापन केलीं; कांहीं ठराविक दिवशीं प्राणिवध बंद केला; प्रजेचीं गाऱ्हाणीं सहज ऐकतां यावींत, म्हणून त्यानें एक सोन्याची सांखळी आपल्या महालांतील घंटेस बांधून किल्ल्याच्या तटाबाहेर सोडली होती. परंतु यांतील बरेचसे कायदे अमलांत येत नसत.

४ रजपुतांशीं युद्धः— अकबरानें मेवाडच्या रजपुतांस इतकें

नामोहरम केलें होतें कीं, पुढील स्वाऱ्यांना तोंड देणें त्यांना अशक्य झालें. इ. स. १६०५ पासून सतत नऊ वर्षे नाणावलेल्या मोंगल सेनापतींच्या नजरेखालीं रजपुतांबरोबर लढाया झाल्या. शेवटीं शहाजहानकडून त्यांचा पाठपुरावा होऊन ते जर्जर झाले; व त्यांचा राजा राणा प्रतापचा पुत्र **अमरसिंह** यास इ. स. १६१४ त तह करणें भाग झालें. रजपुतांनीं बादशाही सैन्यांत फक्त एक हजार घोडेस्वार पुरवावे व अमरसिंहाचा पुत्र **कर्ण** यानें पांच हजारांची मनसबदारी पतकरावी असा तह झाला. परंतु या तहांत आपल्या शत्रूला अपमानास्पद वाटणारी अशी कोणतीही मागणी जहांगीरनें केली नाहीं. अशा रीतीनें अखेर मोंगलांचें स्वामित्व पत्करणें प्राप्त झाल्यामुळें आपला मानभंग झाला असें वाटून राणा अमरसिंहानें आपलें राज्य स्वखुषीनें आपला ज्येष्ठ पुत्र कर्ण याच्या हवालीं केलें.

५ इराणचा बादशहा शहा अब्बास याची नजर **कंदहारवर** बरेच दिवस होती. त्यामुळें अकबर मेल्यावर व खुस्रूच्या बंडानंतर त्यानें कंदहारला १६०६ मध्यें वेढा दिला; परंतु तो अपयशी ठरला. शेवटीं इराणी लोकांनीं तो प्रान्त इ. स. १६२२ त जिंकला; व कांहीं अंतस्थ भानगडीमुळें जहांगिराला तो त्यांच्याकडून परत घेतां आला नाहीं.

६ **दक्षिणेंतील युद्धः**—चांदबीबीच्या मृत्यूनंतर मोंगलांनीं अहमदनगर जिंकलें; तरी कांहीं भागांत तेथील सुलतानाचा अंमल चालत होता. **मलिक अंबर** नांवाचा एक हबशी तेथें मंत्री व अज्ञान राजाचा पालक या नात्यानें होता; त्यानें अहमदनगरचें स्वातंत्र्य पुनः पुकारलें व मोंगलांना हांकलून देण्याचा प्रयत्न केला. इ. स. १६१२ ते १६१६ पर्यंत मलिक अंबरनें बादशाही सैन्याचा तीन वेळां पराभव केला. तेव्हां खुर्रम उर्फ शहाजहानला तिकडे पाठविण्यांत आलें; त्यानें मलिक अंबरला जिंकलें. परंतु पुढें पांच वर्षांच्या अवधींत मलिक अंबरानें अहमदनगर मोंगलांपासून पुनः परत घेतलें; नंतर जहांगिराकडून पळून आलेल्या शहाजहानला त्यानें आपल्या जवळ आश्रय दिल्यामुळें त्याचा बोलबाला अधिक वाढला. त्यानें आपल्या मृत्यूपर्यंत [१६२६] अहमद-

नगरचें उत्तम रीतीनें राज्य केलें. पुढें स्वतः बादशहा झाल्यावर शहाजहानें मलिक अंबरच्या पुत्राबरोबर युद्ध चालू ठेविलें. इ. स. १६२९ ते १६३६ च्या दरम्यान शिवाजीचा बाप शहाजी राजे हा अहमदनगरच्या सुलतानाचा पालक असल्यामुळें तो यावेळीं मोंगलांबरोबर लढला; परंतु इ. स. १६३६ मध्यें त्याला अहमदनगर मोंगलांच्या हवालीं करणें भाग झालें.


७ नूरजहानः— इ. स. १६११ मध्यें जहांगिरानें नूरजहान नामक एका सुंदर स्त्रीशीं विवाह केला. या विवाहाचा जहांगिराच्या उत्तर कारकीर्दीवर बराच परिणाम झाल्यामुळें तिचें संक्षित वर्णन समजणें जरूर आहे. इराण मधील मिर्झा गयास बेग नामक एका कुलीन गृहस्थाला उदरंभरणाची पंचाईत पडल्यामुळें तो आपलें नशीब काढण्यासाठीं हिंदुस्थानामध्यें आला. सुदैवानें त्याला अकबराच्या दरबारांत नोकरी मिळाली. महरुन्निसा (स्त्रियांचा सूर्य) नामक त्याची एक मुलगी होती. तिच्या अद्वितीय सौंदर्यावर सलीम मोहित झाला. परंतु अकबराच्या आज्ञेनें **शेर अफगन** नामक एका अफगाण सरदाराशीं तिचा विवाह झाल्यामुळें सलीम राजपुत्राची मनीषा पूर्ण झाली नाहीं. परंतु स्वतः बादशहा झाल्यावर त्यानें शेर अफगनला मारवून आपली आवडती महरुन्निसा आपल्या अंतःपुरांत आणिली. यावेळीं तिचें वय तीस वर्षांचे होतें, तरी तिच्या खूपसुरतेमुळें तो फारच लुब्ध झाला होता. परंतु ती चतुर, स्वाभिमानी व धाडशी स्त्री असल्यामुळें जहांगीर आपल्या पतीचा घातक आहे असें जाणून चार वर्षेपर्यंत ती त्याच्या पासून विन्मुख राहिली. नंतर जहांगिरानें तिचें मन वळवून तिला आपली राणी केलें, व तिचें " नूरमहल " (राजवाड्याचा प्रकाश) असें नांव ठेविलें. कांहीं वर्षांनीं तिला **नूरजहान** (जगद्दीपिका) असें नांव दिलें; व त्याच नावानें ती अद्यापही प्रसिद्ध आहे. तिच्यासारखें वैभव हिंदुस्तानांतील कोणत्याही राणीनें उपभोगिलें नाहीं. नाण्यांवर जहांगिराच्या नांवाबरोबर तिचेंही नांव ठसविलें होतें; त्याचप्रमाणें सनदांवर सुद्धां तिची मोहर लागे. तिच्या बापाला मुख्य मंत्री व भाऊ आसफखां याला ' अमीरुल उमराव ' केलें

होतें. तिनें स्वतःची मुलगी (पहिल्या नवऱ्यापासून झालेली) राजपुत्र शहर्यारला देऊन, भावाची मुलगी मुमताजमहाल हिचा विवाह शहाजहान बरोबर केला. प्रथम प्रथम नूरजहाननें राज्योन्नतिसाठीं बराच प्रयत्न केला. बादशहा विलासोपभोग, मद्य, अफू यांत गर्क होऊन राज्यव्यवस्थेविषयीं निष्काळजी असतां, नूरजहानच सर्व राज्यकारभार करी. तिनें जहांगिराच्या मद्यपानाला बराच आळा घातला; खर्च कमी करून सुद्धां दरबारचें वैभव वाढविलें. तिच्या बापानें व भावानें सुद्धां आपापल्या परीनें राज्याची सुव्यवस्था केली. शहाजहान व महाबतखान यांना अनावर राज्यलोभ झाला असतां जहांगिराचें त्यांच्यापासून तिनें रक्षण केलें.

८ **शहाजहानः**—खुस्रू, पर्वीझ, खुर्रम उर्फ शहाजहान व शहर्यार या जहांगिराच्या चार मुलांत **शहाजहान** मोठा बुद्धिवान, मुत्सद्दी, शूर व चतुर सेनापति होता. याच्या अनेक लढायांपैकीं उदेपूर व अहमदनगरचे विजय प्रसिद्ध आहेत. पित्याचें त्याच्यावर प्रेमही होतें. परंतु जहांगिरानंतर आपला जामात शहर्यार याला गादी मिळावी अशी नूरजहानची इच्छा असल्यामुळें शहाजहान रुष्ट झाला. इ. स. १६२२ त शहा अबास कडून कंदहार परत जिंकण्यासाठीं शाहाजहानला मोठ्या सैन्यासह तिकडे पाठविण्याचें ठरलें; परंतु अशा रीतीनें आपल्याला हिंदुस्थानाबाहेर घालवून देण्याचा नूरजहानचा कपट हेतू ओळखून त्यानें जाण्याचें नाकारलें. तेव्हां बरेंच सैन्य शहर्यारच्या ताब्यांत देऊन त्याचा गौरव करण्यांत आला. ह्मणून जशास तसें या न्यायानें शहाजहानानें आग्र्याचा खजिना लुटण्याचा मनसुबा केला; परंतु तो तडीस गेला नाहीं. इ. स. १६२३ त त्याची जहांगिराशीं दिल्लीजवळ एक चकमकही झाली; त्यांत पराभव होऊन, शहाजहान माळव्याकडे पळाला. महाबतखान व पर्वीझ यांनीं त्याचा पाठलाग करून एकदां पराभवही केला. त्यानंतर शहाजहानानें तेलंगण व मच्छलीपट्टण येथें लुटालुट करून नंतर बंगाल प्रान्त हातीं आणिला; परंतु काशी येथें पुन्हां पराभव झाल्यामुळें तो दक्षिणेंत पळून गेला, व आपला जुना शत्रु **मलिक अंबर** याची



नूरजहान व जहांगीर सिंहाची शिकार करीत आहेत (श्री राजेसाहेब, मुधोळ)



इतमादुद्दौलाची कबर (आग्रा).



शहाजहान, अकबर व जहांगीर (प्रि. वे. म्यू.)
हें उत्कृष्ट चित्र हास्तिदंतावर कोरलेलें आहे.

त्यानें मैत्री संपादन केली. तेथून पुढें तो राजपुताना व इ. स. १६२६ त सिंध येथें कांहीं काळ भटकत राहिला. सुदैवानें पुन्हां चांगले दिवस दाखविले; युवराज पर्वीझ मेला, व महाबतखान मिळाल्यामुळें त्याला आधिक जोर आला.

९ **महाबतखान**---हा शूर व सहासी रजपूत वाढून मुसलमान झाला होता; जहांगिराच्या कारकीर्दीत हा काबूलचा सुभेदार असून त्या काळीं शौर्यांत त्याच्या तोडीचे फारच थोडे सेनापति होते. शहाजहान आग्र्यास चाल करून येत आहे असें समजल्यामुळें नूरजहाननें याला आपल्या साहाय्याला बोलावलें. त्याप्रमाणें यानें शहाजहानचा पाठलाग करून त्याला नाकीं नऊ आणविले. परंतु नूरजहानला त्याचें सामर्थ्य व तो शहर्यारच्या विरुद्ध आहे ही गोष्ट सहन न होऊन तिनें महाबतला ठार मारण्याचा व त्याच्याकडून सैनापत्य घेण्याचा प्रयत्न केला. इ. स. १६२६ च्या आरंभीं जहांगीर काबुलांतील बंड मोडण्यास जात असतां महाबतला दरबारांत हजर होण्याची आज्ञा झाली. त्यानें बेगमचा दुष्ट भाव ओळखिला व बरोबर पांच हजार निवडक विश्वासू रजपूत घेऊन झेलम नदीवर स्वारीच्या ठिकाणीं पोंचला. तेथें त्याचा अपमान करण्यांत आल्यामुळें, त्यानें मोठ्या धाडसानें बादशहाला कैद केलें. तेव्हां प्रसंगावधान धरून नूरजहाननें महाबतबरोबर युद्ध केलें. परंतु तिचें कांहीं चाललें नाहीं; तेव्हां ती स्वतः त्याच्या स्वाधीन झाली. सरासरी एक वर्षपर्यंत हीं दोघें व वजीर आसफखान महाबतचे नजरकैदी होते. शेवटीं सर्व सैन्य काबूलांत असतां नूरजहाननें चतुरपणानें आपली व बादशहाची कैदेंतून सुटका करून घेतली. त्यानंतर महाबत दक्षिणेकडे शहजहानला जाऊन मिळाला.

१० **इंग्लंडचा वकील सर टॉमस रोः**— सतराव्या शतकाच्या प्रारंभीं हिंदुस्तानच्या मोंगल बादशाहांच्या वैभवाची प्रसिद्धि इंग्लंडपर्यंत जाऊन पोहोंचल्यामुळें, त्या काळच्या इंग्रजी लेखकांनीं जहांगिराला 'महान् मोंगल' अशी संज्ञा दिली होती. इ. स. १६१३ त जहांगिरानें इंग्लिश व्यापाऱ्यांना सुरत येथें वखार खोलण्याची परवानगी दिली;

पण पोर्तुगीझांच्या द्वेषामुळें इंग्लिश व्यापाराची स्थिति चांगली नव्हती. या कारणास्तव, इंग्लंडचा राजा पहिला जेम्स यानें आपला वकील सर टामस रो याला इंग्लिश व्यापाऱ्यांना हिंदुस्तानांत उत्तेजन व सोयी मागण्यासाठीं इ. स. १६१५ त जहांगिरकडे पाठविला. त्यांत त्याला थोडेसें यशही आलें.

सर टामस रो अजमीर येथें जहांगिराच्या दरबारीं तीन वर्षें होता. या मुदतींत त्यानें बादशहाचें मद्यपान, भोजन व हिंदुस्तानचा राज्यकारभार यांची बरीच माहिती करून घेतली. त्यानें त्याचप्रमाणें इकडे प्रवासास आलेल्या **हॉकिन्स** व **टॅरी** यांनीं लिहून ठेवलेल्या वृत्तांतावरून असें समजतें कीं, अकबराच्या प्रमाणें जहांगिराचा राज्यकारभार सुव्यवस्थित नव्हता; (अ) वाटेंत लुटमारीची भीति असल्यामुळें प्रवास करणें फार कठीण होतें. (ब) दरबारांत लांच देण्याघेण्याचा प्रकार सर्रास सुरु होता. (क) रजपुतांची उपेक्षा व मुसलमानाशीं पक्षपात होत असल्यामुळें देशांत नेहमीं बंडें होत होतीं. (ड) सरदार लोक अनुचित रीतीनें द्रव्य मिळवीत असत. हिशेबांत अत्यंत ढिलाई असे. गुजराथचा सुभेदार ७१०००० रुपये सैन्याच्या खर्चांतून उरवून खात असे, व लाखों रुपये गुजराथेंत कराच्या व लांचेच्या रूपानें उकळी. शिवाय त्याला रोज १००० रुपये पगार मिळे. (इ) बादशाही दरबाराचा व वाड्यांतील खासगी खर्च रोजीं ८००० हजार रुपये होता; व ३६००० नोकर जहांगिराच्या खासगी सेवेंत होते. लष्करांत एकंदर १२००० हत्ति असून त्यांतील ३०० बादशहासाठीं होते. या प्रकारामुळें प्रजेची स्थिति शोकजनक होती. शेतकरी लोक या वेळीं अत्यंत दरिद्रावस्थेंत होते. या कारणामुळेंच इतिहासकार कीन यानें जहांगिराला "अराजकतेचा राजा" म्हटलें आहे. या एकंदर गोष्टींवरून, मोंगली साम्राज्याच्या दौर्बल्याला सुरवात जहांगिराच्याच कारकीर्दींत झाली असें दिसतें.

जहांगीरनें बांधलेल्या इमारतीः–(१) सिकंदरा येथील अकबराची कबर, (२) राजा मानसिंहानें बांधिलेलें मथुरेंतील मंदिर, (३) आग्रा मधील इतमाद – उद्– दौलाची कबर, व (४) लाहोर जवळ शहादरा येथील

जहांगीरची कबर इत्यादि इमारतींत हिंदू शिल्पकलाच अधिक दृग्गोचर होते; अशा इमारती बांधून जहांगिरानें आपलें नांव अजरामर केलें आहे.

१२ आग्राः— हें हिंदुस्तानांतील एक भव्य शहर आहे, असें मेंडलस्लोनें वर्णन केलें आहे. दुसरा एक लेखक ह्मणतो कीं आग्याची त्या वेळची वस्ती परकीय लोक सोडून सहा लाख होती. त्या शहराचे रस्ते सुंदर व रुंद होते. तेथें परदेशच्या व्यापाऱ्यांकरितां ८० मुशाफरखाने होते; ७० मोठ्या मशिदी होत्या; सार्वजनिक स्नानगृहें ८०० होतीं. आग्र्यांतील तिजोरींत ३० कोट पौंड होते असें ह्मणतात.

१३ जहांगिराचा मृत्युः— काश्मीरांत जात असतां वाटेंतच दम्याच्या विकारानें इ. स. १६२७ त आपल्या एकोणसाठाव्या वर्षी जहांगीरनें प्राण सोडला. नंतर शहाजहानच्या राज्यारोहणाबरोबर नूरजहानची सत्ता नाहींशी झाली; त्यानें नूरजहानला योग्य नेमणूक करून देऊन तिला राज्यकारभारांतून पृथक केलें. त्यानंतर तिनें उरलेलें अठरा वर्षांचें आयुष्य ईश्वरोपासनेंत घालविलें. शेवटीं इ. स. १६४५ मध्यें ती मेली व तिच्या इच्छेनुसार जहांगीरच्या कबरेजवळच एका साध्या छोट्या कबरींत तिचें दफन करण्यांत आलें.

१४ जहांगिराच्या राज्यपद्धतीचें सिंहावलोकनः—परस्पर विरुद्ध गुणांचा हा पुतळा स्त्रैण बनून आपलें जीवित केवळ विलासभोगांत घालवीत असे. दारु व अफूचे सेवनानें तो कित्येक वेळां बेशुद्ध होऊन रात्रीं एक वाजतां जेवण करी, त्या वेळीं दुसऱ्यांनीं त्याच्या तोंडांत अन्न कोंबावें लागे. त्याचे दोन मुलगे सुरापानानें मरण पावले. सरदार लोकांमधील लांचलुचपत, कारस्थान व विलासभोग यांमुळें साम्राज्याची शक्ति हलु हलु क्षीण होत चालली. उदेपूरशिवाय त्यानें कोणतेंच प्रान्त जिंकले नाहींत, मलिकअंबरच्या बंडाचा नायनाट केला नाहीं, कीं कंदहारही पुनः जिंकिला नाहीं. यावरून साम्राज्याचें अधःपतन होऊं लागलें होतें असें स्पष्ट दिसतें. त्यानें ललितकला व शिल्प यांना फक्त उत्तेजन दिलें.

प्रकरण ६ वें.

वैभवशाली शहाजहान (इ० स० १६२८–५८)


१ राज्यप्राप्तिः—जहांगिराच्या मृत्यूनंतर गादीबद्दल त्याच्या दोन मुलांमध्यें भांडणें सुरू झालीं. नूरजहाननें आपला जांवई शहर्यार याची बाजू धरली व आसफखान शहाजहानास मदत करूं लागला. शहाजहान दक्षिणेंतून आग्र्यास येईपर्यंत खानानें खुस्रूचा मुलगा दावरबक्ष याच्या नांवानें द्वाही फिरविली. या बाबतींत नूरजहान व शहर्यार यांचें कांहीं चालेना. शेवटीं खानाच्या मदतीनें शहाजहानास बादशाही पद लाभलें; व आपल्या आप्तांचा नाश करून त्यानें आपला मार्ग निष्कंटक करून घेतला.

२ शहाजहानचें वर्तनः—तक्तनशीन होण्यापूर्वी शहाजहान शूर, मुत्सद्दी व राज्यकार्यधुरंधर होता; परंतु नंतर त्याची विलासप्रियता, ललितकलेची व शिल्पकलेची आवड इत्यादि कळसास पोंचल्यामुळें त्याच्या ठिकाणीं आळसाचा प्रादुर्भाव होऊं लागला. यानें राज्यकारभार जरी मुख्य प्रधान आसफखान व जेष्ठ पुत्र दारा यांजवर सोंपविला होता, तरी न्यायदानाचे कामीं त्याजकडून कधींही हयगय होत नसे. महाबतखान, सादल्लाखान, अलीमर्दान, मिर्झाराजा जयसिंह, व जसवंतसिंह इत्यादि कर्तृत्ववान् मुत्सद्यांच्या साहाय्यानें त्यानें प्रजेचें उत्तम रीतीनें संरक्षण केलें. शहाजहान आपल्या प्रजेस मुलांप्रमाणें वागवीत होता असें बर्नियरचें मत आहे. त्याच्या कारकीर्दींत मोंगल साम्राज्य वैभवाच्या शिखरास पोंचल्यामुळें तो अतिशय लोकप्रिय झाला.

३ राज्यकारभाराचें धोरणः— [१] शहाजहाननें मुसलमानांना खूष राखण्यासाठीं सौरवर्षाऐवजीं चांद्रवर्ष सुरू केलें, व बादशहाला दंडवत घालण्याची पद्धत बंद केली. [२] त्यानें आपल्या राज्यांत खिश्चन लोकांचेंही संरक्षण केलें. हुगळीच्या पोर्तुगीजांचा त्यानें केलेला छळ धर्मांधतेमुळें नव्हता. [३] हिंदूंना खूष राखण्यासाठीं हिंदूंप्रमाणें तो "तुलादान" करीत असे. शहाजहाननें हिंदू पद्धतीप्रमाणें



मयूरसिंहासनावरील शहाजहान (भा. इ. सं. मं. पुणें).



दिल्ली किल्ल्यांतील दिवान-इ-आम (हा शहाजहानानें सन १६३८–४८ च्या दरम्यान बांधिली).

रत्नजडित मयूरसिंहासन तयार केलें. दिल्ली शहराचा पाया घालतेवेळीं हिंदू समजुतीप्रमाणें त्यानें कित्येक मनुष्यांचे बळी दिले. कांहीं हिंदूंना मोठमोठे अधिकार दिले. अशा रीतीनें हिंदू व मुसलमान यांना त्यानें सारखेंच खूष ठेविलें.

४ **शहाजहानाच्या कारकीर्दींतील युद्धें:— (१) खानजहानचें बंड**:-दक्षिणेचा सुभेदार खानजहान लोदी यानें अहमदनगरशीं तह करून स्वत: बंड केलें व विजापूर, गोवळकोंडा, अहमदनगर व बुंदेलखंड यांची मदत मिळविण्याचा प्रयत्न केला; तथापि त्यांत त्याला यश आलें नाहीं. शेवटीं बादशाही सैन्याबरोबर शौर्यानें लढतां लढतांच त्यानें देह ठेविला. (२) **हुगळीचे पोर्तुगीज** बंगाल्यांतील प्रजेला निरनिराळ्या तऱ्हेनें लुबाडीत असत, व कित्येकांना गुलाम करून नेत असत. या वेळीं समुद्रावर त्यांचें वर्चस्व असल्यामुळें नाविक दळणवळणास त्यांचा परवाना लागे. व्यापाऱ्यांना तो देतेवेळीं व कर वसूलीच्या वेळीं ते फार त्रास देत. तेव्हां याचा बंदोबस्त करण्यासाठीं बंगालच्या सुभेदारानें इ. स. १६३२ त भलें मोठें सैन्य तिकडे रवाना केलें. या मोहिमेंत एकंदर १०००० पोर्तुगीज मारले गेले, ४००० पोर्तुगीज गुलाम करून आग्र्यास आणिले व बाकी राहिलेल्यांना बंगाल्यांतून हांकून लाविलें. अशा रीतीनें हुगळीची वस्ती इतकी कमी झाली कीं तिचें गतवैभव पुन: कधींही परत आलें नाहीं. (३) इ. स. १६३६ त शहाजहाननें मलिकअंबरचा मुलगा फतहखान व राजे शहाजी भोंसले यांजपासून **अहमदनगर** जिंकलें. (४) **गोवळकोंडा व विजापूर**:-गोवळकोंड्याच्या सुलतानानें शहाजहान बादशहाच्या नांवाचीं नाणीं पाडण्याचें व खुतबा वाचण्याचें त्याच्या सांगण्यावरून कबूल केलें, व त्याला नजराणा ह्मणून वीस लाख रुपये देण्यांत आले. अठरा वर्षांच्या औरंगजेबास खानदेश, वऱ्हाड, तेलंगण व दौलताबाद असे चार प्रान्त देऊन बादशहानें १६३६ त त्याला दक्षिणेचा सुभेदार केलें. येथील वार्षिक वसूल पांच कोटी रुपये होता. दक्षिणेची ही परिस्थिति आठ वर्षें तशीच राहिली. नंतर १६५३ मध्यें औरंगजेबास पुन: दक्षिणची सुभेदारी मिळाली, व त्यानें या राज्यांविरुद्ध लढण्यास कंबर कसली. या

विषयीं माहिती पुढें येईल. (५) **बुंदेलखंडाचा** त्या वेळचा स्वतंत्र रजपूत राजा **चंपतराय** याला आपल्या छत्राखालीं आणण्यासाठीं शहाजहाननें त्याजवर स्वारी करून सैन्य व कपट यांचा उपयोग करण्याची शिकस्त केली; पण त्यांत यश न येतां उलट राजा चंपतराय मात्र मोंगलाच्या प्रदेशांत सारखा लुटालूट करीत राहिला. (६) **कंदहारः**—अलीमर्दान नामक इराणच्या बादशहाच्या सुभेदारानें बादशहावर नाखुष होऊन इ० स० १६३७ त कंदहार शहाजहानाचे हवालीं केला. तथापि इ० स० १६४८ त इराणच्या बादशहानें तो प्रान्त परत घेतला. त्यावर मोंगल सेनापतींनीं व राजपुत्रांनीं तो हस्तगत करण्याचा आटोकाट प्रयत्न केला, परंतु त्यांत यश न मिळाल्यामुळें मोंगल बादशहांना कंदहारला कायमचेंच मुकावें लागलें. (७) **तिबेटवरील मोहीमः**—कित्येक दिवसांपासून तिबेटावर मोंगलांचा डोळा होता. मुसलमानी अमलाखालीं काश्मीरच्या लगत असलेल्या तिबेटच्या कांहीं भागांत प्रजा फार गांजून गेली होती. त्यावर स्वारी करण्याचा हुकूम शहाजहानानें काश्मीरच्या सुभेदारास दिला. त्याप्रमाणें त्यानें इ० स० १६३६ त युद्ध करून राजघराण्यांतील सर्वांना पकडून आपल्या राजधानीस आणलें. (८) शहाजहानला **बलख** व **बदख्शान** जिंकण्याची अनावर इच्छा होती. इ० स० १६४५ त अनुकूल परिस्थिति प्राप्त होतांच हे प्रान्त जिंकून त्यानें आपल्या साम्राज्यास जोडिले.

५ शहाजहाननें बांधलेल्या इमारतीः—इ. स. १६३६ अखेर बहुतेक लढाया संपल्या होत्या. शहाजहाननें आपल्या कारकीर्दीचीं राहिलेलीं बावीस वर्षे इमारती बांधण्याकडे व ललितकलेची वृद्धि करण्याकडे सर्वस्वी खर्च केलीं. या इमारती आज सुद्धां प्रसिद्ध आहेत. (१) आपली बेगम मुमताजमहाल हिच्या स्मरणार्थ शहाजहाननें आग्र्यांत **'रोजा ताजमहाल'** बांधिला. शहाजहानचें दफनही पुढें याच रोज्यांत करण्यांत आलें. 'ताजमहाल' बांधण्यासाठीं वीस हजार लोक बावीस वर्षे सारखे खपत होते. ही संगमरवरी इमारत ह्मणजे जगांतील सौंदर्य, पावित्र्य, शिल्पकला इत्यादींचें मनोहर प्रदर्शनच आहे. (२) आग्र्यांत उष्णता अधिक

असल्यामुळें बादशहानें " **शहाजहानाबाद** " नांवाचें दिल्लीमध्यें शहर वसविलें व इ. स. १६४८ पर्यंत राजवाडे मशिदी इत्यादींनीं तें सुशोभित केलें. दिवाण-इ-खास, दिवाण-इ-आम, मोती मशीद, आरसेमहाल, स्नानगृहें, दिल्लींतील प्रसिद्ध **जुम्मा मशीद** इत्यादि सुंदर इमारती आज सुद्धां पाहाणारांस दिपवून सोडतात. अशा रीतीनें मोंगलांच्या कारकीर्दींतील शिल्पकलेचीं अत्युत्तम कामें शहाजहानच्या वेळीं झालीं. रावी व यमुना या नद्यांचे कालवे काढण्यांत आले. अलीमर्दानचा कालवा आजसुद्धां प्रसिद्ध आहे. शहाजहानचे वेळीं बरेच नामांकित चित्रकार होऊन गेले.


६ **लोक-समृद्धि**:--केवळ ताजमहालसाठीं सुमारें तीन कोटी रुपये खर्च झाले. विजयनगरच्या राजसिंहासनाप्रमाणें एक अपूर्व सुवर्णमय रत्नजडित **मयूरसिंहासन** तयार करविलें. त्याला अजमासें सहा कोटी पन्नास लक्ष रुपये खर्च आला. आणखी पुष्कळ कालवे व महाल बांधण्यांत जो पैसा खर्च झाला त्याचा अंदाज करतां येत नाहीं. इतका पैसा खर्च होऊन सुद्धां बादशहाच्या खजिन्यांत अठरा कोटी पौंड शिल्लक होते. यावरून त्या वेळचें मोंगलांचें वैभव व प्रजेची समृद्धि व्यक्त होते.

७ **शहाजहानचे मुलगे**:—या ख्यालीखुशालीप्रिय बादशहाचीं आयुष्यांतील शेवटलीं वर्षे फार दुःखांत गेलीं; त्याच्या वृद्धापकाळीं त्याच्या मुलांनीं बंडें उभारल्यामुळें त्याजवर संकटांचा व दुःखांचा डोंगर कोसळला. याला एकंदर चार पुत्र होते. (१) **दारा** मुलतान व काबूल यांचा सुभेदार होता. परंतु बादशहास राज्यकारभारांत साहाय्य करीत असल्यानें हा नेहमीं दरबारांतच रहात असे. हा शूर, सुंदर, सत्याभिलाषी, सरस्वतीभक्त व घमेंडखोर होता. मुसलमानी धर्मावरील याचा विश्वास उडाला होता. याला संस्कृत वाङ्मयाची फार आवड असल्यामुळें यानें बावन्न उपनिषदांचें फारसींत भाषांतर करविलें. (२) **शुजा** हा शियापंथी, चतुर व शूर सेनापती बंगालचा सुभेदार होता, परंतु आतिशय मद्यपान व विषयसेवन यांनीं याचें शरीर व मन कमकुवत झालें होतें. (३) **औरंगजेब** इ० स० १६५३ पासून दक्षिणेचा सुभेदार होता.


तो कट्टर सुन्नी मुसलमान असून शूर, संयमी, दूरदर्शी, धर्मनिष्ठ, पण संशयी व कावेबाज होता. याच्या काखेंत कुराण, हातांत जपमाळ व हृदयांत कपट होतें. आपल्या ऐन तारुण्यांत सुद्धां हा मद्य व विलास यांपासून अगदीं अलिप्त होता; हा नेहमीं फकिरांची संगत करीत असे, व कधीं कधीं स्वतः फकीर होऊन मक्केंत आयुष्य कंठणार असें ह्मणत असे. ह्मणून हा मुसलमानांचा अत्यंत आवडता होता. (४) **मुराद**, गुजराथचा सुभेदार, हा भोळा व साहसी योद्धा होता; पण मद्यपान व शिकार यांत तो सदा मग्न असे. तो दुसऱ्या भावांप्रमाणें महत्त्वाकांक्षी असला तरी बुद्धींत त्यांच्या तोडीचा नव्हता. यामुळें हा कपटी औरंगजेबाच्या पाशांत सांपडला.

८ **भावाभावांतील युद्धें**:--वयाच्या सत्तराव्या वर्षी १६५८ त शहाजहान आजारी पडला. वार्धक्यामुळें हा आजारांतून उठेल अशी सरदारांना आशा राहिली नाहीं. ही बातमी वणव्याप्रमाणें चारही दिशेला पसरली. अदूरदर्शीपणानें त्यानें आपल्या पुत्रांना निरनिराळया प्रांतांचे सुभेदार करून पुष्कळ द्रव्य व मोठी सेना त्यांच्या हातीं दिली. यामुळें बंगाल, गुजराथ व दक्षिण येथून आपापलें सैन्य घेऊन तिघे भाऊ आग्र्याकडे निघाले. थोरला मुलगा दारा यानें राजा जयसिंह व शहाजादा सुलेमान शुकोह यांना बादशाही सैन्यासह आग्र्याहून पाठविलें. शुजाचें व त्यांचें काशिजवळ बहादुरपूर येथें फेब्रुवारी १६५८ त युद्ध झालें. त्यांत शुजाचा पराभव झाला, ह्मणून तो व त्याची सेना यांनीं यःपलायन केलें. तेव्हां त्याच्याशीं एकट्यानें लढणें कठीण आहे, हें ओळखून कपटी औरंगजेबानें मुरादला आपल्या हाताशीं धरिलें व आग्र्याकडे कूच केलें.

९ **धर्मठचा संग्राम** (१५ एप्रिल १६५८):- महाराजा जसवंतसिंहाच्या हाताखालीं मोठें सैन्य देऊन त्यास दारानें या दोघांविरुद्ध पाठविलें. उज्जयनीपासून १४ मैलांवर धर्मठ येथें लढाई झाली. दोघां भावांच्या जबर हल्ल्यामुळें व मोंगल सेनापती कासिमखान याला लांच दिल्यामुळें मोंगल सैन्य रणमैदानांतून पळून गेलें. या युद्धांत रजपूत मात्र निकरानें लढले. शेवटीं आठ हजार रजपुतांपैकीं अवघीं सहाशें माणसें जिवंत राहिलीं.



दिल्ली किल्ल्यामधील शहाजहानची कचेरी.



जुम्मा मशीद–दिल्ली.

उरलेल्या जखमी शिपायांस घेऊन मोठ्या कष्टानें महाराजा जसवंत मारवाडास परत गेला. येथें त्याच्या शूर पत्नीनें त्याची फारच निर्भर्त्सना केली व पुनः यश घेऊन येतों असें वचन मिळेपर्यंत त्याला आंत घेतलें नाहीं!

१० सामूगडचा संग्राम (२९ मे १६५८):— पराभवामुळें चिडलेला दारा बऱ्याच मोठ्या सैन्यासह आग्र्याहून निघाला. परंतु या फौजेंतील बहुतेक शिपाई दाराच्या कार्याविषयीं आस्था बाळगणारे नव्हते. आग्र्यापासून पूर्वेस आठ मैलांवर असलेल्या सामूगड येथें दोन्ही सैन्यांची गांठ पडली. पुढें सामूगड फत्तेबाद या नांवानें प्रसिद्ध झालें. या ठिकाणीं घनघोर संग्राम होऊन त्यांत आरंभी दारा विजयी झाला. त्या वेळीं औरंगजेबनें आपला हत्ती पळून जाऊं नये ह्मणून त्यास साखळदंडानें बांधून घालण्याचा हुकूम सोडला. औरंगजेबानें वश करून घेतलेल्या एका सरदाराच्या सांगण्यावरून दारा हत्तीवरून खालीं उतरून घोडेस्वार झाला, यामुळें साहजिकच तो शिपायांना दिसेना. आपला पुढारी हत्तीवर नाहीं असें पाहून दाराचें विजयी सैन्य गर्भगळीत झालें व जीव वांचविण्याकरितां सैरावैरा धांवूं लागलें; क्षणार्धांतच यशाचें पारडें औरंगजेबाच्या बाजूस झुकलें व पराभूत झालेल्या सैन्याला विजयश्रीनें माळ घातली. औरंगजेबाच्या या धैर्याचें बक्षीस ह्मणून त्याला मयूरसिंहासनाची प्राप्ति झाली, आणि दारा हा उनाड व पळपुट्या ठरला. हे विजय संपादिल्यामुळें सर्व प्रतिष्ठित प्रधान व अधिकारी औरंगजेबास मिळाले आणि त्यांनीं दाराचा पक्ष कायमचा सोडून दिला.

११ शहाजहानच्या कारकीर्दीचें सिंहावलोकनः— शहाजहाननें केलेलीं सर्व युद्धें साम्राज्याच्या बाहेर होतीं. आरंभींच्या एक दोन किरकोळ बंडांखेरीज शहाजहानची कारकीर्द एकंदरींत शांततापूर्ण व भरभराटीची झाली. पोर्तुगीजांचें वर्चस्व कमी करून त्यानें बंगालमधील व्यापाराची वाढ केली; दक्षिणेंत अहमदनगर जिंकून विजापूर व गोंवळकोंडा यांच्या अधिपतींस खंडणी देण्यास भाग पाडिलें; वायव्येकडे कंदहार गमाविलें असलें तरी बलख व बदखशां हे प्रान्त जिंकून साम्राज्याची मर्यादा वाढविली; ईशान्यदिशेस


तिबेट जिंकण्यासाठीं त्यानें स्वारी केली. यावरून शहाजहान विलासी व चैनी दिसत असला तरी तो शूर सेनापती व हुषार मुत्सद्दीही होता असें सिद्ध होतें. इ. स. १६३२ पासून पुढें त्यानें हिंदूंना धर्मस्वातंत्र्य दिलें नाहीं; व त्याच वर्षी बनारस जिल्ह्यांत नवीं बांधलीं जाणारीं ७६ देवळें पाडण्यांत आलीं. यावरून इतर ठिकाणीं किती अनन्वित प्रकार झाले असतील याची बरोबर कल्पना येईल. याच्याविषयीं प्रसिद्ध इतिहासकार स्मिथ याचें मत वाईट असलें, त्याच्या राज्यांत कांहीं ठिकाणीं अनन्वित छळ व बऱ्याच चोऱ्या होत असल्या, त्याचा स्वभाव कसाही असला, तथापि त्याची कारकीर्द एकंदरींत न्यायाची व जोमदार झाली आणि या कालांत मोंगल साम्राज्याचें वैभव शिखरास पोचलें व सर्वत्र शांतता व समृद्धि नांदूं लागल्या असें म्हटलें पाहिजे.

प्रकरण ७ वें.

औरंगजेब आलमगीर (१६५८-१७०७)

१ **औरंगजेब** फारच संयमी होता. त्याचें स्वभाववर्णन मागच्या प्रकरणांत दिलें आहेच. आपल्या एकोणनव्वद वर्षांच्या आयुःमर्यादेंत त्यानें एकोणपन्नास वर्षें राज्य केलें. इस्लाम धर्माबद्दल त्याला इतकें प्रेम व आदर वाटे कीं, त्यापुढें राज्य, वैभव, स्वास्थ–कशाचीही तो कदर करीत नसे. धर्मासाठींच त्यानें हिंदूंचा छळ केला, त्यांचीं देवळें पाडलीं, व दक्षिणेंत भयंकर युद्धें केलीं. धर्मामुळेंच त्यानें इंद्रियसुखाचा त्याग केला; मांसाहार तो कधींही करीत नसे; परंतु या सर्व वागणुकीचा परिणाम काय झाला व त्याच्या कारकीर्दींत साम्राज्याला उतरती कळा कशी लागली याबद्दल सविस्तर माहिती खालीं दिली आहे.

२ **हिंदूंवर जुलुमः**–औरंगजेबाच्या कारकीर्दींत झालेल्या लढाया त्यानें केलेल्या हिंदूंवरील जुलुमाचीं फळें आहेत; म्हणून त्या जुलुमाचें संक्षिप्त अवलोकन प्रथमत: केलें आहे. (१) मथुरा, दिल्ली, काशी, मुलतन



ताजमहाल (आग्रा).



औरंगजेबचा दरबार (प्रि. वे. म्युझियम)
हें उत्कृष्ट चित्र हस्तिदंतावर कोरलेलें आहे.

स्थानेश्वर, उज्जैनी, सोमनाथ, हरिद्वार व अयोध्या इत्यादि शहरांतील हिंदू देवळें पाडून, कांहीं ठिकाणीं त्यांच्या जागीं मशिदी बांधून व नद्या अपवित्र करून त्यानें हिंदूंचा छळ केला. (२) हरिद्वार येथें स्नान करण्याबद्दल प्रत्येक हिंदूला सवा सहा रुपये कर द्यावा लागत असे. इ. स. १६७९ सालीं त्यानें जिझीया कर हिंदूंवर बसविला. या विषयीं त्याचे सरदार, बेगमा, वजीर, रजपूत राजे व शिवाजी या सर्वांनीं त्याची कानउघाडणी केली, तरी त्यानें तिकडे लक्ष दिलें नाहीं. (३) हिंदू व्यापाऱ्यांना आयात-निर्यात मालावर मुसलमानी व्यापाऱ्यांपेक्षां जास्त कर द्यावा लागे. (४) त्यानें हिंदूंना पालखींत व हत्ती घोडे यांवर बसण्याची मनाई केली आणि त्यांना नोकऱ्या देणें बंद केलें. त्यांना शस्त्रधारणाची परवानगी नव्हती. (५) हिंदूंना मुसलमान करण्याचे बरेच प्रयत्न करण्यांत येत असत. (६) हिंदूंच्या शाळा, धार्मिक प्रवचनें व वेदपठण हीं त्यानें बंद केलीं. परंतु हा छळ निमुटपणें सहन करून घेण्याइतके त्या वेळचे हिंदू भित्रे नव्हते. सतनामी, जाट आणि उदेपूर व जोधपूर येथील रजपूत यांचीं बंडें प्रसिद्ध आहेत. दक्षिणेंत औरंगजेबाविरुद्ध शिवाजी राजानें तेथील लोकांच्या साहाय्यानें स्वातंत्र्ययुद्ध पुकारलें. तें औरंगजेबाच्या मृत्यूपर्यंत चालू असून त्याचा वृत्तांत मराठा रियासतींत दिला आहे.

३ जाट व सतनामी यांचीं बंडें:-- औरंगजेबाच्या प्रारंभींच्या अत्याचारांनीं हिंदूंचें रक्त उसळलें. मथुरा जिल्ह्यांतील जाट लोकांनीं इ. स. १६६९ मध्यें बंड केलें, परंतु तें कांहीं काळ दबलें. इ. स. १६८१ व १६८८ मध्यें पुन्हा वीर जाटांनीं उचल खाल्ली. इ. स. १६९१ मध्यें या धाडशी लोकांनीं अकबराचीं हाडें कबरेमधून काढून व जाळून मोंगल बादशहांचा मोठा अपमान केला. आग्र्याजवळ अशी बंडाळी माजली असतां दूरदूरच्या प्रान्तांत काय स्थिति असेल हें सांगावयासच नको.

सतनामी लोकांनीं सुद्धां वरील कारणास्तव इ. स. १६७२ मध्यें बंड सुरू केलें व ते निकरानें लढले. परंतु त्यांचें संख्याबल कमी असल्यामुळें त्यांचा पराभव झाला.

४ रजपुतांशीं युद्ध (इ. स. १६७८–८१):— राजा जयसिंह, राजा जसवंतसिंह व त्याचा जेष्ठ मुलगा पृथिवीसिंह यांनीं बादशहाची एकनिष्ठ नोकरी करून सुद्धां त्यांना विषप्रयोगाचें बक्षीस मिळालें. राजा जसवंतसिंहाचे मृत्यूनंतर त्याच्या दोन लहान मुलांना कैद करून त्यांना मुसलमानी धर्माची दीक्षा द्यावी असा औरंगजेबाचा बेत होता. परंतु वीर दुर्गादासाच्या नजरेखालीं विश्वासू रजपुतांनीं त्यांना राणीसह पळवून जोधपुरास आणिलें. यामुळें बादशहाला संताप आला; शिवाय रजपूत लोकांनीं जिझीया कर देण्याचें नाकारल्यामुळें त्यानें जोधपूरवर व त्याला मदत करणाऱ्या उदेपूरवर स्वारी करून तेथील राजवाडे व देवालयें जमीन-दोस्त केलीं. उलट रजपुतांनींही मुसलमानांच्या मशिदी पाडून व त्यांचा वेळोवेळीं धिःकार करून या आगळिकीची फेड केली. बादशहाच्या हातांत शहरें असलीं, तरी अरवली पर्वताच्या सर्व डोंगराळ प्रदेशांत जिकडे तिकडे त्याचे रजपूत शत्रु पसरले होते. त्यामुळें त्यांनीं बादशाही सैन्याला खिंडींत वेळोवेळीं गांठून, त्याला मुठींत नाक धरावयाला लाविलें. औरंगजेबानें रज-पुतांवर केलेले जुलुम न आवडून व राज्यलोभानें त्याचा मुलगा अकबर रजपुतांना मिळाला, व औरंगजेब अजमीर येथें असतां त्याच्यावर रजपूत सेनेसह त्यानें स्वारी केली. परंतु कपटनीतीनें बादशहानें रजपुतांना अकबरा-पासून फोडलें. अशा रीतीनें निराश्रित झाल्यामुळें, अकबर दक्षिणेंत पळाला. तेव्हां औरंगजेबालाही दक्षिणेंत जाणें भाग पडलें; ह्मणून त्यानें रजपु-तांशीं युद्ध बंद करून तह केला. परंतु जसवंतचा मुलगा अजितसिंह याचा जोधपूरच्या गादीवरील हक्क त्यानें कबूल केला नाहीं. त्यामुळें तेथील राठोड रजपुतांनीं स्वधर्म व स्वराज्य यांसाठीं पुन्हा पंचवीस वर्षें पर्यंत युद्ध चालू ठेविलें. शेवटीं औरंगजेबानंतर बहादुरशहानें तो हक्क कबूल केला व त्यामुळें युद्ध थांबलें. या दीर्घकालीन युद्धामुळें पूर्वी मित्र असलेले रजपूत औरंगजेबाचे कट्टे शत्रू बनले; व औरंगजेबाला दक्षिणेच्या स्वाऱ्यांत त्यांचें साहाय्य न मिळतां उलट त्यांचें पारपत्य करण्यासाठीं बरेंच सैन्य त्याला उत्तरेंत गुंतवावें लागलें.

५ विजापूर व गोवळकोंड्यावरील मोहीमः— हिचीं विविध

कारणें होतीं, तीं अशीं:— (१) या राज्यांतील मुसलमान लोक शियापंथी असल्यामुळें सुन्नी औरंगजेबाच्या डोळ्यांत ते शल्याप्रमाणें खुपत होते. त्यामुळें पूर्वी सांगितल्याप्रमाणें इ. स. १६५६ पासून तो या दोन राज्यांशीं लढत होता. (२) या निरंतर युद्धांनीं जरी तीं जेरीला आलीं, तरी तीं सर्वस्वी जिंकणें अवघड होतें. परंतु या राज्यांना आपल्या बुद्धिबळानें व सैन्यबळानें मदत करीत असलेला शिवाजी इ. स. १६८० मध्यें वारल्यावर, हीं राज्यें सहज घेतां येतील अशी औरंगजेबाची अटकळ होती. (३) विजापूर व गोवळकोंडा येथील बादशहांनीं बऱ्याच हिंदूंना आपल्या दरबारीं नोकऱ्या दिल्या होत्या; येथील बादशहा आणि औरंगजेबाचे कट्टे शत्रु शिवाजी व संभाजी राजे यांची एकमेकांना मदत असे. (४) रजपुतांशीं केलेल्या युद्धांमुळें औरंगजेबाचा मान व यश यांना कलंक लागला होता; तेव्हां दक्षिणेंतील वरील दोन निर्बल राज्यें खालसा करून दिग्विजय गाजवावा अशी त्याची इच्छा होती. (५) शिवाय त्याचा मुलगा अकबर यानें रजपुतांकडून येऊन दक्षिणेंत संभाजी राजाचा आश्रय केला होता; तो कदाचित् बंड पुकारून शहाजहानशीं आपण केलेल्या वागणुकीचें अनुकरण करील ह्मणून त्याला स्वाधीन करून घेण्यासाठीं दक्षिणेवर स्वारी करणें त्याला भाग होतें.

हे सर्व उद्देश मनांत धरून औरंगजेबानें इ. स. १६८१ त प्रचंड सेनेसह दक्षिणेंत येऊन बऱ्हाणपुरांत तळ दिला व लढाई सुरू केली. पांच वर्षें सतत लढून अखेर महत्प्रयासानें इ. स. १६८६ मध्यें त्यानें विजापुराचें राज्य खालसा केलें. यामुळें औरंगजेबाचें बळ वाढलें; व त्यानें आपलें सर्व सैन्यबल एकवटून आणि नेहमींप्रमाणें कपटाचाही आश्रय करून सन १६८७ मध्यें गोवळकोंडा जिंकिला व आपल्या राज्यांत सामील केला.

वरील विजयाचे परिणाम फारच महत्त्वाचे आहेत ते असे:- (१) वरील दोन राज्यें जिंकल्यानें मोंगल राज्याचा विस्तार झाला; व शियापंथी लोक दबले गेले. (२) हीं राज्यें साम्राज्याला जोडण्यांत एक मोठी चुकी झाली; कारण येथील मराठे सरदार आणि मुसलमान व मराठे सैनिक यांच्या नोकऱ्या गेल्यामुळें पोट भरण्यासाठीं ते

मोंगली अमलांत लुटालूट करूं लागले. (३) वरेच सैनिक पडल्यामुळें औरंगजेबाची लष्करी सत्ता कमी होऊन मराठी सत्तेला भरपूर वाव मिळाला. (४) मुसलमानी राज्यें व मराठ्यांचें राज्य यांच्या मधील चढाओढीनें दक्षिणेंत समबलत्व रहात असे, तें या विजयानें मोडलें. (५) हीं राज्यें पुरातन असल्यामुळें यांच्याबद्दल हिंदू व मुसलमान या दोघांनाही आदर वाटे; त्यामुळें ते दोघेही औरंगजेबाला कट्टा दुष्मन समजूं लागले. (६) संभाजी राजाविरुद्ध लढण्यासाठीं वरील राज्यांकडून मदत मिळण्याऐवजीं, तेथील लोक औरंगजेबाविरुद्ध मराठ्यांस सामील झाले.

६ **राज्यविस्तार:—** औरंगजेबाचें साम्राज्य काबूलपासून कावेरीपर्यंत आणि गुजराथपासून आराकानपर्यंत पसरलें होतें. त्याच्या कारकिर्दीच्या उत्तरार्धांत अकबराच्या वेळच्या १५ सुभ्यांचे २१ सुभे झाले. सिंध, काश्मीर, व ओरीसा हे प्रदेश पूर्वीं अनुक्रमें मुलतान, काबूल व बंगाल या सुभ्यांत होते, ते पृथक् केले गेले; व दक्षिणेच्या तीन सुभ्यांचे सहा करण्यांत आले. या साम्राज्यांतील सर्व राज्यव्यवस्था पूर्वींप्रमाणेंच चालू होती. या साम्राज्याच्या जमीन–महसुलाचें उत्पन्न इ. स. १६६६ त २४ कोटी होतें, तें इ. स. १७०० च्या सुमारास ४३ कोटीपर्यंत वाढलें; पण इ. स. १७०७ मध्यें तें ३० कोटी झालें. इतर सर्व करांचें उत्पन्न सरासरी जमीन महसुलाच्या उत्पन्नाएवढें होतें.

७ **औरंगजेबाचें पूर्ण एकतंत्री राज्य:—** प्रत्येक मोहिमेची योजना तो स्वतः करीत असे; फर्मानें काढणें, हल्ल्याच्या जागा ठरविणें, खंदकांच्या मर्यादा ठरविणें, इत्यादींवर त्याची खुद्द नजर असे. दक्षिणेंतील सैन्याच्या निरनिराळया तुकड्यांची व्यवस्था त्यानें स्वतःच ठेविली व कित्येक वेढ्यांवर तो स्वतः नजर ठेवीत असे. अफगाणिस्थान ते आराकानपर्यंत सर्वत्र त्याची प्रत्यक्ष हुकमत चाले. कोणताही अधिकारी–एखादा सरकारी कारकून सुद्धां–त्याच्या संमतीशिवाय नेमिला जात नसे; आणि सर्व कारभारी मंडळावर अनेक हेरांच्या मार्फत कडक नजर ठेवण्यांत येई. अशा रीतीनें राज्यकारभाराच्या व तदनुषंगिक

सर्व गोष्टी त्यानें स्वतःच्या हातांत केंद्रीभूत केल्या होत्या, व सर्व अधिकारीवर्ग त्याच्या हातांतील बाहुल्याप्रमाणें वागत होता. अर्थात् ही त्याची घोडचुक होती; कारण अति विस्तृत साम्राज्याची एकट्यानेंच व्यवस्था ठेवणें त्या वेळच्या परिस्थितींत अशक्य होतें.

८ **न्यायव्यवस्था:**--औरंगजेबानें अकबराचीच न्यायव्यवस्था चालू ठेविली होती; परंतु न्यायदान मात्र त्याप्रमाणें नव्हतें. औरंगजेब स्वतः न्यायाच्या कामांत आळस अगर पक्षपात करीत नसल्यामुळें राजधानीच्या आसपास मात्र योग्य न्याय होत असे. परंतु त्याच्या कारकीर्दीच्या उत्तरार्धात दूरच्या प्रान्तांत अन्याय व अत्याचार यांमुळें प्रजेच्या दुर्दशेला सीमा नव्हती. बादशाही हेरांना लांचलुचपत देऊन अधिकारी त्यांना आपल्या बाजूला मिळवून घेत असत. त्यामुळें त्यांच्या वर्तनाचा बादशहाला कांहींच सुगावा लागत नसे. अशा प्रकारचे अत्याचार आजसुद्धां "औरंगजेबी अत्याचार" म्हणून प्रसिद्ध आहेत.

९ **अकबर व औरंगजेब:**--या दोन्ही बादशहांत थोडेंसें **साम्य** आहे--(१) ते दोघेही जेते होते; मात्र या बाबतींत अकबर सरस होता. कारण त्याला नवीन साम्राज्य स्थापन करावयाचें होतें. परंतु औरंगजेबाकडे पूर्वीच विस्तृत साम्राज्य होतें. (२) दोघेही मोठे मुत्सद्दी असून उद्योगी होते; व दोघांची रहाणी साधी होती. (३) दोघांनींही आपापल्या कारकिर्दीच्या उत्तरार्धात दक्षिण पादाक्रांत करण्याचा प्रयत्न केला. परंतु हें साम्य वरवर दिसणारें आहे. त्यांचे **परस्पर विरुद्ध गुण** मात्र समजणें महत्वाचें आहे. (१) अकबरानें निरनिराळे प्रदेश जिंकून, राज्यव्यवस्थेंत सुधारणा करून व सर्व लोकांशीं चांगली वागणुक ठेवून राज्य वाढविलें; परंतु याच्या अगदीं उलट वर्तन करून औरंगजेबानें तें संपुष्टांत आणिलें. (२) अकबराला दयाळु अंतःकरण, मोहक आकृति, असाधारण विनोदी स्वभाव व खेळाची अतोनात इच्छा या गोष्टी लाभल्या होत्या; औरंगजेब उदास, संशयी आणि हिशोबी वृत्तीचा असल्यामुळें सगळे लोक त्याच्यापासून दूरदूर रहात असत. (३) अकबर सर्वधर्मसहिष्णु होता पण औरंगजेब धर्मांध

मुसलमान पडल्यामुळें, इतर धर्मांचा द्वेष करीत असे. हिंदूशीं या दोघांनीं केलेल्या वागणुकीची तुलना केल्यास त्यांचे स्वभावभेद स्पष्ट होतात. (४) अकबरचा आपल्या अधिकाऱ्यावर---तो हिंदु असो वा मुसलमान असो---सारखाच विश्वास होता; परंतु औरंगजेबाचा आपल्या पोटच्या मुलांवरसुद्धां विश्वास नव्हता, मग अधिकाऱ्यांवर कसा असणार. (५) अकबरानें कर कमी करून व्यापार--उदीम वाढविला, परंतु औरंगजेबानें हिंदूंवर भारी कर लादले व अशा रीतीनें त्यांना छळून राज्याच्या आंतील व बाहेरील व्यापार मोडला. (६) अकबरानें कला, शिल्प, उद्योग, वाङ्मय, गायन, व इतिहासलेखन यांना उत्तेजन दिलें; परंतु औरंगजेबानें यांना मुळींच आश्रय दिला नाहीं. (७) विविध सुधारणांनीं अकबरानें हिंदी राष्ट्रीयत्व निर्माण केलें; परंतु औरंगजेबानें संघटन मोडून हिंदुमुसलमानांत दुही माजविली. यावरून असें स्पष्ट होतें कीं, अकबिराची एलिझाबेथ बरोबर तुलना करणें योग्य आहे, पण "स्वाभाविक वर्तन, सत्ता, ऐश्वर्य, दुराग्रह, पोकळ डामडौलाची हाव, अविश्वास व बेइमान इत्यादि गोष्टींत औरंगजेबाचा समकालीन फ्रान्सचा बलिष्ठ राजा चौदावा लुई ह्याच्याशीं त्याचें उत्तम साम्य जुळतें."

१० **कारकिर्दीचें सिंहावलोकनः**---बादशहा या नात्यानें औरंगजेबाच्या कारकिर्दीचें परीक्षण केलें असतां, तो मूर्तिमंत अपयश होता असें ह्मणतां येईल. याच्या कारकिर्दीत मोंगल राज्याचा उत्कर्ष होण्याऐवजीं त्याला उतरती कळा लागली. हिंदूंचा नाना तऱ्हेनें छळ करणें, एकतंत्री राज्य चालविणें, स्वानुरक्त रजपूत राजांशीं विनाकारण युद्ध करणें, निरपराधी व स्वतःस साहाय्य देणारीं विजापूर व गोवळकोंडा येथील मुसलमानी राज्यें बुडविणें व मराठ्यांचा निःपात करण्याचा व्यर्थ प्रयत्न करणें या त्याच्या चुका अगदीं अक्षम्य होत. त्याच्या उत्तर वयांत तर त्याला जिकडे तिकडे अपयश व निराशा यांचेंच साम्राज्य दिसूं लागलें. दक्षिणेंतच बरींच वर्षें घालविल्यामुळें उत्तरेकडे त्याचें दुर्लक्ष झालें व तिकडे यादवी माजली. रजपुतांनीं उघड उघड बंडें पुकारलीं; आग्र्याकडे जाट

उठले; व सिख मुलतानकडे दंगल करूं लागले. दक्षिणेंत मराठ्यांनीं जाळपोळ चालू केली. मोंगल सैन्य निःसत्व व निरुत्साही झालें. अशा रीतीनें प्रत्येक वेळीं अपयशाचा वांटा त्याच्या हिःशास येई. तरी त्याची स्वधर्मावरील निःसीम प्रीति, संयमी आचरण व दीर्घोद्योग यांमुळें तें अपयश शोभून जाई.

प्रकरण ८ वें.

मोंगल वंशाचा ऱ्हास.


१ **बहादुरशहा** (१७०७–१७१२):— औरंगजेबाच्या चार पुत्रांपैकीं, **अकबर** विषयीं माहिती आलीच आहे. तो मराठ्यांकडून निघून इराणमध्यें सैन्य जमविण्याकरितां गेला व तेथेंच इ० स० १७०६ मध्यें वारला. बाकीच्या तीन पुत्रांना आपल्या मृत्यूपूर्वीं औरंगजेबानें राज्याचे वांटे करून दिले होते; तथापि बादशहाच्या मृत्यूनंतर ते गादी साठीं आपसांत भांडूं लागले. शेवटीं त्यांपैकीं **मुअझमानें आझमला** आग्र्याजवळ मारून व स्वतः **बहादुरशहा** नांव धारण करून इ० स० १७०७ मध्यें गादी बळकाविली. पुढें दोन वर्षांनीं त्यानें आपला दुसरा भाऊ **कामबक्ष** यालाही ठार मारिलें. स्वतः राज्यकारभारांत निपुण नसल्यामुळें याला नेहमीं आपल्या वझिरांवर विसंबून रहावें लागे. या सर्वांत सुप्रसिद्ध सेनापति झुल्फिकार ह्याचें याच्यावर अधिक वजन होतें.

२ **बहादुराचें कार्यः**—गादीवर येतांच औरंगजेबाचा जुलमी कारभार बदलून टाकण्याला त्यानें सुरवात केली. यासाठीं (१) त्यानें राजा शाहूला सोडून दिलें, त्याला मराठ्यांचा राजा म्हणून मान्य केलें व दक्षिण सुभ्यांत चौथाई व सरदेशमुखी वसुलाचा अधिकार त्याला दिला. (२) जोधपूरच्या अजितसिंहाचा गादीवरील हक्क यानें कबूल केला. (३) हिंदूं-वरील जिझीया कर काढून टाकला. (४) उदेपूरच्या महाराण्याबरोबर यानें तह केला. (५) सिखांशीं सुद्धां सख्य करण्याचा त्यानें बराच प्रयत्न केला. परंतु त्यांनीं बंड पुकारतांच त्यांचें पारिपत्य करण्यासाठीं त्यानें


पंजाबांत चाल करून त्यांचा पराभव केला. पुढें इ. स. १७१२ त वयाच्या सत्तराव्या वर्षीं तो निधन पावला. या सर्व गोष्टींवरून त्याचें औदार्य व सहिष्णुता हीं स्पष्ट दिसतात. त्यामुळें धर्मवेड्या मुसलमानांनीं त्याला " शाह-इ-बेखबर " हें उपपद दिलें. तो फार वर्षें जगता तर मोंगल साम्राज्याचें पुनरुज्जीवन होऊन तें दीर्घ काळ टिकलें असतें.

३ जहांदारशहा (१७१२-१७१३):—बहादुरशहाच्या मृत्यूनंतर त्याच्या चारही पुत्रांत राज्याबद्दल तंटे सुरू झाले. सर्वांत मोठा पुत्र जहांदारशहा यानें वजीर झुल्फिकारखानाच्या साहाय्यानें आपल्या तीन भावांना ठार केलें व राज्य बळकावलें. यानें फक्त अकराच महिने राज्य केलें. राज्य प्राप्त होतांच विलासांत दंग होऊन हा लाल कुंवर नामक रखेच्या नादीं लागला. शिवाय तो क्रूर व भित्राही होता. त्यामुळें सर्व लोक त्याचा तिरस्कार करूं लागले. याचा फायदा घेऊन बंगालचा सुभेदार जहांदारचा पुतण्या **फर्रुखसीयर** यानें आपल्या बापाच्या मृत्यूचा सूड घेण्याकरितां बिहारचा सुभेदार सय्यद हुसेनअली व अलहाबादचा सुभेदार सय्यद अबदुल्ला या बंधूंची मदत घेऊन आग्र्यावर मोहीम केली आणि जहांदारचा पराभव करून राज्य मिळविलें; व मुख्य वजीर झुल्फिकारसह त्याला ठार मारिलें.

४ **फर्रुखसीयर** (इ. स. १७१३-१७१९):— राज्यप्राप्ति होतांच यानें **अबदुल्लाला** वजीर व **हुसेनला** बक्षी किंवा सेनापति असे अधिकार देऊन त्यायोगें सर्व मुलकी व लष्करी सत्ता सय्यद बंधूंच्या हातीं दिली. हे **सय्यद बंधू** पैगंबराचे वंशज असल्यामुळें त्यांना मुसलमान लोक मान देत. ते हिंदुस्तानांत बरींच वर्षें राहिल्यामुळें स्वतःला हिंदुस्तानवासी मानीत असत. त्यामुळें साहजिकच त्यांना हिंदूंबद्दल सहानुभूति वाटे. शिवाय ते शियापंथी होते. बादशाहा आणि त्याचे दरबारी सुन्नी असल्यामुळें त्यांच्याविषयीं व विदेशी मुसलमानांविषयीं त्यांना तिटकारा वाटे. यामुळें दरबारांत उघड दोन तट झाले. यांपैकीं मोंगलपक्षानें बादशाहाला सय्यदांविरुद्ध चिथाविलें. म्हणून बादशाहा व त्याचे वजीर यांमधील भांडणें व युद्धें यांनीं ही कारकीर्द व्यापिलेली आहे. याचे



औरंगजेबाची मिरवणक (श्री राजे साहेब, मधोळ



आग्र्याच्या किल्ल्यांतील दिवाण–इ–आमचा देखावा (इ. स. १६८५ मध्यें औरंगझेबनें बांधिला).

परिणाम एकंदरींत मोंगल सत्तेला विघातक असेच झाले. जिझीया कर यानें पुनः लादला आणि हिंदू जहागिऱ्या व मनसबदाऱ्या जप्त केल्या. सिखांचा मोड करण्याचाही यानें बराच प्रयत्न केला. शिवाय इंग्रज व डच कंपन्यांना सनदा देऊन त्यांच्या व्यापाराला उत्तेजन दिलें. याच्या कारकीर्दींत मराठ्यांची सत्ता वाढली व त्यानीं दिल्लीला शह दिला. या सर्वांचें वर्णन त्या त्या प्रकरणांत येईलच. शेवटीं बादशहाच्या मूर्खपणामुळें त्याचे मित्रच त्याच्या विरुद्ध सय्यदांना सामील झाले. सय्यदांची सत्ता वाढून शेवटीं त्यांनीं बादशाहाला दिल्लींत पकडलें आणि त्याचे डोळे काढून व विष देऊन त्याला ठार केलें.

५ राजकर्ते सय्यद बंधू:— नंतर सय्यदांनीं **रफी उद्दर्जात** नामक एका शहाजाद्याला सिंहासनावर बसविलें; परंतु तो तीन महिन्यांतच क्षयरोगानें मेला. त्यावर **रफी उद्दौला** नांवाच्या दुसऱ्या एका शहाजाद्याला त्यांनीं राज्य दिलें; तोही लौकरच मेला. पुढें त्यांनीं **रौशन अख्तर** नांवाच्या एका सशक्त तरुण शहाजाद्याला **महम्मदशहा** असें नांव देऊन बादशहा केलें. यामुळें सय्यदांना राजकर्ते ह्मणतात.

६ महंमदशहा (१७१९–४८):— या सर्व गोष्टींमुळें या वेळीं सय्यदांचें सामर्थ्य फार वाढलें होतें. एका पाटीमागून एक असे चार राजे सिंहासनावर बसविल्यामुळें, त्यांना सय्यदांनींच ठार मारिलें असा संशय राज्यांत पसरला. त्यामुळें सरदार लोक व जनता क्रुद्ध झाली. अलहाबाद, कसूर व काश्मीर येथें बंडें झालीं; त्यांत **निजाम-उल्-मुल्क** व **सादतखान** हे मुख्य होते. दक्षिणेची सुभेदारी बळकाविण्याची निजामाची इच्छा आहे असें पाहिल्यामुळें त्याला शासन करण्याकरतां सय्यद हुसैन बादशहासह दक्षिणेंत निघाला. परंतु त्याचा वाटेंतच वध झाला. यावर सय्यद अबदुल्लानें लढाईची तयारी केली, परंतु दिल्ली व अग्ऱ्यामधील शहापूरच्या लढाईत एक लाख सैन्य असूनही तो ठार झाला. अशा प्रकारें राजकर्त्या सय्यदांचा अंत झाल्यावर चतुर, राजकारणपटु, दूरदर्शी निजाम उल्मुल्क हा सन १७२१–२३ पर्यंत वजीर होता. बादशहा सदा चैनींत निमग्न असून स्त्रैण बनल्यामुळें राज्यकारभाराची चिंता करीत नसे.

या कारणानें त्याचें व वजिराचें पटेना; ह्मणून वजिराची जागा सोडून त्यानें दक्षिणेंत सुभेदारी पत्करली. तेथें तो कदाचित् स्वतंत्रपणें राज्य करूं लागेल म्हणून त्याला मारण्याचे बादशहानें फार प्रयत्न केले, परंतु ते सर्व फसले.

७ **महंमदशहाच्या कारकीर्दींत** [१] मराठ्यांचें सामर्थ्य फारच वाढलें. [२] युरोपियन व्यापाऱ्यांनींही हिंदुस्तानांत किल्लेबंदी करून आपापसांत लढाया सुरू केल्या. [३] राजाच्या निर्बलतेमुळें परदेशी लोकांनीं हल्ले करून सुवर्णभूमि भारतवर्ष लुटला. [४] बहुतेक प्रान्त स्वतंत्र झाले ते असे--

प्रान्त	सन	संस्थापकाचें नांव.
जोधपूर व अजमीर	१७२०	अजितसिंह
हैद्राबाद	१७२४	निजाम-उल्-मुल्क उर्फ आसफजहा
अयोध्या	१७२४	सादतखान
दक्षिण, माळवा, गुजराथ व ग्वाल्हेर	१७३२	मराठे
बंगाल	१७३९	अलीवर्दीखान
रोहिलखंड		रोहिले
भरतपूर		जाट

८ **अयोध्याः—-सादतखान** नांवाचा एक इराणी व्यापारी मोंगल दरबारांत आला, व वाढत वाढत अयोध्येचा सुभेदार बनला; पुढें महंमदशहाच्या क्षीण सत्तेचा फायदा घेऊन हा स्वतंत्र झाला. त्याच्यानंतर त्याचा मुलगा सफ्दरजंग व नातू शुजाउद्दौला हे सुभेदार बनले. यांचा वृत्तांत इंग्रजी रियासतींत दिला आहे. याचे वंशज इंग्रजांच्या आश्रयाखालीं १८५६ पर्यंत अयोध्येंत राज्य करीत होते. नंतर तो देश खालसा करून इंग्रजांनीं आपल्या राज्यास जोडला.

९ **बंगालः**—इ. स. १७०२ ते १७२५ पर्यंत बंगालचा सुभेदार **मुर्शिद कुलीखान** हा मोठ्या हुशारीनें बंगालचा राज्यकारभार करीत होता. नंतर त्याचा जांवई शुजाउद्दौला १७३९ पर्यंत सुभेदार होता. परंतु

अलीवर्दीखान नांवाच्या एका शूर व अनुभवी सरदारानें शुजाउद्दौल्याच्या पुत्राला हांकून दिलें व सुभेदारी बळकाविली; या त्याच्या कृत्याला मंजुरी देणें महंमदशहाला भाग झालें.

१० **हैद्राबादः—निजाम-उल्-मुल्क** याचीं "चीन कुलीचखान, आसफजहा, फिरोजजंग" अशीं नांवें असून हा शहाबुद्दीन नामक तुराण्याचा मुलगा होता. लहानपणींच हा औरंगजेबाच्या दरबारीं प्रसिद्धीस येऊन ठिकठिकाणीं सुभेदार झाला. नंतर तो दिल्लीचा वजीर कसा झाला व दक्षिणेंत कां गेला वगैरे भाग मागें सांगितला आहे. पुढें इ. स. १७२४ त त्यानें हैद्राबादचें स्वतंत्र राज्य स्थापिलें तें आजही अस्तित्वांत आहे. तो लोभी व महत्वाकांक्षी असला तरी असामान्य दृढनिश्चयी, चाणाक्ष, वाङ्मयप्रेमी व विद्वानांचा चहाता असून त्यानें सुंदर व लोकोपयोगी बांधकामें केलीं. त्या वेळच्या मुत्सद्यांत तो श्रेष्ठ होता.


११ **नादिरशहाची स्वारी—नादिरशहा** हा महत्त्वाकांक्षी विजेता एका इराणी धनगराचा पुत्र होता. यानें अफगाणांच्या स्वारीपासून इराणचें रक्षण करून तेथें आपलें राज्य स्थापिलें. नंतर त्यानें अफगाणिस्थानही जिंकून मोठ्या इराणी व अफगाणी सैन्यासह हिंदुस्थानावर स्वारी केली. त्याचीं **कारणें** अशीं:— [१] पुष्कळ वर्षांच्या युद्धांनीं इराण दरिद्री बनलें होतें. त्यामुळें हिंदुस्थानांतील लूट तिकडे नेऊन तो देश समृद्ध करावा अशी नादिरशहाची इच्छा होती. [२] अफगाणिस्थानाहून दिल्लींत आश्रयास आलेल्या अफगाणांची नादिरशहानें बादशहाकडे दोन वेळां मागणी केली. परंतु त्याचें उत्तरही न मिळाल्यामुळें, या अपमानाचा सूड उगविण्याचा नादिरचा हेतु होता. [३] काबूलपर्यंतचा प्रदेश जिंकतांना नादिरशहाला महंमदशहाकडून कोणताच अडथळा झाला नाहीं; त्यामुळें त्याला हिंदुस्थानही जिंकण्याची उमेद आली. [४] इराणी व अफगाणी लोकांना त्यांच्या पराजयाची विस्मृति पाडून त्यांचें लक्ष हिंदुस्थानच्या विजयांवर वेधण्याची नादिरची इच्छा होती. [५] हिंदुस्थानाच्या उत्तर सरहद्दीवरील लोकांना शांतता राखण्यासाठीं बादशहाकडून पुष्कळ वर्षें खंडणी न

मिळाल्यामुळें त्यांनीं नादिरशहाला कोणतीच हरकत केली नाहीं. [६] देशद्रोही सादतखान व आसफजहा हे गुप्त रीतीनें नादिरशहास सामील झाले. [७] या वेळीं दिल्ली येथील बादशाही सत्ता कमजोर झाली होती, त्यामुळें हिंदुस्थान जिंकणें व लुटणें ही गोष्ट सुसाध्य होती.


स्वारीचें वर्णन—अटकेपार होऊन नादिरशहानें बिनहरकत पंजाब मधून कर्नालपर्यंत चाल केली. तेव्हां चैनी बादशहानें भानावर येऊन त्याच्याशीं तोंड दिलें, शेवटीं तो हताश होऊन नादिरशहाला शरण गेला, व लोकांना त्रास न देण्याचें वचन त्याच्याकडून घेऊन त्या समवेत त्यानें दिल्लींत प्रवेश केला. परंतु त्याच्या शिपायांनीं कांहीं अत्याचार केल्यामुळें दिल्ली येथील लोकांनीं त्याच्या कांहीं सैनिकांची कत्तल केली. तेव्हां क्रुद्ध होऊन त्यानें एकदम दिल्लींत सरसहा कत्तल व लूट करण्याची आज्ञा दिली. दिवसभर रक्ताचा पाट वहात होता. जिकडे तिकडे लूटच लूट चालली होती. प्रजेवर भयंकर अत्याचार करण्यांत आले, व दिल्ली शहराला आग लाऊन त्याची शोभा उध्वस्त केली. सुमारें शंभर कोटी रुपायांची लूट आणि मयूरसिंहासन घेऊन नादिरशहा परत गेला.

परिणाम—या स्वारीमुळें हिंदुस्थानच्या समृद्धीला उतरती कळा लागली. काबूल, काश्मीर व पंजाब हे मोंगली प्रान्त नादिरशहाच्या ताब्यांत गेले व मोंगल साम्राज्याचा सांगाडा खिळखिळा होऊन याचे लचके तोडले गेले. या सर्व परिस्थितीचा फायदा घेऊन इंग्रज, फ्रेंच इत्यादि विदेशीय लोक हिंदुस्थान जिंकण्याचा विचार करूं लागले.


१२ आहमदशहा हा **अब्दाली** नामक अफगाणांच्या टोळीचा एक सरदार मोठा भाग्यशाली, साहसी व शूर होता. नादिरशहाच्या कारकीर्दीत हा प्रसिद्धीस आला. इ. स. १७४७ त नादिरचा खून झाल्यावर त्यानें अफगाणिस्थानचें स्वातंत्र्य पुकारलें. आपल्या धन्याप्रमाणेंच हाही मोठा महत्वाकांक्षी विजिगीषु होता. त्यानें सहा वेळां हिंदुस्थानवर स्वारी केली, व पहिली खेरीजकरून इतर सर्वांत त्याला यशही आलें. पहिल्या स्वारींत शहाजादा आहमदशहा व वजीर कमरुद्दीन यांच्या शौर्यानें व बुद्धिमत्तेनें सरहिंद येथें याचा १७४८ त पूर्ण पराभव झाला. हाच



औरंगजेब व गोवळकोंड्याचा वेढा.



दौलताबाद येथील औरंगजेबाची कबर.



बऱ्हाणपूरचा किल्ला.

मोंगलांचा शेवटचा विजय! या लढाईमुळें मोंगलांच्या सत्तेचा मालवूं लागलेला दिवा किंचित् पाजळला; परंतु वजीर कमरुद्दीन, बादशहा महंमदशहा व राजकारणपटु निजामउल्मुल्क यांचा अंत झाल्यामुळें मोंगली राज्य दुर्बळ झालें.

१३ आहमदशहा (१७४८--१७५४):— महंमदशहाचा मुलगा आहमदशहा सर्व वजिरांच्या संमतीनें इ. स. १७४८ त गादीवर आला. तख्तनशीन होतांच याच्या दुर्दैवामुळें इ. स. १७४८ च्या शेवटीं **अब्दालीनें दुसरी स्वारी** करून हिंदुस्तानावर आपत्ति आणिली. लाहोर व मुलतान हे सुभे ताब्यांत घेऊन तो परत फिरला. आहमदशहा फारच दुबळा होता. त्यामुळें दरबारांत दुहीची वाढ होऊन मराठी सत्तेची प्रगति झाली; व इंग्रज आणि फ्रेंच लोकांना दंगल माजविणेची मुभा मिळाली. त्याचा वजीर सफ्दरजंग याची जागा आपल्याला मिळावी म्हणून निजाम उल्मुल्काचा नातू सेनापति गाझी उद्दीन यानें आपला पक्ष निर्माण केला. त्यामुळें सफ्दरजंगाची मंडळी व गाझी उद्दीनाची मंडळी यांमध्यें कांहीं महिनेपर्यंत रस्त्यांत चकमकी उडत असत. शेवटीं गाझी उद्दीन मराठ्यांच्या साहाय्यानें यशस्वी होऊन त्यानें बादशहाचे डोळे काढून त्याला कैद केलें व जहांदार शहाच्या एका वृद्ध मुलाला आलमगीर हें नांव देऊन गादीवर बसविलें. आहमदशहा नेहमीं विलासांत व चैनींत गुंग असून राज्यकारभाराकडे दुर्लक्ष करीत असे. त्यामुळें त्याचें राज्य महंमदशहाच्या राज्यापेक्षांही संकुचित झालें. याच्या मृत्युच्या वेळीं पंजाब, अयोध्या, रोहिलखंड, बंगाल व दक्षिण हैद्राबाद येथें स्वतंत्र मुसलमान सुभेदार राज्य करीत होते. बंगाल व बिहार या प्रांतांतून मराठे चौथाई वसूल करीत असत. बाकी सर्व उरलेला देश हिंदू राज्याच्या छायेखालीं होता. समुद्रालगतचीं कांहीं शहरें युरोपियनांच्या हातीं होतीं.

१४ दुसरा आलमगीर (१७५४--१७५९):—हा बादशहा गादीवर येतांच, गाझी उद्दीन वजीर होऊन त्यानें क्रूरता, लहरी स्वभाव व स्वार्थ यांमुळें दिल्लीच्या राज्यावर बऱ्याच आपत्ती आणिल्या. अब्दालीच्या ताब्यांत असलेल्या पंजाब प्रान्तावर गाझी उद्दीनानें हल्ला

करून तो आपल्या स्वाधीन करून घेतला. हें ऐकून अब्दालीनें चिडून जाऊन दिल्लीवर तिसरी स्वारी केली. या वेळीं गाझीउद्दिनानें भित्रेपणानें अब्दालीची क्षमा मागून आपला जीव वाचविला. अब्दालीनें दोन महिने दिल्ली व मथुरा हीं धनाढ्य शहरें लुटलीं; आपला मुलगा तैमूर याला लाहोर येथें प्रतिनिधि व एक नातलग नजीब उद्दौला याला दिल्ली येथें गाझीउद्दीनाऐवजीं मुख्य वजीर अशा नेमणुका करून हा जून १७५७ मध्यें परत गेला.

१५ पंजाबांत मराठ्यांचें आगमनः— अशा रीतीनें दुय्यम दर्जा प्राप्त झाल्यामुळें संतापून गाझीउद्दीनानें लौकरच राघोबादादाचें साहाय्य घेऊन नजीबउद्दौल्याला हाकललें, व स्वतः वजीरपद प्राप्त करून बादशहा, राजवाडा व राजधानी यांना त्यानें स्वाधीन करून घेतलें. शहाजादा शहाआलमलाही पकडण्याचा त्याचा बेत होता, परंतु आपल्या थोड्याच अनुयायांनिशीं त्यानें लढून आपला मार्ग काढला व अयोध्या आणि बंगालकडे तो पळून गेला; त्यामुळें गाझी त्याला पकडूं शकला नाहीं. गाझीउद्दिनानें नंतर सर्व राज्यव्यवस्था हातीं घेतल्यावर त्याच्या चिथावणीनें राघोबानें पंजाबावर स्वारी करून तो प्रान्त तैमूरकडून जिंकून घेतला, व तेथें इ. स. १७५८ मध्यें मराठ्यांचें राज्य स्थापन केलें. गाझीचा व मराठ्यांचा सूड उगवण्याकरतां अब्दालीनें चौथी स्वारी (इ. स. १७५९) केली. हें ऐकून गाझीउद्दीन भ्याला व बादशहाशीं आपण केलेली वागणूक कदाचित् अब्दालीला कळेल म्हणून यानें बादशहाची कत्तल करून दुसऱ्याच एका शहाजाद्याला गादीवर बसविलें. परंतु त्याचा हक्क कबूल न करतां बऱ्याच लोकांनीं शहाआलमला सहानुभूति दाखविली. अब्दाली आपला सूड घेईल या भीतीनें गाझी जाटांकडे व दक्षिणदेशांत पळून गेला व तेथून पुढें मक्का, काबूल वगैरे ठिकाणीं राहिला. अब्दाली व मराठ्यांमधील या वेळच्या लढाईचें वर्णन पुढें येईल.

१६ शहाआलमः— इ. स. १७६० त आहमदशहा अब्दालीनें दिल्ली लुटली व तो आसपासच सैन्याचा तळ देऊन राहिला. मराठ्यांचा

सेनापति विश्वासराव यानें दिल्ली जिंकली, व शहाआलमचा पुत्र जवान-बख्त याला सिंहासनावर बसविलें. स्वतः विश्वासरावालाच महाराज करावें असा कांहीं मराठे सरदारांचा विचार होता; परंतु अब्दाली इतका नजीक असतां असें करणें अनुचित ठरलें. पानिपतच्या विजयानंतर अब्दालीनें जवानबख्तची बादशाही कायम ठेविली, तरी खरा बाद-शहा शहाआलमच होता. परंतु शहाआलम जवळ जवळ दहा वर्षे दिल्लीबाहेर राहिला. त्यानें बंगाल घेण्याचा प्रयत्न केला; परंतु बंगालच्या सुभेदाराला इंग्रजांची मदत असल्यामुळें इ. स. १७६४ त बक्सरच्या लढाईत अयोध्येचा नबाब शुजाउद्दौला यासह त्याचा पराभव होऊन हा बेत फसला. बंगाल्यांतील सारावसुलीचा दिवाणी हक्क त्यानें इंग्रजांना दिला व त्याबद्दल दरसाल पंचवीस लाख खंडणी देण्याचें इंग्रजांनीं कबूल करून अलहाबाद व कोरा ह्या प्रांतांचें स्वतंत्र राज्य त्याला दिलें. तेव्हांपासून तो तेथेंच राहूं लागला; परंतु दिल्लीचें सिंहासन मिळविण्याची आकांक्षा मराठ्यांनीं त्याच्या मनांत भरविली; व त्याला तेथें नेऊन त्यांनीं गादीवरही बस-विलें(इ. स. १७७०). यामुळें मराठ्यांचें सामर्थ्य अधिकच वाढलें; कारण शहाआलम हा फक्त नांवाला बादशहा होता; पण सर्व राज्यकारभार शूर व राजकारणकुशल मराठा **महादजी शिंदे** हाच पहात होता. महादजी शिंद्यास दिल्लीचा कारभार सुयंत्रित करावयाचा होता; परंतु पुण्यास माधवराव व नारायणराव पेशव्यांच्या मृत्यूमुळें त्याला दिल्लीकडील कामें अर्धवट टाकून दक्षिणेंत जावें लागलें.

महादजी परतल्यावर दिल्लींत निरनिराळ्या पक्षांमध्यें तंटे सुरू झाले व ते पुष्कळ वर्षेपर्यंत टिकले. त्यामुळें दिल्लीच्या संकुचित राज्यांत वजीर मंडळी भराभर बदलण्यापलीकडे विशेष महत्त्वाचें असें कांहींच झालें नाहीं. इ. स. १७८३ च्या सालबाईच्या तहापर्यंत महादजी शिंदे दक्षिणेंत गुंतला होता. त्यानंतर तो उत्तर हिंदुस्तानांत आला, व इंग्रजांच्या संमतीनें बादशहाकडून पेशव्यांच्या नांवानें मुख-त्यारी घेऊन त्याच्यातर्फे स्वतः दिल्लीचा राज्यकारभार पाहूं लागला. या वेळीं आग्र्याचा किल्लाही त्याला मिळाला, व सर्व मोंगल सरदार त्याला शरण आले; त्यामुळें महादजी उत्तर हिंदुस्तानांत प्रमुख झाला. बादशाहीचा योग्य बंदोबस्त करण्यासाठीं महादजीस अनेक गोष्टी कराव्या

लागल्या; त्यामुळें लोक त्याचा द्वेष करूं लागले, व रजपूत राजेही त्याच्याशीं लढण्यास तयार झाले. या परिस्थितींत बादशहा धरसोडीचें वर्तन करीत होता. शेवटीं एक सरदार गुलाम कादर याला महादजी विरुद्ध लढण्यास बादशहानें भर दिली. मोंगल व मराठ्यांत एक चकमक झाली, तींत शिंदेचा जय झाला. तरी बादशाही दुटप्पी वर्तनामुळें महादजी दिल्लीस गेला नाहीं. ही संधी साधून गुलाम कादरनें बादशहाला दिल्लीच्या राजवाड्यांत गांठून त्याच्याकडून वजिरी कायम करून घेतली, व पुरलेल्या संपत्तीची बादशहाकडे मागणी केली. ती देण्याचें नाकारल्यामुळें त्यानें बादशहाला चाबकानें मारिलें, त्याचे डोळे काढिले आणि तो व त्याचा परिवार यांवर पाशवी अत्याचार केले. शेवटीं बादशहाची ही दीन स्थिति पाहून त्याची सोडवणूक करण्यासाठीं महादजी दिल्लींत आला, आणि बादशहाच्या कुटुंबाची कैदेतून सुटका करून, गुलाम कादरला ठार मारून, बादशहाला खूष करण्यासाठीं, त्यानें त्याचे अवयव छिन्न विछिन्न केले. इ. स. १७८९ सालीं बादशहास नऊ लाख रुपयांची त्यानें नेमणूक बांधून दिली. यासाठीं बादशहानें पेशव्यास मुख्य मुखत्यारी दिली; व महादजीस 'आलिजाह बाहादुर' अशी पदवी दिली. अशा रीतीनें बादशाहीची व्यवस्था सुरळीत चालली. परंतु महादजीच्या मृत्यूनंतर बादशहाची नेमणूक योग्य रीतीनें पोचेना; शेवटीं १८०३ सालीं इंग्रज सेनापति लॉर्ड लेक यानें मराठ्यांकडून दिल्ली काबीज केल्यावर बादशहानें इंग्रजांच्या आश्रयाचा स्वीकार केला.

१७ मोंगल वंशांतील शेवटले बादशहाः— इ. स. १८०६ मध्यें हतभागी व इंग्रजांचा पेनशनर असा हा बादशहा मरण पावला. त्याचा पुत्र **अकबर** हा १८३६ पर्यंत फक्त नामधारी राजा होता; कारण वस्तुतः दिल्लीचें राज्य इंग्रजांच्या हातांत होतें. नंतर त्याचा मुलगा **महंमद बहादुरशहा** हा मोंगल वंशाचा शेवटचा बादशहा झाला. १८५७ सालच्या मोठ्या बंडाचा शेवट होतांच इंग्रजांनीं बादशहाला कैद करून ब्रह्मदेशांत पाठविलें, आणि याचे मुलगे व नातू यांना गोळी घालून ठार मारिलें. अशा रीतीनें प्रतापशाली मोंगल बादशाहीचा शेवट झाला. तेव्हांपासून इंग्लंडचे राजे हिंदुस्तानचे सार्वभौम बादशहा झाले.

प्रकरण ९ वें.

(* सिखांचा उदय)

१ गुरु नानक (१४६९-१५३८): - हिंदुधर्मांतील कुरीति व दौर्बल्य दूर करण्याचा प्रयत्न करण्याऱ्या मध्ययुगीन महात्म्यांपैकीं, **रामानुज, रामानंद, तुकाराम, रामदास, चैतन्य, कबीर** व **नानक** हे प्रमुख आहेत. यांतील नानकानें सिख धर्माचा पाया घातला. याचा जन्म तलवण्डी गावीं इ. स. १४६९ त झाला. पुढें स्वतःचें पवित्र जीवन व उपदेशामृत यांमुळें त्यानें सर्व लोकांना मोहित केलें. एका परमात्म्याची उपासना; मूर्तिपूजन, तीर्थयात्रा, श्राद्ध, यज्ञ वगैरेचें खंडण; मनुष्यमात्रांकडे समतेची दृष्टि व भ्रातृभाव; वेदान्त व संसाराची असारता यांचें खंडण आणि व्यावहारिक जीवन सुखमय बनविण्याचा उपदेश करणें ही कामगिरी त्यानें आजन्म केली.

२ गुरु अंगद:—गुरु नानकानें आपल्या दोन पुत्रांपैकीं, एकालाही गादी न देतां **अंगद** नामक एका योग्य शिष्याला ती दिली. अंगदानें गुरुमुखी लिपी बनविली, व पंजाबी भाषेंत **बाला** कवीकडून नानकाची जन्मकथा लिहविली. त्यानें निरनिराळ्या ठिकाणीं अन्नसत्रें सुरू करून सिख लोकांना एकत्र जमण्याचा व दान करण्याचा मार्ग दाखविला. **गुरु अमरदास** व **गुरु रामदास** यांनीं अकबर बादशहाची मैत्री संपादन केली, त्याच्याकडून भूमि व धन प्राप्त करून अमृतसरचा तलाव बांधविला, व नगर वसविलें. यामुळें सिख धर्माचा प्रसार झाला. नंतर रामदासानें आपला कनिष्ठ पुत्र **अर्जुन** याला आपली गादी दिली.

३ गुरु अर्जुनानें (१५८२-१६०७) सिखांचें बळ बरेंच वाढविल्यामुळें तो फार प्रसिद्ध आहे. पुष्कळशा साधनांनीं त्यानें अमृत-

---

* टीप:—इतर मराठी पुस्तकांत "शिख" शब्द वापरण्यांत येतो. परंतु त्याचा खरा उच्चार "सिख" असा असल्यामुळें आह्मी तसा शब्दप्रयोग केला आहे. "सिख" याचा अर्थ शिष्य असा आहे.

सरला सिखांचें धार्मिक केंद्र केलें; आदिग्रंथ नामक एक धर्मपुस्तक रचिलें; व आपल्या अनुयायांना दान देण्यास सोपें व्हावें म्हणून बावीस मठ स्थापन केले. खुस्रूच्या बंडाच्या वेळीं खुस्रूला यश मिळावें ह्मणून यानें प्रार्थना केली. बंड मोडल्यावर जहांगिरानें या गुरूला ठार मारून रावी नदींत फेकून दिलें. या कारणानेंच मुसलमान व सिख यांचा विरोध सुरू झाला.

४ गुरु अर्जुनाचा पुत्र **गुरु हरगोविंद** यानें फक्त वयाच्या १२ व्या वर्षींच आपल्या बापाच्या मृत्यूचा सूड घेण्यासाठीं माळ, कमंडलु, दोन तरवारी, छत्र, शिरस्त्राण व बहिरी ससाणा हीं बाळगण्यास सुरवात केली, आणि आपल्या अनुयायांना शस्त्र-धारण करण्याची व मुसलमानांची कत्तल करण्याची आज्ञा दिली. याप्रमाणें सिखांनीं फकिरी वृत्तीचा त्याग करून लष्करी वृत्ति स्वीकारावी असा त्यानें बराच प्रयत्न केला. या गोष्टी पाहून जहांगीर बादशहानें त्याला ग्वाल्हेरच्या किल्यांत कैदेंत ठेविलें; पण कांहीं काळानें त्याला सोडून दिलें. पुढें पंजाबच्या सुभेदाराच्या जुलमास कंटाळून त्याला तोंड देण्यासाठीं यानें तयारी केली. तीन चकमकी होऊन त्यांत हरगोविंदाला यश आलें. यामुळें सिख लोक मोंगलांना दुर्बल समजूं लागले व त्यांनीं सैन्यभरतीनें आपल्या गुरूचें बळ वाढविलें. याच्या मागून **हरराय** व **हरकिशन** असे दोन गुरू झाले. त्यांच्या वेळीं मुसलमान व सिख यांमधील तंटा चालूच होता.

५ **गुरू तेघबहादुरनें** सिखांना सैनिक करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. सिख त्याला "सच्चा बादशहा" मानीत असत. राजद्रोही वागण्यामुळें औरंगजेबानें त्याला कैद केलें; पण कालांतरानें सोडलें. नंतर यानें आपली पूर्वीची वर्तणूक अधिकच जोरानें चालू ठेवून मुसलमानांविरुद्ध लोकांना चिथावलें व आपल्या सैन्यांत लुटारूंची भरती केली. यामुळें औरंगजेबानें त्याला पकडून दिल्लींत ठार मारिलें. याच्या मरणानें पंजाब व माळवा येथील हिंदू लोकांना खूप अवसान आलें. याचा फायदा घेऊन तेघबहादूरचा मुलगा **गुरु गोविंद** यानें सर्वांना संघटित केलें.

६ गुरु गोविंदसिंह (१६७५--१७०८):— हा शूर, साहसी, बुद्धिमान्, उदार, सुधारक व दूरदर्शी नेता होता. औरंगजेबाचें बळ पाहून तो वीस वर्षे पर्वतांत दडून सुधारणा, स्वराज्य व संघटण यांच्या साधनांचा विचार करीत होता. नंतर त्या योजनांना त्यानें स्वरूप देण्याला सुरवात केली. त्यानें आपल्या शिष्यवर्गातील जातिबंधन तोडलें, सैन्यांत अपूर्व उत्साह भरला, व मेषवृत्तीच्या हिंदूंना नरशार्दूल केलें. सिख शब्दांचे 'सिंह' शब्दांत रूपांतर करून प्रत्येक सिखानें केंस, कंगवा, कृपाण, कडी, व कच्छ (मांड चोळणें) हीं पांच धारण करण्याची त्यानें आज्ञा दिली, आणि अमृतसर हें यात्रास्थान करून ग्रंथसाहेबाची पूजा आरंभिली. तसेच त्यानें मोंगली मुलखांत लुटालूट करण्यास सिखांना आज्ञा दिली. बादशाही सैन्याशीं युद्ध होऊन त्यांत गुरु गोविंदाची आई, बायको व दोन लहान मुलें गफलतीनें मोंगल सुभेदाराच्या हातांत सांपडलीं. त्यांना मुसलमान व्हा असें सांगितल्यावर त्यांनीं त्याचा धिःकार केला; ह्मणून त्याच्या मुलांना भिंतींत चिणून ठार करण्यांत आलें. या अत्याचारामुळें साऱ्या पंजाबांत संताप पसरला. मोंगलांना तोंड देण्याची आपणांत शक्ति नाहीं असें पाहून गुरू गोविंदसिंह दक्षिणेंत गेला व तिकडेच १७०८ मध्यें मरण पावला; तरी त्यानें पसरलेल्या उत्साहामुळें मोंगलांच्या अत्याचारांचा सूड घेण्यास पंजाबांतील लोक तयार होते.

७ गुरु बंदा :— मुसलमानांबरोबर धर्मयुद्ध करून, अतांपर्यंत आपणावर झालेल्या अत्याचाराचा व गुरुगोविंदाच्या वीर पुत्रांच्या वधाचा सूड उगविणें येवढें एकच ध्येय आतां सिखांचें होतें; ह्मणून बादशाही खजिना व समृद्ध शहरें लुटून आणि जागोंजागीं तटबंदी करून मुसलमानांचा खरपूस समाचार घ्यावयास सिखांनीं सुरवात केली. सरहिंद जिंकून सतलज व यमुना यांमधील देशांत सिखांनीं स्वराज्य स्थापन केलें. शेवटीं बादशहा फर्रुखसीयरनें बऱ्याच यत्नांनीं पुष्कळ सिखांसमवेत इ० स० १७१६ त गुरुबंदाला दिल्लींत आणलें व दोन हजार सिखांची कत्तल केली. शेवटीं सिंहहृदय बंदानें बादशहाच्या हुकुमाप्रमाणें कोणत्याही विकाराचें चिन्ह न दर्शवितां आपल्या हातानें आपल्या पुत्राचें डोकें उडविलें. नंतर


बंदाच्या शरीरावर सांडसांनीं डाग देण्यांत आले आणि हातापायांचीं बोटें तोडण्यांत आलीं; व त्याचा शिरच्छेद करून मस्तक दिल्लीच्या एका वेशीवर टांगण्यांत आलें. परंतु या अत्याचारांनीं सिखांचा उत्साह कमी न होतां उलट त्यांचा त्वेष भडकला व पुढें येणाऱ्या कष्टांना व संकटांना सिखांनीं अपूर्व धैर्यानें तोंड देऊन आपल्या गुरूच्या मृत्यूचें पारणें फेडलें.

८ **सिखांची वाढती शक्ति** (१७१६–१७९८):— बंदाच्या वधानंतर सिखांनीं आपल्या डोकीचे केस काढले व इतर हिंदूंप्रमाणें ते शेती करूं लागले. इतर पुष्कळसे सिख डोंगरांत पळून गेले; परंतु तेथें ते मुसलमानांचा सूड घेण्याची संधी केव्हांही सोडीत नसत. नादिरच्या स्वारीनंतर डोंगरांतून खालीं उतरून अमृतसर येथें ते जमूं लागले. या ठिकाणाहून विजेप्रमाणें चमकत, मेघाप्रमाणें गडगडाट करीत, सर्व पंजाब प्रांताच्या मुसलमानांवर हें सिखांचें संकट जाऊन आदळलें. तरी बादशाही सैन्याला त्याचा बंदोबस्त करतां आला नाहीं. सन १७४८ ते १७६८ या कालांत मोंगलांचें राज्य अगदीं खिळखिळें होऊन गेलें होतें. सिखांच्या भरभराटीला हीच योग्य संधी होती; त्यांनीं ठिकठिकाणचीं मुसलमानी राज्यें हिसकावून घेतलीं व लाहोर जिंकून आपलीं नाणीं पाडिलीं. शिवाय त्यांनीं अनेक मुसलमानांस आपल्या धर्मांत घेतलें.

अशा प्रकारें सिखांनीं आपल्या राज्याचा पाया घातला. मोंगल राज्याच्या ऱ्हासामुळें सन १७६८-९८ या तीस वर्षांच्या अवधींत सिखांचा फारच उत्कर्ष झाला. साऱ्या पंजाबांत व सतलज नदीच्या पलीकडील थोड्याशा प्रदेशांत त्यांनीं आपलीं निरनिराळीं बारा राज्यें स्थापिलीं. व त्यांचा बराच विस्तारही केला. शेवटीं या सर्व राज्यांस संघटित करणारा व सिखांचें एकछत्री राज्य स्थापून त्यांची सत्ता कळसास पोंहचविणारा **रणजितसिंह** नांवाचा एक पुरुष निर्माण झाला, त्याची माहिती पुढें येईल.



Bahadur Shaw
Ferock Sere.
Jehander Shaw.
Nadir Shaw.
Mahommed Shaw.
Allumgire II.
Nizam Ulmulk


Guru Angat
Bhai Bala
Guru Hargobind
Guru Har Rai
Guru Teg Bahadar
Bhai Mardana

शिखांचे दहा गुरु.

प्रकरण १० वें.

मुसलमान रियासतीबद्दल स्फुट विचार.

१ औरंगजेबाच्या दक्षिणेंतील पराभवाचीं कारणें:—औरंगजेबाचा स्वभाव, त्याची वर्तणूक व त्याचा दक्षिणेंतील पराभव या गोष्टी मुख्यतः मोंगल साम्राज्याच्या ऱ्हासाला कशा कारणीभूत झाल्या, याचें वर्णन सातव्या प्रकरणांत, ४, ५, ७, व १० या परिच्छेदांत दिलें आहे; आणि साम्राज्यावर त्यांचा काय परिणाम झाला हें पुढें दाखविलें आहे.

(१) अतिशय वार्धक्यामुळें राज्यांत व्यवस्था ठेवण्याचें व लढाईत प्रमुख भाग घेण्याचें सामर्थ्य औरंगजेबांत राहिलें नव्हतें. त्याच्या मुलांच्या मनांत राज्यतृष्णा असल्यामुळें तेही मराठ्यांच्या बाजूला जाऊन बापाचा किल्ला गिरविण्याचा प्रयत्न करीत होते. त्याचप्रमाणें त्यांच्या वरील औरंगजेबाच्या दडपणामुळें त्यांच्यांतील लष्करी जोम व राज्य-शासनाची शक्ति नष्टप्राय झाली होती. (२) अमीर, उमराव व सैनिक विलासांत गुग झाल्यामुळें त्यांच्यांतील उत्साह व शौर्य यांचा ऱ्हास झाला. यामुळें धडधाकट, साध्या व उत्साही मराठ्यांशीं त्यांचा निभाव लागेना. सरदारलोक नीतिबाह्य झाले व त्यामुळें मराठ्यांनीं त्यांना पैसा देऊन आपल्या बाजूला वळवून घेतलें. (३) औरंगजेब सत्तावीस वर्षे सतत दक्षिणेंत असल्यामुळें उत्तरेकडील राज्यव्यवस्था ढिली पडली व जिकडे तिकडे बेबंदशाही माजून राहिली. दक्षिणेंतील युद्धाच्या वाढत्या खर्चासाठीं औरंगजेबाला सारा वाढवावा लागला; व नवे कर लादावे लागले. या कारणानें प्रजेंत सर्वत्र असंतोष पसरला, ह्मणून त्याला ताज्या दमाचे सैनिक व अन्नाचा पुरवठा हीं मिळेनात. (४) अकबरानें फार मुत्सद्देगिरीनें मिळविलेली हिंदूंचीं सहानुभूति औरंग-जेबाच्या धर्मवेडेपणामुळें नष्ट झाली; व मित्रांऐवजीं ते त्याचे शत्रू बनले. यामुळें हिंदू सैन्याच्या मदतीशिवाय मोंगलांना एकटेंच लढावें लागलें. (५) औरंगजेबानें चालविलेल्या दक्षिणी युद्धांत सरासरी एक लाखापेक्षां अधिक मनुष्यें व तीन लाखांहून जास्त वाहतुकींचीं जनावरें दरसाल मरत असत. त्याचप्रमाणें कोट्यवधि रुपये खर्च होत. यामुळें वडिलोपार्जित खजिना

सुद्धां मोकळा झाला होता. दुष्काळ, दारिद्य व रोगधाड हीं प्रजेस गांजत होतीं. ह्मणून मराठ्यांशीं सतत पन्नास वर्षे लढून सुद्धां त्याला यश आलें नाहीं. या सर्व कारणांमुळें मोंगलसाम्राज्याच्या नाशाची भूमिका तयार झाली व खालील कारणांमुळें शेवटीं तें साम्राज्य नष्ट झालें.

२ **मोंगल साम्राज्याच्या नाशाचीं कारणें**:—बहुतेक सर्व एकसत्ताक राष्ट्रांप्रमाणें मोंगलसाम्राज्याचा पाया फार कच्चा होता. (१) राजकर्त्या बादशहाच्या वैयक्तिक गुणावगुणांवर राज्याचें अस्तित्व अवलंबून असे. शेवटचे अकरा बादशहा राज्यशासनाला अयोग्य होते. (२) परदेशीयांचें साम्राज्य वाढल्यामुळें लोकांच्या मनांत राष्ट्राभिमानाचा अभाव असणें साहजिक होतें. त्यामुळें या राज्याला पुरेसा लौकिक आधार नव्हता. इतकेंच नव्हे तर, संधी साधून तें साम्राज्य गाडून टाकण्याचा हिंदू लोक प्रयत्न करीत. (३) बादशहा मेल्यानंतर त्याची गादी त्याच्या ज्येष्ठ पुत्राला मिळावी असा निश्चित नियम नसल्यामुळें, वारसांमध्यें नेहमीं लढाया होत. त्यामुळेंच बाबरपासून शेवटपर्यंतच्या बादशहांत एक सुध्दां प्रतिस्पर्ध्या-शिवाय नव्हता. बापामुलांमध्यें बेबनाव असे व भावांभावांत युद्धें चालत. त्यामुळें राजवाड्यांना कसायखान्यांचें रूप आलें व गादीचा मार्ग रक्तमांसानें वारंवार मारवला गेला. साहजिकच प्रजेंतही कट होत असत; आणि शहाजाद्यांच्या व पराभूत पक्षाच्या बुद्धीचा राष्ट्राला कांहींच उपयोग नसे. (४) राष्ट्राचा डळमळणारा डोलारा सारखा ठेवण्यासाठीं जरूर त्या कायम राष्ट्रीय संस्था नव्हत्या. त्याचप्रमाणें अकबरानें निर्माण केलेलें लष्कर, जरी त्या काळीं हिंदू लष्करापेक्षां बळकट असलें, तरी योग्य शिस्तीच्या अभावीं तें एकंदरींत घटत चाललें होतें; त्यामुळें शहा-जहानच्या वेळीं मोंगली लष्कराला इराण्यांकडून कंदहार जिंकतां येईना, व पुढें तर औरंगजेब व इतर बादशहाचे वेळीं त्या लष्कराचा मराठ्यांसमोर टिकावही लागेना. मोंगलांचा तोफखाना कमी प्रतीचा होता, शिवाय त्यावर युरोपियन लोक असत; व मोंगल सेनापती अनुभविक आणि कार्यक्षम नव्हते. या बाबतींत युरोपियन सरस असल्यामुळें त्यांनीं एतद्देशियांचा सहज पाडाव केला. (५) नाविक सत्तेकडे पूर्वीपासूनच दुर्लक्ष असल्या-

मुळें मराठे व विदेशीयांनीं मोंगलसाम्राज्याचे समुद्रालगतचे निरनिराळे भाग काबीज केले. (६) इ. स. १५५६ ते १७०७ या दीड शतकांत फक्त चार बादशहा गादीवर आले; तर इ. स. १७०७ ते १७२० या अवघ्या तेरा वर्षांच्या कालांत पांच बादशहा गादीवर बसले. या वरून राजलक्ष्मी स्थिर नव्हती हें स्पष्ट होईल. शिवाय भाऊबंदकीच्या युद्धांत शहाजादे, अनुभवी सरदार व मंत्री यांचा घात; दरबारांतील दुही व बादशहांचे खून यांमुळें बादशाहीचा आब पार निघून गेला होता. (७) मराठ्यांची व सिखांची सत्ता उत्तरोत्तर वाढत होती व त्यामुळें ते दुर्दमनीय झाले. (८) महंमदशहाची कारकीर्द फारच दुबळी असल्यामुळें साम्राज्याचे तुकडे तुकडे झाले. (९) शिवाय नादिरशहा व आहमदशहा अब्दाली यांच्या हल्ल्यामुळें मोंगली साम्राज्याचीं हाडें फारच खिळखिळीं झालीं. याचा फायदा घेऊन प्रथम मराठ्यांनीं व नंतर इंग्रजांनीं हें साम्राज्य गिळलें.

मुसलमानी अमलाचे विशेष.

हिंदू जागृतिः—मुसलमानी साम्राज्याच्या दीर्घ अस्तित्वामुळें प्राप्त झालेल्या अवनति व दास्य यांस न जुमानतां हिंदूंनीं आपलें डोकें वर केलें व असामान्य प्रतिकारशक्ति दाखविली. उत्तर आफ्रिका, इजिप्त, आशियामायनर, पर्शिया, मध्य आशिया, चीन व अफगाणिस्थान इत्यादि देशांनीं मुसलमानी स्वाऱ्यांमुळें स्वातंत्र्य गमावून त्यांचें दास्यत्वच नव्हे, तर त्यांचा धर्म, भाषा, चालीरीति वगैरे मुद्धां स्वीकारल्या. या देशांतील राजकीय, धार्मिक, सामाजिक व व्यापारिक क्षेत्रांमध्येंही मुसलमानांचा पगडा बसला. परंतु एकाच हिंदुस्तान देशानें इ. स. ७०० पासून १२०० पर्यंत मुसलमानांना पुढें येऊं दिलें नाहीं व त्यानंतरही त्यांची राष्ट्रीय प्रगति फारशी होऊं दिली नाहीं. त्यांना म्लेंच्छ व पतित समजून व त्यांच्यावर बहिष्कार घालून, सामाजिक आणि धार्मिक बाबतींत त्यांना पाऊलही सरकूं दिलें नाहीं. इतकेंच नव्हे तर संधी मिळतांच मुसलमानांबरोबर दोन हात करून राजकीय बंधनेंहीं तोडून टाकण्यास ते तयार होते. मुसलमान झालेले कांहीं हिंदू वगळून इतर समाज हिंदू

धर्मांसच चिकटून राहिला. त्यामुळें सिंध काबीज केल्यापासून आजपर्यंत १२०० वर्षांत सुद्धां हिंदुस्तानांत फक्त ६॥ कोटी मुसलमान असून २४ कोटी हिंदू आहेत. इतर देशांना १३०० वर्षांइतक्या दीर्घ कालांतही मुसलमानांचें जूं टाकतां आलें नाहीं; परंतु इस्लामी रियासत स्थापन झाल्यापासूनच त्यांच्याशीं बंडाचें धोरण ठेवून व सदोदित लढून केवळ ४॥ शें वर्षांच्या अल्पकालांतच मुसलमानी राज्याची इमारत पूर्ण वैभवांत असतांही हिंदूंनीं तिला असा जोराचा धक्का दिला कीं, ती सपशेल कोलमडून पडली आणि हिंदूंनीं हिंदुस्तानच्या ३/४ भागावर पुनः हिंदू राज्य प्रस्थापित करून स्वातंत्र्याचा झेंडा फडकाविला. याचें सविस्तर वर्णन पुढें येईल.

खालील कोष्टकावरून मुसलमानांची राजकीय प्रगति व हिंदूंची प्रतिकारशक्ति स्पष्टपणें डोळ्यांसमोर राहील.

इ. स. १०१८ ते ११९० सिंध व पंजाब येथें कांहीं वर्षे वगळून मुसलमानी अंमल होता.

" ११९० ते १२३६ सिंध, पंजाब, अजमीर, दिल्ली, कलिंजर, बंगाल, ग्वाल्हेर, रथंनभोर, माळवा, काल्पी, संयुक्त-प्रांत व बिहार या ठिकाणींच फक्त मुसलमानी राज्यें होतीं.

" १२३६ ते १२७० वरीलपैकीं बरेच रजपूत राजे स्वतंत्र झाले.

" १२७० ते १२८७ कांहीं स्वतंत्र रजपूत राजे जिंकिले गेले.

" १२८७ ते १३०० रजपूत पुनः स्वतंत्र झाले.

" १३०० ते १३१६ रथंनभोर, चितोड, जैसलमीर, गुजराथ, माळवा पुनः मुसलमानी अमलाखालीं आले, व मलिक काफूरनें चार स्वाऱ्या करून दक्षिणदेश लुटला.

" १३१६ ते १३२० रजपूत स्वतंत्र झाले.

" १३२० ते १३४० डाका, तिरहुट, बेदर, वरंगळ, देवगिरी हे प्रांत दिल्लीच्या मुसलमानी राज्याला जोडले गेले.

" १३४० ते १५४० राजपुताना, काठेवाड, ओरिसा, पूर्व बंगाल व केपकामोरीन पर्यंत सर्व दक्षिण देश

		[बहामनी राज्य वगळून] हे भाग स्वतंत्र हिंदू राजांच्या अमलाखालीं होते.
इ. स.	१५४० ते १५४५	राजपुतान्यावर शेरशहाच्या स्वाऱ्या.
”	१५४५ ते १५६५	उत्तर हिंदुस्तान पूर्वीप्रमाणें स्वतंत्र झाला. परंतु ओरिसा मुसलमानांनीं जिंकिला व विजयानगरच्या राज्याचा नाश करून कावेरीच्या पलीकडे हिंदू राजाची पिछेहाट केली.
”	१५६५ ते १६४५	राजपुताना व दक्षिण हिंदुस्तानमधील हिंदू राजांनीं मुसलमानांचें मांडलिकत्व पतकरिलें.
”	१६४५ ते १७०७	हिंदूंचें स्वातंत्र्य--युद्ध चालू राहून त्यांत हिंदूंचा विजय झाला.
”	१७०७ ते १७६०	मोंगल बादशहांकडून हिंदूंनीं प्रांतामागून प्रांत जिंकून घेतले. १७६० च्या सुमारास मराठ्यांचें राज्य खालीं दिलेल्या प्रांतांखेरीज अट्टक ते रामेश्वरपर्यंत पसरलें. [१] सिंध [२] दिल्ली [३] रोहिलखंड [४] अयोध्या [५] बिहार [६] बंगाल [७] हैद्राबाद हीं मुसलमानी अमलाखालीं होतीं; पण सिंधखेरीज या सर्वांकडून मराठे खंडणी वसूल करीत.
”	१७६० ते १८००	सिख, रजपूत, मराठे, मुसलमान, आणि इंग्रज यांचेमध्यें सर्व देश वांटला गेला.
”	१८०० ते १९२८	इंग्रजांनीं स्वतंत्र राज्यें नाहींशीं केलीं; व मुसलमान आणि हिंदू राजे उभयतः इंग्रजांचे छत्राखालीं गेले.

मुसलमानी अमलाचें सिंहावलोकनः--मुसलमानी रियासतींतील धार्मिक छळ, देवळांची पाडापाडी, उघडपणें प्रार्थनेची बंदी, हिंदी कला, वाङ्मय-थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे हिंदी संस्कृतीची मुस्कटदाबी यांमुळें मुसलमानी रियासत तिरस्करणीय वाटते. परंतु ख्रिस्ती लोकांनीं धर्मांधतेमुळें आपल्याच लोकांचा केलेला छळ लक्षांत घेतां, मुसलमानांच्या या वागणुकीबद्दल खेद करण्याचें मुळींच कारण

नाहीं. आश्चर्याची गोष्ट इतकीच कीं मुसलमानांनीं या ठिकाणीं बरीच सहिष्णुता दाखविली. मुसलमानी रियासतीचे मुख्य विशेष पुढें थोडक्यांत दिले आहेत. (१) अकबराच्या कारकीर्दीपासून औरंगजेबाच्या कारकीर्दीपर्यंतच्या कालांत गोवध बंद असून प्रजेच्या सहानुभूतीवर व सक्रिय आधारावरच राज्य उभारण्याचा मुसलमानांकडून प्रयत्न करण्यांत आला हें प्रशंसनीय आहे. (२) पूर्वीच्या मुसलमानांनीं हिंदी संस्कृति, तत्वज्ञान, आयुर्वेद, गणितशास्त्र, शिल्पकला, इत्यादि आशिया, आफ्रिका व युरोप खंडांत नेऊन त्या ठिकाणीं त्या लोकप्रिय केल्या. (३) गझनवी, घोरी, तैमूर, नादिर यांच्यामार्फत हिंदी शिल्पकलेचा अफगाणी, तुर्की व इराणी शिल्पकलेवर बराच पगडा बसला. (४) हिंदुस्तानचा परदेशी व्यापार मुसलमानांनीं त्या वेळच्या ज्ञात जगांत फैलावला व उद्योगधंद्यांना उत्तेजन दिलें. (५) त्या वेळीं मुसलमानी व ख्रिस्ती वाङ्मय; ग्रीक औषधशास्त्र व ज्योतिषशास्त्र; आणि युरोपियन शिल्पशास्त्र, उद्योगधंदे, लष्करी शिस्त, तोफखाना व नौकाशास्त्र हीं हिंदुस्तानांत आलीं. (६) हिंदुस्तानांत इराणी चालीरीतींचा प्रसार झाला, व मुसलमानांनीं हिंदू चालीरीतींचा स्वीकार केला. (७) मुसलमान साधूंना हिंदू लोक स्तवन करीत असत; व दादू, कबीर, नानक व अकबर यांनीं हिंदूंना व मुसलमानांना रुचणारा असा धर्म स्थापन केला. (८) विजापूर, अहमदाबाद, जौनपूर, आग्रा, दिल्ली, लाहोर इत्यादि ठिकाणीं भव्य इमारती बांधून मुसलमान बादशहांनीं आपलें नांव अजरामर केलें आहे. (९) हिंदी शिल्पकला व लेखनकला, स्थापत्य, ललितकला, चित्रकला वगैरेंना उत्तेजन मिळालें. (१०) राजघराण्यांतील लोकच सुभेदार वगैरे अधिकारी असल्यामुळें प्रजेचा राजघराण्याशीं वारंवार संबंध येऊन राजनिष्ठा वाढे. (११) सर्व देशभर मुलकी, दिवाणी व लष्करी व्यवस्था एकाच पद्धतीची असल्यामुळें ऐक्यता दृढावली. (१२) मोंगलांनीं शेतीची उन्नति केली; खाणींतून शक्य तेवढीं रत्नें काढविलीं; रस्ते व पूल बांधले; ठरींव वजनें, मापें व उत्तम कसाचीं नाणीं अमलांत आणलीं.

त्यामुळें मुसलमानांनीं केलेल्या कांहीं वाईट गोष्टींकडे दुर्लक्ष केल्यास त्यांनीं हिंदुस्तानाला ऋणी केलें आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

छत्रपति भोसले घराणें

मालोजी (ज. १५५०–१६१९)

शहाजी (ज. १५९४–१६६४)

जिजाबाईचे मुलगे

संभाजी (लढाईंत मारला गेला)

छत्रपति शिवाजी (१६६४–१६८०)

तुकाबाईचा मुलगा.

व्यंकोजी (१६७५–१६८२ तंजावरची गादी)

छत्रपति शिवाजी यांचे मुलगे:

संभाजी (१६८०–८९

शाहू (साताराची गादी) (१७०८–४९)

रामराजा (दत्तक) (१७४९–७७)

दुसरा शाहू (१७७७–१८०८)

दुसरा शाहू यांचे मुलगे:

प्रतापसिंह (१८०८–३९)

रामराजा

शहाजी (१८३९–४८)†

राजाराम (पहिला) (१६८९–१७००) (कोल्हापूरची गादी)

(बा. ताराबाई)

शिवाजी (१७००–१२)

रामराजा (शाहूनें दत्तक घेतला)

(बा. राजसबाई)

*संभाजी दुसरा (१७१२–६०)

शिवाजी (दत्तक) (१७६०–१८१२)

शिवाजी (दत्तक) यांचे मुलगे:

शंभू (१८१२–२१)

शहाजी उर्फ बाबाजी (१८२१–३८)

शिवाजी उर्फ बाबासाहेब (१८३८–६६)

राजाराम दुसरा (१८६६–७०)

शिवाजी (दत्तक) (१८७०–८३)

शाहू (दत्तक) (१८८४–१९२२)

राजाराम तिसरे (१९२२—)

* टीप:–शिवाजी दुसरा याचा राज्याभिषेक करून ताराबाईनें कोल्हापूर येथें स्वतंत्र गादी स्थापिली (१७१०).

† टीप:–लार्ड डल्हौसीनें साताराची गादी इ० स० १८४८ त खालसा केली.

मराठी साम्राज्य.

प्रकरण १ लें.

शिवाजीची पूर्वपीठिका.

१ महाराष्ट्र देश व तेथील लोकः— उत्तरेस नर्मदा नदी व सातपुडा पर्वत, दक्षिणेस घटप्रभा व भीमा असे कृष्णा नदीचे फांटे, पूर्वेस वैनगंगा व गोदावरी आणि पश्चिमेस अरबी समुद्र; यांमधील दक्षिण पठारास **महाराष्ट्र** अशी संज्ञा आहे. त्यांत नाशिक, पुणें, सातारा, हे जिल्हे; अहमदनगर, सोलापूर, व औरंगाबाद यांतील कांहीं भाग ; रत्नागिरी, कुलाबा व ठाणें हे जिल्हे व सावंतवाडी वगैरे संस्थानें असलेला कोंकण पट्टीचा भाग यांचा मुख्यतः समावेश होतो. या भागांत मराठी भाषा प्रचलित आहे. आजूबाजूचा बराच प्रदेश डोंगरांनीं व्यापिलेला असल्यामुळें, तेथील लोक ठेंगणे परंतु शूर, धीट, काटक व स्वकार्यदक्ष असे आहेत. या देशाच्या हिंदू व मुसलमानी राज्यांचा इतिहास पूर्वीं दिलाच आहे. प्रस्तुत भागांत मुसलमानांची सत्ता झुगारून, त्याऐवजीं मराठी साम्राज्याची स्थापना व त्याची वाढ कशी झाली यांचें विवेचन केलें आहे.

२ सतराव्या शतकाच्या आरंभींची महाराष्ट्राची राजकीय परिस्थिति समजणें आवश्यक आहे. यावेळीं हिंदुस्थानांत एकंदर पांच मुसलमानी राज्यें होतीं—दिल्लीचें मोंगली राज्य व दक्षिणेंतील निजामशाही, आदिलशाही, कुतुबशाही व बरीदशाही. अशा रीतीनें मुसलमानी राज्य पूर्व–समुद्रापासून पश्चिम–समुद्रापर्यंत व काबूल–काश्मीरपासून पनार नदीपर्यंत पसरलें होतें. याशिवाय पोर्तुगीज व जंजिऱ्याचे हबशी यांच्या ताब्यांत समुद्रकिनाऱ्यावरचे कांहीं किल्ले होते. त्यामुळें (१) स्वतंत्र हिंदू राज्याची मर्यादा पनार नदीपासून केप कामोरीनपर्यंत संकुचित झाली होती. शिवाय (२) उत्तरेंतील रजपूत मोंगली साम्राज्य विस्तारण्यास लागले होते; तर दक्षिणेंतही हिंदूलोक मुसलमानी बादशहांचे एकनिष्ठ नोकर होऊन त्यांचा राज्यविस्तार करीत होते. (३) मुसल-

मानांनीं दिलेल्या जहागिऱ्या व धन यांमुळें पूर्ण बद्ध होऊन दास्यत्वाच्या शृंखला तोडण्याची त्यांची इच्छाही नव्हती. परंतु दाक्षिणी मुसलमानी राज्याच्या आपापसांतील झगड्यांमुळें व प्रत्येकांतील अंतस्थ कलहामुळें तीं निर्बल होऊं लागलीं होतीं; ह्मणून एका बाजूनें शहाजहान व औरंगजेब तीं जिंकण्याचा प्रयत्न करीत होते, तर दुसरीकडून अशा प्रतिकूल परिस्थितीमध्येंही हिंदूंच्या मनांत हिंदूसंस्कृति, धर्म, व स्वराज्य यांविषयीं जाणीव उत्पन्न झाली होती. याच नवचैतन्याच्या जोरावर पन्नास वर्षांनंतर, असंख्य अडचणींतूनही मार्ग काढून, शककर्त्या शिवाजीनें बुडत असलेली हिंदू संस्कृति व नष्टप्राय झालेलें हिंदवी स्वराज्य हीं दीर्घ प्रयत्नानें तरविलीं.

३ मराठी राज्याच्या उदयाचीं कारणें:—क्षत्रियकुलावतंस शिवाजी महाराज यांच्याद्वारा स्वराज्यस्थापनेची भूमिका तयार होण्याला मुख्यतः पुढील कारणें होतीं:— [१] बहामनी राज्यांत पुष्कळ हिंदूंच्या नेमणुका होऊन व त्यांच्या चालीरीति कायम राहून तें राज्य नुसतें मुसलमानी न होतां त्याला राष्ट्रीयत्वाची छटा आली होती. यांतून पुढें निर्माण झालेल्या पांच राज्यांनींही तीच पद्धत बऱ्याच अंशीं चालू ठेविली; याचें उदाहरण ह्मणजे गोवळकोंड्यांत मुरारराव, आकण्णा व मादण्णा; विजापुरांत शहाजी, येसुपंडित व मुरार जगदेव; अहमदनगरांत लखोजी जाधव, शहाजी भोसले वगैरे हिंदू अधिकारी व जहागीरदार होते. [२] दक्षिण देश मुसलमान लोकांच्या घरट्यांपासून फार दूर असल्यामुळें येथें मुसलमानी सैनिकांचा वारंवार पुरवठा होत नसे. फक्त उत्तरेंत शिल्लक असलेल्या थोड्याबहुत मुसलमानांना दक्षिणेंत आगावें लागे. ह्मणून लष्कर, राज्यव्यवस्था वगैरे बाबतींत येथील सुलतानांना हिंदूंवर अवलंबून रहाणें भाग होतें. (३) दक्षिणेंतील मुसलमानी राज्यांत एतद्देशीय मुसलमान व परदेशी मुसलमान असे दोन तट निर्माण झाले होते. ह्मणून येथील राजांना अकबराप्रमाणेंच हिंदूंवर भिस्त ठेवणें प्राप्त होतें. त्यामुळें पुष्कळशा मराठ्यांना दसहजारी, बीसहजारी, अशा उच्च मनसबदाऱ्या मिळाल्या. यांपैकीं भोसले, घाटगे, घोरपडे, जाधव, निंबाळकर, मोरे,

शिंदे, डफळे व माने इत्यादि जहागीरदार प्रसिद्ध आहेत. (४) विजय-नगरचें राज्य शेजारींच असल्यामुळें हिंदू व मुसलमान समबल होते. त्यामुळें मुसलमानांना विशेष धर्मवेडेपणानें वागतां येत नसे. (५) दक्षिणेंतील बऱ्याच मुसलमान राजांनीं हिंदू स्त्रियांशीं विवाह केले, व पुढें पुढें त्यांपासून झालेले मुलगे गादीवर बसले; त्यामुळें हिंदूंविषयीं त्यांचे मनांत आदर व प्रेम असे. (६) कित्येक मुसलमान राजे पूर्वाश्रमीं हिंदू होते. त्याचप्रमाणें त्यांच्या दरबारांतील अधिकारीही बाटलेले हिंदू असून शियापंथी होते. त्यामुळें या राज्यांत प्रायः हिंदुधर्मसहिष्णुता नांदत होती. (७) मुलकी व्यवस्था व खजिना हिंदूंच्या ताब्यांत असून या मुसलमानी राज्यांतील हिशेब फारसी ऐवजीं मराठी लिपींत ठेवण्यांत येत असे. (८) अहमदनगर, विजापूर व गोवळकोंडा या राज्यांत सेनापति, कारकून, मंत्री, किल्लेदार, खजिनदार, देशपांडे, देसाई, देशमुख व जहागीरदार असे हिंदू अधिकारी होते. या कारणानें त्यांना लढण्याचा व राज्यकारभाराचा पूर्ण अनुभव होता. (९) पर्वतांच्या शिखरांवर असलेले किल्ले मराठे जहागीरदारांच्या ताब्यांत असून ते नाममात्र मांडलिक होते; म्हणून ते मुसलमानांशीं वारंवार लढत असत. (१०) नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास वगैरे साधुसंत निर्माण झाले; व त्यांच्या "मराठा तेवढा मेळवावा, महाराष्ट्र धर्म वाढवावा" अशा प्रकारच्या उपदेशामुळें महाराष्ट्रांत एक प्रकारचें संघटण घडून आलें होतें. (११) यावेळीं प्रत्येक गांवांत ग्रामसंस्थेच्या रूपानें स्थानिक स्वराज्य नांदत असल्यामुळें, आपला राजा कोण व त्याची कारकीर्द कशी आहे याविषयीं लोक फारशी फिकीर करीत नसत; व त्यामुळें स्वराज्याची व्यवस्था लावण्याची ऐपतही त्यावेळच्या लोकांमध्यें होती. (१२) मोंगली स्वाऱ्यांमुळें इ. स. १६३६ च्या सुमारास येथील मुसलमानी राज्यें अगदीच मेताकुटीला आलीं होतीं; व स्वसंरक्षणासाठीं तीं हिंदूंवर अधिकाधिक अवलंबून राहूं लागलीं. त्यामुळें हिंदू जास्त बळकट झाले होते.

४ शहाजी निजाम शाहींतील मालोजी भोसले* नामक एका पंचहजारी मनसबदाराचा मुलगा होता. मालोजी मूळचा बारगीर असून पुढें स्वपराक्रमानें मनसबदार कसा झाला व नंतर निजामशाहींतील लखुजी जाधव नामक देवगिरीच्या यादवांच्या कुळांतील एका मोठ्या जहागीरदाराची मुलगी जिजाबाई हिचा शहाजीशीं कसा विवाह झाला, वगैरे गोष्टी प्रसिद्ध आहेत. मालोजी इ. स. १६१९ त युद्धांत मेल्यानंतर दरबारी शिरस्त्याप्रमाणें त्याची जहागीर व सेनापतिपद हीं शहाजीस प्राप्त झालीं, व त्यानें पुढें स्वतःची बुद्धि व शौर्य यांच्या जोरावर तीं वाढविलीं. त्याच्या कारकीर्दीचे एकंदर चार विभाग करतां येतात—[१] सन १६२१ पासून १६२७ पर्यंतच्या सात वर्षांत शहाजी निजामशाहींत मलिकंबरचा हस्तक ह्मणून होता. या मुदतींत तो मोगलांबरोबर लढला. हा त्याचा पराक्रम पाहून आदिलशाहीनें त्याला बोलाविलें. इ. स. १६२६ त मलिकंबरच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा फत्तहखान हा निजामशाहीचा कारभारी झाला; त्याच्याशीं न पटल्यामुळें शहाजी आपल्या सैन्यासह विजापुरकरांस मिळाला. या वेळीं जिजाबाई त्याच्या बरोबर होती. तिला कांहीं दिवस गेलेले असल्यामुळें, त्याच्याबरोबर तिला घोड्यावरून पळवेना, ह्मणून त्यानें तिला पुण्यापासून ५० मैलांवर आपल्या जहागिरींतील जुन्नर गांवीं ठेविलें. पुढें ती शिवनेरीस गेली व तेथें १० एप्रिल १६२७ [वैशाख शु. ५, शके १५४९] या दिवशीं × प्रसूत होऊन तिला मुलगा झाला;

टीपः—* उदेपूर येथील सूर्यवंशीय सिसोदिया रजपूत कुलांतील सुजनसिंह नामक राजपुत्र आपलें नशीब काढण्यासाठीं दक्षिणेत येऊन हसन गंगूच्या सैन्यांत नोकरीस राहिला. याचा पणतु भोसाजी नांवाचा होता; त्यावरून या वंशाला " भोसावंत, भोसले " ह्मणतात. सुजनसिंहापासून सातव्या पिढींत कर्णसिंह व शुभ कृष्ण असे दोन भाऊ होते. प्रसिद्ध शिवाजी शुभकृष्णाच्या वंशांतला आहे. मुधोळचे राजे भोसले घोरपडे हे कर्णसिंहाचे वंशज आहेत. मुधोळ शिवाय आणखी सावंतवाडी, नागपूर, तंजावर वगैरे ठिकाणींही भोसले वंशाचे राजे आहेत.

(×) जेधे शकावली व बृहदीश्वर शिलालेख शिवाजीचा जन्म काल शके १५५१ फाल्गुन वद्य ३ देतात, परंतु राजवाडे वगैरे इतिहाससंशोधन ती तिथी मान्य करीत नाहींत.

तोच मराठी राज्यसंस्थापक श्रीशिवाजी होय. [२] फत्तहखानास इ. स. १६२८ त सुलतानानें कैद केलें; त्यामुळें याच वर्षी शहाजी पुनः निजामशाहींत आला व पुढें १६३६ पर्यंत आठ वर्षे त्यानें एकनिष्ठ नोकरी करून व मोंगलांशीं शौर्यानें लढून निजामशाही कांहीं वर्षे टिकविली. या कालांत शहाजीचें प्राबल्य चांगलें वाढलें. इ. स. १६३० मध्यें त्यानें मोहित्यांची कन्या तुकाबाई हिजबरोबर विवाह केला. हिला सन १६३१ त व्यंकोजी नामक मुलगा झाला. [३] शहाजीचें प्राबल्य व वैभव त्याच्या द्वेष्ट्यांना सहन न होऊन ते त्याच्याशीं कपटानें वागूं लागले. ही कृतघ्नता पाहून तो इ. स. १६३७ त विजापुरला मिळाला; व नंतर निरनिराळ्या प्रांतांवर स्वाऱ्या करून कर्नाटकांतील बंकापूर, हरिहर, बंगळूर पर्यंतचे तालुके त्यानें आदिलशाहीच्या ताब्यांत आणले; व चंद्रगिरी, जिंजी मदुरा इत्यादि ठिकाणचे पाळेगार जिंकून त्यांचेकडून खंडण्या घेतल्या. अशा रीतीनें कर्नाटकांत त्याचा चांगला धाक बसला. सन १६४९ त शिवाजीच्या बंडामुळें विजापुरकरांचा शहाजीवर रोष होऊन, त्याला चार वर्षांची नजरकैद व प्राणदंडाची शिक्षा होऊन या सर्वांतून पुढें त्याची सुटका कशी झाली वगैरे भाग शिवाजीच्या पूर्ववृत्तांत दिला आहे. [४] यानंतर इ. स. १६५३ पासून सन १६६४ त मृत्यूपर्यंतच्या कालांत शहाजीनें कर्नाटकांत स्थिरस्थावर करून तो स्वतंत्र राजाप्रमाणें राहूं लागला. त्याच्याजवळ बलाढ्य सैन्य, उत्तम युद्धसामुग्री, आणि चतुर व विश्वासु मुत्सद्दी, असून तो स्वतः नाणावलेला सेनापति व राजकारणपटु होता. मुसलमानी राज्यांतील दुही, व्यंगें, जोम इत्यादींची त्याला खडान्खडा माहिती होती. या सर्वांचा उपयोग करून हिंदवी राज्य स्थापण्याची त्याची बरीच इच्छा होती. त्याच्या या धोरणाला त्याच्या पराक्रमी पुत्रानें मूर्त व उज्वल स्वरूप दिलें.

५ **मातोश्री जिजाबाई**:–ही शहाजीची वडील पत्नी हिला **संभाजी** व **शिवाजी** असे दोन पुत्र झाले. इ० स० १६३७ त शहाजी अहमदनगर सोडून विजापुरास गेला तेव्हां त्यानें पुण्याकडील आपल्या जहागिरीची व्यवस्था जिजाबाईकडे व दादोजी कोंडदेव नामक विश्वासू कारकुनाकडे सोपविली.

त्यामुळें त्या वर्षापासून ती आपला नऊ वर्षांचा पुत्र शिवाजी याच्या समवेत पुण्यास राहूं लागली. शिवाजीच्या जन्मापूर्वी ती शहाजीबरोबर कधीं मुलूखगिरीवर जाई, व कधीं मागें राहून त्याच्या जहागिरींत न्यायमनसुबी करी. या मुदतींत तिला अनेक संकटें सोसावीं लागलीं; पुष्कळ लढाया, खून, छापे व पळापळी पहाव्या लागल्या व बिकट राजकीय प्रश्न सोडवावे लागले. अशा परिस्थितींत शिवाजीचा जन्म झाल्यामुळें त्याच्या ठिकाणीं धैर्य, साहस, स्वावलंबन व चिकाटी हे गुण उतरले. राजकीय बाबतींत जिजाबाईला बराच अनुभव आला होता. एकदां तर ती स्वतः तीन वर्षेपर्यंत कोंडाणा किल्ल्यांत मोंगलांच्या कैदेंत होती, तरी तिनें मोंगलांना आपल्या मुलाचा थांग लागूं दिला नाहीं. अशा कर्त्या व पोक्त बाईच्या प्रभावी शिक्षणाचा सुपरिणाम शिवाजीच्या मनावर पूर्णपणें झाल्यामुळें या मायलेकांचें एकमेकांवर अगाध प्रेम होतें. शिवाजीच्या हृदयांत अनन्य मातृभक्ति होती. त्यामुळें महत्त्वाच्या बाबतींत व आणीबाणीच्या प्रसंगीं जिजाबाईचा सल्ला, प्रोत्साहन व आशीर्वाद हीं त्याच्या उपयोगीं पडलीं. ऐंशीं वर्षे जगून स्वतःच्या हयातींतच हिंदुपदपादशाहीची स्थापना व स्वपुत्राचा राजतिलक या गोष्टी या माऊलीनें इ. स. १६७४ त पाहिल्या.

प्रकरण २ रें.

शककर्ता शिवाजी.

१ **शिवाजीचें बाळपणः**—मागें सांगितल्याप्रमाणें शहाजीनें सन १६३७ त पुणें व सुपें या आपल्या जहागिरींतील कारभार जिजाबाईकडे सोंपविला, व दादोजी कोंडदेव नांवाचा आपला जुनाट व पोक्त कारकून तिच्या मदतीस दिला. दादोजी फारच स्वामिनिष्ठ, विश्वासू, मुत्सद्दी, चाणाक्ष, अनुभवी, धर्मशील, व लोककल्याणेच्छु असून जमाबंदीच्या कामांत वाकबगार होता. म्हणून शिवाजीच्या शिक्षणाची जबाबदारी शहाजीनें त्याच्यावर

टाकली. भयंकर दुष्काळ व दीर्घकाळ चाललेलीं युद्धें यांमुळें शहाजीच्या जहागिरींतील शेती अगदींच नष्ट झाली होती. अशा वेळची **दादोजीची कामगिरी** फारच महत्वाची आहे. ही दुर्दशा नाहींशी करण्याचे त्यानें कांहीं उपाय योजिले. त्यानें तेथील हिंस्र पशू मारून शेतकऱ्यांस निर्भय केलें; प्रांताच्या बंदोबस्तासाठीं पुष्कळ लष्कर ठेविलें; किल्ले वगैरे दुरुस्त करून त्यांवर शिबंदी ठेविली; जमिनीची लागवड करवून उत्पन्न वाढविलें; गांवोगांवीं चौक्या पहारे बसविले; सारा--वसुलींत सुधारणा केली; न्याय-पद्धति सुधारली. यामुळें शेती व उत्पन्न वाढलें. या सर्व बाबतींत शिवाजीनें दादोबाला फारच मदत केल्यामुळें तेथें एक लहानसें पण सुव्यवस्थित व नमुनेदार स्वराज्य स्थापन झालें, व आजुबाजूच्या पर अमलांतील लोकांपेक्षां येथील लोक जास्त समृद्ध झाले. ज्या स्वराज्याची कल्पना शहाजी व दादोजी यांच्या ध्यानींमनींही नव्हती, त्या स्वराज्याचीं सुखस्वप्नें शिवाजीस याच वेळीं पडत होतीं; व याच्या पुढील कालांत हीं स्वप्नें सत्यसृष्टींत आणण्याचा शिवाजीनें प्रयत्न केला. सन १६४६ पासून "छत्रपति" हा किताब शिवाजीच्या नांवापूर्वीं सुरू झाला. शिवाजीच्या शिक्षणांतही दादोजीचा बराच भाग होता. त्यानें शिवाजीला लिहिणें, वाचणें, धर्मशास्त्र, राजनीति, जमीन महसूल हे विषय; घोड्यावर बसणें, तिरंदाजी करणें, तरवार--पट्टा वगैरे हत्यारें चालविणें, भाला फेकणें, या युद्धकला; व लष्कराच्या साहाय्यानें स्वतःचा व देशाचा बचाव करणें, आणि लोकसंग्रह करणें या गोष्टी शिकविल्या. शिवाय मातृशिक्षणाचा सुद्धां शिवाजीवर बराच परिणाम झाला. यवनांविषयीं तिरस्कार; देव, साधु व संत यांवर भक्ति आणि गोब्राह्मण-प्रतिपालन या गोष्टी त्यानें जिजाबाईकडूनच घेतल्या. रामायण व महाभारत ऐकण्याचा नाद त्याला तिच्याचमुळें लागला. महाभारतांतील आवेशयुक्त युद्धवर्णनांच्या श्रवणाची स्वराज्यस्थापनेच्या विचारांना जोड मिळाली, व शिवाजीनें त्या दिशेनें चंग बांधला. रणजितसिंह व अकबर यांप्रमाणेंच शिवाजीही विशेष सुशिक्षित नव्हता; तरी स्वतःची प्रतिभा, कुशाग्र बुद्धि व आकलन-शक्ति यांमुळें राज्यकारभार व इतर बाबतींत त्यानें संपूर्ण ज्ञान मिळविलें.

२ स्वराज्यस्थापनेचा उपक्रमः—सन १६४६ त शिवाजीनें आपल्या उद्योगाचा विस्तार केला. आपल्या जहागिरीच्या सभोंवारचे विजापूरकरांच्या दुर्लक्षामुळें अव्यवस्थित असलेले किल्ले त्यानें कसे घेतले व आजुबाजूच्या जहागीरदारांचीं मनें वळवून त्यांना आपल्या हुकमती-खालीं त्यानें कसें आणिलें हें खालीं सांगितलें आहे. १ एकोणीस वर्षांच्या तरुण शिवाजीनें पुण्याच्या नैर्ऋत्येस **तोरणा** नांवाचा किल्ला तेथील किल्लेदारास वश करून मिळविला, आणि त्याची डागडुजी करून व मावळे लोकांना आंत ठेवून त्याला प्रचंडगड नांव दिलें. २ तोरण्यावर एका पडीत जागेंत त्याला द्रव्यसंचय सांपडला; त्याचा उपयोग शिवाजीनें **राजगड** नामक नवीन किल्ला बांधण्यांत केला. ३ त्याचा सावत्र मामा, सुप्याचा जहागीरदार संभाजी मोहिते, शिवाजीला विरोध करीत असल्यामुळें त्यानें एकदां त्याच्यावर छापा घातला व त्याच्याकडील मुलूख, पागा व जडजवाहीर घेऊन व त्याला कैद करून कर्नाटकांत शहाजी-कडे पाठवून दिलें. ४ पुण्याच्या उत्तरेकडील **चाकण** किल्ला तेथील किल्लेदार फिरंगोजी नरसाळा याला वश करून त्यानें घेतला; पुढें फिरं-गोजीनें शिवाजीची एकनिष्ठ नोकरी केली. ५ **कोंडाणा** किल्लाही त्यानें असाच मिळवून त्यास **सिंहगड** नांव दिलें. ६ स. १६४८ त त्यानें बारामती व इंदापूर यांमधील **पुरंदरचा** अवघड किल्ला तेथील किल्ले-दाराकडून घेतला. हें सर्व काम त्यानें रक्तपाताशिवाय केलें. अशा रीतीनें यशप्राप्ति झाल्यामुळें जास्त हिंमतीचीं कामें करावीं असें शिवाजीस वाटूं लागलें. ७ कोंकणांतून कांहीं खजिना विजापुरास जात आहे अशी बातमी कळतांच शिवाजीनें त्याजवर एकदम छापा घालून तो खजिना राजगडास नेला; व लगेच **कांगारी, तिकोना, लोहगड,** वगैरे किल्ले व **मावळप्रांत** ताब्यांत आणिले. याच वेळीं आबाजी सोनदेवानें **कल्याणप्रांत** व तेथील किल्ले हस्तगत केले. शिवाजीनें स्वतः कल्याणास जाऊन आबाजीस तेथील सुभेदार नेमिलें, व त्यानें नजर केलेली सुभेदार मुल्ला आहमदची सून सन्मानानें तिच्या सासऱ्याकडे परत पाठविली. यावरून शिवाजीचें स्त्रीदाक्षिण्य व पवित्राचरण व्यक्त होतें. नंतर शिवाजीनें

दक्षिण कोंकणांतील **तळें, घोसाळा** हे किल्ले घेतले; **बिरवाडीस** किल्ला बांधिला; सिद्दीकडून रायरीचा डोंगर घेतला व तेथें लिंगोना नांवाचा मजबूत किल्ला बांधिला. पुढें त्याचेंच नांव **रायगड** असें ठेवण्यांत आलें. याच वेळीं गोवळकर सावंतांनीं शिवाजीस **भवानी तलवार** दिली. तसेंच कोंकणांतील सिद्दीच्या समुद्रालगतच्या प्रांतावर स्वारी करून **राजापूर, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, रत्नागिरी, खारेपाटण** वगैरे ठिकाणें शिवाजीनें आपल्या ताब्यांत आणिलीं. याप्रमाणें कल्याणपासून राजापुरापर्यंतचीं मुख्य ठाणीं व तेवढ्या टापूंतील घांटमाथ्यावरील मोठमोठे किल्ले शिवाजीनें हस्तगत केले; व तेथील पूर्ण माहितगार असे येसाजी कंक, तानाजी मालुसरे यांसारखे लोक शिवाजीनें आपल्या पदरीं ठेविले.

३ **शहाजीची कैद:—** शिवाजीच्या पुंडाईची हकीगत विजापूर दरबारच्या कानांवर गेली व त्याला या कामीं शहाजीची फूस आहे अशी सुलतानाची खात्री झाल्यामुळें, सन १६४८ त शहाजी कर्नाटकांत असतां त्याला पकडण्याविषयीं तेथील एक सरदार बाजी घोरपडे यास आज्ञा झाली. त्याप्रमाणें त्यानें शहाजीला दग्यानें पकडून विजापुरास आणिलें; व त्याला शिवाजीचा बंदोबस्त करण्याविषयीं सुलतानानें सांगितलें; परंतु मुलगा आपले ताब्यांत नाहीं व आपला त्याच्याशीं कोणताही संबंध नाहीं, या शहाजीच्या उत्तरावर सुलतानानें भरंवसा न ठेवतां त्याला एका भिंतींत चिणण्याचा हुकूम दिला; व कांहीं ठरावीक मुदतींत शिवाजी शरण न आल्यास त्याला गाडण्याची भीति घातली. ही गोष्ट शिवाजीस कळतांच त्यानें एक युक्ति योजिली. अजूनपर्यंत त्यानें मोंगल बादशहाशीं उघड वैर केलें नव्हतें, आणि शहाजहान बादशहा विजापूर घेण्यास टपलेला होता. तेव्हां शिवाजीनें वकिलामार्फत दक्षिणेंतील सुभेदार शहाजादा मुरादबक्ष याजकडे पत्रव्यवहार सुरू करून आपण मोंगलांची नोकरी करण्यास तयार आहों व जुन्नर, अहमदनगर वगैरे कांहीं प्रदेशांतील चौथाई व सरदेशमुखी मिळावी अशी मागणी करून सुलतानास बादशहाचा शह लावण्यास सुरवात केली. मुरार जगदेव व रणदुल्लाखान या शहाजीच्या मित्रांनीं वरील गोष्ट सुलतानाच्या कानांवर घालून

शहाजीच्या सुटकेबद्दल खटपट केली; तेव्हां शहाजीला भिंतींतून काढून नजरकैदेंत राहण्याचा हुकूम झाला. अशा रीतीनें चार वर्षें काढल्यावर शहाजीला सन १६५३ मध्यें त्याची जहागीर पुनः मिळाली बाप नजरकैदेंत असल्या मुदतींत विजापूर दरबारला राग येईल असें कोणतेंही कृत्य शिवाजीनें केलें नाहीं. फक्त आपण मिळविलेल्या मुलखांचें संघटन करण्यांत त्यानें ही मुदत खर्च केली; व शहाजी कर्नाटकांत सुरक्षित होईपर्यंत त्यानें कोणताही नवीन मुलूख घेतला नाहीं.

४ जावळीचा विजयः—शिवाजीला पकडण्याचा विजापूरकरांचा बेत चालला होता. शिवाजी कोंकणांत महाडावर स्वारी करणार अशी सुलतानाला बातमी लागतांच त्यानें तिकडील जावळीचा राजा **चंद्रराव मोर** याच्या कडे बाजी शामराज नामक एका सरदाराला शिवाजीवर छापा घालण्यासाठीं पाठविलें. ही गोष्ट हेरांमार्फत शिवाजीस कळतांच त्यानें बाजीच्या सैन्यावर हल्ला करून त्याची बरीच नुकसानी केली. नंतर सन १६५५ त चंद्रराव मोऱ्याकडे स्वतः जाऊन त्याला आपल्या बाजूला वळविण्याचा त्यानें प्रयत्न केला; परंतु त्यांत त्याला यश आलें नाहीं. मात्र उलट आपणास कैद करून विजापुराला पाठविण्याचा मोऱ्याचा बेत आहे हें समजल्यामुळें त्याला धडा शिकवावा असा शिवाजीनें विचार केला. जावळीचें राज्य शिवाजीच्या प्रदेशास लागून होतें, व चंद्ररावाबरोबर उघड युद्ध करण्याची शिवाजीस ताकद नव्हती. तेव्हां त्यानें गुप्त छापा घालून चंद्ररावाला मारिलें व जावळी प्रांत ताब्यांत घेतला. तेथें त्याला वासोटा व प्रतापगड हे किल्ले आणि बरीच लूट मिळाली. या विजयामुळें तेथील साधे पण शूर व काटक मावळे त्याला मिळाले. मराठे जहागीरदार व सरदार यांवर शिवाजीचा वचक बसून ते त्याला शरण आले. लौकरच त्यानें रोहिड्याचा किल्ला घेतला; तेथें त्याला बाजी प्रभू सारखा शूर व स्वामिनिष्ठ सरदार मिळाला. या मुदतींत औरंगजेबाचें वास्तव्य शेजारींच असल्यामुळें विजापूरकरांना शिवाजीकडे लक्ष देतां येईना. याप्रमाणें जावळीपासून पन्हाळ्यापर्यंत व महाडपासून राजापूरपर्यंतच्या मुलखावर शिवाजीचा अंमल बसला.

५ मोंगलांशीं संबंधः— मोंगलांना चिडविण्याचा प्रथम प्रयत्न

शिवाजीनें सन १६५७ त केला. जुन्नरावर एकाएकीं हल्ला करून एका रात्रीं तो कांहीं माळव्यांनिशीं गडावर दोरखंडानें चढून गेला. या वेळीं त्याला बरीच लूट मिळाली. त्याचप्रमाणें अहमदनगरसारख्या दक्षिणेंतील मोंगली राजधानीपर्यंतचा मुलूख त्यानें उध्वस्त केला. हें पाहून शिवाजीचा मुलूख लुटण्याचा व उध्वस्त करण्याचा औरंगजेबानें हुकूम दिला. सन १६५७ मध्यें विजापुराशीं मोंगलांचा तह झाल्यावर, मोंगलांशीं एकट्यानें लढणें अशक्य असें वांटून, झालेल्या गोष्टी विसरण्याविषयीं शिवाजीनें औरंगजेबास लिहिलें. पण या गोष्टीचा कांहींच विचार न करतां उलट स्वतः उत्तेरंत जातांना त्यानें आपला सुभेदार व आदिलशहा यांस शिवाजी-वर लक्ष ठेवण्यास बजाविलें. यानंतर दोन वर्षे औरंगजेब भाऊबंदकींत गुंतल्यामुळें, त्यानें शिवाजीकडे दुर्लक्ष केलें.

६ **अफझल खानाचावध व प्रतापगडचें युद्ध (१६५९):—** इ. स. १६५३ मध्यें अली आदिलशहा नामक एक बालराजा विजापूरच्या गादीवर बसला; त्या वेळेपासून सर्व राज्यकारभार त्याच्या आईच्या ताब्यांत असल्यामुळें सन १६५९ च्या सुमारास बरीच अव्यवस्था माजली होती; याचा फायदा घेऊन शिवाजी विजापुरी मुलखावर जोरानें स्वाऱ्या करूं लागला. तेव्हां त्याला आळा घालण्याची कामगिरी अफझलखान नामक शूर व अनुभवी सरदारावर सोंपविण्यांत आली. त्यानें शिवाजीला पकडण्याचा, निदान त्याचें प्रेत तरी आणण्याचा विडा उचलिला. त्या प्रमाणें १२००० सैन्य व प्रचंड तोफखाना यांसह इ. स. १६५९ च्या एप्रिलांत तो विजापुराहून निघून जून महिन्यांत वाई मुक्कामीं आला. याठिकाणीं त्याचें सैन्य २५००० पर्यंत वाढलें. या वेळीं शिवाजी प्रतापगडावर होता. त्याला कपटानें पकडावें या हेतूनें त्याच्याशीं खानानें तहाचें बोलणें सुरू केलें; अखेर दोघांची मुलाखत प्रतापगडाजवळ व्हावी, व प्रत्येकाबरोबर एक दोन माणसांपेक्षां जास्ती मंडळी असूं नयेत असें ठरलें. तेव्हां खानानें प्रतापगडच्या पायथ्याशीं पारगांवीं सैन्याचा तळ दिला. शिवाजीला खानाच्या कपटहेतूचा सुगावा आधींच लागल्यामुळें खानाच्या सैन्याला पळून जातां येऊं नये, व जरूर

पडल्यास आपलें रक्षण व्हावें ह्मणून त्यानेंही गडाच्या आसपास चारी बाजूंला पहाडांत आपलें सैन्य नेताजी पालकरच्या नेतृत्वाखालीं ठेविलें होतें. त्याचप्रमाणें स्वसंरक्षणासाठीं शिवाजीनें पोषाखाखालीं चिलखत व शिरस्त्राण घालून, आपल्या हातांत वाघनख व अस्तनींत बिचवा लपवून आणला होता. खानाच्या खास भेटीसाठीं गडाच्या पायथ्याशीं उभारलेल्या भव्य मंडपांत खान व शिवाजी यांची भेट १० नोव्हेंबर रोजीं झाली; त्यावेळीं खानानें शिवाजीला डाव्या बगलेंत धरून चिरडण्याचा प्रयत्न केला व त्याच्यावर तरवार चालविली, परंतु चिलखतामुळें शिवाजीला जखम झाली नाहीं. खानाचें कपट पाहून शिवाजीनें आपलीं वाघनखें व बिचवा त्याच्या पोटांत खुपसून त्याचीं आंतडीं बाहेर काढलीं. त्यामुळें खान पडला, व शिवाजीनें त्याला तरवारीनें चिरलें. खुणेच्या तोफांचे आवाज होतांच मराठा सैन्यानें खानाच्या सैन्यावर चौफेर छापा घालून त्याची दाणादाण उडविली. विजापूरचे शेलके लोक मारले गेले; खानाचा मुलगा फाजल कसाबसा निसटला. खानाचें डोकें कापून तें गडावर नेण्यांत आलें. पुढें कांहीं काळानें भेटीच्या ठिकाणीं तें पुरून त्यावर "अफझल बुरूज" बांधण्यांत आला. या युद्धांत शिवाजीला पुष्कळ लूट मिळाली. शिवाय पन्हाळगड, पावनगड, वसंतगड, रांगणा, खेळणा व कोल्हापूरचा बराचसा भाग; त्याचप्रमाणें कोंकण पट्टींतील राजापूर, दाभोळ, चौल वगैरे बंदरें त्याच्या ताब्यांत आलीं; आणि शृंगारपुरचे प्रसिद्ध सुर्वे व सावंतवाडीचे सावंत त्याला शरण आले. या विजयामुळें विजापूरचा दरारा कमी होऊन शिवाजीचा वचक त्या ठिकाणीं इतका बसला कीं, शिवाजी येतो असें कळतांच मुसलमान सरदार आपापले प्रांत सोडून पळून जात.

या सर्व गोष्टींवरून आपल्याला असें दिसेल कीं, कपटाचें पहिलें आचरण खानाकडून घडलें, व भेटीच्या वेळींही खानानेंच शिवाजीवर वार केला. जशास तसें या न्यायानें शिवाजीला आत्मसंरक्षणासाठीं तयारी ठेवणें भाग झालें. त्यामुळें बाह्यतः दिसणारें शिवाजीचें कपटी आचरण मुळींच दोषार्ह ठरत नाहीं.

७ बाजी प्रभूचा अतुल पराक्रम (१६६०):-वर सांगितल्याप्रमाणें अफझलखानाच्या वधानंतर शिवाजीनें घेतलेला पन्हाळा त्याच्याकडून परत घेण्यासाठीं, विजापूर दरबारनें २४००० सैन्य व मोठा तोफखाना यांसह सिद्दीजौहर व खानाचा मुलगा फाजल यांना तिकडे पाठविलें. त्याच-वेळीं जंजिऱ्याचे सिद्दी व सावंतवाडीकर हे शिवाजीकडून कोंकणपट्टीचा भाग परत घेण्यासाठीं निघाले. पन्हाळयाला चार महिने जोरानें वेढा पडल्यामुळें, गड हातांतून जातो असें पाहिल्यावर शिवाजी स्वतः सिद्दीस भेटला व किल्ला दुसऱ्या दिवशीं त्याच्या ताब्यांत देण्याचें त्यानें ठरविलें; यामुळें सिद्दी जौहर गाफील राहिला; याचा फायदा घेऊन शिवाजी विशाळ-गडाकडे कांहीं हजार सैन्यासह निघाला. ही बातमी मुसलमानांना समजल्या-वर त्यांनीं त्याचा जोरानें पाठलाग केला, व पांढरें पाणी येथें (विशाळ-गडापासून सहा मैलांवर) त्यांनीं त्याला जवळ जवळ गांठलें. तेव्हां आपण विशाळगडाला सुखरूप पोंहचल्याच्या खुणेचा आवाज येईपर्यंत वाटेवरच्या घोडखिंडींतून विजापूरकरांना पलीकडे जाऊं न देण्याविषयीं शिवाजीनें पन्हाळयाचा किल्लेदार वीर बाजी देशपांडे याला बजाविलें, व निवडक मंडळींनिशीं तो पुढें निघून गेला. इकडे बाजीनें आपल्या ५००० साथीदारांच्या मदतीनें या खिंडीच्या तोंडाशीं निकरानें लढून मुसलमानांचे तीन हल्ले थोपविले. अखेर शेवटच्या हातघाईंत तो मारला गेला. ग्रीसच्या थरमॉपोली खिंडींत, लीऑनीडासनें इराणी सैन्याला दाखविलेलें शौर्य या ठिकाणीं बाजीनेंही दाखविलें. प्राणोत्क्रमणाच्या पूर्वी त्यानें शिवाजी सुखरूप पोंहचल्याबद्दलचे खुणेचे आवाज ऐकिले. त्याचे नंतर त्याचे शूर शिपाई मुसलमानांबरोबर शौर्यानें लढत लढत मागें सरूं लागले, व अशा रीतीनें त्यांनीं बाजीचें प्रेत विशाळगडाला नेलें. मुसलमानांनीं विशाळगडाला वेढा दिला, पण त्यांत त्यांना यश आलें नाहीं. नंतर त्याला खुद्द अली आदिलशहानें सुद्धां वेढा दिला, पण तोही फसला. फक्त पन्हाळगड व पावनगड हे दुर्ग त्याला घेतां आले.

८ मुधोळचा विध्वंसः— इ. स. १६४९ त शहाजीला पकडण्यांत बाजी घोरपड्याचें बरेंच अंग असल्यामुळें त्याचा सूड घेण्याविषयीं शहाजीनें



संभाजी.



तुकाराम.



रामदास.



श्री शिवाजी म०



ताराबाई



साहु



अफझुलखान.



राजा जयसिंह.



राजा जसवंतसिंह.



दिलेरखान.



शाहिस्ताखान.

शिवाजीस वजाविलें होतें; व शिवाजी ही संधि पहात होता. शेवटीं सावंतवाडीकर व बाजी घोरपडे यांनीं शिवाजीविरुद्ध विजापुराशीं १६६२च्या आरंभीं संगनमत केलें. तेव्हां त्यांचें पारिपत्य करण्यासाठीं तीन हजार घोडेस्वारांनिशीं शिवाजीनें मुधोळवर स्वारी करून आपल्या बापाचा शत्रु घोरपडे यावर अचानक झडप घातली. त्यांत बाजी, त्याच्या चार राण्या व सहा पुत्र आणि इतर पुष्कळ लोक मारले गेले. नंतर शिवाजीनें अतोनात लूट घेऊन मुधोळ उध्वस्त केलें.

९ शाइस्ताखानाची मोहीमः--शाइस्ताखान हा, नूरजहानचा भाऊ आसफखान, याचा मुलगा व औरंगजेबचा मामा असून बापाच्या मृत्यूनंतर इ. स. १६४१ त दिल्लीचा वजीर झाला. स्वतःची गादी स्थिर झाली नसतांही शिवाजीचा मोड करण्यासाठीं औरंगजेबानें शाइस्ता-खानासारखा त्या काळचा उत्तम सेनापति व वजीर याला एक लाख सैन्य देऊन दक्षिणेच्या सुभेदारीवर पाठविलें. खान मोठ्या लव्याजम्या-सह इ. स. १६६० मध्यें येऊन त्यानें पुणें, चाकण, वगैरे ठिकाणें घेतलीं, व सैन्यानिशीं पुण्यामध्यें शिवाजीच्या लाल महालाच्या आवा-रांत तळ दिला. यावेळीं शिवाजी विजापुराशीं लढण्यांत गुंतला असतां सुद्धां, त्यानें तीन वर्षेंपर्यंत खानाबरोबर मोठ्या मर्दुमकीनें लढाया चालू ठेविल्या व त्यास दमविलें. शेवटीं ५ एप्रिल १६६३ रोजीं काळोख्या-रात्रीं शिवाजीनें सिंहगडावरून उतरून खानाच्या गोटांत त्याच्यावर छापा घातला. त्यावेळीं झालेल्या झटापटींत खानाच्या हाताला तरवारीची जखम झाली, व तो पळून गेला. खानाचे मुलगे, चाळीस सरदार आणि कांहीं स्त्रिया ठार झाल्या. यावेळीं सेनापति जसवंतसिंहही रजपूत सेनेसह पुण्याजवळ होता; परंतु त्यानें कांहींच प्रतिकार केला नाहीं. यामुळें ही सर्व मंडळी शिवाजीस सामील आहेत असा संशय खानास आला, व शिवाजीची भीति वाटून त्यानें पुणें सोडलें. या छाप्यानें मोंगल साम्राज्यावर शिवाजीचा भयंकर दरारा बसला व त्याचा अतुल पराक्रम, योजक बुद्धि, व साहस हीं दृग्गोचर झालीं. या विजयाचा फायदा घेऊन विजापूरकरांनीं काबीज केलेला कोंकणपट्टींतील

कांहीं मुलूख परत घेऊन शिवाजी कुडाळ व वेंगुर्ल्यापर्यंत गेला, आणि पोर्तुगीजांवरही त्यानें आपला दरारा बसविला.

१० **सुरतेचा नाशः**—इ० स० १६६४ च्या जानेवारीमध्यें त्या काळचें सधन, सुंदर, दोन लाख लोक वस्तीनें गजबजलेलें, मक्केचा वेस आणि व्यापाराचें केंद्र असें सुरत शहर शिवाजीनें लुटलें; कारण औरंगजेबाशीं चार वर्षे सतत लढावें लागल्यामुळें रिकामा झालेला खजिना शिवाजीला भरावयाचा होता; शिवाय अशा रीतीनें औरंगजेबाचा सूड घ्यावा व शाइस्ताखानाची आपण पर्वा करीत नाहीं हे दाखवावें असाही त्याचा विचार होता. ह्मणून मोंगलांचा तळ पुण्यांत असतांच, शिवाजीनें ७००० सैन्यासह ६ जानेवारी इ० स० १६६४ मध्यें सुरतेवर अचानक छापा घातला, व पांच दिवस चारही बाजूंनीं लूट केली. त्याचा लोकांना इतका दरारा होता कीं, त्याच्या आज्ञेप्रमाणें शहरांत शिरतांच त्याच्या सैनिकांनीं केलेला नामघोष ऐकून तेथील सर्व अधिकारी जीव वांचविण्यासाठीं किल्ल्यांत दडून बसले; बरेच रहिवाशी घरदार सोडून निघून गेले; व तेथील लाखों नागरिकांपैकीं कोणीही त्याला अडथळा केला नाहीं. त्यानें शहराचा दोन--तृतीयांश भाग जाळून उध्वस्त केला, व एक--दिड कोटी किंमतीची लूट (डचांच्या मतानें तीन कोटी) घेऊन तो परत गेला. या मुदतींत तेथील डच व इंग्रज व्यापाऱ्यांकडूनही त्यानें नजराणा मागितला; परंतु तो देण्याचें त्यांनीं नाकारिलें व आग आणि लूट यांपासून आपलें रक्षण केलें; यामुळें खूष होऊन बादशहानें त्यांना व तेथील सर्व प्रजेला एक वर्षपर्यंत आयात व निर्यातीवरील कर माफ केला; आणि पुढें सुद्धां करांत सवलत दिली. या लुटीमुळें सुरतच्या व्यापाराला मोठा धक्का बसला, व सुरतेसारखें सधन व सुंदर शहर बेसुरत झालें. सुरत सुरक्षित नाहीं असें वाटून येथील यूरोपियन व्यापाऱ्यांनीं दुसरीकडे जाण्याचें ठरविलें, आणि इंग्लिशांनीं मुंबईला ठाणें दिलें. मोंगलांचा वचक कमी होऊन, शिवाजीचा दरारा अधिक बसला. इ. स. १६७० त दुसऱ्या हल्ल्याच्या वेळीं शिवाजीनें अर्धें शहर पुनः जाळलें, व पुष्कळ लूट घेऊन तो परत आला. त्यानें तेथील लोकांकडून दरवर्षी बारा

लाख रुपयांची मागणी केली; ती त्यांनीं न दिल्यामुळें बहुतेक प्रतिवर्षी शिवाजी सुरतेवर हल्ला करीत असे.

११ जयसिंह व पुरंदरचा तहः— शाइस्ताखान परतल्यानंतर दक्षिणेंतील सर्व मोंगली सैन्याचें आधिपत्य शहाजादा मुअज्ञम व महाराजा जसवंतसिंहाकडे देण्यांत आलें. जसवंतसिंहानें सिंहगडाला वेढा दिला, परंतु तो फसला. नंतर लहानसहान चकमकी होत असत; परंतु शिवाजीवर त्याचा कांहींच परिणाम झाला नाहीं; हें पाहून मोंगल सैन्यांतील त्या काळचा नामांकित सरदार **मिर्झा राजा जयसिंह** याला एक लाख सैन्य देऊन दक्षिणेंत पाठविण्यांत आलें. जयसिंहानें बलखपासून मध्य-आशियापर्यंत व कंदहारपासून मुंगीरपर्यंत झालेल्या सर्व लढायांत भाग घेतला होता. तो फार धैर्यशील, मुसलमानी रीतीरिवाजांत तरबेज; तुर्की--फार्सी हिंदी उर्दु-भाषा कोविद, आणि अफगाण, तुर्क, रजपूत व हिंदुस्तानी या लोकांच्या मिश्र सैन्याला योग्य असा सेनापति होता. त्यानें ३ मार्च १६६५ रोजीं पुण्यास येऊन सिंहगड आणि पुरंदर या किल्यांस वेढा दिला, परंतु त्यांत लौकर यश न आल्यामुळें त्यानें पुरंदर घेण्यासाठीं आपली सर्व शक्ति एकवटली. तेव्हां गड काबीज होतो असें पाहून शिवाजीनें जयसिंहाशीं तह केला; याला **पुरंदरचा तह** ह्मणतात. **त्यांतील कलमें अशीं होतीं**:-(१) मोंगलांकडून जिंकलेला मुलूख शिवाजीनें परत करावा, व पुरंदर, सिंहगड, लोहगड, इत्यादि तेवीस (कांहींच्या मतें २७) किल्ले व त्यांच्या ताब्यांतील मुलूख मोंगलांना द्यावा. (२) रायगड, तोरणा वगैरे बारा किल्ले शिवाजीकडे रहावेत. (३) शिवाजीच्या मुलाला पांच हजारांची मनसबदारी मिळावी, व त्यानें बापाच्या वतीनें मोंगल दरबारांत हजर असावें. (४) शिवाजीनें विजापूरकरांविरुद्ध बादशहास मदत करावी. (५) विजापूरांतील कांहीं मुलखांत चौथाई व सरदेशमुखी वसूल करण्याचा हक्क शिवाजीस मिळावा, व याबद्दल शिवाजीनें चाळीस लाख होन नजराणा बादशहाला द्यावा.

१२ शिवाजी व औरंगजेब यांची भेटः- तहाप्रमाणें विजापुराविरुद्ध मोंगलांना शिवाजीनें मदत केली. त्याबद्दल आनंद व्यक्त करण्या-

करितां औरंगजेबानें शिवाजीस दरबारास बोलाविलें. दक्षिणेची सुभेदारी, जंजिराबेट, व विजापुरांत चौथाई घेण्याचा अधिकार मिळण्याची आशा असल्यामुळें आपल्या जिवास दगा पोंहचणार नाहीं अशी जयसिंहाकडून शपथ घेतल्यावर शिवाजी मार्च १६६६ मध्यें आपला पुत्र संभाजी व चार हजार निवडक सैनिक यांसह उत्तरेकडे निघाला. अग्र्याजवळ जातांच औरंगजेबानें आपले सामान्य सरदार त्याला सामोरे पाठविले. बादशहाच्या पन्नासाव्या वाढदिवशीं त्याला भेटण्याची शिवाजीस आज्ञा झाली. त्या प्रमाणें तो दरबारांत आल्यानंतर त्याला तिसऱ्या प्रतीच्या सरदारांमध्यें उभें राहण्यास बादशहानें सांगितलें. हा अपमान सहन न होऊन शिवाजीला मूर्च्छा आली. सावध होतांच त्याला त्याच्या बिऱ्हाडीं पोंचविण्यांत आलें, व कांहीं दिवसांनीं त्याच्यावर पहारा ठेवण्यांत आला. परंतु असामान्य प्रसंगावधान व साहस यांमुळें तो मिठाईच्या पेटाऱ्यांत बसून अतएव औरंगजेबाच्या हातावर तुरी देऊन या संकटांतूनही कसा निसटला ही नवलकथा सर्वांना माहित आहेच. या वेळच्या हयगयीमुळें औरंगजेबाला जन्मभर मराठ्यांबरोबर युद्धें करावीं लागलीं. सुटका होतांच शिवाजी व त्याच्या बरोबरचे लोक हे फकिरांचा वेष घेऊन मथुरेला आले व तेथें संभाजीला ठेऊन बाकीची सर्व मंडळी बनारस, अलहाबाद, गया, पुरी, गोंडवाना व गोवळकोंडा यांवरून मुसलमानांचे पाठलाग चुकवीत चुकवीत सुमारें चार महिन्यांनीं रायगडास आली. याच्या नंतर सन १६७४ पर्यंत सात वर्षे शिवाजीला मोंगलांशीं सतत लढाया कराव्या लागल्या; या मुदतींत पुरंदरच्या तहानें मोंगलांना सोडलले किल्ले परत घेऊन शिवाय बागलाण, जव्हार व रामनगर हे प्रान्त त्यानें ताब्यांत घेतले. तसेंच कर्नाटकांतील आपला मुलूखही वाढविला.

१३ **राज्याभिषेकः**— तीस वर्षे स्वराज्य स्थापनेचा जिवापाड प्रयत्न करून त्यांत यश आल्यानंतर, शिवाजीनें स्वतःस राज्याभिषेक करवून घेण्याचा विचार मनांत आणिला. शहाजी राजे निवर्तल्यावर शिवाजीनें राजपद धारण करून स्वतःचीं नाणीं पाडिलीं होतीं. सर्व महाराष्ट्रीयांस एकवटून त्यांच्यांत स्वराज्य व स्वातंत्र्य यांविषयीं प्रेम

उत्पन्न व्हावें व त्याच्या सत्य संकल्पाला यश यावें यासाठीं त्याच्या राज्याभिषेकाची जरूरच होती. हा समारंभ ६ जून १६७४ रोजीं प्राचीन पद्धतीप्रमाणें राजगडावर मोठ्या थाटानें साजरा करण्यांत आला. हा आनंदोत्सव पुष्कळ दिवस चालला होता. भिक्षुक, ब्राह्मण व मंत्री मंडळी यांना बक्षिसें वांटण्यांत आलीं. या वेळीं इंग्रजांनीही हेन्री एक्सिंझडनच्या मार्फत त्याला अहेर पाठविला होता; व हा अधिकारी समारंभाचे वेळीं हजर होता. समारंभ आटोपल्यावर राजगडाच्या रस्त्यांतून मोठी मिरवणूक काढण्यांत आली. सभासद–बखरींत सांगितल्याप्रमाणें या अभिषेकास सर्व खर्च सुमारें एक कोटी बेचाळीस हजार होन आला. या समारंभापासून शिवाजीनें "क्षत्रियकुलावतंस श्री राजा शिव छत्रपति" असा किताब धारण केला. कागदोंपत्रीं "राज्याभिषेक" नामक नवा शक चालू केला. या अभिषेकामुळें हिंदुपदपादशाहीचा पाया खंबीर झाला. सर्व रजपूत राजे त्याचप्रमाणें परदेशस्थ लोक शिवाजीस मान देऊं लागले; व आदिलशहा, कुतुबशहा व मोंगल बादशहा यांनाही शिवाजीला बरोबरीचा मानावा लागला.

१४ कर्नाटकाची मोहीमः– १. राज्याभिषेकोत्सवांत बरेंच द्रव्य खर्च झाल्यामुळें शिवाजीला पैशांची टंचाई भासूं लागली; अभिषेकानंतर प्रकृति नादुरुस्त झाल्यामुळें त्याला मोहिमेवर जातां आलें नाहीं. तेव्हां त्यानें संपत्तीनें भरलेल्या दक्षिण हिंदुस्तानावर नजर फिरविली. २. शहाजी वारल्यावर त्याची कर्नाटकांतील जहागिरी व सुभेदारी त्याचा पुत्र व्यंकोजी याच्या ताब्यांत होती. तिचा हिस्सा घेण्याचें शिवाजीच्या मनांत असल्यामुळें पुष्कळ दिवसांपासून कर्नाटक प्रान्तावर स्वारी करण्याचा त्याचा विचार होता. ३. शेवटीं इ. स. १६७७ मध्यें संधि प्राप्त झाली मोंगल व विजापूर यांमध्यें तह झाल्यामुळें गोवळकोंड्याच्या सुलतानास भीति उत्पन्न झाली. तेव्हां त्यानें शिवाजीशीं सख्य केलें. ४. शिवाय गोवळकोंड्यांतील हिंदू प्रधानांना शिवाजीविषयीं सहानुभूति वाटे. या अनुकूल परिस्थितीचा फायदा घेऊन गोवळकोंड्याच्या राज्याशीं विशेष मैत्री संपादन करावी, व तेथून पैसा व सैन्य घेऊन विजापूरच्या ताब्यांतील कर्नाटक प्रांत जिंकावा असें शिवाजील

वाटलें. ह्मणून त्यानें कर्नाटकांत जावयाचें ठरविलें. शिवाजी रायगडाहून इ. स. १६७७ च्या आरंभीं ७० हजार सैन्यासह निघून भागानगर, तुंगभद्रेच्या कांठीं करनाल कडापें, कृष्णा व भावनाशीचा निवृत्ति-संगम. मल्लिकार्जुनपर्वत या मार्गानें व्यंकट-रमणगिरी खिंडींतून एप्रिल महिन्यांत कर्नाटकांत तो आला; मद्रासेजवळच्या पेडापोलम् वरून जिंजीवर वज्रासारखे हल्ले करून तेथील अजिंक्य डोंगरी किल्ला घेतला. तेथून कावेरीच्या कांठावरील तिरुमलवाडीला तळ देऊन त्यानें व्यंकोजोशीं समेटाचें बोलणें लाविलें. परंतु शहाजीच्या मिळकतीपैकीं थोडासा सुद्धां वांटा देण्यास व्यंकोजी तयार होईना. अशा रीतीनें वेळ दवडण्यांत अर्थ नाहीं, असें पाहून व्यंकोजी व विजापूरकर यांच्याकडील शक्य तेवढा देश लढाई करून घ्यावा असा शिवाजीनें बेत केला; व वेलोर, महाराजगड, जगदेवगड, कर्नाटकगड, हे किल्ले त्यानें घेतले. पुढें पूर्वेकडील घाट उतरून त्यानें शहाजीच्या जहागिरींतील कोलार, बालापूर, बंगलोर, वास्कोट, शिरटें वगैरे प्रान्त घेतले. नंतर श्रीरंगपट्टण व इतर भागांतून खंडणी वसूल करून तो परत येतांना त्यानें गदग, कोपाल, बेलवाडी व लक्ष्मेश्वर हे प्रान्त घेतले आणि त्याला वाटेंत अडथळा करण्यासाठीं आलेल्या विजापूरच्या तीन सरदारांचा व घाटगे व निंबाळकर यांचा त्यानें पराभव केला. ही कर्नाटकची स्वारी शिवाजीनें प्रतिकूल परिस्थितींत केली. अवघ्या पधंरा महिन्यांच्या अवधींत आपल्या ठिकाणापासून ७०० मैल दूर असलेल्या परप्रान्तावर शिवाजीनें झडप घातली; व माघार न घेतां विजयावर विजय मिळवून आपल्या राज्याइतक्या विस्ताराचा संगतवार नवा प्रदेश त्यानें काबीज केला. या स्वारीमुळें शिवाजीच्या उत्पन्नांत २० लाख होनांची भर पडली, व कर्नाटक, ह्मैसूरचा कांहीं भाग, बेळगांव व धारवाड जिल्हे इतक्या प्रदेशांतील सुमारें शंभर नवे किल्ले त्याच्या सत्ते खालीं आले. अशा रीतीनें संबंध कर्नाटक प्रान्ताचें द्रव्यसत्त्व पिळून त्यानें तें महाराष्ट्रांत आणिलें.


१५ शिवाजी आणि इंग्रजः-- याप्रकारें कर्नाटकांत वर्चस्व

बसविल्यावर समुद्रावरसुद्धां आपली सत्ता चालवावी असें शिवाजीला वाटूं लागलें. इंग्रजांच्या ताब्यांत असलेल्या मुंबईवर शिवाजीचा डोळा होता. त्याचप्रमाणें सुरतचा व्यापारही त्याला अडवावयाचा होता. या हेतूनें त्यानें मुंबईच्या दक्षिणेस बारा मैलांवर असलेल्या खांदेरी नांवाच्या खडकाळ बेटावर किल्ला बांधण्यासाठीं आपले लोक इ. स. १६७२ सालीं रवाना केले. परंतु मोंगल, जंजिऱ्याचा सिद्दी व इंग्रज यांनीं आपापलें आरमार एकत्र करून लढण्याची तयारी केली. यामुळें मराठ्यांना ती जागा सोडावी लागली; व शिवाजीचा यत्न फसला. सात वर्षांनंतर इ. स. १६७९ च्या सप्टेंबरांत शिवाजीनें त्या बेटावर किल्ला बांधण्याचा जोराचा फिरून प्रयत्न केला. त्याविरुद्ध इंग्रजांनीं क्याग्विन नामक अधिकाऱ्याबरोबर आरमार पाठविलें. परंतु मराठ्यांच्या लहानशाच तराफ्यानें इतका जोराचा प्रतिकार केला कीं, इंग्रजी आरमारांतील बरींच जहाजें पळत सुटलीं. सहा गुराब व शिबार अशीं जहाजें बुडालीं; कांहीं जहाजें मराठ्यांच्या स्वाधीन झालीं. इंग्रजांनीं शिवाजीविरुद्ध मदत मिळविण्यासाठीं पोर्तुगीजांना व सिद्दीला आपल्या बाजूला वळविण्याचा प्रयत्न केला. यापैकीं सिद्दी आपल्या प्रचंड आरमारानिशीं आला. परंतु चार हजार मराठा सैन्य मुंबईवर हल्ला करण्यासाठीं पनवेल येथें आलें. हे पाहून इंग्रज भ्याले. सिद्दीनें कांहीं गांवें जाळलीं, अंधेरी घेतली, व खांदेरीला वेढा दिला; तरीही इंग्रजांनीं शिवाजीबरोबर तह करून खांदेरीवरील त्याचा हक्क कबूल केला. अशा प्रकारें शिवाजीनें आपला दरारा मुंबई पासून गोव्यांपर्यंत बसविला.

१६ **राज्यव्यवस्थाः**--येथवर शिवाजीच्या मुलुखगिरीचें पर्यालोचन केल्यावर राज्यशासनांच्या बाबतींत सुद्धां तो कसा तरबेज होता हें आपण आतां पाहूं. सर्वसत्ता स्वतःच्याच हातांत केन्द्रीभूत न करतां प्राचीन हिंदू पद्धतीप्रमाणें शिवाजीनें अष्ट प्रधानांचें मंडळ स्थापून त्यांतील प्रत्येकाकडे कांहीं कांहीं खातीं दिलीं; ती व्यवस्था पुढीलप्रमाणें होतीः—

फारसी नांव	संस्कृत नांव	काम
पेशवा	मुख्यप्रधान	मुलकी व लष्करी खात्यांवर देखरेख, सर्व राज्याची व्यवस्था सुयंत्रित चालविणें, राजाच्या गैरहजेरींत सर्व व्यवस्था पाहणें.
सरनोबत	सेनापति	लष्कराचा मुख्य अधिकारी; याच्याकडे घोडदळाची व्यवस्था असून, पायदळाच्या व्यवस्थेसाठीं त्याच्या हाताखालीं एक दुय्यम सेनापति असे.
मुजुमदार	पंतअमात्य	स्वराज्यांतील वसुलाची व जमाखर्चाची व्यवस्था.
सुरनवीस	पंतसचिव	दप्तराचा सांभाळ.
वाक-इ-नवीस	मंत्री	खासगी कारभार.
दबीर	सुमंत	परराष्ट्रीय कारभार.
	पंडितराव उर्फ दानाध्यक्ष	देवस्थानें, दानधर्म, शास्त्रार्थ.
	न्यायाधीश	फौजदारी व दिवाणी न्याय करणें.


हें अष्टप्रधान मंडळ इंग्लिश कॅबिनेटसारखें होतें असें कांहीं ह्मणतात. परंतु हें ह्मणणें बरोबर नाहीं; कारण [१] यांतील अधिकारी लोकप्रतिनिधि नसून त्यांची नेमणूक राजाच्या इच्छेवर अवलंबून होती. [२] प्रत्येक अधिकारी स्वतःच्या खात्यापुरता स्वतंत्र नसून, तो फक्त राजाच्या हुकुमाप्रमाणें त्या खात्याची व्यवस्था पाही. त्यामुळें हे अधिकारी आपापल्या खात्यापुरते राजाचे चिटणीस व सल्लामसलतगार असत. [३] शेवटचे दोन वगळून बाकीच्या सर्वांकडे लष्करी अधिकारही होते व त्यांना मोहिमेवरही जावें लागे. [४] कांहीं महत्त्वाच्या बाबतींत सर्व प्रधानांचा विचार घेण्यांत येई —इतर बाबतींत राजा स्वतःच्या मताप्रमाणें वागे. तथापि कॅबिनेटशीं या मंडळाचें थोडेसें साम्य होतें. कारण महत्त्वाच्या कागद



पुरंधर.



सिंहगढ–कल्याण दरवाजा.



राजगढ.

पत्रांवर प्रत्येक प्रधानाचें मत लेखी घेण्यांत येई, व त्यांच्या सह्या होऊन त्यांचा शिक्का मोर्तबही लागे. यावरून शिवाजी सर्वस्वी एकतंत्री राजा नसून तो जबाबदारीची वांटणी सर्वांना देत असे, असें दिसतें.

१७ जमीन महसुलाची पद्धत:— (१) स्वराज्यांतील सर्व मुलखांचे निरनिराळे सुभे व महाल करून त्यांवर सुभेदार, मुजुमदार व महालकरी असे अधिकारी असत. (२) शिवाजीनें सर्व जमीन मोजविली व ती लागवड करणारांच्या नांवें नोंदवून दिली. (३) मुसलमानी अमलांत रयत व राजा यांमध्यें प्रत्येक गावांत देशमुख, देशपांडे, देसाई, पाटील, कुलकर्णी, खोत, मिरासदार, जमीनदार वगैरे मध्यवर्ती लोकांचा वर्ग असे. हे लोक रयतेकडून जास्त सारा घेऊन तिला त्रास देत; सरकारांत कमी सारा भरून त्याला बेसुमार फसवीत; आणि किल्ले, वाडे, व सशस्त्र शिपाई यांच्या जोरावर राजाला दाद देत नसत. शिवाजीनें हा जुलमी वर्ग अजिबात मोडला व (४) त्यांच्याऐवजीं सर्वत्र वेतनी कामगारांमार्फत सारा-वसुली करून रयत व सरकार यांचा प्रत्यक्ष संबंध आणला. त्यामुळें प्रजा सुखी व स्वतंत्र झाली. त्याचें वार्षिक उत्पन्न नऊ कोटी रुपये होतें. (५) प्रत्येक प्रांताचा वसूल सर्वच खर्च न करितां त्यांतून कांहीं शिल्लक ठेवण्यांत येई. त्याला **खजिना** ह्मणत. शिवाजीच्या मृत्युसमयीं हा खजिना विपुल होता व कापड वगैरे जरीचें सामान एक कोटी होन किंमतीचें होतें.

१८ न्याय-व्यवस्था :— वसुलासंबंधीं तक्रारीचा व फौजदारी खटल्यांचा निकाल फौजदार शास्त्रानुसार करीत असे. प्रत्येक गांवांतील दिवाणी खटल्यांचा निकाल ग्रामपंचांकडून होई, व तो बजावण्याचें काम सुभेदाराचें होतें. या सर्वांवर एक न्यायाधीश असून त्याच्याकडे निकालाचा फेर विचार होई. शिवाजी राजा जरूरीच्या कामांत स्वतः न्यायदान करी.

१९ लष्करी व्यवस्था:--शिवाजीच्या लष्करांत आरमार, तोफखाना, घोडदळ, पायदळ, शरीररक्षक व हत्तीचा तांडा असे विभाग असत. (१) घोडदळांत दोन प्रकार होते-बारगीर व शिलेदार. बारगिरांच्या दळांस पागा अशी संज्ञा असून त्यांतील घोडीं सरकारी व त्यांची

निगाही सरकारमार्फत होई. शिलेदारांना स्वतःचीं घोडीं आणून त्यांची व्यवस्थाही त्यांना स्वतःच ठेवावी लागे. (२) पायदळांत घांटमाथ्यावरचे मावळे व घांटाखालील कोंकणी हेटकरी लोक असत. यांतील प्रत्येकानें ढाल, तलवार व बंदूक हीं शस्त्रें स्वतः आणावीं असा नियम होता. दारूगोळा मात्र सरकारी मिळे. यांतील लोक डोंगराळ प्रदेशाचे रहिवाशी असल्यामुळें अवघड डोंगरांवर व कड्यांवर चढण्यांत ते कुशल व चपल असत. (३) याशिवाय शत्रूचा हल्ला केव्हां येईल याचा नेम नसल्यामुळें शिवाजीनें पांच हजार शरीररक्षक स्वतः बरोबर ठेविले होते, त्यांत बहुतेक शूर मावळे असत. (४) त्याच्या लष्करांत १२६० हत्ती होते, असें 'सभासद' ह्मणतो. (५) त्याच्या कारकीर्दीच्या आरंभीं १२००० बारगीर व २००० शिलेदार होते; परंतु ही संख्या जावळीच्या विजयानंतर अनुक्रमें ७००० व ३००० अशी झाली; शिवाय पायदळांत १०००० मावळे होते. मृत्यूच्यावेळीं शिवाजीकडें ४५००० पागा, ६०००० शिलेदार व १००००० मावळे होते. उत्तम व्यवस्था व कडक शिस्त यांमुळें त्याचें लष्कर नमुनेदार झालें होतें; व ह्मणूनच खाफीखानासारख्या विरोधी इतिहासकारानें सुद्धां त्याची स्तुति केली आहे. (६) त्याच्या पदरीं उत्तम हेर असून ते निरनिराळ्या ठिकाणीं फिरून तेथलि परिस्थिति व इतर माहिती त्याला पुरवीत; यांपैकीं बाहिर्जी नाईक व हिरोजी हे प्रसिद्ध हेर आहेत,

२० शिवाजीचें आरमारः—मोंगलांच्या ताब्यांतील बंदरकांठच्या कांहीं शहरांत व्यापार चांगला चालत असल्यामुळें, तीं लुटून पैसा मिळवावा अशी शिवाजीची इच्छा होती. पोर्तुगीज लोक समुद्रावर लुटालूट करून मराठी प्रजेला त्रास देत; तेव्हां त्यांनाही आळा घालणें इष्ट होतें. शिवाय जंजिऱ्याच्या सिद्दीबरोबर लढून त्याला जेरीला आणावें असें त्याचें धोरण होतें. त्यामुळें शिवाजीनें आरमार बांधण्यास सुरवात केली. इ. स. १६७२ च्या सुमारास त्याच्या आरमारांत निरनिराळ्या प्रकारचीं अजमासें १६० जहाजें होतीं, परंतु चित्रगुप्ताच्या बखरींत तीं ६४० होतीं असें लिहिलें आहे. हें आरमार दर्यासारंग इब्राहीम खान व मायनाक भंडारी या दर्यावर्दी सरदारांच्या ताब्यांत दिलें असून त्याच्या

हाताखालीं मराठे, भंडारी, कोळी व गाबीद असे उत्कृष्ट खलाशी होते. या आरमाराच्या रक्षणार्थ समुद्रांत बांधलेल्या किल्यांपैकीं रायरी, सिंधुदुर्ग (मालवण), विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, अंजनवेल, खांदेरी वगैरे प्रसिद्ध आहेत. यांपैकीं कांहीं ठिकाणीं जहाजें बांधण्याच्या मोठ्या गोद्या होत्या. या आरमाराच्या साहाय्यानें शिवाजीनें गोंव्या खालीं १३० मैलांवर असलेल्या बार्सीलोरावर हल्ला करून बरीच लूट आणिली; मोंगलापासून दाभोळ बंदर घेतलें; व समुद्रावर बराच धुमाकूळ मांडिला. त्यानें समुद्रावर इतकें वर्चस्व बसविलें होतें कीं, इंग्रज व पोर्तुगीझ हे सुद्धां त्याला भिऊं लागले. त्याच्याविषयीं इंग्रज ह्मणत कीं "तो स्वतः दर्यावर्दी नव्हता ह्मणून बरें, नाहीं तर जशी त्यानें जमीन उध्वस्त केली त्याप्रमाणेंच समुद्रही शत्रुविरहीत केला असता.

२१ शिवाजीचें धार्मिक धोरण फार उदारतेचें होतें. कुराणाविषयीं सुद्धां तो आदर बाळगी. ज्या काळीं औरंगजेब बादशहा आपल्या धर्मांधतेनें हिंदूंच्या वेदपठणाला अडथळा करून देवळें पाडीत होता, त्याच काळीं शिवाजीनें आपल्या सर्वधर्मसहिष्णुतेमुळें हिंदूंची उदारबुद्धि प्रत्ययास आणिली. तो सदाचारी, दयाळू, देवभक्त व गोप्रजाप्रतिपालक होता. भवानीवर त्याची अगाध व अढळ भक्ति होती, व आणीबाणीच्या प्रसंगीं तिच्या स्फूर्तिप्रमाणें तो वागत असे. तो आपल्याला ईश्वराचा दास मानी. सर्व पंथांच्या पवित्र स्थानांना तो सारखाच मान देई, व हिंदूंचीं देवालयें आणि मुसलमानांच्या मशीदी आणि दरगे यांना सारख्याच देणग्या देत असे. जिझीया कराविरुद्ध औरंगजेबास शिवाजीनें पाठविलेल्या पत्रावरून सुद्धां त्याचें सर्वधर्मसहिष्णुतेचें उदात्त ध्येय स्पष्टपणानें दिसतें. त्यानें विद्वान ब्राह्मणांना इनामें दिलीं व मुसलमानांच्या मशिदींचाही खर्च चालविला. त्या काळचा प्रसिद्ध समर्थ रामदास स्वामी हा शिवाजीचा गुरु होता. *

* त्यानेंच शिवाजीच्या मनांत स्वराज्य स्थापनेची स्फूर्ति उत्पन्न केली. व हिंदूसंघटन आणि राजकीय धोरण या गोष्टी शिवाजीला त्यानेंच शिकवील्या असे कांहीं लोक मानतात. परंतु सरकार, सरदेसाई, केळुसकर हे विद्वान् लेखक हे विधान मान्य करीत नाहींत.

२२ शिवाजीचा स्वभाव व वर्तणूकः— शिवाजीचें खासगी वर्तन फारच पवित्र व उदात्त होतें. त्याच्या ठिकाणीं मातृ–पितृ भाक्ति व पुत्र-पत्नी प्रेम हीं निःसीम होतीं. लहानपणापासूनच स्वबुद्धीनें व शिक्षणामुळें तो निर्व्यसनी, साधुसंतांबद्दल आदर बाळगणारा, त्यांचा समागम व सेवा करणारा आणि पवित्रग्रंथ, काव्य इत्यादिंच्या श्रवणाची गोडी असणारा असा होता. यामुळेंच तो कधींही धर्मवेडा झाला नाहीं. त्याचा राज्यस्थापनेचा हेतु स्वतःला सुख व ऐश्वर्य मिळावें असा नसून त्या वेळची परिस्थिति सुधारावी, मुसलमानांच्या जाचांतून हिंदू जात बचवावी, बुडत असलेली हिंदू संस्कृति तारावी, व परराज्याऐवजीं "स्वराज्य" स्थापन करावें असा होता. त्यामुळेंच त्याला हिंदुपद पादशहा हें नांव मिळालें. ब्राह्मणांना बक्षिसें देऊन व विद्वानांचा सन्मान करून त्यानें मोंगलांच्या धर्मवेडेपणामुळें मृतप्राय झालेला वेदाभ्यास व संस्कृत वाङ्मय यांचें पुनरुज्जीवन केलें व मराठी कवि आणि शाहीर यांना उत्तेजन दिलें. कवि भूषण व कीर्तनकार संत तुकाराम यांना त्याचा आश्रय होता. त्याची शरीरयष्टि व स्वभाव फारच आकर्षक होते; व बोलणें विनोदी होतें; त्यामुळें त्याचे अधिकारी त्याच्यावर प्रेम करीत व त्याच्यासाठीं स्वार्थत्याग करण्याला ते तयार होते.

२३ शिवाजीची अखेरः— वयाच्या दहाव्या वर्षापासून अविश्रांत श्रम करीत राहिल्यानें शिवाजीचें शरीर झिजत चाललें होतें. त्याला चैनीसाठीं तर राहोच, पण विश्रांतीसाठीं देखील एकादा दिवस क्वचितच सांपडे. शेवटीं सन १६७८ मध्यें याचा पुत्र संभाजी रुसून मोंगलांना मिळाल्यामुळें त्याच्या हृदयाला धक्का बसला. अशा स्थितींत रायगडावर असतां त्यास ज्वर येऊन ५ एप्रिल सन १६८० रोजीं ह्या हिंदुराज्य-संस्थापकाचा देहांत झाला. याची छत्री अद्याप रायगडावर आहे.

२४ कारकीर्दीचें सिंहावलोकनः— कांहीं लोक शिवाजीला चोर, डोंगरांतील उंदीर, दुष्ट वाटमाऱ्या इत्यादि शिव्यांनीं संबोधितात. परंतु मनावर दुःसंस्कार करणाऱ्या या गोष्टी जर दृष्टीआड करून ऐतिहासिक कागद पत्रांवरून आपण त्याची योग्यता पाहूं लागलों, तर त्यांत शिवाजीच्या अंगच्या अवगुणांच्या ऐवजीं अनेक सद्गुणांचाच स्पष्ट गौरव आपल्याला

आढळून येईल. इतिहासानें त्याला 'महापुरुष' हीच संज्ञा दिली आहे. याच्या विषयीं ऑर्म साहेब ह्मणतो, "आजपर्यंत होऊन गेलेल्या कोणत्याही सेनापतीपेक्षां शिवाजीच्या अंगीं अधिक चापल्य होतें. एकाद्या सैनिकालाही कधीं करतां आली नसेल इतकी वाटचाल शिवाजीनें बरोबर सैन्याचा व्याप घेऊन केली. संकटें कितीही अकस्मात् आलीं आणि तीं कितीही बिकट स्वरूपाचीं असलीं तरी आपल्या विलक्षण समयसूचकतेनें त्यांचा तो तावडतोब निरास करी. त्याची बुद्धी कधींही चळली नाहीं; व धैर्य कधींही भंग पावलें नाहीं. त्याच्या सैन्यांतील अत्यंत श्रेष्ठ हुद्यावर असलेल्या मनुष्यालाही त्याच्या बुद्धीच्या श्रेष्ठत्वाचें कौतुक करण्यांत आनंद वाटत असे; आणि हातांत समशेर घेऊन गनिमांवर तुटून पडलेला शिवाजी ज्या सैनिकांना पाहवयास मिळाला ते तो अत्यंत धन्यतेचा प्रसंग, अशा वृत्तीनें त्याचा अभिमान बाळगीत असत." परंतु शिवाजी नुसता शूरच नव्हता तर राजनीतिविशारद आणि सर्वगुणसंपन्न असा होता. शिवाजीचें वर्तन न्यायाचें, नीतिचें, पराक्रमाचें, व स्वधर्मपरायणतेचें होतें. शिवाजी केवळ मराठी साम्राज्याचा संस्थापक नसून हिंदू राज्याला पुनरुज्जीवन देणारा, आर्यसंस्कृतीचा संरक्षक, व महाराष्ट्र आणि हिंदुपदपादशाही घडविणारा होता. अनेक लढायांत विजय संपादन करणें, मैदानांत, समुद्रतीरावर किंवा डोंगरावर तीनचारशें किल्ले बांधणें; नवीन सैन्य तयार करणें; नवीन आरमार बांधणें; नवे कायदे करणें; स्वभाषेला उत्तेजन देणें; कवींना आश्रय देणें; नवीं शहरें वसविणें; स्वधर्म स्थापन करून त्याचें ऐश्वर्य वाढविणें,—सारांश स्वराज्याचा उद्धार करून स्वदेशाला स्वतंत्र व सुखी करणें ह्या लोकोत्तर कार्यांत जर कोण्या पुरुषानें ह्या भारत भूमीला अक्षय्य ऋणी करून ठेविलें असेल तर तें शिवाजीनेंच होय. ह्मणून सिकंदर, हॅनीबाल, नेपोलियन, सीझर इत्यादि अद्वितीय विभुतींच्या वर्गांत त्याची गणना केली पाहिजे. ह्मणून त्यास हिंदी सीझर, हिंदी ॲलेक्झांडर, किंवा हिंदी नेपोलियन असें ह्मणावयास हरकत नाहीं, असें आमचें ठाम मत आहे. ×

× याच लेखकाचे "Shivaji the Great" पुस्तक पहा.

प्रकरण ३ रें.

छत्रपति संभाजी (१६८०–१६८९)

१ गादीकरितां कटः— शिवाजी महाराजांच्या अंत्यविधीनंतर लगेच संभाजी रायगडाहून पन्हाळ्यास आला. त्याच्यामागें त्याची सावत्र आई सोयराबाई हिनें मराठ्यांची मोकळी झालेली गादी आपला पुत्र राजाराम याला मिळवून देण्याविषयीं कांहीं प्रधानांबरोबर गुप्त कट रचण्याला सुरवात केली, व पन्हाळ्यावर संभाजीला पकडण्याविषयीं किल्लेदाराला गुप्त पत्रें लिहलीं. संभाजीचें खासगी वर्तन बरेंच गैर असल्यामुळें शिवाजीनें त्याला पन्हाळ्यावर नजरकैदेंत ठेविलें होतें; सन १६७८ मध्यें तो मोंगलांना मिळाला व इ. स. १६७९ त पन्हाळ्याला परत आला. अशा तऱ्हेच्या त्याच्या गैर वागणुकीनें अधिकारी आधींच बिथरले होते. त्यामुळें त्याला गादीसाठीं अयोग्य समजून ते सोयराबाईला सामील झाले. परंतु कांहीं अधिकारी वर्ग व पन्हाळ्यांतील सैन्य संभाजीच्या बाजूचें असल्यामुळें तो कट फसला. कटाची बातमी ऐकून संभाजीनें चिडून जाऊन पन्हाळा व कोल्हापूर हीं ठिकाणें आपल्या ताब्यांत घेतलीं व रायगडावर चाल केली. तेव्हां रायगड येथील विरुद्ध पक्षाच्या लोकांनींसुद्धां भिऊन तो किल्ला त्याचे हवालीं केला. कटांत सामील असणाऱ्या मंडळींना हत्तीच्या पायीं बांधणें, कडेलोट करणें अशा जबर शिक्षा देण्यांत आल्या. पेशवा व पंत सचीव यांना पकडून त्यांचीं घरें जाळण्यांत आलीं. मोठमोठे दोनशें सरदार या कटाच्या प्रकरणांत संभाजीच्या क्रोधास बळी पडले. तसेंच रागाच्या भरांत सोयराबाईनें शिवाजीला विष देऊन ठार केलें असा तिच्यावर आरोप करून, त्यानें तिला भिंतींत चिणून मारलें; व राजारामाला फक्त बंदींत ठेविलें. नंतर राज्याची व्यवस्था लावून संभाजीनें फेब्रुवारी सन १६८१ त स्वतःला राज्याभिषेक करून घेतला. या समारंभाला रामदास स्वामीला बोलाविण्यासाठीं तो स्वतः परळीला गेला. परंतु संभाजीचीं दुष्ट कृत्यें कानावर गेल्यामुळें त्याची भेट घेण्याचें स्वामीनें नाकारलें; तरी प्रजेचें उत्तम रीतीनें संघटन व संरक्षण करण्याविषयीं एक उपदेशपर पत्र त्यानें संभाजीला पाठविलें.

२ कारकीर्दीतील युध्दें :— संभाजीची सर्व कारकीर्द स्वराज्य रक्षणासाठीं, विशेषतः मोंगलाशीं लढण्यांत, खर्च झाली; व त्याची परिस्थिति लक्ष्यांत घेतां ही कामगिरी त्याने फारच शौर्यानें बजाविली.

(१) इ. स. १६८०च्या आक्टोबर महिन्यांत संभाजीनें **सुरत** आणि **औरंगाबाद** येथील मोंगली मुलखांत लूट करण्यासाठीं सैन्य रवाना केलें. खानदेशाची धनाढ्य राजधानी **बऱ्हाणपूर** येथें स्वतः विजेप्रमाणें छापा घालून त्यानें ती मनमुराद लुटली. या अपमानामुळें औरंगजेबाला संताप आला, व दक्षिणेच्या सुभेदाराची बदली करून मराठ्यांच्या पारिपत्यासाठीं त्या ठिकाणीं जातीनें जाण्याचें त्यानें ठरविलें.

(२) आपल्या बापानें सुरू केलेली **सिद्दीशीं लढाई** संभाजीनें चालू ठेविली. सन १६८१ मध्यें संभाजीनें प्रथम सिद्दीकडून अंधेरी घेण्याचा प्रयत्न केला, व वीस हजार सैन्य आणि पन्नासहजार मजूर यांसह जंजिऱ्याला वेढा दिला; परंतु हे दोन्ही प्रयत्न फसले. जंजिरा काबीज करण्याच्या इराद्यानें खुष्की सैन्याला समुद्रावर मदत करण्यासाठीं त्यानें एक मोठें आरमार सुद्धां तयार केलें, परंतु सिद्दीनें त्याची दाणादाण उडविली.

(३) सन १६८२ मध्यें मोंगल आणि पोर्तुगीज यांनीं मैत्री संपादन केली असें समजल्यामुळें, पोर्तुगीजांना धडा शिकविण्यासाठीं संभाजीनें इ. स. १६८३ च्या जून महिन्यांत तीस हजार सैन्यानिशीं **चौल** किल्ल्याला वेढा दिला. परंतु तो त्यास जिंकितां आला नाहीं. पोर्तुगीज गव्हर्नर **अल्वर** यानें मराठ्यांचा कांहीं मुलूख उध्वस्त करून **फोंडा** वेढला; परंतु या ठिकाणीं संभाजीनें त्याच्या सैन्याची वाताहात उडविल्यामुळें अल्वरला कसाबसा गोंव्याचा आश्रय करावा लागला. या वेळीं संभाजीनें गोव्याच्या आजुबाजूचीं कांहीं गांवें उध्वस्त केलीं; व **गोंव्याला वेढा** दिला. गोंवा त्याच्या हातांत पडणार होता. इतक्यांत पोर्तुगीजांच्या रक्षणासाठीं **शहाजादा शहा आलम** मोंगल सैन्यासह आला. अशा रीतीनें गोंव्याचा प्रयत्न फसला तरी, शहाआलमचें सैन्य परततांना मराठी सैन्यानें त्याची पाठ पुरवून आणि अन्नाचा पुरवठा तोडून त्याचा पुरा सूड उगविला. उपास मारीनें व रोगाच्या धाडीनें हजारों लोक आणि

जनावरें मेलीं; शिल्लक राहिलेली थोडी सेना फारच मुष्किलीनें अहमदनगरला पोंहचली.

(४) [अ] या नुकसानीचा, त्रासाचा व मानहानीचा मोबदला घेण्यासाठीं शहाआलमनें नवीन फौज जमवून मराठ्यांशीं पुन्हा युद्ध सुरू केलें. शहाजादा आहमदशहा यानें सलहर जिंकून नाशिक जवळच्या **रामसेज** नामक डोंगरी किल्ल्याला वेढा दिला; पण तो त्याला घेतां आला नाहीं. याच्या उलट पुण्यापासून चाळीस मैलांवरील पाथर्डी येथें मोंगलांच्या पीलखान्यावर मराठ्यांनीं अचानक हल्ला करून, ते कांहीं हत्ति घेऊन गेले. [ब] इ. स. १६८४ मध्यें निजाम–उल्–मुल्कचा बाप शहाबुद्दीन यानें चाकण व सुपा घेऊन मराठ्यांची राजधानी **रायगड** यास वेढा दिला; व बहादुरगड काबीज करून संभाजीच्या शरीरक्षांतील कांहीं नायकांना कैद केलें. इ. स. १६८५ मध्यें मोंगलांनीं संभाजीकडून गोकाक, हुबळी, धारवाड आणि कारवार हे घेतले; पण हा विजय क्षणिक होता. कारण संभाजीनें मोंगल सैन्याचा पिच्छा पुरवून त्यांतील अर्धें अधिक सैन्य मारलें व खानदेशपर्यंत लुटालूट केली. [क] कांहीं मराठे अहमदनगरच्या किल्ल्या-वरही दोरखंडानें चढून गेले; कांहींनीं भडोच लुटलें; व मोंगलांविरुद्ध विजापूर व गोवळकोंडा यांना संभाजीनें यथाशक्ति मदत दिली. [ड] इ. स. १६८१ मध्यें शहाजादा **अकबर** रजपुतांकडून दक्षिणेमध्यें संभाजीच्या आश्रयाला आला होता हें मागें सांगितलें आहेच. इ. स. १६८६ त विजापुरांत औरंगजेबास विजय मिळाल्यानंतर अकबराला इराणांत पळून जाण्याला संधि मिळाली.

३ संभाजीच्या शौर्याचा कळसः–विजापुर व गोवळकोंडा जिंकल्या-नंतर मराठ्यांचें निर्मूलन करण्यासाठीं औरंगजेबानें आपली सर्व लष्करी शक्ति एकवटली व कारस्थान रचण्याला त्यानें सुरवात केली; त्याला कांहीं मराठे सरदार फसले. कलुषा नामक संभाजीच्या मंत्र्याविषयीं सरदारांचा तिटकारा आणि संभाजीचा ऐदीपणा यांचा मराठी राज्यावर फारच दुष्परिणाम झाला. सलहर व रामसेज हे मराठी राज्यांतील उत्तरेकडील किल्ले व दक्षिणेकडील बंगलोर मोंगलांच्या हातीं सांपडले; परंतु मराठ्यांनीं याला तोड म्हणून

कारोमांडेलच्या किनाऱ्यावरील **पन्नामाली, अर्काट, कांजिवरम** आणि म्हैसूर इलाख्यांतील कांहीं भाग आपल्या हातीं घेतले. विजापूर पडल्यानंतर तेथील मराठे सरदार कपटी व धर्मांध औरंगजेबाच्या विरुद्ध होऊन त्यांनीं स्वसंरक्षणासाठीं संभाजीचें आधिपत्य स्वीकारलें. त्यांत डफळे, माने, घाटगे, निंबाळकर वगैरे मुख्य होते. यांच्या जहागिऱ्या राज्यास जोडल्यामुळें संभाजीचें राज्य विस्तृत झालें; आणि त्यांच्या मदतीनें मोंगलांच्या ताब्यांतील किल्ले व शहरें मिळून आणखी १२० ठिकाणें संभाजीनें घेतलीं. अशा प्रकारें औरंगजेबानें दक्षिणेंत जितका राज्यविस्तार केला होता तेवढाच प्रदेश संभाजीनें मिळविला. तो परत जिंकण्यासाठीं सेनापति सर्जेखानाला औरंगजेबानें पाठविलें; परंतु **हंबीरराव मोहिते** नामक एका शूर सरदारानें सर्जेखानाला महाबळेश्वरीं गांठून त्याच्या सैन्याला दे माय धरणी ठाय ह्मणावयास लाविलें. या धुमश्चक्रींत हंबीरराव मोहिते मारला गेला, तरी या ठिकाणचा हा मराठ्यांचा दुसरा विजय फारच महत्त्वाचा असल्यामुळें सुवर्णाक्षरांनीं लिहिण्यासारखा आहे.

४ संभाजीचा वधः — याच्यानंतर संभाजीनें मोंगलांना जोरानें तोंड देण्याऐवजीं ऐषआरामांत गुंग होऊन राजकार्याकडे दुर्लक्ष केलें. त्यामुळें बेळगांव आणि इतर बरेच कोट किल्ले मोंगलांनीं जिंकले व शेवटीं संभाजीचा वध झाला. **शेख निज़ाम हैद्राबादी** नामक एक मोंगली सरदार पन्हाळ्याला वेढा देऊन बसला होता; तो न कळत कोल्हापुराहून निघाला व त्यानें विशाळगडच्या उत्तरेस वीस मैलांवर व रत्नागिरीच्या आग्नेय दिशेला बावीस मैलांवर असलेल्या संगमेश्वर या ठिकाणीं संभाजी व कलुषा यांच्या वर अचानक हल्ला केला. याच्या आगमनाची बातमी संभाजी राजाला त्याच्या हेरांकडून अगोदरच पोंहचली होती; परंतु तो दारूच्या धुंदींत असल्यामुळें बेफिकीर राहून "कलुषा जादुगार आहे, तो आपल्या जादूनें शत्रूंचा धुव्वा उडवील," असें ह्मणाला. हेरांनीं संभाजीला सावध करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला; परंतु त्यानें संतापून त्यांना हाकलून बाहेर काढलें. नंतर ही बातमी त्यांनीं राजाच्या शरीरसंरक्षकांना दिली. त्यांनीं राजाला रायगडावर निघून जाण्याविषयीं विनंति केली; परंतु कांहीं केल्या संभाजी भानावर येईना. इतक्यांत मोंगल आंत घुसले. संभाजीनें पळून जाण्याचा प्रयत्न केला, परंतु तो २८ डिसेंबर १६८८ रोजीं पकडला गेला; नंतर ही

सर्व पकडलेली मंडळी अकलूजला नेण्यांत आली; तेथून औरंगजेबानें पुण्याच्या आग्नेय दिशेस सोळा मैलांवर असलेल्या तुळापूर गांवीं आपला तळ दिला होता, तेथें कलुषाला व संभाजी राजाला त्या धर्मनिष्ठ बादशहानें अमानुषपणें ठार मारिलें, आणि संभाजीची जिव्हा छेदून व त्याच्या शरीराचे तुकडे तुकडे करवून तें कुत्र्यांकडून खावविलें. पराभूत राजाचा असा अमानुष वध जगाच्या इतिहासांत सांपडत नाहीं. आपल्या जित शत्रूशीं अकबराची उदार वागणूक व औरंगजेबाचें जितांशीं आचरण यांत महदंतर दिसतें.

५ **सिंहावलोकन:—** अशा रीतीनें शिवछत्रपतीचा जेष्ठ पुत्र संभाजी बात्तिसावे वर्षी मोंगलांच्या क्रौर्याला बळी पडला. परंतु मरण समयीं त्यानें अपूर्व धैर्य दाखविलें. त्याच्या वधामुळें लोक त्याचे अवगुण विसरले व स्वराज्यरक्षणासाठीं आणि निर्दोष वधाचा सूड घेण्यासाठीं त्यांनीं कंबरा कसल्या. त्याच्या कारकीर्दींतील बहुतेक संकटें त्याच्या निरर्गल वर्तनाचीं फळें होतीं. त्याच्या नीतिबाह्य वागणुकीमुळें त्याची आई सोयराबाई व कांहीं प्रधान मंडळींनीं आरंभीं त्याचेविरुद्ध कट केला, आणि त्याच्या कटामुळें संभाजीला आपल्या अधिकारी वर्गावर अविश्वास दाखवून आपला मित्र कलुषा याजवर भरंवसा ठेवावा लागला. त्याचें बहुतेक आयुष्य लढाईत खर्च झालें असलें, तरी तो विद्यापराङ्मुख नव्हता; तो हिंदी कवि असून "नखशिख आणि नायकाबद्ध" हीं दोन हिंदी काव्यें त्यानें रचिलीं. मादिरा आणि मदिराक्षी यांच्या आधीन असूनही त्यानें धर्माकडे केव्हांही दुर्लक्ष केलें नाहीं. याच्या कारकीर्दीत ख्रिस्ती लोकांनीं हिंदूंना बाटविण्याचा प्रयत्न केल्यामुळें त्यानें ख्रिस्त्यांचा प्रांत उध्वस्त केला व हर्सूलचा कुलकर्णी गंगाधर रंगनाथ हा श्रीमंत ब्राह्मण मुसलमान झाला होता, त्याला त्यानें हिंदु धर्मांत परत घेतलें. असामान्य अडचणी व प्रतिकूल परिस्थिति यांत सुद्धां त्यानें औरंगजेबासारख्या बलाढ्य शत्रूशीं धडाडीनें टक्कर देण्यांत आपली शिकस्त केली व शेवटीं सुद्धां त्यानें धर्म व स्वराज्य यांच्या वेदीवर आपली प्राणाहुती देऊन तो हुतात्मा झाला.

प्रकरण ४ थें

शिवाजी (शाहू) व राजाराम.

१ **मोंगलांशीं सामन्याची तयारीः**—संभाजी राजाचा अमानुष रीतीनें केलेला वध ऐकून मराठ्यांचीं अंतःकरणें खवळली, व रायगडावर असलेल्या सरदारांनीं मोंगलांशीं कोणत्याही प्रकारें तह न करण्याचा निश्चय केला. संभाजीचा पुत्र बाल शिवाजी यानें राजाचीं वस्त्रें धारण करावीं व राजारामानें राज्याची व्यवस्था पहावी असें त्यांनीं ठरविलें. पुढच्या मोहिमेबद्दल विचार होऊन **प्रल्हाद निराजीचें** मत ग्राह्य झालें कीं, [१] सैन्यांत पूर्ण शिस्त ठेवावी; [२] किल्ल्यांची डागडुजी करून त्यांच्यावर तोफखाना, अन्न पुरवठा व सैन्य भरती भरपूर असावी; [३] मोंगली प्रांतांत मराठ्यांनीं लुटालूट करावी; राजारामानें मोंगलांशीं तोंड द्यावें; व शिवाजी आणि येसूबाई यांनीं रायगडीं सुरक्षित असावें.

२ **राजारामाची** शरीरयष्टि भक्कम व उमदी असून त्याची वागणूक चित्ताकर्षक होती. हा चाणाक्ष व निर्भय वृत्तीचा होता. नउ वर्षें नजरकैदेंत असल्यामुळें हा सर्व व्यसनांपासून अलिप्त राहिला. राज्यकारभार हातीं घेतांच यानें रामदासाच्या समाधीचें व प्रतापगडावरच्या भवानीचें दर्शन घेऊन आपल्या धार्मिक वृत्तीबद्दल लोकांच्या मनांत विश्वास उत्पन्न केला.

३ **मोंगलांचे हल्लेः**— संभाजीच्या वधानंतर महाराष्ट्र जवळ जवळ आपणांस मिळालाच असें औरंगजेबाला वाटूं लागलें. त्यामुळें त्यानें महाराष्ट्राची राजधानी रायगड काबीज करण्यासाठीं इतकादखान नामक एका सरदाराला मोठ्या सैन्यासह पाठवून दिलें. त्याच वेळीं राजारामाला पकडण्यासाठीं मोंगलांनीं पन्हाळ्यास वेढा दिला. हें पाहून **संताजी घोरपडे** नामक सरदार एका रात्रीं मोंगल छावणींत बेधडक प्रवेश करून औरंगजेबास पकडण्यासाठीं तंबूंत घुसला; परंतु दुसऱ्या ठिकाणीं झोंपला असल्यामुळें बादशहा वांचला. शेवटीं संताजीनें त्याच्या तंबूचे सोन्याचे कळस घेऊन तो आपल्या छावणींत सुखरूप पोंचला. अशा

तऱ्हेच्या झटापटी चालल्या असतां मोंगलांचा जोराचा वेढा **रायगडास** पडला. तेथील येसुजी पिसाळ नामक किल्लेदारानें तो किल्ला फितुरीनें खानाच्या स्वाधीन केला. यामुळें येसूबाई, बाल शिवाजी व निरनिराळ्या प्रांतांतून शिवाजीनें आणलेली अतुल संपत्ति व जुने कागदपत्र, घोडे, हत्ती, वगैरे खानाच्या हातांत सापडलीं. औरंगजेबाचे ताब्यांत गेल्यावर शिवाजीला बादशहानें शाहू नांव देऊन त्याला व त्याच्या आईला आदरपूर्वक वागविलें.

विठोजी चव्हाणानें संताजीला त्याच्या कामगिरींत बरीच मदत केली ह्मणून त्याला **हिंमतबहादुर** पदवी देण्यांत आली. याचे वंशज कोल्हापूरचे मोठे जहागीरदार असून त्यांना हल्लीं हिम्मतबहादुरच ह्मणतात. संताजीनें मोंगल सैन्यावर पुढेंसुद्धां नेहमीं असेच छापे घालून त्याच्यावर इतका दरारा बसविला कीं, जर घोडीं पाणी पीत नसलीं तर, "पाण्यांत संताजी दिसतो काय" असे मोंगल सैनिक आपल्या घोड्यांना प्रश्न विचारीत. ही त्याची कामगिरी पाहून राजारामानें त्याला मामलकतमदार व त्याच्या भावांना 'हिंदूराव' व 'अमीर-उल् उमराव' या पदव्या दिल्या व सेनापति केला. त्याचे वंशज कोल्हापूरच्या राज्याच्या अष्टप्रधानांमधील सेनापति होते; व ते आजसुद्धां कापशीचे जहागीरदार आहेत. या मुदतींत **धनाजी जाधव** नामक संताजीच्या एका जोडीदार सरदारानें मोंगली हल्ला फलटण पासून परतविला. याबद्दल राजारामानें त्याला **जयसिंगराव** ही पदवी दिली.

४ जिंजीला प्रयाणः– वरील कामगिरीबद्दल औरंगजेबानें इतिकादखानाला 'झुलफिकारखान' ही पदवी दिली, आणि पन्हाळा व मिरज घेण्यास त्याला सांगितलें. **पन्हाळा** मोंगलांच्या हातांत सांपडतो असें वाटून राजारामानें शौर्यानें लढून मोंगल सैन्यांतून आपला मार्ग काढला, व तेथून विशाळगडावर गेला, तोंच खानानेंही राजारामाचा पाठलाग करून व **विशाळगडाला वेढा** देऊन त्याला आंत कोंडून ठेविलें. अशा संकटाच्यावेळीं पुढचें धोरण ठरविण्यासाठीं राजारामानें या ठिकाणीं सर्व मुख्य मुख्य अधिकारी बोलाविले; या सर्वांच्या मतें असें ठरलें कीं, मराठ्यांनीं मोंगलांच्या दळणवळणावर छापे घालावे; रामचंद्रपंत बावडेकरानें पश्चिम

महाराष्ट्रांत राहून मोंगलांशीं शक्य तों लढावें; विशाळगड व इतर ठिकाणच्या सैनिकांनीं आपापल्या किल्याचें रक्षण करावें, आणि राजाराम व इतर अधिकाऱ्यांनीं फुटून व यात्रेकरूंचें सोंग घेऊन विशाळगडाहून जिंजीस जावें. त्याप्रमाणें ते जाण्यास निघाले. वाटेंत त्यांना बरेच अडथळे व संकटें आलीं, तरी त्या सर्वांतून बचावून ते जिंजीस सुखरूप पोंहचले. अशा रीतीनें १६९० सालीं **जिंजी मराठ्यांची राजधानी** झाली. येसूबाईच्या सांगण्याप्रमाणें, शिवाजी राजा मोंगलांच्या ताब्यांत असल्यामुळें, तेथें राजारामानें राजवस्त्रें धारण केलीं, अष्ट प्रधानांचें मंडळ पुनः अमलांत आणिलें, आणि मराठी सैन्याची शिस्तवार उभारणी सुरू केली; दक्षिणेंत मोंगलांशीं युद्ध जोमानें चालू ठेवण्यासाठीं त्यानें रामचंद्रपंत बावडेकराला "हकूमत पनाह" असा किताब देऊन आपला प्रतिनिधी नेमिलें, आणि संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांजकडे जिंजी व कर्नाटकाच्या रक्षणाची कामगिरी दिली. अशा रीतीनें जरी पन्हाळा, रायगड, मिरज, मराठ्यांचा राजा व खजिना हे मोंगलांच्या ताब्यांत गेले, तरी मराठ्यांचा धीर तिळप्रायही खचला नाहीं. उलट मोंगलांशीं दुप्पट जोरानें सामना करण्याचा त्यांनीं चंग बांधिला.

५ जिंजीचा वेढा (१६९०-९८):-- इकडे कोंकणपट्टींत सुवर्णदुर्ग व विजयदुर्ग नामक अति बळकट किल्ले मराठ्यांनीं परत घेतल्यामुळें चिडून, वाटेल तें करून, जिंजी घेण्याचें औरंगजेबानें ठरविलें. स्वतः झुलफिकारनें हा किल्ला घेण्याचा बराच प्रयत्न केला; पण धनाजी जाधव व संताजी घोरपडे रूपी भीमार्जुनांच्या अप्रतीम पराक्रमामुळें त्याला यश येईना; यामुळें बादशहा बेभान होऊन त्यानें शहाजादा कामबक्ष याला तिकडे पाठविलें. हें पाहून खानाला राग आला, व या दोघांच्या बेबनावामुळें वेढ्याचें काम कांहीं काळ ढिलें पडलें. इकडे संताजीनें जिंजीचे रस्ते रोखून ठेविले व मोंगल सैन्यावर छापे घालून त्याची बरीच दाणादण उडविली. याच वेळीं मराठ्यांनीं कामबक्षाला बादशाही मिळवून देण्याची लालूच दाखवून त्याला फितविलें. बादशहानें वजीर आसदखान याला त्याचा पुत्र झुल्फिकार याच्या मदतीला पाठविलें होतें; त्यानें शहाजाद्याची फितुरी कळतांच त्याला पकडलें; व नंतर बाप लेकांनीं आपल्या अफाट

सैन्यासह वेढा जोरानें चालू केला, परंतु त्यांत त्यांना यश आलें नाहीं. हें पाहून बादशहानें खानास आणखी कुमक पाठविली. त्यामुळें या वाढलेल्या सैन्यापुढें आपला निभाव लागणार नाहीं असें वाटून व मराठ्यांनीं दक्षिणेंत पुन्हां मुलूख जिंकला असल्यामुळें तिकडे जाण्याच्या इराद्यानें राजाराम जिंजीहून निसटला, आणि संताजी, धनाजी व खंडो-बल्लाळ यांच्या मदतीनें तो सन १६९७ च्या डिसेंबरांत विशाळगडास आला. नंतर एकाच महिन्यांत झुल्फिकारनें जिंजीचा किल्ला घेऊन, कर्नाटकांत मोंगली राज्य पुन्हां प्रस्थापित केलें. तरी मोंगली राज्यावर याचा अनिष्ट परिणाम झाला. कारण मोंगली खजिना जवळ जवळ धुतला गेला, आणि मराठ्यांची शक्ति व मोंगलांचीं निर्बलता प्रदर्शित झाली.

६ **मराठ्यांचा महाराष्ट्रांतील विजयः**-- रामचंद्रपंत बावडे-करांच्या उत्साही कामगिरीमुळें राजारामाच्या सात वर्षांच्या गैरहजेरींत सुद्धां दक्षिणेंत मोंगलांना फारसें कांहीं करतां येईना. त्यांनीं सिंहगड व पुरंदर हे फक्त दोन किल्ले घेतले; परंतु मराठे घोडेस्वार जागोजागीं त्यांचा पाठपुरावा करीत असत. राजारामानें संताजी व धनाजी यांना दक्षि-णेंत मराठ्यांचें सैनापत्य करण्यास पाठविलें. त्यांनीं वाई येथें मोंगली तोफखान्यावर अचानक छापा घातला व मिरजेचा किल्ला परत घेतला. शिवाय याच सुमारास मोंगलांनीं जिंकलेला मराठी मुलूख परत मिळ-ण्यासाठीं राजारामानें एक अजब युक्ति शोधून काढिली. त्यानें हा मुलूख आपल्या मराठे सरदारांत वाटून देऊन त्यांनीं तो स्वबलानें मोंगलांकडून जिंकावा, व जहागीर म्हणून वहिवाटावा असें सांगितलें. त्याप्रमाणें इ. स. १६९२ मध्यें भोरच्या पंत सचिवाचा पूर्वज शंकर नारायण गंडेकर यानें मावळ्यांच्या मदतीनें राजगड आपल्या ताब्यांत घेतला, व पुढच्याच वर्षी तोरणा व रोहिडा काबीज केले. औंधच्या पंतप्रतिनिधीचा पूर्वज परशुराम त्रिंबक यानें पन्हाळा व विशाळगड घेतले; या शौर्याबद्दल त्याला समशेर बहादुर ही पदवी देण्यांत आली. कोंकण पट्टींत सुवर्णदुर्ग व विजयदुर्ग किल्ले सरखेल सिद्दोजी गुजरनें परत घेतले. पाटणकरानें, पाटण, वाई व कऱ्हाड हे जिंकले; पवारनें मध्य प्रांताचा कांहीं भाग लुटला; व सर्वांनीं मोंगलांच्या मुलखांत लुटालूट जाळपोळ वगैरे सुरवात केली.

७ सन १६९८ मधील परिस्थितिः—औरंगजेबानें विशेषतः दक्षिण जिंकण्याच्या प्रयत्नांत पुष्कळ संपत्ति व सेना खर्ची घातली होती. दक्षिणेंतील निबिड अरण्यें व उंच पहाड यांचा त्याच्या सैनिकांना कंटाळा आला होता. बादशहा वृद्धपणामुळें लढाईची दगदग सोसावयास असमर्थ होता. राष्ट्राचें उत्पन्न अव्यवस्थित झालें होतें. त्यामुळें राजारामाशीं तह करून राहिलेला आब ठेवण्याबद्दल कांहीं विचारी माणसांनीं औरंगजेबास सुचविलें; तरी तो दुराग्रही बादशहा व त्याचे लोभी सेनापती या गोष्टीला कबूल होईनात. इतक्यांत धनाजीनें खासगी वैमनस्यामुळें संताजीला संधि साधून मारिलें. मराठ्यांचा एक आधारस्तंभ व मोंगलाचा कर्दनकाळ संताजी नाहींसा झाला; हें ऐकून मोंगलांना निराशेच्या ढगांत आशेचे किरण दिसूं लागले. त्यामुळें त्यांनीं पुन्हा मराठ्यांशीं जोरानें लढण्याची तयारी केली.

८ मराठ्यांची राजधानी सातारा:—जिंजीहून आल्यानंतर राजारामानें साताऱ्यास राजधानी करून सर्व मंत्र्यांच्या विचारानें असें ठरविलें कीं, बादशहा दक्षिणेंत गुंतला असतां मराठ्यांनीं त्याच्या इतर मुलखांत स्वाऱ्या व लुटालूट करावी आणि अशा रीतीनें औरंगजेबास जेरीस आणावें. या प्रमाणें राजाराम परसोजी भोसले, हैबतराव निंबाळकर, नेमाजी शिंदे, अतोळे, धनाजी जाधव, खंडेराव दाभाडे वगैरे मंडळींनीं पंढरपूर, नाशिक, खानदेश, नंदूरबार येथें हल्ले करून लुटालूट केली. इकडे बादशहानें वसंतगड जिंकून राजधानी साताऱ्याला वेढा दिला. हा वेढा बरेंच दिवस चालला होता. परंतु मराठ्यांच्या जोराचा प्रतिकारामुळें बादशहाला प्रथम यश आलें नाहीं. शेवटीं राजाराम सिंहगडावर मरण पावल्याची बातमी आली; व किल्ला आतां लढवितां येत नाहीं, असें वाटून तेथील किल्लेदारानें तो किल्ला बादशहाच्या हवालीं केला.

९ राजारामाचा मृत्यु:—राजाराम जालना, भिड, पैठण वगैरे ठिकाणें लुटून सिंहगडास जात असतांना झुल्फिकारनें एकाएकीं छापा घालून त्याचा पाठलाग केला; परंतु राजारामाचें प्रसंगावधान व चाणाक्षपणा यांमुळें तो शिरसलामत सिंहगडास पोंहचला. या दगदगीनें

त्रास होऊन, त्याला बराच ताप आला. मृत्युशय्येवर असतां आपल्या सर्व अधिकाऱ्यांना त्यानें जवळ बोलाविलें, व रामचंद्रपंत बावडेकर यांच्या सल्ल्याप्रमाणें वागून स्वराज्याचें रक्षण, शाहूची सुटका व मोंगलांचा निःपात करण्याविषयीं त्यानें त्यानां कळकळीनें सांगितलें; आणि शान्त चित्तानें ५ मार्च सन १७०० रोजीं तो वारला. सिंहगडावर त्याची छत्री अद्याप आहे.

१० राजारामाची कामगिरीः— राजारामाचें चातुर्य, व दूरदृष्टी यामुळें जिंजिचा किल्ला त्यानें मोंगला विरुद्ध सात वर्षें लढविला. शेवटीं राजारामाला आतां आपण जिंजींत कोंडले असा मोंगलांचा समज असून सुद्धां तो पुनः स्वदेशास सुखरूप परत आला. जगाच्या लष्करी इतिहासांत जिंजीचा वेढा फारच महत्वाचा आहे. जिंजीला दक्षिणचा ट्राय व राजारामाला महाराष्ट्राचा हेक्टर ह्मणणें शोभेल. सर्वस्वी प्रतिकूल परिस्थितींत त्यानें सैन्य उभारलें; मोहिमांची योजना केली; व दूरदूरच्या प्रान्तांवर राज्य केलें. आणि त्याच्या शिरावर जरी बरीच प्रचंड अशी जबाबदारी असली, तरी त्यानें ती उत्तम तऱ्हेनें पार पाडली. निःस्वार्थीपणा, पवित्र वर्तन, दूरदृष्टी, मुत्सद्देगिरी हे शिवाजीचे गुण त्याच्यांत उतरले होते. त्यामुळेंच त्या वेळीं मराठी साम्राज्य परदास्यांधःकारांत पडण्याच्या बेतांत आलें असतांही राजारामानें त्याची स्वातंत्र्याची मिणमिणी ज्योत पाजळली; आणि दक्षिणेंत मोंगली राज्याला जोराचा धक्का देऊन शिवाजीचें अपूर्ण कार्य त्यानें बरेंच पुरें केलें. त्यामुळें महाराष्ट्रानेंच नव्हे, तर अखिल भारतवर्षानें राजारामाचें ऋणी असलें पाहिजे.

प्रकरण ५ वें

शिवाजी २ रा व ताराबाई

१ शिवाजीचा राज्याभिषेकः— मागें सांगितल्याप्रमाणें राजारामानें आपल्या सर्व कारकीर्दींत जरी गादी न स्वीकारितां शाहूच्या वतीनें राज्य चालविलें व त्याच्या सुटकेसाठीं अनेक प्रयत्न केले, तरी त्याची थोरली बायको महत्वाकांक्षी असल्यामुळें, राजारामाचे पश्चात मराठ्यांनीं

आपला पुत्र शिवाजी याला राजा ह्मणून कबूल करावें असा तिनें आग्रह धरिला. ही कल्पना प्रथम मंत्र्यांना रुचली नाहीं. परंतु औरंगजेब दाराशीं बसला असतां अशा मतभेदानें राष्ट्र कमकुवत होईल व नवीन मिळविलेले विजय फुकट जातील, ह्मणून ताराबाईच्या योजनेला बहुतेक मंडळींनीं कबुली दिली. अशा रीतीनें कांहीं काळ ही दुही जरी थांबली तरी शाहूच्या सुटकेनंतर तिचा पुन्हां उद्भव झाला व पुढील चाळीस वर्षांत त्यामुळें अनेक भानगडी उत्पन्न झाल्या. ठरल्याप्रमाणें सन १७०१ च्या आरंभीं पन्हाळ्यावर दहा वर्षांच्या बाल शिवाजीचा राज्याभिषेक झाला. नतर ताराबाईनें आपली सवत राजसबाई हिला तिचा पुत्र संभाजी यासह कैदेंत टाकिलें आणि सर्व राज्यकारभारांत आपली छाप बसविली.

२ **औरंगजेबाचे दिखाऊ विजयः**— [१] इतक्यांत मोंगलांनीं **परळीच्या** किल्ल्याला वेढा दिला. तेथील किल्लेदार परशुराम त्रिंबक यानें पावसाळा सुरू होईपर्यंत मोठ्या हिंमतीनें वेढा थोपवून नंतर तेथील देवळांतील मूर्ति वगैरे काढून किल्ला मोकळा केला; तो तसा मोंगलांनीं घेतला. यामुळें औरंगजेबास आनंद झाला; परंतु लागलीच त्यावर विरजण पडलें. बादशाही फौज परत जात असतां ऊरमोडी नदी व कृष्णा नदी यांच्या पुरानें त्यांचें सामान सुमान व पिछाडीचें सैन्य हीं सर्व वाहून गेलीं. त्यामुळें औरंगजेबाचें बरेंच नुकसान झालें. तरी त्यानें मराठ्यांचा मुलूख घेण्याचा हिय्याच केला होता. [२] सन १७०१ मध्यें झुल्फिकारखानानें ऐंशीं हजार सैन्यासह **पन्हाळ्यास** वेढा दिला; परंतु पराभूत होऊन तो पळाला. त्याचें बरेंच सैन्य मारलें गेलें, व कांहींचे नाक कान कापले गेले; तेव्हां बादशहानें स्वतः त्या किल्ल्यास वेढा घालून व किल्लेदाराला लांच देऊन तो घेतला. [३] नंतर **फत्तेउल्लाखान** नामक सेनापति **विशाळगडास** वेढा देण्यास निघाला. परंतु वाटेंतच मराठयांनीं हल्ला करून त्याला ठार मारलें, सैन्याची कापाकापी केली व बरीच लूट घेऊन ते विशाळगडास गेले. नंतर शहाजादा बेदार बक्ष बारा हजार घोडेस्वारांसह आला; परंतु शूर मराठ्यांनीं त्याचेंही बहुतेक सर्व सैन्य कापून काढिलें; शेवटीं पांच साहाय्यकांसह तो मागें गेला. नंतर स्वतः औरंगजेब

आला; परंतु मराठ्यांनीं त्याच्यावर छापा घालून सैन्याचा नाश केला; स्वतः बादशहा रजपूत सैन्याच्या मदतीनेंच वांचला. मे १७०२ मध्यें बादशहानें मोठ्या सैन्यासह शेवटचा प्रयत्न केला; परंतु या वेळीं त्याचे सहा हजार मनसबदार मारले गेले. इतर सैनिकांची तर गणतीच नाहीं. तरी त्याची छाती जरा सुद्धां डगमगली नाहीं. त्यानें किल्लेदाराला लांच देऊन जून १७०२ मध्यें तो किल्ला घेतला; परंतु परत फिरतांना पावसाचा मार व मराठ्यांचे छापे यांमुळें मोंगलांचें अपरिमित नुकसान झालें. या वेढ्यावरून ताराबाई व तिचे अधिकारी यांची चिकाटी व अप्रतिहत उत्साह हीं व्यक्त होतात. [४] नंतर कांहीं काळ विश्रांति घेऊन सन १७०३ च्या एप्रिलांत **सिंहगड** आणि सन १७०४ च्या फेब्रुवारींत **राजगड** व मार्चांत **तोरणा** हे किल्ले औरंगजेबानें काबीज केले.

३ **मोंगलमर्दिनी ताराबाई**:—अशा रीतीनें रक्ताच्या पुरानें मराठ्यांचे अजिंक्य किल्ले एकामागून एक काबीज करण्यांत औरंगजेबाला जरी यश आलें, तरी मराठे लोक मात्र त्याला काबीज करितां आले नाहींत. मराठ्यांच्या राज्यावर आतां जरी दोन बालकें असलीं आणि राजारामासारखा त्यांचा आधारस्तंभ नाहींसा झाला असला, तरी मराठी राज्य कोणत्याही तऱ्हेनें कमकुवत झालें नाहीं. राजारामाची स्त्री ताराबाई हिच्यामध्यें तिचा बाप हंबीरराव मोहिते याचे लष्करी गुण पूर्णपणें उतरले होते. ती फारच महत्वाकांक्षी होती. तिच्यासारख्या एकंदर सात स्त्रिया भारतवर्षांत झाल्या. सुलतान रझिया, चांदबिबी या बेगमा; आणि पद्मिनी, कर्णवती, दुर्गावती, अहिल्याबाई व झांशीची राणी या हिंदू राण्या. यांपैकीं फक्त ताराबाईलाच राज्यस्थापनेंत यश आलें व तिचें राज्य आजसुद्धां अस्तित्वांत व प्रसिद्ध आहे. वर सांगितल्याप्रमाणें मोंगलांना यश येऊन ते चारही बाजूंनें उठल्यामुळें आलेल्या संकटांतून महाराष्ट्राला मुक्त करण्यासाठीं आपल्या लष्कराच्या एका छावणीहून दुसऱ्या छावणीकडे व एका किल्याहून दुसऱ्या किल्ल्याकडे फिरून निरनिराळ्या स्वाऱ्यांची योजना करण्यांत आणि आपल्या सैन्याला व अधिकाऱ्यांना उत्तेजन देण्यांत ताराबाई एकसारखी गढून गेली

होती; व स्वराज्य-शत्रु मोंगलांचें मर्दन करण्यांत, ती देवी फ्रान्सच्या जोन ऑफ् आर्कपेक्षांही अधिक कृत्यकृत्य झाली. औरंगजेबाबद्दल मराठ्यांना तिरस्कार वाटत होता. त्याला ताराबाईच्या प्रोत्साहनाची जोड मिळाल्यामुळें मराठ्यांनीं मोंगलांच्या अफाट सैन्याची दिक्कत न बाळगितां मोंगलांनीं जिंकलेल्या मुलुखावर झडप घातली. [१] खंडेराव दाभाडे नामक सरदारानें सुरत, भडोच वरून गुजराथवर छापा घातला. [२] नेमाजी शिंद्यानें भोपाळ पलीकडे सिरंजपर्यंत मुलूख उध्वस्त केला. [३] बऱ्हाणपूर व गोवळकोंडा लुटून मराठ्यांनीं खंडणी वसूल केली व ते ओरीसापर्यंत गेले; इतकेंच नव्हे तर, ताराबाईनें महाराष्ट्रांतील सर्व किल्ले परत घेण्याविषयीं धनाजी जाधव व इतर सरदारांना हुकूम दिला. तेव्हां एका मागून एक किल्ले मराठे पुन्हा हस्तगत करूं लागले. रामचंद्र बावडेकरानें **पन्हाळा व पावनगड,** परशुराम त्रिंबकनें **सातारा व परळी**, शंकर नारायण गंडेकरानें **सिंहगड राजगड व तोरणा** असे किल्ले परत घेतले. या प्रकारें मोंगलांनीं जिंकलेले किल्ले एका मागून एक मराठ्यांनीं परत जिंकले. ताराबाईची योजक बुद्धि, बाणेदार वृत्ति व करारी स्वभाव यांमुळें मोंगली सैन्याच्या आशेचा बुडबुडा फुटला, औरंगजेबाची राक्षसीमहत्वाकांक्षा पार मावळली व तो निराश होऊन उत्तरेंत जाण्यासाठीं परत फिरला.

४ प्रचंड मोंगली सैन्याची पिच्छेहाट :—कठोर अंतःकरणाचा व दृढ निश्चयी औरंगजेब बादशहा दुराग्रहानें सव्वीस वर्षे युद्ध करून सुद्धां आपणांस कोणतीच फल निष्पत्ति झाली नाहीं, असें पाहून निराशेच्या समुद्रांत गटंकळ्या खाऊं लागला. शेवटीं आपल्या सैन्याला परत फिरण्याची त्यानें आज्ञा केली. इतक्या दीर्घ कालानें स्वदेशास जाण्यास सांपडल्यामुळें त्याच्या सैनिकांना अत्यानंद झाला; तर इकडे आपला विजय झाला ह्मणून मराठ्यांच्या हृदयांत आनंदोर्मी उसळूं लागल्या. परत जाणाऱ्या सैन्यावर मराठे घारीप्रमाणें घिरट्या घालून त्यांची नासाडी करूं लागले. शेवटीं आशाहीन व शक्तिहीन झालेला, द्रव्य आणि सैन्य गमावलेला असा औरंगजेब बादशहा कसाबसा अहमदनगरपर्यंत

आला; त्याचें धैर्य फारच खचल्यामुळें त्याच्यानें पुढें जाववेना; तो तेथेंच आजारी पडून सन १७०७ च्या मार्चांत वारला. मरतेसमयीं त्यानें असे उद्गार काढिले कीं; "माझे शिपाई माझ्या प्रमाणेंच गर्भगलित, कावरे बावरे व असहाय झाले आहेत. जन्मास येतांना मी एकटाच आलों, मरतांना मात्र माझ्या डोक्यावर पातकांचा बोजा आहे; व त्यामुळें देवासमोर उभें राहण्यास मला भीति वाटते."

५ औरंगजेबाच्या मृत्यूचे मराठीराज्यावर परिणामः—त्याच्या पश्चात् त्याच्या मुलांत गादीविषयीं भांडणें सुरू झालीं. त्यामुळें मराठ्यांची सत्ता वाढविण्याला ताराबाईला अधिक फुरसत मिळाली व ती आपल्या मुलाच्या राज्यवृद्धीसाठीं मसलती करूं लागली. परंतु इतक्यांत शाहूची सुटका झाल्यामुळें तिचे सर्व बेत फसले. शाहूकडे गोंडवन, गुजराथ व तंजावर येथील सुभेदारी व खानदेश, वऱ्हाड, औरंगाबाद, बेदर, हैद्राबाद आणि विजापूर या सहा सुभ्यांतील चौथाई व सरदेशमुखी वसूल करण्याचे अधिकार बादशहाकडून देण्यांत आले. नंतर त्याला फौज देऊन आपल्या बापाचें राज्य परत घेण्यासाठीं बादशहानें दक्षिणेंत पाठविलें. दक्षिणेंत आल्यावर त्याला तेथें निंबाळकर, शिंदे, भोसले असे मोठमोठे सरदार मिळाले. कांहीं काळानें तो पुण्याला आला. रस्त्यांत त्यानें धनाजी जाधवादि कांहीं सरदारांना वश करून ताराबाईचा पक्ष कमजोर केला. नंतर चाकण, पुणें, जेजुरी, चंदनवंदन, सातारा, परळी वगैरे किल्ले त्यानें काबीज केले. पुढें सातारा आपली राजधानी करून त्यानें सन १७०८ च्या जानेवारींत स्वतःला राज्याभिषेक करून घेतला, अष्टप्रधान नेमिले व धनाजी जाधवाला सेनापति केलें. हें पाहून ताराबाईनें पन्हाळा आपली राजधानी केली. अशा रीतीनें मराठी साम्राज्याचे दोन विभाग झाले, व ही दुहीची आग चाळीस वर्षांहून जास्त काळ धुमसत राहिली.

पेशवे.

वंशावळ.

१ बाळाजी विश्वनाथ (१७१३–२०)

- २ बाजीराव (१७२०–४०)
  - ३ बाळाजी बाजीराव (१७४०–६१)
    - विश्वासराव (पानिपत मध्यें पडला)
    - ४ माधवराव (१७६१–७२)
    - ५ नारायणराव (१७७२–७३)
      - ६ सवाई माधवराव (१७७३–९५)
  - रघुनाथराव
    - ७ बाजीराव दुसरा (१७९६–१८१८)
      - नानासाहेब (दत्तक) (यानें १८५७ च्या बंडांत भाग घेतला होता)
- चिमणाजी आप्पा
  - सदाशिवराव (पानपतच्या युद्धांत मेला)

प्रकरण ६ वें.

बाळाजी विश्वनाथ (१७१३–२०)

१ **बाळाजी विश्वनाथाचें पूर्ववृत्तः**–बाळाजीचे पूर्वज श्रीवर्धन, हरिहर, दंडाराजपुरी या गांवचे देशमुख होते. बाळाजीनें आपल्या दोन भावांसह धनाजीच्या फौजेंत नोकरी धरली. याच्या असामान्य कर्तबगारीनें या कोंकणस्थ–चित्तपावन ब्राह्मणावर धनाजीचा आपला मुलगा चंद्रसेन या पेक्षांही जास्त विश्वास बसला. त्यामुळें चंद्रसेन व बाळाजी यांमध्यें दीर्घद्वेष सुरू झाला. ताराबाईबरोबरच्या युद्धांत बाळाजीनें शाहूस बरीच मदत केली; त्यांत पुढील गोष्टी मुख्य आहेत. (१) त्यानें परशुराम त्रिंबकाला कैदेंतून सोडविलें आणि त्याला व धनाजी जाधवाला

शाहूच्या बाजूस वळविलें. (२) चंद्रसेन जाधव आपल्या बापाच्या मृत्यूनंतर बाळाजीशीं असलेल्या द्वेषामुळें ताराबाईच्या पक्षास जाऊन त्यानें शाहूचे बरेच सरदार तिकडे वळविले होते. तेव्हां बाळाजीनें नवीन फौज उभारून शाहूची बाजू सावरली. (३) कृष्णराव खटावकर व कान्होजी आंग्रे नांवाचे सरदार शाहूच्या मुलखांत लुटालूट करीत. या दोघांनाही बाळाजीनें शाहूच्या पक्षास आणिलें. (४) कोल्हापूर दरबारांत त्यानें बरीच क्रांति घडविली व ताराबाईचे सर्व बेत ढासळले. सन १७१२ त कांहीं कोल्हापूरचे सरदार व बाळाजी यांमार्फत राजसबाईनें पन्हाळयाच्या सैनिकांना फितविलें; ताराबाईकडून कारभार काढून घेतला, तिला मुलासह तुरुंगांत टाकली, आपला मुलगा संभाजी याला गादीवर बसविलें व रामचंद्रपंत बावडेकराला नोकरीवरून दूर केलें. या क्रांतीनें भिऊन चंद्रसेन निजामाला मिळाला व मराठ्यांचा कट्टा शत्रू बनला. अशा रीतीनें शाहूच्या मागील कोल्हापूरचा ससेमिरा बंद झाला. बाळाजीची एकनिष्ठता, हिम्मत व करामत यांसाठीं शाहूनें त्याला बहिरोपंत पिंगळयाऐवजीं नोव्हेंबर १७१३ त पेशवा नेमिलें, व त्यावर सर्व राज्यकारभार टाकला. शिवाजीच्या वेळेपासून पेशवेपद चालू होतें; पण बाळाजीनें राजाला मागें टाकून त्यानें बहुतेक अधिकार आपल्या हातांत घेतल्यामुळें त्याला पहिला पेशवा म्हणतात. हा अधिकार त्याच्या वंशजांकडे सन १८१८ त पेशवाई नष्ट होईपर्यंत चालला; त्यामुळें यापुढील मुदतीचा मराठ्यांचा इतिहास म्हणजे पेशव्यांचाच इतिहास होय.

२ **बाळाजी पेशव्याची कामगिरीः**—औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मुलुखगिरी फारशी नसल्यामुळें व आपापसांतील दुहीमुळें सरदार सुस्त व स्वेच्छाचारी बनल्याकारणानें ते आपसांत भांडत असत. हीं भांडणें बंद करण्यासाठीं बाळाजीनें या सरदारांना एक नवीन कर्तव्यक्षेत्र दाखविलें; (२) मोंगलांकडून निरनिराळे प्रांत जिंकून ते मराठी राज्यास जोडावे व राजास त्याबद्दल कांहीं खंडणी देऊन ते जहागिरी म्हणून वहिवाटावे असें त्यानें सरदारांस सांगितलें. त्याचप्रमाणें प्रत्येक सरदाराला त्याच्या कामाप्रमाणें वसुलाचा वांटा देण्याचें त्यानें ठरविलें. अशा रीतीनें

शिवाजीच्या काळचें राजकारण व उमेद सरदारांपुढें ठेविलें. मराठ्यांमधील दुफळी मोडण्याचा हा एक उत्तम उपाय होता. ह्मणून ते मोंगली मुलखांत जाऊन विजय संपादन करूं लागले; याप्रमाणें मराठ्यांनीं आतां चढाईचें धोरण स्वीकारलें, व हिंदुपदशाहीच्या क्षेत्राचा विस्तार केला. (३) शिवाय बाळाजीनें सारा वसुलीची अशी गुंतागुंतीची व्यवस्था सुरू केली कीं, त्यामुळें ब्राह्मणशाही निर्माण झाली, व राज्याच्या विस्ताराबरोबर ती वाढूं लागली. एकसत्ताक राज्यपद्धतीऐवजीं बाळाजीनें जहागीरदारांचा संघ स्थापन करून त्याच्या साहाय्यानें तो राज्यकारभार पाहूं लागला. (४) दिल्लीस प्रयाणः-- दिल्लीचा बादशहा फर्रूखसीयर व त्याचे वजीर सय्यदबंधु यांच्या वैमनस्याविषयीं सांगितलें आहेच (पान १२१). सय्यदांपैकीं हुसेन दक्षिणेंत सुभेदार झाला; नंतर त्यानें मराठ्यांशीं लढण्यास सुरवात केली. परंतु बादशहा सय्यदबंधूंच्या नाशाची खटपट करीत असल्यामुळें, त्यानें मराठ्यांना हुसेन विरूद्ध आंतून फूस दिली; ह्मणून मराठ्यांनीं गुजराथ व खानदेश एथें आपला अंमल बसविण्यास सुरवात केली. इतक्यांत बादशहाच्या दुटप्पी वर्तनाची हुसेनास खबर लागतांच यानें सर्व मराठ्यांशीं तह केला कीं, [१] थोरल्या शिवाजीनें जिंकलेल्या सर्व मुलखांवर मराठ्यांचें स्वराज्य मोंगलांनीं कबूल करावें. (२) खानदेश, गोंडवाना, वऱ्हाड, हैद्राबाद व कर्नाटक हे प्रांत मराठ्यांनीं घ्यावे. (३) दक्षिणेंतील सहा सुभे व कर्नाटक, त्रिचनापल्ली, तंजावर ह्मैसूर या मुलखांत मराठ्यांनीं चौथाई व सरदेशमुखी वसूल करावी. (४) मराठ्यांनीं पंधरा हजार सैन्य बादशहाच्या मदतीस ठेवून बादशहास दहा लाख रुपये वार्षिक खंडणी द्यावी. (५) शाहूचीं कैदेंत असलेलीं सर्व माणसें मोंगलांनीं सोडून द्यावींत. फर्रूख्सियर या अटींना कबूल होईना. तेव्हां हुसेनानें बाळाजीसह दक्षिणेंतून निघून दिल्लींत प्रवेश केला व बादशहाला पदच्युत केलें. नंतर महंमदशहा गादीवर येईंपर्यंत मराठे दिल्लींत राहून सय्यदांना मदत करीत होते. शेवटीं महंमदशहानें तहास मान्यता दिल्यावर शाहूच्या मंडळींस घेऊन बाळाजी दक्षिणेंत परत आला. या तहामुळें विंध्यापासून केपकामोरीनपर्यंत मराठ्यांचें वर्चस्व बसलें व या सर्व ठिकाणीं त्यानीं आपले अधिकारी नेमिले.

या प्रांतांत वसुलाची व्यवस्था करण्यांत बाळाजीला अति त्रास झाला व त्यामुळें आजारी पडून तो १ एप्रिल १७२० त सासवड येथें वारला.

प्रकरण ७ वें

बाजीराव (सन १७२०--४०)

१ **पूर्ववृत्त व पेशवेपदाची प्राप्ति:**--बाजीराव व चिमणाजी असे बाळाजीचे दोन पुत्र होते; त्यांपैकीं वडील बाजी याला लहानपणापासूनच लष्करी व मुत्सद्देगिरीचें शिक्षण मिळालें होतें. बापाबरोबर सतत असल्यामुंळ त्याला बराच प्रत्यक्ष अनुभव आला होता. बाळाजी मरण पावला त्या वेळची सर्व परिस्थिति बाजीस पूर्ण अवगत होती. त्याची योग्यता शाहू ओळखत असल्यामुळें कांहीं मुत्सद्यांचा सल्ला विरुद्ध असूनही त्यानें बाजीस तात्काळ पेशवा नेमिलें. गुणग्राहकता दाखवून ही नेमणूक केल्यानें हिंदुपदपादशाहीचा भाग्योदय झाला. बाजीची वीस वर्षांची कारकीर्द बहुतेक लढाईत गेल्यामुळें त्यांतील मुख्य मुख्य युद्धें खालीं दिलीं आहेत.

२ **निजामाशीं युद्धें:**— दक्षिणेंतील सुभ्यांत चौथाई व सरदेशमुखी वसूल करण्याचा हक्क मराठ्यांस मिळाला होता. परंतु हा वसूल साताराच्या गादीस द्यावा कीं कोल्हापूरच्या गादीस द्यावा हें आपल्यास नक्की समजत नाहीं या सबबीवर निजाम तो वसूल कोणासच देत नसे. शिवाय कर्नाटकांतील मराठ्यांच्या मुलखावर तो चाल करूं लागला होता. यामुळें त्याच्याशीं सन १७२७ त युद्ध करणें मराठ्यांना प्राप्त झालें. परंतु कर्नाटकांतील मुलूख परत घेतां आला नाहीं. बाजीरावानें हैद्राबाद मुलखांत मात्र, कोल्हापूरच्या संभाजीकडून निजामाला मदत होऊनही, बराच विजय मिळविला; त्यानें जालना, औरंगाबाद, खानदेश व गुजराथ या प्रदेशांत बरीच लूट केली. बाजीराव उत्तरेंत गेला असें पाहून निजामानें पुण्यावर छापा घालण्याचा प्रयत्न केला; परंतु बाजीनें निजामच्या राज्यांत पुनः नासधूस केली व परत येऊन त्याच्यावर अचानक छापा घातला. त्यामुळें निजामाला मुंगी-शेवगांव येथें सन

शिवाजीच्या काळचें राजकारण व उमेद सरदारांपुढें ठेविली. मराठ्यांमधील दुफळी मोडण्याचा हा एक उत्तम उपाय होता. ह्मणून ते मोंगली मुलखांत जाऊन विजय संपादन करूं लागले; याप्रमाणें मराठ्यांनीं आतां चढाईचें धोरण स्वीकारलें, व हिंदुपदशाहीच्या क्षेत्राचा विस्तार केला. (३) शिवाय बाळाजीनें सारा वसुलीची अशी गुंतागुंतीची व्यवस्था सुरू केली कीं, त्यामुळें ब्राह्मणशाही निर्माण झाली, व राज्याच्या विस्ताराबरोबर ती वाढूं लागली. एकसत्ताक राज्यपद्धतीऐवजीं बाळाजीनें जहागीरदारांचा संघ स्थापन करून त्याच्या साहाय्यानें तो राज्यकारभार पाहूं लागला. (४) दिल्लीस प्रयाणः-- दिल्लीचा बादशहा फर्रूखसीयर व त्याचे वजीर सय्यदबंधु यांच्या वैमनस्याविषयीं सांगितलें आहेच (पान १२१). सय्यदांपैकीं हुसेन दक्षिणेंत सुभेदार झाला; नंतर त्यानें मराठ्यांशीं लढण्यास सुरवात केली. परंतु बादशहा सय्यदबंधूंच्या नाशाची खटपट करीत असल्यामुळें, त्यानें मराठ्यांना हुसेन विरूद्ध आंतून फूस दिली; ह्मणून मराठ्यांनीं गुजराथ व खानदेश एथें आपला अंमल बसविण्यास सुरवात केली. इतक्यांत बादशहाच्या दुटप्पी वर्तनाची हुसेनास खबर लागतांच यानें सर्व मराठ्यांशीं तह केला कीं, [१] थोरल्या शिवाजीनें जिंकलेल्या सर्व मुलखांवर मराठ्यांचें स्वराज्य मोंगलांनीं कबूल करावें. (२) खानदेश, गोंडवाना, वऱ्हाड, हैद्राबाद व कर्नाटक हे प्रांत मराठ्यांनीं घ्यावे. (३) दक्षिणेंतील सहा सुभे व कर्नाटक, त्रिचनापल्ली, तंजावर ह्मैसूर या मुलखांत मराठ्यांनीं चौथाई व सरदेशमुखी वसूल करावी. (४) मराठ्यांनीं पंधरा हजार सैन्य बादशहाच्या मदतीस ठेवून बादशहास दहा लाख रुपये वार्षिक खंडणी द्यावी. (५) शाहूचीं कैदेंत असलेलीं सर्व माणसें मोंगलांनीं सोडून द्यावींत. फर्रूख्सियर या अटींना कबूल होईना. तेव्हां हुसेनानें बाळाजीसह दक्षिणेंतून निघून दिल्लींत प्रवेश केला व बादशहाला पदच्युत केलें. नंतर महंमदशहा गादीवर येईंपर्यंत मराठे दिल्लींत राहून सय्यदांना मदत करीत होते. शेवटीं महंमदशहानें तहास मान्यता दिल्यावर शाहूच्या मंडळींस घेऊन बाळाजी दक्षिणेंत परत आला. या तहामुळें विंध्यापासून केपकामोरीनपर्यंत मराठ्यांचें वर्चस्व बसलें व या सर्व ठिकाणीं त्यानीं आपले अधिकारी नेमिले.

या प्रांतांत वसुलाची व्यवस्था करण्यांत बाळाजीला अति त्रास झाला व त्यामुळें आजारी पडून तो १ एप्रिल १७२० त सासवड येथें वारला.

प्रकरण ७ वें

बाजीराव (सन १७२०--४०)

१ **पूर्ववृत्त व पेशवेपदाची प्राप्ति**:--बाजीराव व चिमणाजी असे बाळाजीचे दोन पुत्र होते; त्यांपैकीं वडील बाजी याला लहानपणापासूनच लष्करी व मुत्सद्देगिरीचें शिक्षण मिळालें होतें. बापाबरोबर सतत असल्यामुळें त्याला बराच प्रत्यक्ष अनुभव आला होता. बाळाजी मरण पावला त्या वेळची सर्व परिस्थिति बाजीस पूर्ण अवगत होती. त्याची योग्यता शाहू ओळखत असल्यामुळें कांहीं मुत्सद्यांचा सल्ला विरुद्ध असूनही त्यानें बाजीस तात्काळ पेशवा नेमिलें. गुणग्राहकता दाखवून ही नेमणूक केल्यानें हिंदुपदपादशाहीचा भाग्योदय झाला. बाजीची वीस वर्षांची कारकीर्द बहुतेक लढाईत गेल्यामुळें त्यांतील मुख्य मुख्य युद्धें खालीं दिलीं आहेत.

२ **निजामाशीं युद्धें**:— दक्षिणेंतील सुभ्यांत चौथाई व सरदेशमुखी वसूल करण्याचा हक्क मराठ्यांस मिळाला होता. परंतु हा वसूल सातारच्या गादीस द्यावा कीं कोल्हापूरच्या गादीस द्यावा हें आपल्यास नक्की समजत नाहीं या सबबीवर निजाम तो वसूल कोणासच देत नसे. शिवाय कर्नाटकांतील मराठ्यांच्या मुलखावर तो चाल करूं लागला होता. यामुळें त्याच्याशीं सन १७२७ त युद्ध करणें मराठ्यांना प्राप्त झालें. परंतु कर्नाटकांतील मुलूख परत घेतां आला नाहीं. बाजीरावानें हैद्राबाद मुलखांत मात्र, कोल्हापूरच्या संभाजीकडून निजामाला मदत होऊनही, बराच विजय मिळविला; त्यानें जालना, औरंगाबाद, खानदेश व गुजराथ या प्रदेशांत बरीच लूट केली. बाजीराव उत्तरेंत गेला असें पाहून निजामानें पुण्यावर छापा घालण्याचा प्रयत्न केला; परंतु बाजीनें निजामच्या राज्यांत पुनः नासधूस केली व परत येऊन त्याच्यावर अचानक छापा घातला. त्यामुळें निजामाला मुंगी–शेवगांव येथें सन


बाजीराव.
माधवराव
श्री बाळाजी बाजीराव.
नाना फडनवीस.
रघोबा.
नारायणराव.
बाजीराव



आहमदशहा व त्याचे वजीर.



अहमदशहा अब्दाली (प्रि. वे. म्यु. मुंबई.)

१७२८ त तह करणें भाग पडलें; त्यांत असें ठरलें कीं, [१] निजामानें चौथाई व सरदेशमुखीची सर्व बाकी चुकती करावी; [२] मराठी मुलकी अधिकाऱ्यांना पुन्हा नोकरीवर रुजू करावें; [३] सर्व मराठ्यांचा राजा ह्मणून एकट्या शाहूलाच मान्य करावें. [४] बाजीरावाला मोठी जहागीर द्यावी. (५) संभाजीनें आपल्या राज्यांत जावें आणि त्याच्याविरुद्ध योग्य दिसेल ती तजवीज करण्याची शाहूस मुभा असावी.

या तहानंतर लागलीच **गुजराथच्या सुभेदाराबरोबर तह** झाला. त्याप्रमाणें अहमदाबादेच्या सारावसुलीपैकीं शेंकडा पांच, व राहिलेल्या गुजराथ प्रांतांतून चौथाई व सरदेशमुखी मराठ्यांनीं घ्यावी, आणि या साठीं शाहूनें अडीच हजार घोडेस्वार बादशहाच्या नोकरींत ठेऊन पिलाजी गायकवाड व खंडोजी कदम यांचा बंदोबस्त करावा.

३ दाभाड्याशीं युद्धः— गुजराथच्या तहामुळें तळेगांवकर दाभाड्याचे गुजराथवरील विजय निष्फळ झाले. त्यामुळें बाजीराव व दाभाड्याचे मुलगे यांमध्यें भांडणें सुरू होऊन शेवटीं पुण्याजवळ सन १७२९ त युद्ध झालें. दोन्ही बाजू सारख्याच शौर्यानें लढल्या, परंतु फितुरीनें दाभाड्यांचा पराभव व मृत्यु झाला. तेव्हां दाभाडे बंधूंना सैनापत्य, सेना-खासखेल हा किताब व गुजराथेंतील निम्मी चौथाई देऊन शाहूनें त्यांचें सांत्वन केलें. परंतु पुढें दाभाडे विलासांत दंग झाल्यामुळें त्यांचे हे अधिकार त्यांचे कारभारी पिलाजी गायकवाड व त्याचे वंशज यांचे हातांत गेले.

४ संभाजी राजाचा पराभवः—कोल्हापूर व सातारा या दोन दरबारांत लौकरच तंटे सुरू झाले. कोल्हापूरच्या संभाजीनें निजामास सैन्य देऊन त्याला शाहूविरुद्ध उघड रीतीनें मदत करण्यास सुरवात केली; मुंगी-शेवगांवच्या तहाच्या वेळीं, निजामाच्या निर्धारामुळेंच संभाजी बाजीरावाच्या हातांत सांपडावयाचा राहिला. कोल्हापूरचा सेनापति उदाजी चव्हाण यानें सन १७२९ त साताऱ्याच्या मुलखावर स्वारी केली; आणि संभाजीनें शाहूशीं युद्ध पुकारलें. **वारणेच्या युद्धांत** संभाजीवर छापा पडला; व त्यांतून तो निसटला, तरी ताराबाईसह त्याची सर्व

मंडळी शाहूच्या हातांत सांपडली. परंतु राजसबाईची कैदी राहण्याऐवजीं शाहूची बंदिवान होणें ताराबाइला बरें वाटलें. शेवटीं तह करण्यासाठीं या दोन राजांची कराड येथें भेट झाली. दोन लाख शिपाई व सर्व मराठे सरदार यांनीं त्यांत भाग घेतला; मोंगली थाटमाटाला मागें टाकणारा त्या वेळचा मराठ्यांचा थाट होता. यावेळीं शाहूनें संभाजीस सर्व प्रकारचा मान मरातब दिला. परंतु सन १७३१ तील वारणेच्या तहानें सातारा व कोल्हापूर या राज्यांच्या हद्दी निश्चित झाल्या. एकमेकांच्या शत्रूस मदत न करतां त्याच्याशीं दोघांनीं सख्यत्वानें लढावयाचें व एकानें दुसऱ्याच्या अमलांतील माणसांना नोकरीस ठेवावयाचें नाहीं असें ठरलें. या तहानें दोन्ही राष्ट्रांतील वैमनस्य व दुही बंद झाली.

५ माळवा व गुजराथः— माळवा, बुंदेलखंड व गुजराथ येथील लढायांत मराठ्यांनीं दाखविलेलें शौर्य व लढविलेले डावपेंच यांचें सर्वांना कौतुक वाटतें. बडोदें, इंदूर व धार या तीन संस्थानांचे संस्थापक अनुक्रमें पिलाजी गायकवाड, मल्हारराव होळकर व उदाजी पवार हे बाजीरावाच्या बाजूचे मुख्य सरदार होते. (क) बाजीरावानें **बुंदेलखंडांतून** मोंगलांना हुसकून लाविलें आणि छत्रसाल राजाची त्या गादीवर पुनः स्थापना केली. याच्या मोबदला छत्रसालानें बाजीला आपला मुलगा समजून आपल्या पश्चात् आपलें अर्धे राज्य त्याला मिळावें असें ठरविलें. (ख) **गुजराथच्या सुभेदाराला** मराठ्यांपासून आपल्या मुलखाचें रक्षण करतां येईना; तेव्हां गायकवाडानें सन १७३५ त तो प्रांत पूर्णपणें जिंकिला. (ग) बाजीरावानें **माळव्याच्या सुभेदारांचा** एकामागून एक पराभव करून एकाएकीं दिल्लीवर स्वारी केली व तेथें लूट करण्यास आरंभ केला. या परिस्थितींत बादशहाला सन १७३६ त माळवा बाजीरावाच्या हवालीं करावा लागला. हा विजय क्षणिक होता; कारण मतलबी बादशहानें लौकरच माळवा व गुजराथची सुभेदारी निजामच्या मुलाला दिली व मराठ्यांचा मोड करण्यासाठीं द्रव्य व सैन्य निजामाच्या स्वाधीन केलीं. नंतर या सैन्यासह निजाम दिल्लीहून भोपाळपर्यंत गेला. या ठिकाणीं बाजीरावानें ऐशीं हजार सैन्यासह त्याची

गांठ घेतली, आणि डांबरेंच लढवून त्याचा कोंडमारा केला; ह्मणून तो मागें सरूं लागला; शेवटीं सिरिंज येथें निजामानें मराठ्यांशीं तह केला; त्यामुळें दिल्लीवरील नादिरशहाचा हल्ला मागें परतवण्यास त्यास सवड मिळाली. सन १७३८ च्या सिरिंजच्या तहान्वयें माळवा, चंबळ आणि नर्मदा यांमधील सर्व मुलूख, व बादशहाकडून ५० लाख रुपये खंडणीबद्दलचें वचन इतकीं बाजीस मिळालीं.

६ **सिद्दीशीं सामना (१७३३–३६)**:— सिद्दीनें वेळोवेळीं मराठ्यांविरुद्ध दिलेल्या मदतीमुळें उपकृत होऊन, औरंगजेबानें त्याला महाड, दाभोळ, रायगड आणि कोंकणपट्टींतील इतर कांहीं मजबूत किल्ले बक्षीस दिले. (१) रायगडावरील मुसलमानांचा तावा मराठ्यांना सहाजिकच खपत नव्हता. (२) एका सिद्दीनें चिपळूण येथील परशुराम क्षेत्र उध्वस्त केलें, (३) व आंग्र्याच्या मुलखांत लुटालूट केली. यामुळें सिद्दीचें पारिपत्य करण्यासाठीं मराठे वाट पहात होते. (४) इतक्यांत सिद्दीनें आपसांतील भाऊबंदकीच्या द्वेषामुळें सन १७३३ त मराठ्यांची मदत मागितली. ही संधि प्राप्त होतांच बाजीरावानें सिद्दीवर स्वारी करून तळें, घोसाळें व रायगड हे किल्ले घेतले; त्यामुळें मराठ्यांत जिकडे तिकडे आनंदी आनंद झाला. सिद्दीच्या आरमाराला पराभूत करून, त्याचा कांहीं प्रांत जाळण्यांत व कांहीं काबीज करण्यांत आला. इंग्रज व पोर्तुगीज यानीं जरी हबशांना मदत दिली, तरी मराठ्यांची सरशी झाली. नंतर सन १७३६ त सिद्दीबरोबर तह होऊन त्यांत मराठ्यांनीं काबीज केलेला मुलूख त्यांच्याचकडे राहिला.

७ **पोर्तुगीजांचा पराभवः**—पोर्तुगीज सिद्दी व आंग्रे यांना शाहु विरूद्ध मदत करीत असत. ह्मणून सन १७६७त बाजीराव व त्याचा भाऊ चिमणाजी आपा हे सैन्य घेऊन पोर्तुगीजांचीं ठाणीं घेण्यासाठीं निघाले. ठाणें, अरनाळा, घोडबंदर, मांडवी, मनोरें, बाळापूर, माहीम आणि वसई सुद्धां मराठ्यांच्या हातांत आलीं. नंतर वारसोवा, करंजें, वांद्रें हें जिंकण्यांत आले. सन १७३९ त व्यंकटराव

घोरपड्यानें × गोवें प्रांतावर हल्ला केला; मार्मगोव्याच्या किल्यावर चढून तो घेतला व गोंव्याला वेढा दिला. शेवटीं इंग्रजांच्या मध्यस्थीनें तह होऊन चौल, वसई, साष्टी हे प्रांत मराठी राज्याला जोडले गेले. पोर्तुगीजांनीं बरेच पराक्रम केले; परंतु मराठ्यांपुढें त्यांच्या टिकाव लागेना. या लढाईत इंग्रज तटस्थ न राहिल्यामुळें मराठ्यांनीं मुंबईला वेढा देण्याचा बेत केला; परंतु फारच शहाणपणानें इंग्रजांनीं शाहूशीं तह करून जून १७३९ मध्यें त्याच्या मुलखांत व्यापारावरील कर माफ करून घेतला.

८ **मिरजेचा विजय :**— सातारा व कोल्हापूर या दोन मराठी राज्यांच्या दरम्यान मिरजेवरील मोंगलांचा १६९० पासूनचा ताबा मराठ्यांच्या डोळ्यांत सलत होता. आपल्या ऐदीपणाबद्दलच्या लोकापवादानें संतापून, सन १७३९ मध्यें शाहूनें तीस हजार शिपायांनिशीं मोठ्या डामडौलानें मिरजेवर हल्ला करून तो किल्ला सर केला.

९ **कर्नाटकची मोहीमः**—जिंजी ताब्यांत आल्यावर मोंगलांनीं कारोमांडेलच्या किनाऱ्यावर आपलें वर्चस्व बसविलें, व तंजावर खेरीज बाकी सर्व प्रांत मराठ्यांच्या हातांतून गेला. पूर्वी सांगितल्याप्रमाणें निजामसुद्धां सन १७२४ च्या नंतर या प्रांतांत पाऊल पुढें सरसावीत होता. सन १७३५ च्या नंतर वारसाहक्काबद्दलच्या भाऊबंदकीमुळें तंजावरचें राज्य दुर्बल झालें. तेथील **प्रतापसिंहाला** त्याच्या भावाविरुद्ध मदत करण्यासाठीं व कर्नाटक परत जिंकण्यासाठीं शाहूनें राघोजी भोंसल्याला पन्नास हजार सैन्य देऊन पाठविलें. त्यावेळीं **दोस्तअली** कर्नाटकचा नबाब होता; व त्याला त्याचा शूर पुत्र **सफदरअली** आणि जांवई **चंदासाहेब** यांची मदत होती. राघोजीच्या अफाट सैन्यानें कर्नाटकावर स्वारी करून मुसलमानी सैन्याचा धुव्वा उडविला, दोस्तअलीला मारून

× व्यंकटराव हा नारोपंत जोशी नामक एका चित्तपावनाचा मुलगा असून त्याच्यावर संताजीची मर्जी बसून त्यानें त्याला पुत्रवत् मानलें. म्हणून त्यानें स्वतःला घोरपडे नांव घेतलें. नंतर व्यकंटरावाचें लग्न बाळाजी विश्वनाथाच्या मुलीबरोबर झालें. हाच प्रसिद्ध पुरुष सध्यांच्या इचलकरंजीकर जहागीरदारांचा पूर्वज होय.

कर्नाटकचा कांहीं भाग उध्वस्त केला, सफदर अलीकडून **आरकट** घेतलें. **त्रिचनापल्लीचा** किल्ला चंदासाहेबानें फार शौर्यानें लढविला, पण तोही मराठ्यांनीं उडवून दिला. अखेरीस सन १७४१ त किल्ला मराठ्यांच्या हवालीं केल्यानंतर चंदासाहेबाला कैद करून साताऱ्याला पाठविण्यांत आलें; व त्याच्याऐवजीं संताजी घोरपडेचा वंशज मुरारराव याला त्रिचनापल्लीचा किल्लेदार नेमिलें. रघोजीनें सफदरअलीशीं तह करून त्याला कर्नाटकाचा नवाब ह्मणून कबूल केलें; त्याच्याकडून मराठ्यांना एक कोटी रुपये मिळाले आणि ज्या हिंदूंच्या जहागिऱ्या यानें व याच्या बापानें काढून घेतल्या होत्या त्या त्यांच्या त्यांना फिरून दिल्या. **पांडिचरी** या फ्रेंचांच्या राजधानीवर हल्ला करण्याचा रघूजीनें धाक घातला, परंतु विशेष असें कांहीं झालें नाहीं. हे विजय संपादन करून रघूजी साताऱ्याला परत आला.

१० **बाजीच्या कारकीर्दीचें सिंहावलोकनः**—त्याचा शरीराचा बांधा भव्य असून तो अतिशय देखणा होता. हा शूर व साहसी योद्धा व उत्तम वक्ता होता. त्याच्या कारकीर्दीतील कांहीं गोष्टींवरून तो असामान्य सेनापति व चाणाक्ष मुत्सद्दी होता असें दिसतें. बुद्धि, निर्भयता, धडाडी या गुणांत तो त्याच्या समकालीन माणसापेक्षां श्रेष्ठ होता. निजाम, मोंगल सेनापति, पोर्तुगीज गव्हर्नर व प्रख्यात मराठे सरदार या सर्वांना या पेशव्यानें उघड उघड युद्ध करून चित केलें. उच्च ध्येय, सैनापत्य व आपलें वांच्छित कार्य पुरें करण्याची अलौकिक बुद्धि या बाबतींत तो शिवाजीसारखा होता. परंतु शिवाजी स्वतःचा धनी असून बाजीराव वजीर असल्यामुळें परस्वाधीन होता; शिवाय राजदरबारांत मराठ्यांचा विरोध, रणमैदानांतील सरदारांचा आपसांतील कलह व निजाम आणि संभाजी यांची फितुरी यांमुळें पदोपदीं त्याला अडथळा होत असे. तरी कर्तृत्ववान सेनापतींच्या मदतीनें आपसांतील दुही यानें मोडली, व मराठ्यांचें राज्य सर्व उत्तर हिंदुस्थानांत पसरलें. त्यानें निर्माण केलेल्या बृहन्महाराष्ट्रांत त्याचें कार्य अजूनही दृष्टीस पडतें. या साहसी सेनापतीनें दिल्लीपर्यंत भगवाझेंडा फडकविला, हिंदुपदपादशाहीचा विस्तार केला, मराठी संस्थानांची एकी केली, संभाजीचा कोल्हापूरच्या सवत्या सुभ्याचा मोड

केला, आणि औरंगजेबाच्या वेळचा श्रेष्ठ मुत्सद्दी निजाम याचें नाक वारंवार खालीं केलें. सिद्दी व पोर्तुगीज यांचाही त्यानें चांगला समाचार घेतला. त्यानें मराठ्यांचा संघ व मराठी राष्ट्राचा पायाही फारच मजबूत केला. ह्मणून बाजीरावाला सर्व पेशव्यांत श्रेष्ठ मानण्यांत येतें.

प्रकरण ८ वें.

बाळाजी बाजीराव (१७४०-६१)

१ बाळाजी बाजीरावाचा स्वभाव व कामगिरीः-- बाळाजी उर्फ नानासाहेब पेशवा हा फारच भाग्यवान झाला. वीस वर्षांच्या तरूण वयांतच त्याला पेशवाई मिळाली; ती देतांना शाहूनें असें सांगितलें कीं, "पातशाही रक्षून हिंदुस्तान सर्व आपलें करावें, व अटकेपार घोडे चालवावे;" ही कामगिरी आपल्या कारकीर्दींत त्यानें पुरी केली. त्याच्या अश्रांत श्रमामुळें त्याच्या कारकीर्दींत मराठ्यांचें राज्य हिंदुस्तानच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत पसरलें, व त्यानें शिवाजीची हिंदुपदपातशाहीची कल्पना पूर्णावस्थेस आणिली; परंतु राज्य कळसाला पोंचतांक्षणींच, अहमदशहा अब्दालीच्या वज्राघातामुळें त्याला उतरती कळा लागली. राजनीति, मुत्सद्देगिरी, शौर्य आणि डांवपेंच लढवून शत्रूचा यथायोग्य पराभव करणें इत्यादि बाबतींत फारच थोडे मनुष्य त्याची बरोबरी करूं शकतात. तो उदार अंतःकरणाचा, दानशूर व प्रजाहितदक्ष होता. त्यानें राज्यव्यवस्था सुधारली; करजमाबंदीमध्यें लांचलुचपत बंद केली, कामगारांकडून होत असलेला अन्याय व पक्षपात दूर करून पचायतीसारखी संस्था प्रचलित केली; यामुळें व मोंगली अत्याचारांपासून सुटल्याकारणानें सर्व प्रतीचे लोक सुखी झाले. याच्या कारकीर्दींतील पहिल्या दशकांत फारशा लढाया झाल्या नाहींत; परंतु दुसऱ्या दशकांत त्याला महत्त्वाचे विजय मिळाल्यामुळें ते खालीं दिले आहेत.

२ पेशवा व ताराबाईः—शाहूमहाराज १७४९ त मृत्यू पावले, परंतु पेशव्यांची शत्रू ताराबाई अजूनपर्यंत जिवंत होती. शाहू निपुत्रीक


असल्यामुळें ताराबाईनें आपल्याच वंशांतील राजारामाला साताऱ्याच्या गादीवर बसवून व आपण स्वत: त्याची संरक्षक होऊन पेशव्यांची शक्ति संपुष्टांत आणावी अशी ती इच्छा करीत होती. तिनें कारस्थान करून पेशव्यांच्या विरुद्ध तटांतील मराठे सरदारांना आपल्या बाजूला वळविलें. बाळाजीला असें वाटलें कीं शिवाजीच्या वंशजाला झुगारणें ह्मणजे सर्व महाराष्ट्र आपल्या विरुद्ध करून घेणें होय. ह्मणून त्यानें रामराजाला राजा मानिलें; परंतु त्याबरोबरच त्यानें शाहूच्या सहीचें एक मृत्यूपत्र दाखविलें, त्यांत सातारा व कोल्हापूरच्या राजांना आपापल्याच इलाख्यांत स्वतंत्र राज्य करण्याचा हुकूम होता व बाकीच्या सर्व प्रदेशांतील राज्यव्यवस्था पेशव्यांच्या हातीं राहावयाची होती. ह्याविषयीं ताराबाई फार जळफळली; तिनें रामराजाला पेशव्यांच्या विरुद्ध उठविलें. परंतु तिचा हा कट फसला, व तिच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठीं पेशव्यानें सैन्याची एक तुकडी साताऱ्यांत ठेविली. ह्या वेळेपासून पेशवा सातारा सोडून पुण्यांत राहूं लागला; त्यामुळें पुणें राजधानी होऊन, तें मराठी राज्यकारभाराचें केंद्र झालें. त्यामुळें राज्यांत रूपान्तर होऊन पेशवे खरे सत्ताधीश झाले व छत्रपति घराणें नामधारी बनलें.

३ **बंगालचे हल्ले**:– नागपूरचा राघूजी भोंसले त्याचप्रमाणें त्याचा सेनापति भास्कर पंडित यानीं सन १७४२ते ५१ पर्यंत बंगालवर चार स्वाऱ्या केल्या, तेव्हां त्याच्यापासून आपलें रक्षण करण्यासाठीं इंग्रजांनीं विल्यम या किल्ल्यासभोंवतीं एक खंदक खणला; त्याला "मराठा खाई" ह्मणतात. तेथील नबाब अलीवर्दीखान त्यानें भोसले आणि पेशवे यां मधील दुहीचा फायदा घेऊन भोसल्यास परतविण्यासाठीं पेशव्याजवळ मदत मागितली. ह्मणून बंगालला जाऊन नानासाहेबानें भोसल्याला तेथून घालवून दिलें. परंतु कांहीं वर्षांनीं भोसल्यास वश करण्यासाठीं पेशव्यानें बंगाल जिंकण्याची त्याला आज्ञा दिली. त्याप्रमाणें भोसल्यानें एका मागून एक हल्ले करुन बंगाल प्रांताचा इतका विध्वंस केला कीं शेवटीं मराठ्यांचें वर्चस्व कबूल करणें अलीवर्दीखानास भाग पडलें व त्यानें भोसल्यास (१) कटक प्रांत (२)


दरसाल १२ लाख रुपये खंडणी व (३) २५ लाख रुपये नगद दिले. या नंतर बंगालवर मराठयांनीं स्वाऱ्या केल्या नाहींत. परंतु लगेच तेथें एक मोठी क्रांती झाली. यामुळें मराठ्यांचें वर्चस्व कमी होऊन तो प्रांत इंग्लिशांचे ताब्यांत गेला.

४ निजामाशीं युद्ध:— निजाम व मराठे शेजारीं शेजारीं असल्यामुळें नेहमीच लढाई करीत असत. तेव्हां मराठ्यांचा कायमचा सूड घेण्यासाठीं निजामानें जंगी तयारी केली. प्रसिद्ध फ्रेंच सेनापती बूसी याला नोकरीस ठेवून त्याच्या हाताखालीं एक फ्रेंच सैन्य दिलें. तेव्हां लहानसहान चकमकी होऊं लागल्या. (क) शेवटीं सन १७५१ त कुकडी येथें लढाई झाली; त्यांत बाळाजी यशस्वी होऊन निजामानें तह केला व २५ लाख रुपये खंडणी देण्याचें कबूल केलें. (ख) पुढें निजाम ही खंडणी देईना. ह्मणून पेशवे व निजाम यांमध्यें युद्धप्रसंग उपस्थित झाला. त्याला सिंदखेडची लढाई ह्मणतात. त्यांत पेशव्यांचा विजय होऊन सन १७५८ त तह झाला व निजामानें २५ लाखांची जहागिरी पेशव्यांस दिली. (ग) सन १७६० त पुन: निजाम सलाबतजंग याजबरोबर उद्गीर येथें तुमुल युद्ध झालें. त्यांत मराठ्यांचा विजय झाला. असीरगड, दौलताबाद, हे निजामाचे किल्ले व बऱ्हाणपूर, विजापूर, अहमदनगर हीं शहरें व ६० लाखांची जहागीर मराठ्यांना मिळाली. दक्षिणेंतील या मुसलमानी राजधान्यांवर शेकडों वर्षांनीं हिंदुपदपादशाहीचा झेंडा फडकल्यामुळें मुसलमानी राज्याचें जीवित नष्टप्राय झालें. उद्गीरचा विजय हा मराठेशाहीचा कळस असून, त्याचें श्रेय बाळाजीलाच आहे.

५ आंग्र्यांची सत्तामोड:— आंग्रे पश्चिम समुद्रावर युरोपियन जहाजें पकडून घेऊन जात; व ते बलाढ्य असल्यामुळें इंग्रज व फ्रेंच यांचें त्यांच्याविरुद्ध कांहीं चालत नसे. त्यांची राजधानी सुवर्णदुर्ग घेण्याचा इंग्रज व फ्रेंचांनीं कित्येक वेळां प्रयत्न केला, पण तो फसला. शेवटीं सन १७५५ त त्यांना संधि प्राप्त झाली. पेशव्यांचें व आंग्र्यांचें आपसांत वैर होतें. तेव्हां या सुमारास आंग्रे बंधूंतील अंत:कलह पाहून त्यांचें निर्दलन करण्यासाठीं, पेशव्यानें इंग्रजांची मदत मागितली. एकीकडून पेशव्यांनीं जमिनीवरून



पाणिपत संग्राम व्यूह.



सवाई माधवराव पेशवे यांचा दरबार.

व दुसरीकडून इंग्रजांनीं समुद्रावरून आंग्र्यांवर स्वारी केली, व त्यांची सुवर्णदुर्ग राजधानी, विजयदुर्ग, बाणकोट व हिंमतगड हे किल्ले काबीज केले. आंग्र्यांविरुद्ध इंग्रजांची मदत घेण्यांत नानासाहेबासारख्या चाणाक्ष पेशव्याची घोडचुक झाली; कारण शिवाजीनें दूर दृष्टीनें निर्माण केलेलें आरमार, अशाप्रकारें त्यानें बुडविलें; व त्यायोगें इंग्रजांना राज्यस्थापनेची सुवर्णसंधि मिळाली.

६ सिद्दीला शह:-- सिद्दीची सत्ता नाहींशी करण्यासाठीं नानासाहेबाच्या जिवाची धडपड चालली होती. कारण थोरल्या शिवाजीचा जंजिऱ्याच्या सिद्दीला जिंकण्याचा संकल्प अद्याप अपूर्ण राहिला होता. सिद्दीनें पेशव्यांच्या पूर्वजांस त्यांच्या जन्मभूमींतून हाकललें होतें. हिंदुपदपादशाहीच्या पोटांत निजाम व सिद्दी हे दोन कांटे होते. शेवटीं १७५८ सालीं पेशव्यांनीं आपलें आरमार पाठवून हबशीला जर्जर केलें, उंधेरी किल्ला घेतला व राजपुरी लुटून जंजिऱ्या-जवळ मोर्चा दिला; परंतु इतक्यांत दिल्लीवर अब्दालीची स्वारी झाल्यामुळें, जंजिऱ्याचा वेढा उठवून सैन्य उत्तरेस पाठवावें लागलें; यामुळें नानासाहेबाचा जंजिरा जिंकण्याचा मनोदय आर्धाच राहिला; परंतु सिद्दीच्या सत्तेचा मात्र मोड झाला. सिद्दी मोंगलांचा दर्यानायक होता; त्यानें व्यापारी जहाजें व पश्चिम किनाऱ्याचीं बंदरें राखावयाचीं होतीं; परंतु पुष्कळ वर्षे त्याला ही कामगिरी मराठे व युरोपीयन आरमारामुळें करतां येईना. तेव्हां बादशहानें इंग्रजांना सिद्दीच्या ऐवजीं पश्चिम समुद्रावर दर्यानायक नेमिलें (१७६०); व आरमाराच्या खर्चासाठीं सुरतेच्या वसूलापैकीं कांहीं भाग व तेथील किल्लेदारी इंग्रजांना देण्यांत आली. याचे परिणाम असे झाले कीं, (१) आंग्रे व सिद्दी यांचा पाडाव होऊन इंग्रजांना पश्चिम समुद्रावर अधिकार मिळाल्यामुळें त्यांना विजयाचा मार्ग मोकळा झाला. (२) त्याच वेळीं पूर्व किनाऱ्यावर फ्रेंचांचा पाडाव करून इंग्रजांनीं आपलें वर्चस्व बसविलें. (३) बंगालमध्येंही याच वेळीं ते राज्यकर्ते होते. (४) उद्गीरच्या लढाईंत निजामाचा पराभव झाल्यामुळें त्यानें मराठ्यांपासून

आपले पुढें रक्षण होण्यासाठीं इंग्रजांचा आश्रय घेतला व उत्तर सरकारचा प्रांत त्यांना देऊन त्यांची सत्ता वाढविली. (५) इतक्यांत पानिपतचें अरिष्ट मराठ्यांवर कोसळलें. अशा प्रकारें आपलें राज्य वाढविण्यासाठीं इंग्रजांना चारही दिशा मोकळ्या झाल्या.

७ पानिपतचे तिसरें युद्ध (१७६१):- आतांपर्यंत असें आढळून आलें कीं (१) मराठ्यांनीं हिंदुस्थानाच्या बऱ्याच भागावर आपली सत्ता बसविली. निजाम, नबाब अलीवर्दीखान, शूजाउदौला व रोहिले यांचा मराठ्यांनीं पराभव केला होता. त्यामुळें राज्य तर राहोच, पण स्वतःचा जीव तरी बचावतो काय या काळजींत ते होते; त्या कारणानें हे सर्व मुसलमान मराठ्यांविरुद्ध होते. (२) शिवाय पूर्वीं सांगितल्याप्रमाणें राघोबानें अब्दालीचा मुलगा तैमूर याला पंजाबांतून हुसकून देऊन अटकेवर आपला झेंडा रोविला होता. तेव्हां त्याचा बदला घेण्यासाठीं अब्दालीनें स्वारी केली. (३) रोहिला सरदार नजीबखान यानें मराठ्यांपासून आपल्या जातीचें रक्षण करण्यासाठीं अब्दालीला बोलाविलें होतें. या प्रकारें सर्व मुसलमान राजांनीं हिंदुपदपादशाही उलथून पाडण्याचा चंग बांधला, तर हिंदुपदपादशाहीचें रक्षण करण्यासाठीं या आततायी मुसलमानांना हाकलून देऊन रूमशाम येथें राज्य स्थापण्याचा मराठ्यांचा इरादा होता. दोन्ही बाजूंनीं लढाईची खूप तयारी केली. चिमणाजी आप्पाचा पुत्र सदाशिवराव व नानासाहेबाचा पुत्र विश्वासराव हे दोघे मोठी फौज घेऊन १४ मार्च १७६० रोजीं पुण्याहून निघाले; आणि भोपाळ, ग्वाल्हेरवरून दिल्लींत आले; वाटेंत दमाजी गायकवाड, यशवंतराव पवार, मल्हारराव होळकर व जनकोजी शिंदे आपल्या सैन्यासह त्यांस मिळाले. त्यांचें रणमैदानांत जमा झालेलें सैन्य ५५००० घोडेस्वार, १५००० पायदळ, २००००० हंगामी शिपाई असें होतें. मराठ्यांनीं दिल्ली काबीज केली; बादशाही सिंहासन फोडलें व कांहीं महालांतील दागिने काढून नेले. नंतर या सर्व सैन्यासह त्यांनीं पानिपतावर १ नोव्हेंबर सन १७६० रोजीं तळ दिला. अब्दालीच्या फौजेंत ४२००० घोडेस्वार, ३८००० पायदळ असे शेलके शिपाई असून ७० तोफा होत्या; शिवाय इतकेच हंगामी शिपाई होते.

दोन्ही सैन्यामध्यें नेहमींच चकमकी होत. शेवटीं १४ जानेवारी १७६१ रोजीं, प्रातःकालचे दोन घटका दिवसास, युद्धास आरंभ झाला. या वेळची सैन्यांची रचना सोबतच्या चित्रांत आहे. हें युद्ध तीन प्रहर पर्यंत चाललें. प्रथम मराठ्यांची सरशी झाली; परंतु त्यांना विसांवा घेण्यास सवड सांपडेना. इतक्यांत विश्वासराव गोळी लागून पडला, त्याबरोबर सदाशिवरावाला त्वेष येऊन तो गर्दीत सामील झाला, व शौर्यानें लढत असतां मेला. याच सुमारास अहमदशहानें आपल्या ताज्या दमाच्या शिपायांनिशीं हल्ला केला. तेव्हां गायकवाड, शिंदे, व होळकर यांनीं आपल्या सैन्यासह माघार घेतली. त्याबरोबर सर्वत्र पळापळ सुरू झाली. विजयी मुसलमानी सैन्यानें सर्वांचा पाठलाग करून, व एकेकाला गाठून मारिलें. पानिपतमध्यें मागें राहिलेल्या पुरुष, बायका, व मुलें यांपैकीं पुष्कळांना मारिलें, व जिवंत असलेल्यांना गुलाम केलें. अशा रीतीनें या घोर संग्रामाचा शेवट झाला.

पराजयाचीं कारणें अशीं सांगतां येतील कीं, [१] सदाशिवरावाचें वर्तन उद्दाम होतें, व गर्विष्ठपणानें अनुभवी लोकांची हितकर सल्ला त्यानें ऐकिली नाहीं. [२] मराठ्यांची जुनी छापे घालण्याची गनिमी रीत त्यानें सोडून व पानिपतच्या मैदानांत तळ देऊन त्यानें युद्ध केलें. [३] नुसत्या सैन्यानिशीं जाण्याऐवजीं त्यानें बुणगे बरोबर घेतले होते, त्यांचा रणांत फारसा उपयोग नव्हता. [४] जातीजातींतिल मत्सरामुळें मराठी सैन्यांत एकी नव्हती. [५] दिल्लीचें तख्त व मोंगल दिवाणखान्याचें छत फोडल्यामुळें, तेथील लोक सदाशिवरावाविरुद्ध झाले. [६] त्याला लढाईचा पुरेसा अनुभव नव्हता. [७] त्यानें जाट व रजपूत यांना दुखविलें; त्यामुळें हे दोघेही मराठ्यांची बाजू सोडून युद्धाचे पूर्वींच परत गेले (८) एवढी प्रचंड फौज त्याला अडीच महीने पोसावी लागली; शिवाय अन्नाचा व पैशाचा पुरवठा त्याला वेळेवर झाला नाहीं, त्यामुळें त्याच्या सैन्याची उपासमार होऊं लागली. (९) अब्दालीप्रमाणें ताज्या दमाची फौज त्यानें मागें मदतीस ठेविली नाहीं. (१०) आगाउ ठरविलेली व्यवस्था एकाएकीं बदलणें, प्रत्येकाला आपल्या इच्छेप्रमाणें लढण्याचीं परवानगी देणें व त्यामुळें

सैन्यांतील शिस्तीचा व एकात्मतेचा अभाव, आणि विश्वासराव पडल्यानंतर सेनापतीचें काम सोडून स्वतः रणांत आवेशानें घुसणें या सदाशिवरावाच्या तीन अक्षम्य चुका होत. अशा प्रकारच्या कांहीं पूर्व व कांहीं तात्कालिक कारणांमुळें मराठ्यांचा पराभव झाला.

या युद्धाचे कांहीं दारूण परिणाम असे झाले — [१] या युद्धांत दोन लाख मराठ्यांची आहुती पडल्यामुळें प्रचंड संहार झाला. दक्षिणेंतील प्रत्येक घरांत मृत्यूशोक सुरू होता. [२] या संग्रामासाठीं मराठ्यांस सहा कोटी रुपये खर्च झाला; व ते रणक्षेत्रांतून पळाल्यामुळें त्यांची सर्व जिनगी अब्दालीस मिळाली. यामुळें महाराष्ट्राची आर्थिक स्थिती हलाखीची झाली. [३] शिवाय या घोर पराजयामुळें हिंदुपदपादशाही विस्तृत करण्याच्या आशेचा पर्वत पार ढांसळून गेला. [४] झालेला तोटा भरून काढण्यासाठीं मराठ्यांना कित्येक वर्षे मुलूखगिरी करितां येईना, त्यामुळें बंगालमध्यें राज्यस्थापना करण्यासाठीं इंग्रजांना योग्य संधि मिळाली, निजाम व हबशी यांना दम मिळाला, हैदरअलीनें ह्मैसुरांत आपलें राज्य स्थापन केलें आणि सुजाउद्दौला व रोहिले मराठ्यांच्या कचाटींतून सुटले.

या युद्धाचे कांहीं **हितावहही परिणाम** झाले. सदाशिवरावाचा जरी या युद्धांत बळी पडला; तरी यांतील विपत्तींतून धडा मिळून नाना फडणवीस व महादजी शिंदे हे दोन राष्ट्रकर्ते पुरुष राजकारणाच्या क्षितिजावर उदयाला आले. शिवाय या युद्धामुळें मराठ्यांचा लौकीक वृद्धींगत झाला. कारण इतर मुसलमानांप्रमाणें गुप्त कट करीत न बसतां ते हिंदवासीयांसाठीं व राष्ट्र रक्षणासाठीं परदेशीयांशीं निकरानें लढले; आणि पराभूत होऊनही त्यांनीं बराच विजय मिळविला. कारण अफगाण या नंतर केव्हांही हिंदुस्थानच्या वाटेस गेले नाहींत. या युद्धांत अब्दालीलाही ह्मणण्यासारखा कांहीं फायदा झाला नाहीं दिल्लीचा—बादशहा झाला नाहीं, पंजाब प्रांतही त्याला मिळाला नाहीं; व बाबरप्रमाणें त्याला हिंदुस्थानांत राहतांही आलें नाहीं.

बाळाजी बाजीरावाचा मृत्यूः—पानिपतच्या युद्धानें मराठ्यांची सत्ता सर्वस्वी नष्ट झाली नाहीं. सात वर्षांनीं पुनः मराठ्यांनीं डोकें वर उचललें व ते विजय मिळवूं लागले. या युद्धानें मराठ्यांच्या प्रगतीला फक्त धक्का बसला. पण या पराजयाचा पेशव्याच्या मनावर अनिष्ट परिणाम झाला व आधींच तो आजारी असल्यामुळें त्याची विकृति विकोपास जाऊन तो पर्वतीस सन १७६१ मध्यें वारला.

नानासाहेबाच्या कारकीर्दीत पेशवाई कळसास पोंचून तिला उतरती कळा सुरू झाली. इतउत्तर नानासाहेबानंतरच्या पेशव्यांचा इतिहास इंग्रजांच्या इतिहासाशीं निगडीत असल्यामुळें तो तिसऱ्या भागांत दिला आहे.

संस्मरणीय काळ

इ. स.

७१२ महंमद बिन कासीमची स्वारी

१०००-१०२७ महमुदाच्या स्वाऱ्या.

१०२६ महमुदाची सोमनाथावर स्वारी

११९३ पानीपतचें युद्ध.

१२०६ कुतुबुद्दीन ऐबक दिल्लीचा राजा झाला.

१२२१-२२ मोंगलांची स्वारी.

१२९४ अलाउद्दीनानें दक्षिणेवर स्वारी केली.

१२९७ अलाउद्दीनाची गुजराथवर स्वारी.

१३०३ अलाउद्दीनानें चितोडची जाळपोळ केली.

१३३६-३७ विजयनगरच्या राज्याची स्थापना.

१३४७ जाफरखान बहामनीनें दक्षिण हिंदुस्थानांत स्वतंत्र राज्य स्थापन केलें.

१३९८ तैमुरची स्वारी.

१४६९ गुरु नानकाचा जन्म.

१४७७ दिल्लीचा बादशहा बहलोल लोदीनें जौनपूर काबीज केलें.

१४८१ महमूद गावन बहामनी वजीर याचा वध झाला.

१५२६ पानीपतच्या लढाईंत इब्राहीम लोदीचा पराभव.

१५२७ खान्वाच्या लढाईंत राणासंग याचा पराभव.

इ. स.

१५३९ हुमायुनाचा चौसा येथें पराभव

१५४२ अमरकोटास अकबराचा जन्म

१५५६ जानेवारींत हुमायुनाचा अंत; फेब्रुवारींत अकबराचें राज्यारोहण व नोव्हेंबरांत पानीपतच्या लढाईंत हिमूचा पाडाव.

१५६२ अकबरानें जिझीया कर बंद केला.

१५६५ तालीकोटच्या लढाईंत विजयनगरच्या राजाचा पराभव विजयनगरचा विध्वंस.

१५६९-७६ फत्तेपूर सीक्री नांवाचें शहर अकबरानें बांधलें.

१५७६ बंगालच्या सुभेदाराचा बीमोड व हळदी घाटाच्या लढाईंत राणाप्रतापाचा पराभव.

१५८२ दीनइलाहीची स्थापना.

१६०० अहमदनगरचा विजय.

१६०८ हॉकिन्सचें सुरतेस आगमन.

१६१५-१८ जहांगीरचे दरबारी इंग्रजांचा वकील सर थॉमस रो आला.

१६२७ शिवाजीचा जन्म.

१६३२--४७ ताजमहालचें बांधकाम.

१६५९ शिवाजीनें अफझुलखानाचा वध केला.

१६६४ शिवाजीचा सुरतेवर हल्ला.

इ. स.		इ. स.	
१६७४	शिवाजीचा राज्याभिषेक.	१७१३	बाळाजी विश्वनाथास पेशवाई मिळाली.
१६८०	शिवाजीचा मृत्यु; संभाजी गादीवर बसला; व औरंगजेबाचें दक्षिणेस प्रयाण.	१७२०	बाळाजी पेशव्याचा मृत्यु; व बाजीरावास पेशवाईची वस्त्रें मिळालीं.
१६८१	शहांजादा अकबर रजपूतांस मिळतो.	१७३९	नादिरशहाची स्वारी.
१६८६	विजापूर काबीज करण्यांत येतें.	१७४८	अहमदशहा अब्दालीची हिंदुस्थानवर प्रथम स्वारी.
१६८७	गोवळकोंडा खालसा करण्यांत आलें.	१७६०	उद्गीर येथें मराठ्यांचा विजय
१६८९	संभाजीचा वध	१७६१	पानीपतचें तिसरें युद्ध.
१६९०–९८	जिंजीचा वेढा.	१८०३	इंग्रजांचा अंमल.
१७०७	औरंगजेबाचा मृत्यु.	१८५७	मोंगल बादशाहीची अखेर.
१७१०	कोल्हापूरच्या गादीची स्थापना		

संस्मरणीय गोष्टी.

मुसलमानी रियासत.

प्रकरण १ लें.

१ हिंदुस्तान जिंकण्यासाठीं मुसलमानांनीं केलेल्या आरंभींच्या हल्ल्यांचें थोडक्यांत वर्णन; कासीमची सिंधवरील स्वारी. २ महमुदाच्या स्वारीच्या आरंभीं हिंदुस्तानाची राजकीय परिस्थिति; महमुदाचें चरित्र; हिंस्ताना-वरील त्याच्या स्वारीचीं कारणें, धोरण व परिणाम; त्याच्या महत्वाच्या स्वाऱ्यांचें वर्णन. ३ घोरीच्या स्वारीच्या वेळीं हिंदुस्थानची स्थिति; घोरीच्या स्वारीचीं कारणें व त्याचे परिणाम; घोरी व पृथ्वीराज आणि जयचंद यांच्या युद्धाचें वर्णन. ५ महमुद व घोरी यांची तुलना

प्रकरण २ रें

१ कुतुबुद्दीन, अल्तमश, रझीया, बल्बन, कैकुवाद यांची संक्षिप्त कारकीर्द; २ मोंगल व दिल्लीचे सुलतान यांच्या मधील १२९० पर्यंत

युद्धाचें वर्णन. ३ अल्लाउद्दीनच्या राज्यविस्ताराचें क्रमवार वर्णन, त्याचें रजपुतांशीं युद्ध व त्याच्या कारकीर्दीचें सिंहावलोकन;

प्रकरण ३ रें

१ महंमदशहा, गयासुद्दीन, फिरोजशहा तघलक यांची कारकीर्द; महमदशहाच्या राज्यविस्ताराचा क्रम व विस्तार, तघलक वंशाच्या अवनतीचें कारण. २ तैमूरच्या स्वारीचें कारण, वर्णन व परिणाम. ३ लोदी सुलतानांविषयीं माहिती;

प्रकरण ४ थें

१ जौनपूर, गुजराथ व माळवा या स्वतंत्र राज्यांचें संक्षिप्त वर्णन बहामनी राज्याच्या उत्कर्षापकर्षाचीं कारणें, प्रसिद्ध बहामनी सुलतानांची कारकीर्द, बहामनी राज्याचे पांच विभाग व प्रत्येक राज्याचें थोडक्यांत वर्णन. २ विजयनगरच्या प्रसिद्ध राजांची कारकीर्द, विजयनगर राज्याचे विशेष; तालिकोटचें युद्ध व त्याचे परिणाम. ३ अनंगपाल, विशालदेव व पृथ्वीराज यांच्या विषयीं माहिती;

मोंगल साम्राज्य.

प्रकरण १ लें.

बाबरचें चरित्र, बाबरचे स्वारीचे वेळीं हिंदुस्थानची राजकीय परिस्थिति; बाबरच्या हिंदुस्थानावरील आरंभींच्या स्वाऱ्या, पानिपतचें युद्ध व बाबरच्या विजयाचें कारण; राणा संगाचें चरित्र; सीक्री व खानवाच्या युद्धाचें कारण, वर्णन व परिणाम; बाबरचे इतर विजय; बाबरची राज्यव्यवस्था.

प्रकरण २ रें.

हुमायुनाच्या १५४० पर्यंतच्या राज्यकारभाराचें थोडक्यांत वर्णन; हुमायुनाचा परदेशवास व दिल्लीचें राज्य पुनः प्राप्त करण्याची खटपट; हुमायून व शेरखानामधील युद्धें, हुमायुनाच्या पराजयाचें कारण.

प्रकरण ३ रें.

शेरशहाचा उदय, त्याची मुलुखगिरी, त्याची राज्यसुधारणा व त्याच्या कारकीर्दीचें सिंहावलोकन; शेरशहाला पहिला राष्ट्रकर्ता ह्मणण्याचें कारण.

प्रकरण ४ थें.

हिमू व अकबर यांमधील पानिपतच्या दुसऱ्या युद्धाचें वर्णन व त्याचे परिणाम. अकबराच्या कारकीर्दीच्या आरंभीं हिंदुस्थानची राजकीय परिस्थिति, त्याच्या मार्गांतील आरंभींच्या अडचणी, बहिरामखानाचा स्वभाव व कारकीर्द; अकबराचे क्रमवार विजय; त्याचा राज्यविस्तार; त्याचा चितोड व अहमदनगरचा विजय; राणाप्रताप; अबुलफजल, फैजी, बिरबल, तोडरमल, मानसिंग, चांदबीबी यांचें चरित्र; अकबरचें धार्मिक धोरण; अकबरची एलिझाबिथ व अशोक बरोबर तुलना; हिंदूंशीं वागणुक; अकबरची राज्यव्यवस्था, करवसुली, जमीनमहसूल, लष्करी; न्यायव्यवस्था; त्याच्या वेळचें वाङ्मय कलाकौशल्य व शिल्प; त्याची कामगिरी; त्याचा आचार व व्यवहार, अकबराला राष्ट्रकर्ता ह्मणण्याचें कारण.

प्रकरण ५ वें,

जहांगिरचे गुणदोष, आरंभींचे कायदे, रजपुतांशीं व दक्षिणेतील युद्धें. नूरजहान, शहाजहान व महाबतखान यांमधील संबंध. नूर-जहानची कामगिरी; सर टामस रोनें केलेलें हिंदुस्थानचें वर्णन.

प्रकरण ६ वें.

शहाजहानच्या मुलांचे स्वभाव, राज्यप्राप्तीसाठीं त्यांचीं युद्धें; शहाजहानला वैभवशाली व त्याच्या कारकिर्दीस सुवर्णयुग ह्मणण्याचें कारण; त्याच्या कारकिर्दीतील महत्वांचीं युद्धें.

प्रकरण ७ वें.

औरंगजेबाचीं विजापूर व गोवळकोंडा या राज्यांशीं युद्धें; त्याचें रजपूतांशीं युद्ध; हिदूंवर जुलूम; हिदूंचीं बंडें; राज्यविस्तार, न्याय व्यवस्था; एक तंत्री राज्य; अकबर व औरंगजेबाची तुलना. त्याच्या राज्य-कारभाराचें सिंहावलोकन.

प्रकरण ८ वें.

बहादुरशहाची कामगिरी; फर्रुखसीयरची कारकीर्द; सय्यद बंधूंची कारकीर्द; महंमदशहाच्या कारकीर्दीच्या दुर्बलतेचें कारण; त्याच्या

कारकीर्दीचें सिंहावलोकन; नादिरशहाच्या स्वारीचें कारण, वर्णन व परिणाम; अब्दालीच्या स्वाऱ्यांचे कारण, वर्णन व परिणाम.

प्रकरण ९ वें.

गुरू नानक, अर्जून, गोविंदसिंग, व बंदा यांची संक्षिप्त माहिती.

प्रकरण १० वें.

औरंगजेबाच्या दक्षिणेतील पराभवाचीं कारणें; मोंगल साम्राज्याच्या ऱ्हासाचीं कारणें; मुसलमानी अंमलाचें सिंहावलोकन.

मराठी रियासत.

प्रकरण १ लें

१ शिवाजीच्या पूर्वीची महाराष्ट्राची राजकीय परिस्थिति, मराठी राज्याच्या उदयाचीं कारणें; शहाजीचें संक्षिप्त चरित्र.

प्रकरणें २ ते ८

१ शिवाजीचें बालपण, त्याचे आरंभीचे विजय, प्रतापगडच्या युद्धाचें कारण, वर्णन व परिणाम; बाजी घोरपडे, बाजी प्रभु, नेताजी पालकर, तानाजी मालुसरे यांची माहिती, मोंगलांशीं झालेल्या शिवाजीच्या युद्धाचीं कारणें; त्यांचा क्रम व परिणाम, पुरंदरचा तहनामा, राज्याभिषेकाचा परिणाम, कर्नाटकाच्या मोहिमेचीं कारणें, वर्णन व परिणाम, शिवाजीचा इंग्रजांशीं संबंध, त्याची न्यायव्यवस्था, कर, जमीनमहसूल; शिवाजीची लष्करी व्यवस्था व त्याची कामगिरी; त्याच्या थोरवीचें कारण; २ शिवाजीचा स्वभाव आणि योद्धा व राज्यकार्य धुरंधर या नात्यानें त्याची योग्यता; ३ बाळाजी विश्वनाथ व बाजीराव पेशवे यांची माहिती; ४ सर्व पेशव्यांत कोणता पेशवा श्रेष्ठ व तें कां; ५ बाळाजी बाजीरावाच्या राज्यकारभाराचें वर्णन; ६ बाळाजी बाजीरावाच्या कारकीर्दीत मराठी सत्तेचा कळस झाला, व मोठा आघात प्राप्त झाला.